बहरहाल! इन सभी कवियों से महाकवि रामधारी सिंह दिनकर का राष्ट्रीय चेतना का स्वर भिन्न है। उन्होंने आरंभ से ही ओज और तेज से परिपूर्ण कविताएं लिखी। बालकृष्ण शर्मा 'नवीन ' राष्टीय काव्य चेतना को अंगीकार करते नजर आते हैं। बचपन से ही दिनकर में राष्ट्रीयता की भावना कूट-कूट कर भरी पड़ी थी। पढ़ाई के दिनों में उन्होंने स्वयं अंग्रेजी स्कूल से अपना नाम कटवा लिया था। युवाआवस्था के दिनों में जब घर गर्दीश दिनों से गुजर रहा था तब उन्होंने सामंती/पूंजीपति व्यवस्था के विरोध में सरकारी स्कूल की नौकरी का इस्तीफा देकर सत्ता और देशप्रेम में देश के साथ खडे हो गये |इसीकारण हिंदी काव्य/साहित्य में राष्ट्रकवि का दर्जा सिर्फ दो ही कवियों को प्राप्त है। प्रथम मैथिलीशरण गुप्त तथा द्वितीय रामधारी सिंह दिनकर। दोनों कवियों के रचना और विशेषताए/पृवत्तियाँ में अंतर है। राष्ट्रवादी चेतना की जो काव्य परंपरा चली आ रही थी उसे और तीव्र एवं प्रखर बनाने का कार्य रामधारी सिंह दिनकर ने ही किया।

राष्ट्रवादी चेतना को पोषित करने वाली हुंकार, रेणुका, सामधेनी, कुरुक्षेत्र, रश्मिरथी, पशुराम की प्रतीक्षा आदि रचनाए उन्होने प्रकाशित की। जिसमें दिनकर ने आर्थिक ,सामाजिक और धार्मिक समस्याओं की अपेक्षा देश की स्वतंत्रता प्राप्ति के लिए क्रांति एवं विद्रोह का सिंहनाद करते हुए जन जागरण के भावना को ही सर्वाधिक महत्व प्रदान किया है। कवि दिनकर भिखारिणी सुकुमारी मिथिला को याद करके करूणा के आँसू बहाकर वर्णन करता है।

''पैरों पर ही है पड़ी हुई

मिथिला भिखारिणी सुकुमारी

तू पूछ कहाँ इसने खोई

अपनी अनंत निधियाँ सारी।।'' 8

वस्तुतः राष्ट्रीय संचेतना को झकझोरने वाला काव्यजन मानस को आन्दोलित कर नैतिक मूल्यों को स्थापित करने का साहस भरताहै। राष्ट्रीय भावना की सृजनात्मक पक्ष मानवता वादीरहा है।

निष्कर्ष -

20 वीं शताब्दी के आरम्भ में जब स्वाधीनता संग्राम में तीव्रता आ गई थी, उसी के परिणाम स्वरूप हिन्दी कविता में राष्ट्र प्रेम, देशभक्ति आदि विषयों की प्रधानता हो गई। हिन्दी कवि नवजागरण से प्रभावित हुए। इसी से प्रभावित होकर कवियों ने राष्ट्रीयता के गीत गाए। किसी भी देश का साहित्य वहाँ की राजनैतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आदि परिस्थितियों के परिणामस्वरूप बनता व बदलता है।'' साहित्य का मानव जीवन से चिरंतन सम्बन्ध है। साहित्य का स्रष्टा मनुष्य है और मनुष्य के लिए ही साहित्य की सृष्टि है।हिन्दी कविता में राष्ट्रीयता की भावना प्रमुख रही है। राष्ट्रीय सांस्कृतिक पुनरोत्थान में कवि मैथिलीशरण गुप्त की 'भारत - भारती' पुस्तक नवजागरण की अग्रदूत है। इसमें देश के अतीत गौरवगान से लेकर देशप्रेम की भावना का वर्णन मिलता है। मैथिलीशरण गुप्त पर गांधीवाद का जबरदस्त प्रभाव पडा था। यह राष्ट्रीय भावना के ओजस्वी कवि हैं-

"तोड़ लेना वनमाली उस मुझे पथ पर देना तुम फेंक ।

मातृभूमि पर शीश चढ़ाने जिस पर जावें वीर अनेक।।"9

राष्ट्रीय कवि माखनलाल चतुर्वेदी एक तरफ स्वाधीनता हेतु क्रांतिकारी धारा से जुड़े थे तो दूसरी तरफ उनकी रचनाओं में क्रांतिकारी विचारधारा का वर्णनमिलता है ।

संक्षेपमें गोबिन्द राम शर्मा के अनुसार- "जातियां राष्ट्र के व्यक्तियों के एक साथ मिलकर रहने और सामूहिक रूप से अपने देश को उन्नत बनाने की इच्छा ही राष्ट्रीय भावना कहलाती" अत :हिंदी काव्य में राष्ट्रीय चेतना के स्वरके अंतर्गत विविध विषेशताएं दिखाई देते हैं भारत महिमा वर्णन, अतीत का गौरवगान, राष्ट्रप्रेम, अग्रेजोके प्रति विद्रोह के स्वर हिंदी काव्य में दिखाई देते हैं|

संदर्भ सूची-

1.हिन्दी कविता में राष्ट्रीय भावना, विद्यानाथ गुप्त,

2. http://www.anubhuti-hindi.org

3. जयशंकर प्रसाद , चंद्रगुप्त , दूसरा अंक

4.इकबाल ,वतन केगीत ,विनोद पुस्तक मंदर ,आगरा

5. निराला , गीतिका

6.कविता का आधुनिक परिप्रेक्ष्य, मत्स्येन्द्र शुक्ल,

7. मैथिलीशरण गुप्त , भारत-भारती

8.रामधारी सिंह दिनकर रेणुका

9.मधुमती-सितम्बर 2006,

वैश्विक परिदृश्यातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन

अजय श्रीराम मुरमुरे

संशोधक विद्यार्थी, (स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड)

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर

प्रस्तावना :

आदिवासी संस्कृती ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. या संस्कृतीकडे समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. आदिवासी समाज हा भारतभर अनेक ठिकाणी विखुरलेला आहे. ज्या भौगोलिक प्रदेशात जी आदिवासी जमात राहते, त्या ठिकाणची गुणवैशिष्ट्ये त्यांच्यामध्ये आपणास पहावयास मिळतात. त्यांची जीवन जगण्याची पद्धत, त्यांचे राहणीमान, भाषाशैली, अन्न, रूढी-परंपरा नितीनियम या गोष्टींमध्ये थोडीफार विविधता आढळते. आदर्श जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आदिवासी साहित्यातील संस्कृतीचा आढावा घेताना त्यांच्या पारंपरिक पोशाख, घरांची रचना, विवाह पध्दती, जातपंचायत, दारूची प्रथा, देवदेवता, अंत्यसंस्कार यांची माहिती घेण्यात आलेली आहे.

पारंपरिक पोशाख :

आदिवासी जमातीतील स्त्री, पुरुषांच्या पोशाखाच्या बाबतीत आजही या लोकांची खिल्ली उडविली जाते.झाडाची पाने अंगाला गुंडाळणारा माणूस म्हणजे आदिवासी. अशी त्याची ओळख देत असताना, आजची परिस्थिती व त्यांच्यात होत असलेला बदल हा आपल्याला लक्षात घ्यायला भाग पाडते.आज परिस्थिती बदललेली आहे, हे आपणास दिसून येते. आदिवासी जमातीच्या आंध जमातीतील पुरुषाचा पोशाख हा धोतर, कुडता व पागोटे असा पेहराव असतो. लाल रंगाच्या पागोट्याच्या जागी आता टोपी आणि पांढरी पागोटी वापरतात. स्त्रिया हया नऊवारी लुगडी नेसतात आणि अंगात चोळी घालतात. पुरुषाच्या हातात अंगठी, कडा व कानात बाळी असते, तर स्त्रिया बांगड्या, जोडवी, गळयात मंगळसूत्र, एकदाणी, गोट, कोपरखळया इत्यादी दागिने परिधान करतात. प्रत्येक जमातीचा पोशाख हा वेगळा असून त्यातील बदलही वेगळे आहेत. आता आधुनिक पोशाखातला आदिवासी पाहिल्यानंतर हा आदिवासी आहे ?असे ओळखणे कठीण झाले आहे. काही पुढारलेल्या जमातींमध्ये असे आधुनिक पोशाख पाहायला मिळतात. चांगला पोशाख परिधान करणे, दाग-दागिने घालून प्रस्थापित समाजासारखे मिरवण्याची हौस मात्र आदिवासींमध्ये दिसत नाही. अंगावर गोंदवून घेण्याची प्रथा ही आदिवासींमध्ये सर्रास आढळते.आजही काही ठिकाणी मात्र काही जमातीमधील लोकं दारिद्र्यामुळे अर्धनग्न पाहायला मिळतात.

घरांची रचना :

समाजातील प्रत्येक घटकांना अन्न, वस्त्र आणि निवारा या मुख्य मानवाच्या गरजा आहेत. याशिवाय तो जगू शकणार नाही. त्याला राहण्यासाठी घराची आवश्यकता भासते. पूर्वीचे आदिमानव आदिवासी, गुहेमध्ये राहत होते, नंतर त्याला घराची गरज वाटू लागली आता तो घरात राहत आहे. आदिवासी जमातीची बांधलेली घरे ही कुडाणाची, कच्चा विंटाची, चिखलमातीने लिंपलेली, गवताचे किंवा कौलाचे छप्पर असलेली घरे बांधलेली दिसता. पूर्वी माणसांच्या घराला लागून जनावरांचा गोठा असायचा आजही ग्रामीण भागात हे आपणास पहावयास मिळते. काही ठिकाणी ती वेगवेगळी दिसतात. त्यांची घरे छोटीशी असतात दोन दरवाजे असतात परंतु खिडक्या

नसतात.आदिवासी प्रत्येक जमातीतील लोकांची घरे त्यांची रचना ही वेगवेगळी आहेत. आदिवासी लोंकाच्या घरामध्ये तवा, वाटी, सूप, तांब्या, परात, लोटा, बादली थाळी, गंज, कंगी, उखळ इत्यादी गृहोपयोगी वस्तू दिसतात. आज यामध्ये काही प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. पत्राच्या, सलापाच्या घरामध्ये राहतांना हया जमातींची लोकं दिसतात. परंतु आजही जंगल, दरी, डोंगराळ, ग्रामीण भागात हा समाज झोपडीतच आपले वास्तविक जीवन जगत आहे.

विवाह पद्धती :

आदिवासी जमातीतील विवाहाची पद्धत ही इतर समाजापेक्षा थोडी वेगळी असते. प्रत्येक जमातीमध्ये लग्न ठरविण्यापासून ते लग्नाचे सर्व कार्यपार पाडेपर्यंतच्या सर्व विंधीना फार महत्व दिले जाते. पूर्वी लग्नाचा सोहळा सोयी-सुविधा अभावी आठ-दहा दिवस चालत असायचा. परंतु अलिकडच्या काळामध्ये सोयीयुक्त दळण वळणाच्या सोयी झाल्यामुळे व महागाई वाढल्यामुळे हा लग्न विधीचा सोहळा तीन दिवसांचाच राहिला आहे. विवाहाच्या पद्धतीमध्ये वडिलधा-यांनी ठरवून केलेला विवाह, तरुण-तरुणीने एकमेकांना पसंद करून पळून जाऊन केलेला प्रेमविवाह, मुलाला मुलगी पसंत पडली म्हणून, सक्तीने मुलीला पळवून नेऊन केलेला विवाह आणि विधवा विवाह म्हणजे पती मृत्यू पावलेल्या स्त्रीशी केला जाणारा विवाह असे चार प्रकार आहेत. अशा प्रकारची आदिवासी जमातीमध्ये लग्नपद्धती आढळते. आदिवासी जमातीतील साम्यभेद लक्षात घेता काही गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. मावस भावंडांशी विवाह हा निषिद्ध मानला जातो.बहुपत्नीत्वास मान्यता असून ज्यांच्याकडे पैसा आहे, तोच एकापेक्षा जास्त लग्न करू शकतो. पूर्वी बालविवाह होतहोते आता मात्र मुलगा-मुलगी वयात आल्यावरच लग्न केली जातात.

जातपंचायतीचा निर्णय :

आदिवासी जमातीमध्ये आप-आपसात जास्त प्रमाणात भांडण तंटे होत नाहीत. भारतीय समाजाच्या तुलनेत आदिवासी कोर्टकचे-या करण्यास भीत असतात. कोर्टाची पायरी चढणे ही गोष्ट त्यांच्या मनाला भेडसावत असते. त्यामुळेच हा समाज कोर्टाच्या पायरीपासून दूर राहणे स्वीकारतो.आप-आपसात जर भांडण तंटे झाली असता ती गावातच मिटविली जातात. त्यासाठी जातपंचायतीमधील मुख्य माणसाला प्रत्येक जमातीत वेगवेगळया नावाने संबोधतात. अध्यक्ष, मुखिया, महाजन्या, नाईक, म्हतेरा, मोहतरिया इत्यादी नावाने ओळखले जाते. जातपंचायतीच्या मुख्य माणसाचा निर्णय हा सर्वांना मान्य करावा लागतो.एखादया वेळेस गावातील आदिवासी जमातीतील काही कारणाने होणारी भांडणे जशी दारू पिऊन शिविगाळ करणे, शेतजमिनीच्या वादातून भांडणकरणे, मुक्या जनावरांचे नुकसान करणे, विनाकारण मारहाण करणे, घटस्फोट घेणे, विवाहामध्ये तडजोड करणे अशा काही विविध घटनांवर जातपंचायत न्यायनिवाडा करीत असते. आंध जमातीत पूर्वी पंचायतपद्धत प्रचलित होती. त्यामध्ये परंपरागत प्रमुख पद हे जमातीतील ज्येष्ठ व्यक्तीकडे असायचे. त्यास 'मोहतरिया' म्हणत. स्वातंत्र्योत्तर काळात आंध जमातीतून राजकीय नेतृत्व उदयास आल्याचे दिसून येते. यामुळे जमातीतील तरुण पिढी राजकारणात सक्रीय होत आहे.यामध्ये काही प्रमाणात स्त्रियांचाही सहभाग आहे. जमातीत शिक्षणाच्या वाढत्या महत्त्वामुळे त्यांच्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल होताना दिसत आहेत.

दारुची प्रथा :

आदिवासी समाज आणि दारू हे एक त्यांचे दृढ समीकरण मानले जाते.दारू ही त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. आदिवासी समाजातील बहुतांश लोकांना त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाला दारू ही लागतेच. दारू हे व्यसन म्हणून नाही तर त्यांची गरज म्हणून ती घेतात. आदिवासी जमातीच्या प्रत्येक कार्यक्रमाला दारू ही असतेच. आदिवासींच्या दारू संदर्भात डॉ. ठाकरे राजेंद्र आपले मत व्यक्त करतांना म्हणतात की ''अपत्य जन्म, लग्न सोहळा, पीक काढण्याचा प्रसंग, नातेवाईक भेटण्याचा प्रसंग अशा विविध प्रसंगी समूहाने जेव्हा-जेव्हा एकत्र येते तेव्हा तेव्हा 'सामूहिक मद्यपान' मोठया आनंदात केले जाते. जन्मापासून ते मृत्यूच्या शेवटच्या घटनेपर्यंत दारूचे महत्त्व आदिवासी संस्कृतीमध्ये महत्त्वाचे आहे. आदिवासींच्या देवालाही दारू प्रिय असते, अपत्य जन्मताच त्याच्या मुखात दारू सोडली जाते. प्रसूती होणाऱ्या स्त्रीला सुद्धा प्रसूतिच्या वेदना कमी होण्यासाठी दारुचा वापर केला जातो. दारूला आदिवासी संस्कृतीत खूप महत्व असले तरी मद्यपानामुळे आदिवासीचे खूप नूकसान होताना दिसते. अनेक भांडणाचे कारण दारूच आहे. आदिवासींमध्ये मद्यपानाच्या माध्यमातून समूह मनाचा एकोपा पूर्वी दिसत होता. आता दारू व्यसन झाले आहे.१'' महुआच्या फुलापासून बनवलेली दारू ही औषधी समजली जाते.

देवदेवतांच्या उपासनापध्दती :

आदिवासी समाज हा निसर्गाच्या सान्निध्यात राहत आलेला असून आजही तो जंगल द-यात, डोंगराळ भागात आपले जीवन जगत आहे. या समाज, घटकाला जगण्यासाठी अनेक गोष्टी हया निसर्गातूनच मिळतात. त्यामुळे हा समाज निसर्गावर मनापासून प्रेम करीत आला आहे. त्यातील कित्येक घटकांना त्यांनी तर देवत्वच, बहाल केलेले दिसून येते. यामध्ये नदी,चंद्र, सूर्य प्रामुख्याने दिसून येतात. नदी ही दैवत्त्व प्रामुख्याने दिसून येते. द-याखो-यात राहणा-या, व अज्ञानात भरकटलेल्या आदिवासींच्या देवधर्माबद्दलच्या कल्पना हया त्यांच्या स्वतंत्र अशा दिसून येतात. यामध्ये आसरा, सर्पदेव, वेताळदेव, डोंगरदेव, धानदेव, वाघदेव इ. आदिवासींचे देव आहेत. त्यांचा समाज आजही पूजा अर्चना करताना पहावयास मिळतो. काही देवीचे उपासकहीते आहेत. आदिवासी समाज हा शिक्षित नसल्यामुळे तो अनेक अंधश्रद्धा पाळतांना दिसतो. त्याच बरोबर तो तितकाच धार्मिक सुद्धा आहे, निसर्गावरच देवाप्रमाणे प्रेम करतात, अग्नीची पूजाही करतात. भुतेखेते, चेटकिणी, डाकिणी यांच्यावरही त्यांचा विश्वास आहे. अलीकडच्या काळात हिंदू धर्माच्या प्रभावामुळे हिंदूच्या देवतांची ते पूजा करायला लागले असून गणपती, महादेव, लक्ष्मी माता, दुर्गा माता हया हिंदू संस्कृतीच्या देवतांची पूजा करायला लागले आहेत.

अंत्यसंस्कार पध्दती :

जगात अनेक जुन्या चालीरीती आणि परंपरा आजही मानल्या जातात. तसेच त्यांचे पालन देखील केले जाते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आदिवासी जमातीच्या अनेक रूढी-परंपरा आहेत, मृत्यूनंतर अंत्यसंस्काराच्या वेळी सुध्दा प्रत्येक जमातीच्या प्रथा वेगळया आहेत. आंध जमातीच्या लोकांमध्ये मृत व्यक्तीला दफन केले जाते. मृत्यूनंतर मृत व्यक्तीचे डोके त्यांच्या जवळच्या नातलगाच्या मांडीवर ठेवले जाते. ती व्यक्ती मृताच्या तोंडात साखरेचे पाणी घालते व तुळशीपात्र ठेवते. यानंतर मृताला अंघोळ घालून त्याच्या तोंडात शक्य असल्यास सोन्याचा छोटा तुकडा किंवा पानविडा ठेवून त्याला तिरडीवर ठेवतात. तिरडीला ज्वारी-तुरीचे फुलोरे आणि दोन नाणी बांधतात. मृताचा चेहरा रुई व बेलाच्या पानांनी झाकून मृताला झोपलेल्या अवस्थेत पुरले जाते. नंतर प्रमुख नातलग मृताला मूठमाती

देतात. स्त्रियांना या ठिकाणी प्रवेश निषिद्ध असतो, परंतु वृद्ध स्त्रिया अंत्ययात्रेत सामील होऊ शकतात. काही ठिकाणी सर्वच स्त्रिया अंत्यविधीच्या शेवटापर्यंत असतात.

सारांश :

संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असतांना तिच्यामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बदल घडत असतो. कोणतीच संस्कृती ही स्थिर राहत नाही, तिच्यामध्ये बदल होऊनतिच्यावर चांगले वाईट परिणाम होत असतात. एकतर तिचे संवर्धन होऊन वाढीस लागते अथवा पूर्णत: ती बदलून जाते. प्रत्येक राज्याची, देशाची जशी संस्कृती असते तशीच आदिवासी जमातीच्या समाजाचीही एक वेगळी संस्कृती असते.आदिवासी समाजाची एक वेगळी संस्कृती असून तिला सर्वांत जुनी अथवा सर्वांची जननी म्हटले तरीही चालेल. ज्या संस्कृतीमध्ये उच्चनिचता नसून सर्वसमावेशकता आहे.ज्या संस्कृतीची पाळेमुळे खोलवर रोवलेली आहेत. त्यामुळे ती संस्कृती फक्त वेगळी न राहता ती एक जबाबदार संस्कृती ठरते.आदिवासी संस्कृती ही आदर्श संस्कृती आहे, असे कित्येक अभ्यासकांचे मत आहे.

संदर्भ:

१) देवरे रमेश, लोकसाहित्य दर्शन डॉ.कर्मवीर प्रकाशन, पुणे, प्रआ. २००९. प्र. २२७.

२) कर्वे इरावती, आमची संस्कृती, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि. पुणे पुनर्मुद्रण २०१०

३) तत्रैव

४) विनायक तुमराम, आदिवासी साहित्य. दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१२.

५) माधव मोरे, आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृती,

६) लोहकर संजय, धार्मिक अस्मितेचा उदय, यशोदीप क्रियशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११.

जागतिकीकरण व शेतकरी

डॉ. मुक्ता बिरादार

मराठी विभाग प्रमुख, श्रीदत्त महाविद्यालय हदगांव ता.हदगांव

साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो. साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब चित्रित होते. पण आजच्या जागतिकीकरणाच्या युगात साहित्यातून समाज चित्रित होण्याऐवजी समाजाचेच साहित्यावर परिणाम दिसून येत आहेत. जागतिकीकरण ही संकल्पना अर्थशास्त्रीशी संलग्नित आहे. आर्थिक व्यापारी व्यवहारांना आंतरराष्ट्रीय रुप देणारी आहे. पण या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा परिणाम साहित्यावर, समाजावर सर्व क्षेत्रात दिसून येत आहे. भारत हा ग्रामीण भागांनी नटलेला देश आहे. परंतु जागतिकीकरणाच्या या धामधुमीत शहर, खेडे भरडून निघत आहेत.

जागतिकीकरणाच्या झगममगत्या विळख्यात सापडलेला माणूस म्हणजे ग्रामीण माणूस, शेतकरी, अल्पभुधारक ऊस उत्पादक आहे. जागतिकीकरण असो वा खाजगीकरण शेतकरी व त्याच्या कुटुंबाची वाताहात ठरलेली आहे. एकीकडे जागतिकीकरणामुळे प्रचंड सुविधा निर्माण होत आहेत. जगाला सहजपणे जोडून ठेवणारे संसाधने निर्माण होत आहेत. तर यांत्रिकीकरणामुळे प्रचंड बेकारी वाढत आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याऐवजी बिघडतच चाललेली आहे. ग्रामीण माणूस त्याची संवेदनशीलता हरवत चाललेली आहे. जसं–तसं जग बदलत चालले तसंतसे मानवी संवेदना बोथट होते आहे. ग्रामीण शेतकरी त्यांची शेतीवर अवलंबून असणारी कुटुंब व्यवस्था बदलत्या काळानुसार हळूहळू नष्ठ होत चालली आहे. ग्रामीण माणसाचे शेतीशी घट्ट नाते आहे. त्या शेतीवर त्यांची कुटुंबव्यवस्था व त्यांचे सुख–दुःख अवलंबून आहे. पण जागतिकीकरणाच्या या विळख्यात हे सर्व कुठेतरी हरवत चालले आहे. बाजारीकरण,शहरीकरण,दळणवळणाची वाढती संसधाने, वाढते कारखाने कमी होत चाललेली शेती, बाजारभावातील तफावत कारखान्याचे राजकारण, शिक्षणाचे वाढते प्रश्न, भरमसाठ वाढत चाललेली अपेक्षा या चक्रव्युहातून मार्ग काढणारा ग्रामीण शेतकरी रा.रं.बोराडे यांनी रिक्त–अतिरिक्त या कादंबरीतून चित्रित केलेला आहे.

जागतिकीकरण हा शब्द तसा नवीन नाही जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, जगभरातील लोकं एका प्रवाहात येतात एकत्र काम करतात. अर्थात विशिष्ठ एका प्रवाहातल्या लोकांचाच फायदा होतो. एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाचा उदो उदो चालू असतांना शेतकऱ्यांची स्थिती भयावहच आहे. निसर्गाने साथ दिली शेतात धान्य भरपूर झालं तर हमीभाव मिळत नाही आणि निसर्गाने साथ नाही दिली तर पिकतच नाही.जागतिकीकरण म्हणजे विदेशी गुंतवणूक,यंत्राचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक हया सर्व संकल्पना म्हणजे जागतिकीकरण पण या यांत्रिकीकरणात ग्रामीण भागात काय चालले हे पाहण्याचे कष्ट मात्र कोणी घेत नाही. आजही बऱ्याच ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. अशा ठिकाणी जागतिकीकरणाच्या गप्पा मारणं कितपत योग्य ठरतं जागतिकीकरणाच्या सुधारीत संरचनेत जातीयता नष्ठ होण्याऐवजी त्याचे राजकारण झालेले दिसून येते. सरकारी शाळा बंद करुन इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणं सर्वसाधारण शेतकऱ्यांना न परवडणारं शिक्षण देण्याचा अट्टहास म्हणजे जागतिकीकरण रा.रं.बोराडेनी ग्रामीण भागात जागतिकीकरणाचे फायदे होण्याच्या ऐवजी ग्रामीण अल्पभुधारक ऊस उत्पादक कसा भरडला जातो याचे चित्रण करतांना दिसून येतात. जागतिकीकरणाचे अनेक फायदे असतील पण तोटेही कमी नाहीत. छोटया छोटया गावामध्ये इंग्रजी शाळांचे पेव वाढले. विनाअनुदान डोनेशन घ्या संकल्पना रुजू झाल्या सुशिक्षित बेरोजगार वाढले. रोजगाराच्या शोधात स्थलांतर वाढले. शेतकऱ्यांच्या नैराश्येत व आत्महत्येत वाढझाली.

शेतक-यांची स्थिती भयावह झाली. शेतीमध्ये उत्पन्न वाढले तर भाव कोसळू लागले. आणि भाव वाढले तर उत्पन्न घटू लागले. शेतक-यांची मुलं डोनेशनअभावी बेरोजगार झाली. शेती विकण्यासाठी कुटुंब विभक्तीकरण झाले. वस्तुविनियम पध्दतीने शेतकरी काही प्रमाणात तरी सुखी होता पण जागतिकीकरणामुळे मानवी कारागिराची जागा यंत्राने घेउन चलन अस्तिवात आले. शेतकरी आणि व्यापारी यामध्ये राजकारण सुरु झाले. कारखानदार आणि संघटनेची मिलीभगत होऊ लागली शेतकरी उत्पन्न आणि सुविधेच्या अभावी कर्जबाजारी होऊन सावकारी पाशात अडकला अस्मानी आणि सुलतानी संकटाने ग्रासलेला शेतकरी कोलमडून पडून त्याची वाताहात झाली. बोटावर मोजण्या इतके शेतकरी सधन आहेत. त्यांच्याकडे सिंचन व इतर सोयी सुविधा आहेत. पण अल्पभूधारक शेतक-यांचे मात्र जागतिकीकरणामुळे कंबरडे मोडले. अल्पभूधारक उस उत्पादकांचे हाल तर भयंकरच ऊस पिकला तर त्याला भाव नाही भाव मिळाला तर उस वेळेत तोडला जात नाही. कारखान्यावर वेळेत नेने नाहीत. दोन्ही सुविधा मिळाल्यातर एखादी संघटना आणखी भाव वाढीसाठी आंदोलन करते. ऊस वेळेत कारखान्याला जाउ देत नाही असत संभ्रम निर्माण होतो की, आंदोलन शेतक-यांच्या हितासाठी होते की,कारखान्यादाराच्या हितासाठी ! स्वतःच्या राजकिय फायदयासाठी शेतक-यांच्या कष्टाला पायदळी तुडवले जाते. आंदोलनाच्या नावाखाली हजारो लिटर दुध रस्त्यावर फेकून देतात भाजीपाल्याच्या गाडया सडून जातात, भाजीपाला रस्त्यावर फेकतात. नूकसान मात्र शेतक-यांचेच होते. असंख्य प्रश्नानी व समस्यानी ग्रामीण माणूस शेतकरी घेरलेले दिसून येतात जागतिकीकरणाच्या दोन दशकात ग्रामीण शेतकरी हे समाजवास्तव स्वीकारुन अतिशय जिददीने चिवट वृत्तीने जगतो आहे पण एका विशिष्ट वळणावर हतबल होण्याची वेळ त्यांच्यावर येते. आणि तो आत्महत्येच्या दिशेने पावलं टाकतो अशाच एक हतबल ग्रामीण शेतक-यांचे चित्रण म्हणजे रिक्त–अतिरिक्त ही कांदबरी आहे.

रा.रं.बोराडे यांनी अनेक कथा कादंबरीचे लिखाण केले कविता सोडून संपूर्ण साहित्य प्रकार त्यांनी हाताळला समाजातील विशेषतः ग्रामीण भागातील शेतक-यांचे जीवन त्यांची कुटुंबव्यवस्था, नातेसंबध यांचे वास्तव चित्रण त्यांनी केले रिक्त–अतिरिक्त कादंबरीतून अल्पभुधारक, उस उत्पादक नाथाप्पाच्या रुपाने बोराडेनी समग्र ऊस उत्पादकावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. नाथाप्पा कादंबरीचा नायक आहे. त्यांना दोन मुले आहेत एक मुलगा सुशिक्षित बी.ए.बी.एड. आहे. दुसरा मुलगा शेती करतो. ग्रामीण कष्टकरी कुटुंब जगाच्या राजकारणाची कल्पना नसणारा नाथाप्पा तीन एकर ऊस लागवड करुन अनेक कामं होण्याची आस लावून आहे. नातीच्या लग्नाचा हुंडा आणि पोराच्या डोनेशनाची काही सुविधा होईल या आशेने तीन एकर उस लावून हिशोब करत असतो. जागतिकीकरणाचा विचार करतांना असं जाणवतं की, जग जवळ आलय पण माणूस मात्र माणसापासून दूर जातांनाचे चित्रण निर्माण होत आहे.

सुधारणा झाल्या पण ग्रामीण शेतकरी मात्र त्यांच्या परंपरागत विवंचनेत अधिकच रुतत गेला त्यांची कौटुंबिक ओढ आणि आर्थिक नड चित्रित करतांना लेखक लिहितात,"व्हय एकरभर वाढविलाय आधीचा दोन एकर व्हता आता वट्ट तीन एकर झालाय. आमदा नातीचं लगीन करायचं न्हवं का. म्हणून जोर मारलाय कांडून–कुटून सात एकर रानं आमला त्यातनं उसाला तीन एकर गेलं म्हणल्यावर खरीपला–रब्बीला लई आखडता हात घ्यावा लागला पर करणार काय पांघरुन आखुड आसलं की, आसचं व्हायचं तोंड झाकायचं म्हटलं की, पाय उघडे पडतेत अन पाय झाकायचं म्हणलं की, तोंड उघडं पडतं." (रिक्त–अतिरिक्त पृ.क्र.11)

नाथाप्पा अल्पभुधारक शेतकरी, आपल्या सात एकर शेतीमध्ये आपल्या कुटुंबाच्या संपूर्ण खर्चाची तरतुद व्हावी अशी अपेक्षा बाळगणारा तीन एकर ऊस आहे. ऊस खूप सुंदर झालेला आहे. पण कारखान्याला जाईपर्यत ऊसाचा भरोसा नाही. अनेक प्रकारचे राजकारण त्यात होईल याची भिती नाथाप्पाला वाटते. आणि होतेही तसेच. नाथाप्पाचं संपूर्ण कौटुंबिक विश्व त्या तीन एकर लावलेल्या

ऊसाच्या भोवती फिरतं नातीचे लग्न करता येईल मुलाला नौकरी लावता येईल. पण ऊस कारखान्यावर न्यायची वेळ आली की, कारखाना व्यवस्थापक आणि शेतकरी संघटनेत ऊस भाववाढीवरुन संघर्ष सुरु होतो. वाद इतका चिघळतो की, कारखाना गाळप बंद करतो. ऊस वाळायला सुरुवात होते. नाथाप्पा मात्र अस्वस्थ होतातं. त्यांची एकेक स्वप्न धुळीला मिळण्याचे संकेत त्यांना जाणवतात. एकरी 40 टन ऊस निघतो म्हणून खुश होणारे नाथाप्पा हताश होतात. त्यांना असं वाटतं की, कारखान्याच्या परिसरात उपोषणाला बसावं पण कारखान्याचे चेअरमन केदारला नौकरीचं अमिश दिल्यामुळे केदार उपोषणाला विरोध करतो. हुंडयाअभावी नातीचे लग्न मोडते आणि नाथाप्पा कोलमडून पडतात. शेताकडे जाण्यासाठी नाथाप्पाचं मन धजत नाही. वर्षेभर कष्ट करुन हाती आलेले ऊसाचे पिक कारखाना व संघटनेच्या राजकारणात उभं वाळतांना बघून नाथाप्पाचं मन विदिर्ण होतं. शेतक-यानां भाववाढ मिळावी हे ठीक होतं पण त्या भाववाढीसाठी शेतक-यांचे आलेले पिक नासवावे हे मात्र अनाकलनीय आहे.सिद्राम च्या तोंडून लेखकाने शेतक-यांची व्यथा व्यक्त केलेली आहे.“आप्पा कवाकवा लईचं दाटून येतं हो शेतक-यांच्या नशिबी आसलं दलिदंर जगनं का यावं असं वाटतं (रिक्त –अतिरिक्तपृ.क्र 62)

केदार नौकरीसाठी डोनेशन भरावे लागेल असं नाथाप्पाला सांगतो. आणि डोनेशनसाठी दोन एकर शेती विकण्याचा मानस बोलून दाखवतो. जागतिकीकरणातील सुशिक्षितांची व्यथाच तो मांडतो.“आप्पा तुम्हाला माहीत नसल म्हणून सांगतो. आज काल नोक-या मिळणं खूप अवघड झालंय देणगी दिल्याशिवाय नोकरीच मिळत नाही. साधी चपराशाची नौकरी मिळवायची असंल तर कमीत कमी दोन लाख रुपये मोजावे लागतात.” (प्र.क्र154)

लेखकाने सिद्रामच्या तोंडून शेतक-यांची व केदारच्या तोंडून सुशिक्षित बेरोजगारांची व्यथा मांडलेली दिसून येते. एककीडे कौटुंबिक विवंचना, दुसरीकडे शेतीच्या पिकाचा सर्वनाश होताना नाथाप्पा डोळयानी बघून हतबल होतात. कामगार संघटना आणि कारखाना यांच्या राजकारणात नाथाप्पाचा ऊस वाळतो मुलाला नौकरी लागत नाही. लागवडीसाठी काढलेले कर्ज डोक्यावर राहते. आणि नातीचे लग्नही मोडते. नाथाप्पाच्या सहनशीलतेचा अंत होतो.

अतिशय उत्साहाने ऊस लागवड करणारे नाथाप्पा एका सकाळी शेतात जाऊन अतिरिक्त ऊसाच्या पाचटात थांबून उसाबरोबर स्वतःलाही पेटवून घेतात.थोडक्यात जागतिकीकरणामुळे जग जवळ आले.खूप सुधारणा झाल्या भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे. पण ग्रामीण जीवनाकडे कुणाचाही म्हणावं तेवढ लक्ष नाही. महासत्ता बनताना काही घटकाच्या हातात आर्थिक सत्ता जाण्याच्या मार्गावर आहे. ग्रामीण तळागाळातला घटक आजही वंचितच आहे. जागतिकीकरण समाजातील आर्थिक दुर्बल घटकाला आणखीनच दुर्बल बनवत आहे. जागतिकीकरणाचा फायदा तेव्हा होईल जेव्हा समाजाच्या तळागाळातील माणूस जागतिकिकरणाचा भाग बनेल. किमान आज तो नाही लेखकाने रिक्त–अतिरिक्त या कादंबरीच्या रुपाने एका शेतक-याच्या माध्यमातून संबध अल्पभूधारक व सुविधा नसलेल्या ग्रामीण शेतक-यांच प्रतिनिधीत्व केलेले दिसून येते. ही कांदबरी फक्त अतिरिक्त ऊसाचाच प्रश्न मांडत नाही. तर शेतक-यांची होणारी गळचेपी मांडते. नाथाप्पा सारख्या हजारो शेतक-यांनी आत्महत्या केल्या. पण अनुदान आणि वारसाला नौकरी या अमिषावर शेतक-याची बोळवण केली जाते. जागतिकीकरण शेतक-याला स्वतःचा अविभाज्य भाग बनवेल, त्या वेळी त्या जागतिकिकरणाला खरा अर्थ प्राप्त होईल.

संदर्भ सुची :–

1. रा.रं.बोराडे – रिक्त –अतिरिक्त
2. रा.रं.बोराडे – ग्रामीण साहित्य
3. चंद्रकुमार नलगे – घरशिवार
4. माडगुळकर अंबादार /खांडेकर सुर्यकांत–मराठी ग्रामीण कथा
5. पी.विट्ठल– जागतिकीकरण बदलते सामाजिक वास्तव आणि समकालीन मराठी कविता
6. जागतिकिकरण – मराठी भाषा व साहित्य सद्यःस्थिती आणि भवितव्य – भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे 20 वे अधिवेशन

जागतिक दृष्टिकोनातून मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती

प्रा. माळवदकर मंगल तुकाराम
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकूर

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी म्हणजे १९९० च्या आसपास भारतातील जागतिकीकरण या संकल्पनेचा बोलबाला सुरु झाला भांडवलशाही दळणवळण, टेलीग्राम, हवाई मार्ग, दूरध्वनी, संगणक, बहूराष्ट्रीय कंपन्या, गुंतवणूकीवरील निर्बंध या माध्यमातून जागतिकीकरण सुरु झाले. माहिती तंत्रज्ञान इंटरनेट आणि सेवांचा व्यापार जागतिक पातळीवर सुरु झाल्याने जागतिकीकरण प्रक्रियेला वेग आला. आज संपूर्ण जगात ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान आणि औद्योगिक, सामाजिक राजकीय शैक्षणिक इ. सर्वच क्षेत्रात एक अभूत पूर्व क्रांती घडून येऊन त्याद्वारे संपूर्ण जग एकजीव बनविण्याची जी क्रांती कारक किमया घडवून आणली जाते तिलाच जागतिकीकरण असे म्हटले जाते.

विसाव्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीरण म्हणजे जगभर पसरणे.एकाच वेळी संपूर्ण जगाचा किंवा जगातील सर्व लोंकांचा विचार करणे होय. त्यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवलप्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रिय अर्थ व्यवस्थेसाठी खुले केले जाते.

माणूस आपल्या उन्नत क्षणी विश्वाशी तद्रुप पावण्याचा प्रयत्न करतो. जगभरातील पिडीताशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतो. विश्वचैतन्याशी एकरुप होण्याचा प्रयत्न करतो. माणसाची ही अवस्था म्हणजे मानवाचे उन्नत रुप होय. 'हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर ।' असे संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे ही मानवाची उन्नत अवस्था होय. आणि हाच जागतिक दृष्टिकोन किंवा वैश्विक दृष्टिकोन होय.

'माझ्या मराठाची बोलू कौतूके । परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।' इसवीसनाच्या बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी मायबोली मराठी विषयी काढलेले गौरवोद्गार होत. भाषा म्हणजे संवादाचे माध्यम आहे. भाषामुळे मानवी व्यवहार सुरळीत होतो व्यक्तिमत्त्व विश्वासाठी भाषा हा घटक खूप महत्वाचा आहे. व्यक्तीने भाषा आत्मसात केली आणि भाषेने व्यक्तिने भाषा आत्मसात केली आणि भाषेने व्यक्तिमत्व विकसित केले आहे. लेखन, वाचन, श्रवण, भाषण ही भाषेची चार प्रमुख कौशल्ये आहेत.

धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक या सर्वच क्षेत्रात मराठी भाषेचे अमुलाग्र योगदान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे मराठीभाषेला एक जागतिक वारसा लाभला आहे. भारत देशात भाषावार प्रांतरचना अस्तिवात आहे. याच विभागणीतून मराठी भाषीकांच्या स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी करण्यात आली. भाषावार प्रांतरचनेची उदिष्टये भाषांना समृध्द करण्यासाठीच होती.

भाषेच्या विकासासाठी शिक्षण खूप महत्वाचे आहे. म्हणून किमान दहावी पर्यंतचे शिक्षण माराठी भाषेतून सक्तीचे करण्यात आले आहे. आज सरकारी कामकाजातही मराठी भाषेची सक्ती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कर्मचाऱ्यांना शासकीय कर्तव्य बजावताना मराठीत लिहीता, वाचता, बोलता येणे अनिवार्य आहे. सरकारी नावे मराठीत असावीत सरकारी योजनांची नावे मराठीतून द्यावीत. मंत्रीमंडळातील निर्णय मराठीतून द्यावीत, सरकारी जाहिराती निवीदा किमान दोन मराठी वर्तमान पत्रात द्याव्या. माहिती तंत्रज्ञान विभागाने माहिती अधिकार आपले सरकार ई निवीदा इत्यादी ऑनलाईन सेवा पोर्टल मराठी भाषेतच उपलब्ध करुन द्यावेत असा आद्यादेश काढला. महाराष्ट्रासारख्या राज्यात माय मराठी भाषेचा सन्मान व्हावा असाच हा निर्णय आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेत मराठवाडी, खानदेशी, वऱ्हाडी, कोकणी, अहिराणी या बोलीभाषा दिसून येतात. मानवी भावनांचा अविष्कार साहित्यातून अभिव्यक्त केला जातो. कथा, कविता, कांदबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, विनोद हे साहित्याचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात. या साहित्य प्रकारातून मानवी जिवनानुभव अभिव्यक्त केला जातो. हा जिवनानुभव अनन्यसाधारण असतो कोणत्याही साहित्याच्या निर्मितीचे बीज मानवी जीवनातील वास्तवात असतात. जीवनाच्या जडणघडणीत साहित्याचाही वाटा असतो.

कोणतीही साहित्यकृती साकार होत असताना प्रचलीत समाज समाजजीवनातील आशय सांस्कृतीक संदर्भ त्यात आलेले असतात कालखंडानुसार सामाजिक संस्कृतीचे चित्रण साहित्यातून मांडले जाते कोणत्याही साहित्यकृतीत प्रचलित समाजजीवनातील सांस्कृतिक संदर्भ मांडलेल असतात संस्कृती या संस्कृत शब्दाचा अर्थ चांगले करणे धर्मासह समग्र अंतवाहय जीवनाच्या उन्नत असस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरात आणला जातो. प्रवृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रवृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा करावयाचा संस्कार. संस्कृती हा शब्द संस्कार शब्दापासून तयार झाला आहे. संस्कारानी ज्याची सिध्दी झालेली असते ती संस्कृती म्हणून संस्कार आणि संस्कृती या दोहोंचाअविभाज्य संबंध आहे वाच्यार्थाने संस्कार हा शब्द धर्म, नीती इत्यादी क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला आणि धर्मासह समग्र अंतर्बाह्य अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द रुढ झाला. संस्कृती, प्रकृती आणि विकृती यांचा परस्पर संबध आहे. प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे प्रकृतीत बिघाड होणे अथवा प्रकृती विकार जडणे आणि प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये म्हणून या उद्देशाने प्रकृतीवर करावयाचा संस्कार म्हणजे संस्कृती. मनुष्य आणि त्याच्या भोवतीचे विश्व यांनी मीळून निसर्ग बनतो. स्वतःला हवे असणारे श्रेयस आणि प्रेयस प्राप्त करून घेण्यासाठी मनुष्य कधी निसर्गाची अनुकृती करीत, कधी निसर्गाशी झगडत, कधी निसर्गावर मात करीत स्वतःच्या जीवनोत्कर्षास अनुकूल असे बदल करीत आलेला आहे. याचाच अर्थ असा की निसर्गावर संस्कार करीत माणूस आपली जीवनयात्रा चालवीतो. निसर्गावर संस्कार करताना आपसुकच माणसाच्या देहावर, मनावर, बुध्दीवरही संस्कार होत असतात.

मनुष्य समाजात राहत गेला तेंव्हा संस्कृती उद्भवली. व्यवहारासाठी अनेक साधनांच्या उपयोगात वाचा निसर्गतःच होती त्यामुळे मानवाला भाषा गवसली. भाषा मानवी जीवनानुभव व संस्कृतीचा एक अन्वर्थक घटक आहे. भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. म्हणुनच भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा अविभाज्य संबंध आहे. संस्कृती म्हणजे एका अर्थी समग्र मानवी वर्तनवाद. साहित्य, कला, ज्ञान, नीति इत्यादीचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. भाषेचे उत्पादन म्हणजे साहित्य. साहित्यातून मानवी जिवनानुभवाचा आलेख आखलेला असतो. तो भाषेच्या माध्यमातूनच. भाषेच्या माध्यमातून मनुष्य, लेखक, कवी, कादंबरीकार, नाटककार आपले अनुभव व्यक्त करतो, दर्शवतो व आपल्या अनुभवांचे दुसऱ्यापर्यंत/ वाचकापर्यंत संक्रमण करतो यातूनच साहित्यकलेचा उगम होतो.

या साहित्यकलेतून प्रत्यक्षाप्रत्यक्ष संस्कृतीचे दर्शन घडते. त्याद्वारे मानवी जीवनाच्या प्रगतीचा अधोगतीचा आलेख समजुन घेणे संभवनीय आहे. म्हणून साहित्यकृती म्हणजे संस्कृतीच्या वेलीवर येणारे फूल. सांस्कृतिक संदर्भ साहित्यकृतीपासून दूर करता येत नाही. जीवनातील आदर्श जगण्याची पध्दती, सामाजिक मूल्ये, माणसाच्या आकांक्षा, सुख-दुःख, आशा - निराशा थोडक्यात माणसाच्या संस्कृतीचे दर्शन साहित्यातुन घडते. संस्कृती म्हणजे केवळ साहित्याची पार्श्वभुमी नसते तर मानवी जीवनाचा आशय त्यात सामावलेला असतो.

थोडक्यात, आत्मप्रकटीकरणाचे माध्यम असणारी भाषा मानवी जीवनानुभव आणि मानवी संस्कृती यांचा संबंध परस्परावलंबी आहे. त्यातील नाते अतूट आहे. जागतिक दृष्टिकोनातून कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. म्हणून महान अशा राष्ट्रावर महाराष्ट्रावर अधिराज्य गाजवणारी माझी माय मराठी ही करोडोंची आई आहे. साहित्य आणि संस्कृती यांना जोडणारा दुवा आणि आशीर्वाद आहे.

निस्कर्ष

१. भाषा म्हणजे विचारांचे प्रभावी माध्यम.
२. जिवनानुभवाचा आलेख भाषेतून मातृभाषेतून प्रभावीपणे मांडला जातो.
३. भाषेच्या माध्यमातून समग्र मानवी मनावर संस्कार केला जातो.

संदर्भग्रंथ :-

१. भालचंद्र नेमाडे साहित्य, संस्कृती आणि जागतिककरण.
२. रा.ग. जाधव साहित्य आणि सामाजिक संदर्भ
३. पळवेकर अशोक भाषाः साहित्य, संस्कृती आणि जागतिककरण
४. गं. बा. सरदार संत वाङमयची सामाजिक फलश्रृती

मराठी दलीत कवितेतील वैश्विक मूल्य

भगवान साळवे
संशोधक विद्यार्थी, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

प्रस्तावना

स्वातंत्रउत्तरकाळात मराठी साहित्यविश्वात विविध प्रवाह प्रवाहीत झाले. ग्रामीण स्त्रीवादी, जनवादी, अदिवाशी, दलीत इ.विविध शासकिय योजना व शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार यामुळे भारतीय जीवनमानात अमुलाग्र बदल झाला.ि शक्षणामुळे सार्त्र, कामु, किर्केगार्ड आणि फ्राईड, म.फुले, म.गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचारवंताच्या विचाराने प्रभावित होउन भारतीय साहित्यनेही नवा चेहरा अंगीकृत केला. भारताला स्वातंत्र मिळाले परंतु ते स्वातंत्र राजकिय स्वातंत्रयापर्यत सिमीत राहिले. सामाजिक परिस्थिती मात्र विषमच होती. तेंव्हा दलित वंचित समजल्या जाणा–या शिक्षित तरुणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून उद्विग्न भावनेने आपल्या भावना शब्दांत मांडण्यास सुरवात केली.ते त्यांचे साहित्य दलित साहित्य म्हणुन नावारुपाला आले.

''मुकनायक ते महापरिनिर्णाण हा १९२० ते १९५६ पर्यतचा काळ डॉ. बाबासाहेबांच्या लेखणी, वाणी, कार्याने भारावलेला काळ होता.''१ या काळाला शरणकुमार लिंबाळे 'प्रबोधन पर्व म्हणतात.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे दलित, उपेक्षित, वंचित घटकाला मुक्त करण्यासाठी केलेला एक मुक्तीसंग्रामच होता. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तात्विक अधिष्ठानावरच दलित साहित्याचा उदय झाला.''दलित साहित्याचा हा उदय मराठी साहित्यातुनच नव्हे तर भारतीय साहित्यात एक नवे अनुभवविश्व व एक मुल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे.''२ असे प्रकाश खरात म्हणतात.या प्रबोधन पर्व काळात बंधु माधव, शंकरराव खरात, अण्णाभाउ साठे या लेखकांचा उदय झाला. या लेखकाने डॉ.बाबासाहेबांचा विचार तळागाळातल्या माणसापर्यंत पोहचवला.नामदेव ढसाळ, अर्जुन डांगे, यशवंत मनोहर, शरणकुमार लिबांळे, आदि. लेखकांनी आपल्या लेखनातून समाजात आत्मभान निर्माण केले. आपण प्रथमता माणूस आहोत, आपले माणुसपण राखण्यासाठी आपणच सज्ज झाले पाहीजे. ही मानवतेची जाणीव दलित साहित्याने कथा, कविता, कांदबरी, नाटक, वैचारीक लेखनातुन निर्माण केली.म्हणुन आज जागतिक स्तरावर भारतीय साहित्य एक समर्थ व परिपक्व साहित्य म्हणुन ओळख निर्माण करु शकले.

दलित साहित्याचा वैश्विक मानवतावादी मूल्यविचार दलित साहित्याने कथा, कांदबरी, नाटक, वैचारिक लेखन इत्यादी वाड्.मय प्रकारातून परिदृढ व अविष्कृत केला हे निर्विवाद आहे. तरीही या सर्व वाड्.मय प्रकाराहून दलित कवितेतील माणूसपणाची प्रतिष्ठापना, स्वातंत्र, समता, न्याय, बंधुता या वैश्विक मूल्याचा व्यापक स्वरुपात विचार दलित कवितेने गांर्भियाने चिंतनातुन, अनुभवातून आलेल्या विदारक सत्यातून सजगतेने व्यक्त केला आहे. ''स्वातंत्राच्या जाणीवे इतकी तीव्र उत्कट जाणीव दुसरी कोणती असु शकेल म्हणुनच पहिला उत्कट उद्गार काव्य भाषेतुन प्रकटला.''३ हे लक्ष्मण माने यांचे मत सार्थ वाटते. किशन फागु बनसोड, दिनबंधु, शाहिर हेगडे इ. कविनी दलित कविता लिहली. हे दलित कवितेचे प्राथमिक स्वरुप होते. यानंतरची दलित कविता प्रबळ व सशक्त सामर्थ्याने अभिव्यक्त झाली. नामदेव ढसाळ हे या काळातील कवितेच्या प्रांतातील मानदंड म्हणुन ओळखले जातात. त्यांच्या 'गोलपीठा'ने मराठी साहित्याचे दालन हादरवले.नामदेव ढसाळ यांचा सामर्थशाली नवा विचार, नविन भाषा, मुल्यगर्भित जाणीव दलित कवितेला मिळाली. याबरोबरच वामन लिंबाळकर यांचा गाव कुसाबाहेर कविता, महायुध्द, केशव मेश्राम–उत्खनन, अर्जुन डांगळे–छावणी हालते आहे, यशवंत मनोहर–उत्थानगुंफा, प्रज्ञा लोखंडे–अत्यंस्थ, ज्योती लांजेवार–अजून वादळ उठले नाही इत्यादी. कवीनी मानवी मुल्यांची कवितेतून अभिव्यक्ती केली.

नामदेव ढसाळ ते लोकनाथ, यशवंत, भुजंग मेश्राम यांच्या काव्यानेही 'मानव्याची संकल्पना' हेच आपल्या कवितेचे प्राणतत्व मानले.तर अरुण काळे,उत्तम कांबळेया कवीनी विश्वाच्या परिक्षणातून दलित जाणीव आणि जागतिकीकरणाचे महाभयानक–विदारक चित्र आपल्या काव्यातुन मांडले. तर आजच्या नवोदित दलित कवीनेही कविता लेखन करताना ढसाळ यांच्या प्रकटीकरणाच्या भाषेचा आशय आणि अभिव्यक्तीचा आसरा घेतला. तोच पाढा पूढे वाचला हे खरे, परंतू मानवमुक्तीचा विचार दलित कवितेने कधिच दूर केला नाही.

१९७० पासून मराठी साहित्याला दलित कवीतेने प्रभावित केले. १९७० ते १९८०, १९८० ते २०००, २००० ते आजतागायत दलित कवीतेने व्यापक स्वरुप धारण केले.मानवी मूल्यासाठीचा संघर्ष दलित कवितेतून व्यक्त झाला. याविषयी प्रकाश खरात म्हणतात की, ''दलित कवितेतून दलित विश्वाची एक संस्कृतीच साकार झाली आहे.''४ हिच संस्कृती आजचा नवोदित दलित कवी पूढे घेवुन जाताना दिसत आहे.संजय घाडगे–'जेंव्हा अंधाराला डोळे फुटतात',मारोती कसाब–'पोरगं शेकत बसलयं', सतीश नाईकवाडे–'घाव', 'व्हायरस', प्रफुल्ल धामणगांवकर–'चला बारुद पेरुया', ज्ञानेश गायकवाडयांचे–'पिंपळपान', विवेक काठीकर यांचा–'दिक्काल धुकं पसरलेलं', दिपक ढोले यांचे–'चेहरे ओरबडलेल्या देशात', अंकुश शिंदगीकर, विलास शिंदगीकर, राजेंद्र कांबळे इ. कवी आपल्या कवितेतुन मानवी मुल्यांच्या प्रतिष्ठापणेसाठी आवाज उठवताना दिसतात.नामातंर आंदोलन, मंडल आयोग, खैरलांजी हत्याकांड, जवखेडा प्रकरण अशा अस्वस्थ आणि दाहक सामाजिक घटनांना दलित कवितेने केवळ स्पर्शच केला नाही तर,त्याबाबत जागृतीचा ठोस जाबव नकाराची कणखर भुमिका घेतली आहे. चिड, नकार, वेदना, विद्रोहहीच या कवितेची बलस्थाने राहिली आहेत. स्वातंत्र, समता, बंधुता, न्याय हा बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावादी विचारच दलित कवितेचा प्राण होता. म्हणुन दलित कवितेने मराठी साहित्यातच नाही तर एकुणच भारतीय साहित्याच्या पूढे जावून विश्व साहित्यात आपले नाव अधोरेखीत केले आहे.

'माणुस' हा दलित कवितेचा केंद्रबिंदू आहे.माणसाला माणूस म्हणुन प्रतिष्ठा मिळाली पाहिजे या भुमिकेतुन दलित कविता अभिव्यक्त झाली –

'एक तीळ सर्वांनी करंडुन खावा.
माणसाने माणसावरचे सुक्त रचावे
माणसाचे गाणे गावे माणसाने'

हा मानवतावाद नामदेव ढसाळ आपल्या कवितेतून प्रस्थापित करु पाहतात.ढसाळांची ही वैश्विकता महाकाय आहे.रा.ग.जाधव म्हणतात की,''मानव्याची विशाल वैश्विक प्रचिती केवळ दलित साहित्याने दिली''५ ही वैश्विक मानवता माणसाची महती गाते.

'धर्म परंपरा आणि ग्रंथ समूळ बदलुन जावेत...
माणसाचा लख्ख प्रकाश पडावा
आणि माणसचं माणसं म्हणुन गळयात पडावी.

हा मानवी महत्तेचा विचार अर्जुन डांगळे व्यक्त करतात. मानवतेचा पुरस्कार करताना ते धर्मग्रंथ, परंपरा नाकारतात.तर मानवतेचा स्विकार हा त्यांच्या कवितेचा आशय राहिलेला आहे. ''असा माणूसकीचा माथा उन्नत करणारी गीते दलित कवि मुक्त कंठाने गातो.'' हे गं. बा. सरदार यांचे विधान सार्थ वाटते. हा विचार दलित कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातून घेतलेला आहे. ''दलित कविता आत्मसन्मानाच्या आत्मवाहनातून विकसित होत गेलेली आहे''.६ दलित कविता ज्या अधिष्ठानावर उभी आहे ते तत्वज्ञान समतामुलक समाजनिर्मीतीसाठी लढायला भाग पाडते.समाजात पसरलेली विषमता मोडीत काढण्यासाठी दलित कविता आपल्या शब्दांतुन समतेचे विचार पेरते. यासाठी ''दलित कविता विषमतेविरुध्द बंदुकीची गोळी होते,माणसाला माणुसपण प्रदान करण्यासाठी ती पाणी होते, आग होते, झोपलेल्यासाठी ती पहाटेची जाग होते.''७ एवढी मोठी ताकद दलित कवितेत आढळुन येते. तुमचा 'क्रुरकर्मा मनू, विषमता प्रतियोगितेत तुमचा अव्वल नंबर जणू' या अरुण काळेंच्या 'सायरनचे श्शहर' या कवितासंग्रहातील कविता हिंदु धर्माची मनुस्मृती नाकारते आणि ती कविता समताधिष्ठीत समाज व्यवस्था निर्माण करु पाहते.

स्वातंत्र हे एक मानवी समुहाचे नैसर्गिक मुल्य आहे. मानवाला स्वतंत्र जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. ही नैसर्गिक वृत्ती विश्वातल्या सगळया मानवाची आहे. परंतु भारताला स्वातंत्र मिळुनही सामाजिक स्वातंत्राचा मागमुसही सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचला नाही. म्हणुन,

'१५ ऑगष्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट
स्वातंत्रता कुठल्या गाढवीचं नाव आहे.....

कंचा मुलभुत अर्थ स्वातंत्राचा'

या स्वातंत्राला ढसाळ गाढवीची उपमा देतात. तर ज.वि.पवार स्वातंत्रासाठी बाबासाहेबांचा 'स्वातंत्र हे मागुन मिळत नसते ते हिसकावून घ्यावे लागते' हा विचार कवितेतुन व्यक्त करताना

'उठा उठा तरुणानों बंदुकीला हात घाला !
काल स्वातंत्रासाठी पेटलात
आज भेटेल तेथे पेटित चला
आम्ही तर किती काळ याच व्यवस्थेत खितपत पडणार'

हा सशस्त्र क्रांतीचा एल्गार ज.वि. पवार करतात.हा एल्गार मानवी स्वातंत्राच्या प्रतिष्ठापनेसाठी आहे.

मानवतेच्या प्रतिष्ठापनेसाठी स्वातंत्राबरोबरच न्याय महत्वाचा असतो. सामाजिक न्याय ही प्रक्रिया मानवी जीवनाला व्यापुन टाकते. दलित कवितेने कवितेतून न्यायाची मागणी अभिव्यक्त केली आहे. जवखेडा अत्याचार, खैरलांली प्रकरण हे आजच्या अन्यायाची प्रतिकं आहेत. पुरोगामी समजल्या जाणा–या महाराष्ट्रात न्यायासाठी कुंटूब उध्वस्त व्हावं लागतं. हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. ही जाणीव देखील दलित कवितेने शब्दबध्द केली.

दलित कवी हा एक कलावंत आहे.तसा तो कार्यकर्ताही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने तो चळवळीशी जोडला गेला. यातून त्याला परिवर्तन हवे आहे. ''परिवर्तन हे एक मूल्य आहे ते समाजात निर्माण व्हावे लागते आणि नंतर ते जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रवर्तित होतं''८ हे गं.बा.सरदार यांचे विधान परिवर्तनाची गतीशिलता निर्माण करण्यासाठी दलित कवितेने व्यवस्था बदलाचा विचार मांडला त्याची आवश्यकता स्पष्ट करते. 'जग बदल घालूनी घाव,मज सांगून गेले भिमराव' हा अण्णाभाउ साठेंचा विचार परिवर्तनासाठी दिलेली पहिली आरोळी होती. तर याच प्रेरणेतून भुंजग मेश्राम गाव बांधणीसाठी आवाहन करतात.

'गाव बांधणी म्हणजे एवढं शिकाचा हाय,
व्यवस्थेच्या छाताडावर आग्यामोहळावानी बसायचा आहे'.

दलितांना लढल्याविन मुक्ती नाही म्हणुन भुंजग मेश्राम व्यवस्था बदलू पाहतात. डि.बी.जगत्पुरीया, त्रबंक सपकाळे आदि कवी इतर कवी यांनी दलित कवितेतून परिवर्तनाचा दुर्देम्य आशावाद व्यक्त केला,सजगता निर्माण केली. हा विचार घेवुनच दलित चळवळीने आपली लेखनी व कार्य गतिमान केले.

मानव्याची प्रतिष्ठपना करण्यासाठी दलित कवितेतून कारुण्याची एक आर्त हाक प्रतिध्वनीत होते.''बुध्दांची करुणा हे आंबेडकरी प्रेरणेचे चौथे सुत्र आहे. ही करुणा आत्मसात केल्याशिवाय सर्वोत्तम साहित्याची निर्मिती केवळ अशक्य आहे.''९ म्हणुन बुध्दांचा करुण विचार दलित कवितेत आला. प्रफुल्ल धामणगांवकर यांच्या 'अनुसरण' कवितेतून–

'मलाही होता येतं अमेरीकेचा धाक,
हिरोशिमाची आग,पण मी अनुसरलोय ना बुध्द,
टाळण्या युध्द'

ही बुध्दांबद्दलची निस्सिम आस्था आणि बुध्दांचा कारुण्य विचार दलित कवी अभिव्यक्तच करित नाही, तर तो ते जीवन जगतो, अनुसरतो. यशवंत मनोहर आपल्या काव्यातुन बुध्दांला उद्देशुन म्हणतात–

'सिध्दार्था,
शोषिताच्या दु:खाच्या अंतापर्यंत
सुखाला स्पर्शही न करण्याची प्रतिज्ञा करणारा तू
माणुसकीच्या माथी मुकुट झाला आहेस'

ही बुध्दांची श्शांतता व दु:खाचा अंत स्विकारण्याचा संयमी प्रकार त्यांच्यामध्ये दिसतो. १० ही अपरंपार 'करुणा' दलित कवितेने आपल्या शब्दांच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. तर प्रज्ञा लोखंडे यांचा करुणा विचार पुढील ओळीतून अभिव्यक्त झाला आहे.

'मला हवाय माझा समकालीन तोंडावळा,
समष्टीच्या ग्लोबल कल्लोळात अम्लान करण्याच्या,
अनाहात आवाजाचा'

ही कविता समुह मनाचे अत:रंग उकलताना आढळते.

स्वातंत्र, समता, न्याय, बंधुता, करुणा, मानवता हा दलित साहित्यातुन व्यक्त होणारा मूल्यविचार,वैश्विक साहित्याचा मानवतावादी दृष्टिकोन दलित कवितेतून अभिव्यक्त झाला आहे. म्हणुन दलित कविता ही मराठी साहित्याला वैश्विक साहित्य म्हणुन अधोरेखित करते.

स्वातंत्रउत्तर काळात समतावादी विचारप्रणालीने दलित तरुणांमध्ये आत्मभान जागृत झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या झंझावाती प्रेरणेने वंचित, उपेक्षित ठरलेला दलित तरुण आपले अनुभव शब्दबध्द करु लागला. यातुन दलित साहित्याची निर्मीती झाली. समता, स्वातंत्र, न्याय, बंधुता ही वैश्विक मूल्याचा अविष्कार त्याच्या कवितेतून झाला. म्हणुन दलित साहित्य वैश्विक स्तरावर आपले नाव अधोरेखित करु शकले. तत्वत: मानवतावादी विचाराच्या अभिव्यक्तीमुळेच दलित कवितेला विश्व साहित्याच्या रांगेत स्थान मिळाले.

निष्कर्ष

१. दलित साहित्य विषमतेच्या उद्विग्नतेतून निर्माण झाले.
२. मानवमुक्तसाठी लिहलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य.
३. दलित साहित्य प्रवाहात कथा, कांदबरी पेक्षा दलित कविता मोठया प्रमाणावर लिहली गेली.
४. दलित कवितेतून येणारा चिड, नकार, विद्रोह हा समताधिष्ठीत समाज निर्मीतीसाठी आलेला आहे.
५. दलित कवितेतून गौतम बुध्द, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल निस्सीम आदर व्यक्त होतो.
६. आजच्या नवोदित दलित कवितेतूनही मानवतादी मूल्यभाव अभिव्यक्त झालेला आढळतो.
७. स्वातंत्र, समता, न्याय, बंधुता, करुणा या वैश्विक मुल्याच्या पुरस्कारामुळेच दलित कविता ही विश्व कविता म्हणुन स्थानबध्द झालेली आहे.

संदर्भ

१. दलित साहित्याचे सौदर्यशास्त्र – लेखक–शरणकुमार लिंबाळे,पान क्र.१० दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.चतुर्थ आवृत्ती
२. साठोत्तरी मराठी वाडमयातील प्रवाह.संपादक डॉ.शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.व्दितीय आवृत्ती
३. शतकातील दलित विचार –संपा.शरणकुमार लिंबाळे–अ.भा.दलित साहित्य संम्मेलन महाड.१९८९ पान क्र.३०८
४. साठोत्तरी मराठी वाडमयातील प्रवाह.संपादक डॉ.शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.व्दितीय आवृत्ती – प्रकाश खरात.दलित साहित्य पान क्र.१२३
५. शतकातील दलित विचार –संपा.शरणकुमार लिंबाळे
६. भारतीय दलित साहित्य लेखक–शरणकुमार लिंबाळे साहित्य अकादमी प्रकाशन प्रथम आवृत्ती २०१३ पान क्र.१०७
७. साठोत्तरी मराठी वाडमयातील प्रवाह.संपादक डॉ.शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.व्दितीय आवृत्ती – प्रकाश खरात.दलित साहित्य पान क्र.१२३
८. दलित साहित्य एक अभ्यास – संपा. अर्जुन डांगळे
९. भारतीय दलित साहित्य लेखक–शरणकुमार लिंबाळे साहित्य अकादमी प्रकाशन प्रथम आवृत्ती –२०१३ – प्रेमानंद गज्वी अस्मितादर्श लेखक वाचक मेळावा चंद्रपूर १९९४
१०. दलित साहित्याचा इतिहास– योगेंद्र मेश्राम – अक्षरगाथा आय.एस.एस.एन वर्ष पहिले अंक तिसरा १० आक्टोबंर २०१० पान क्र.८३

वैश्विक दृष्टिकोनातून नवीन शैक्षणिक धोरण

सौ आश्लेषा सचिन कुंभार
संशोधक विद्यार्थिनी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
प्रा. डॉ. दिलीप भीमराव गायकवाड
मार्गदर्शक
कला वाणिज्य महाविद्यालय सातारा

प्रस्तावना -

वैश्विक दृष्टिकोनातून भारतीय शिक्षण मनुष्य निर्मितीच्या अनेक कथा आहेत .मनुष्याने उत्क्रांती केली याचे उदाहरण आजचा मनुष्य व आजची परिस्थिती आपल्या समोर आहे. त्याला हे सगळं शक्य झालं ते शिक्षणातून. वैदिक काळापासूनच भारतीय शिक्षणाचा विचार करता, शिक्षणपद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत गेला. वेगवेगळ्या शैक्षणिक संकल्पना योजना राबविण्यात येत आहेत. देशाची प्रगती ही शिक्षणावरच अवलंबून असते. हेच या बदलांवरून लक्षात येते. शिक्षण म्हणजे देशाच्या व्यवस्थेचा कणा म्हटले तरी वावगे ठरणार नाही. संपूर्ण साक्षरतेचे स्वप्न स्वीकारणारा भारत देश पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार करणार यात शंका नाही.

उद्दिष्टे-

१) शैक्षणिक धोरण २०२० चा आढावा घेणे.
२) शैक्षणिक धोरण २०२० मधील नवीन मुद्द्यांवर प्रकाश टाकणे.
३) वैश्विक दृष्टिकोनातून भारतीय शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती-

विश्लेषणात्मक संशोधन पद्धती

विविध माहितीपत्रकांच्या चर्चासत्राच्या ,वृत्तसेवांच्या सहाय्याने नवीन शैक्षणिक धोरण २०२०ची माहिती प्राप्त करून त्यावर विचार व विश्लेषण करून पुढील निष्कर्ष व माहिती मिळवलेली आहे. विविध शैक्षणिक धोरणा बरोबर तुलना करून विश्लेषण पद्धतीने त्याचा अभ्यास करून एक वैचारिक दृष्टी प्राप्त करणे हाच या अभ्यासाचा विषय आहे. येणारे शैक्षणिक धोरण हे कशाप्रकारे अमलात आणले जात आहे व त्याचप्रमाणे भविष्यासाठी या शैक्षणिक धोरणाचा जो फायदा होणार आहे त्याचे विश्लेषण शोधनिबंधामध्ये करण्यात आलेले आहे.

शिक्षण म्हणजे काय?

वैदिक काळात मौखिक पद्धतीने ज्ञान दिले जात होते .विद्यार्थी गुरुग्रही ज्ञान आत्मसात करत होता .१२ वर्षे गुरुगृही राहून ज्ञान आत्मसात करून घेणाऱ्या शिष्यास" स्नातक "असे संबोधले जात होते .२४ वर्षे शिक्षण घेणारे "वसू" म्हणून ओळखली जात होते ३६ वर्षे शिक्षण घेणारे "रुद्र" म्हणून संबोधले जात होते .तर ४८ वर्षे ज्ञान आत्मसात करून घेणारे "आदित्य" म्हणविले जात होते. अशाप्रकारे गुरुगृही राहून गुरुच्या सेवेबरोबरच ज्ञानधारना करून एक परिपूर्ण व्यक्ती ज्ञानी समाजामध्ये वावरत असत. यानंतर गौतम बुद्धांच्या काळात देखील बौद्ध धर्माचे ज्ञान तत्वे यांनी समाज संस्कृत केला. गौतम बुद्धांच्या काळामध्ये देखील शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झाला सर्वत्र वातावरण होते .बौद्ध धर्माचे ज्ञान तत्त्वे यांनी समाज संस्कृत झाला होता. त्या काळात भारत देशात अनेक नावजलेली विख्यात अशी विद्यापीठे होती. देशात अनेक परदेशी अभ्यासक येऊन अभ्यास करत. अभ्यासासाठी तक्षशिला विद्यापीठ, काशी विद्यापीठ, नालंदा विद्यापीठ ,विक्रमशीला विद्यापीठ, वल्लभा विद्यापीठ इत्यादी अतिशय विख्यात विद्यापीठे होती. नालंदासारख्या विद्यापीठात एका वेळी १०००० विद्यार्थी अध्ययन करत व १५०० शिक्षक अध्यापन करत असत. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय हे अफाट साहित्याने समृद्ध होते ते नऊ मजली होते त्यास "धर्मगंज "असे नाव होते. अशा शैक्षणिक, समृद्ध वारसा लाभलेल्या देशातच पाणिनी, चरक, चाणक्य यांसारखे विद्वान नावारूपास आले ज्यानी विश्वामध्ये आपले नाव निर्माण केले. यानंतर मध्ययुगीन

काळामध्ये देशावर अनेक परकीय आक्रमणे झाली आणि देशाला उतरती कळा लागली. मात्र याच काळामध्ये जे संतश्रेष्ठी होते त्यांनी समाज आपल्या ज्ञानाने बांधून ठेवला. भजन कीर्तनातून प्रबोधन करून ज्ञानी केला ज्ञानेश्वरांसारखे तुकारामांसारखे विद्वान समाज योग्य मार्गावर घेऊन गेले, विपुल प्रमाणात साहित्य संपादा, ग्रंथ निर्मिती झाली. बाराशे सहा ते सतराशे सात हा मुघल काळ या काळामध्ये परकीय सत्तांनी देशाला त्रास दिला शैक्षणिक व भावनिक मोठ्या प्रमाणात हानी झाली .अनेक विद्यापीठे उध्वस्त झाली आणि देश पुन्हा पाठिमागे गेला त्यानंतर कंपनी सरकारने भारतीयांसाठी शिक्षण देण्याचे ठरविले. इंग्रजी राजवटीमध्ये फार कालांतराने असा निर्णय झाला. १८१३ ला चार्टर कायदा आला १८३५ मॅकेलेचा सिद्धांत आला. या सिद्धांतानुसार शिक्षण हे वरच्या थरातील लोकांना दिल्यानंतर ते हळूहळू पाजरत समाजात खालील थरापर्यंत पोहोचेल असा समज होता त्याला पाझर सिद्धांत असे संबोधले गेले. मात्र शिक्षण हे फक्त त्याच लोकांची मक्तेदारी राहिली व हा सिद्धांत अपयशी ठरला .शिक्षण फक्त वरच्या थरातील लोकांकडून खाली पाजरेल असे वाटत असताना याचं उलट परिणाम पाहायला मिळाला जे होते त्यांनी शिक्षण घेतले व समाजातील खालच्या थरातील लोकांवर अन्याय होऊ लागला. यानंतर यास विरोध झाला १८५४ मध्ये वूडचा खलिता निघाला व त्यानुसार शिक्षण देण्यात आले. त्यानंतर १८८२ मध्ये 'हंटर आयोग 'राबविण्यात आला शिक्षण क्षेत्रामध्ये प्रगती केली.

१५ ऑगस्ट १९४७ला देश स्वतंत्र झाला ४ नोव्हेंबर १९४८ ला राधाकृष्णन आयोगाची शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीसाठी नेमणूक झाली त्यानंतर १९५२ मध्ये "मुदलियार" आयोग स्थापन झाला. त्यानंतर १९६४ मध्ये "भारतीय शिक्षण आयोग" ज्यास 'कोठारी आयोग 'असे आपण म्हणतो. कोठारी आयोगाने आज पर्यंत कार्य केलेले आहे कोठारी आयोगाच्या तरतुदीनुसार शिक्षण पद्धती चालू आहे. आयोगाचा आकृतीबंध १०+२+३ असा होता. गेले ३४ वर्ष या आयोगाच्या योजनेनुसारच शिक्षण पद्धतीमध्ये कार्य होत आहे. देशाच्या गरजा बदलू लागल्या स्पर्धा वाढू लागली की लोकसंख्येच्या अपेक्षा वाढतात देशाचा विकास ,प्रगती या दृष्टीने विचार करून नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात येते आणि त्याचाच परिणाम म्हणून शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय पूर्व ते माध्यमिक अशा सर्व स्तरावर शालेय शिक्षणाला परिणामकारक असा नवीन शैक्षणिक प्रगतीपट निर्माण करण्यात आला. यालाच आपण शैक्षणिक धोरण २०२० असे म्हणतो.

शैक्षणिक धोरण २०२०मध्ये अमुलाग्र बदल झालेले आहेत. शालेय पूर्व ते माध्यमिक अशा सर्व स्तरावर शालेय शिक्षणाला सार्वत्रिक संधी सुनिश्चित करणे. पायाभूत सुविधा सहाय्यक शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणणे, त्यासाठी कल्पक शिक्षण केंद्रे, विद्यार्थी व त्यांच्या अध्ययन स्तराचा मागवा घेणे. औपचारिक व अनौपचारिक शिक्षण पद्धतीसह शिक्षणाचे अनेक मार्ग सुलभ करणे. शाळा समवेत समुपदेश किंवा उत्तम प्रशिक्षक क सामाजिक कार्यकर्त्यांची सांगड, एन आय ओ एस आणि राज्यातील मुक्त शाळा याद्वारे तीन पाच आणि आठव्या इयत्तेसाठी खुले शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रौढ साक्षरता आणि जीवन समृद्ध करणारे कार्यक्रम या मार्गाने हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. सुमारे दोन कोटी मुले जी शाळाबाह्य मुले आहेत ती मुख्य प्रवाहात आणली जाणार आहेत.

शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षणाचा अभ्यासक्रम आकृतीबंध ५+३+३+४असा असणार आहे.

शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे -

1. पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण साध्य करणे
2. शालेय अभ्यासक्रम आणि शिकविण्याच्या पद्धतीत सुधारणा सुधारणा
3. शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण इयत्ता सहावीपासून सुरू होईल आणि त्यात इंटरशिपचा समावेश असेल
4. बहुभाषिकता आणि भाषेची ताकद वाढविणे
5. मूल्यांकन पद्धतीत बदल व सुधारणा करणे
6. न्याय आणि सर्व समावेशक शिक्षण देणे
7. मजबूत शिक्षक भरती करणे आणि करिअरचे मार्ग निवडीस संधी उपलब्ध करून देणे

8. शालेय प्रशासनात बदल करणे
9. शालेय शिक्षणासाठी मानक निश्चिती आणि मान्यता
10. व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामध्ये सकल नोंदणी गुणोत्तर 26.3% 2018 वरून 2035 सालापर्यंत 50 %पर्यंत वाढवण्याचे एनइपी 2020 चे उद्दिष्ट आहे
11. समग्र बहुशाकीय शिक्षण व विषय निवडीस विद्यार्थ्यास लवचिकता प्रदान करणे
12. पदवी शिक्षण चार वर्षाचे असू शकते यात अनेक निर्गमन पर्याय व योग्य प्रमाणिकरण देण्यात येईल एक वर्षानंतर प्रमाणपत्र, दोन वर्षानंतर पदविका, तीन वर्षानंतर बॅचलर डिग्री, चार वर्षानंतर बॅचलर विथ रिसर्च.
13. तर्कसंगत संस्थात्मक संरचना
14. प्रेरित उत्साही आणि सक्षम शिक्षकांचे शिक्षण
15. मार्गदर्शक मोहीम राबवली जाईल
16. विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीसाठी वेगवेगळ्या योजना उपलब्ध असतील
17. मुक्त आणि दुरुस्त शिक्षण योजना
18. ऑनलाईन शिक्षण आणि डिजिटल शिक्षण
19. शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर
20. भारतीय भाषांचा प्रसार व प्रचार
21. व्यावसायिक शिक्षणावर भर
22. प्रौढ शिक्षणास प्रोत्साहन

राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा 2019 मध्ये अध्यक्ष के कस्तुरीरंगन माझी संचालक इस्त्रो बंगळूर यांच्या दूरदृष्टीने या धोरणात, शिक्षणास वैश्विक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी वरील उद्दिष्टांना अनुसरून आकृतीबंध, रचना व त्यानुसार योजना राबविल्या जातील. प्रथम इयत्ता नुसार सहा वर्षे खेळातून शिक्षण. चार वर्षे विज्ञानावर भर, चार वर्षे विषय ज्ञानावर भर व पुढील पाच वर्षे विश्लेषण क्षमतेवर भर आणि विकास हे साध्य करण्यात येणार आहे. पाचवी पर्यंत स्थानिक भाषेतूनच शिक्षण दिले जाणार असून पुढील शिक्षणाचा विचार करता चीन, जपान सारख्या टेक्नॉलॉजीत पुढे असणाऱ्या देशांप्रमाणेच इयत्ता सहावीपासून संगणक ज्ञान दिले जाणार. विद्यार्थ्यांना टेक्नॉलॉजीची आवड निर्माण करणे व त्यानुसार टेक्नॉलॉजीत प्राविण्य प्राप्त करण्यासाठी उद्युक्त करणे हा उद्देश असेल. मुलांना क्रीडा क्षेत्राची आवड लागून क्रीडा क्षेत्रात पारंगत करणे ज्ञान समृद्ध बनविणे हे या शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019 भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते जी सर्वांना उच्च दर्जाची शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परावर्तित करण्यात थेट योगदान देते" अशा प्रकारे महान दूरदृष्टी या शैक्षणिक धोरणाने अमलात आणण्यास सुरुवात केलेली आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरून मोठ्या प्रमाणात 2020 सालापासूनच सुरुवात झाली आहे शिक्षकांना प्रशिक्षणातून वेगवेगळी शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षणे दिली जात आहेत. निपुण भारत मिशन अशा प्रकारचे एक प्रशिक्षण आयोजित असून त्यावर सध्या अंमलबजावणी सुरू आहे. मेक इन इंडिया, परीक्षा पे चर्चा, यासारख्या अनेक उपक्रमांमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी शैक्षणिक कार्यावर लक्ष ठेवून आहेत.

भारत देशाने 2015 मध्ये शाश्वत विकासाच्या सन 2030 चा कृती कार्यक्रम स्वीकारलेला आहे .त्यातील उद्दिष्ट क्र.4 "जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रमानुसार सन 2030 पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या संधींना प्रोत्साहन देणे यासाठी प्रयत्न" करण्यास सांगितले आहे एकही बालक शैक्षणिक संधी पासून ज्ञानापासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न केले गेले आहेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षक आणि प्राध्यापकांना शिक्षण प्रक्रियेतील शक्तिस्थान म्हटले आहे ..शिक्षक

मार्गदर्शक, चांगला श्रोता व चांगला वक्ता असला पाहिजे तरच तो चांगले मार्गदर्शन करू शकेल. तंत्रज्ञानातील आवश्यक उपयुक्त असाच भाग वेचण्यास विद्यार्थ्यांना शिकविणे हे कार्य शिक्षकाचे आहे. आधुनिक सुविधानियुक्त शैक्षणिक वातावरण, आधुनिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन विकसित करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. अनुभवाबरोबर तंत्रज्ञानावर भर यासाठी शिक्षकांना तयार करण्यात येत आहे त्या दृष्टीने प्रशिक्षणाचे नियोजन आणि कार्यवाही व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी चालू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विचारातून आकारलेल्या शैक्षणिक, औद्योगिक संकल्पना आकारत असताना 2020 शैक्षणिक धोरण देखील" इंडस्ट्री 4.0 "हे महत्त्वाचे आणि फायदेशीर तंत्रज्ञान अमलात आणण्याचा प्रयत्न आहे. "एकमेकांशी जोडण्याचा काम करण्याचा आणि शिक्षणाचा मार्ग बदलण्यासाठी इंडस्ट्री 4.0 हे महत्त्वाचे आणि फायदेशीर तंत्रज्ञान आहे .या सर्वांचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात गांभीर्याने विचार केला आहे" -रवींद्र खंदारे

वैश्विक बदलाबरोबर स्वतःस बदलणे शक्य व्हावे यासाठी NEP 2020 मध्ये तंत्रज्ञानाचा विस्तृत असा उपयोग करून घेण्यासाठी या बदलाचा अंगीकार विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या दोघांच्याही दृष्टीने करण्याचे उपयोजन आहे. इंडस्ट्री 4.0 म्हणजे चौथी औद्योगिक क्रांती. भारतीय तरुणांना या क्रांतीचा हिस्सा बनविण्यासाठी व हि क्रांती देशातील प्रगतिशील मैलाचा दगड ठरावी, त्याचप्रमाणे भारत हा ज्ञानी महासत्ता बनावे यासाठी अंगीकारणे गरजेचे आहे. सर्वांगीण विकासाबरोबर व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षण देण्याचा मानस आहे.

4.0 ही एक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारित क्रांती आहे संगणक आणि इंडस्ट्री 4.0 चे प्रगत ज्ञान प्राप्त झाल्यास अज्ञान दूर होऊन प्रगतीचा पथ सुरू होईल. शिकवण्याबरोबर शिकणे या दोन्ही क्रिया प्रभावित होतील एकंदरीत वैश्विक स्पर्धेत उतरण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण शिक्षण व्यवस्थेला आधुनिक बनवून बळकटी देण्यास यशस्वी होणार आहे.

निष्कर्ष-

1. शैक्षणिक धोरण 2020 हे अत्यंत उपयुक्त आहे .
2. बदलत्या तंत्रज्ञानाचा व शैक्षणिक अपेक्षांचा विचार करून त्यामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत
3. वैश्विक दृष्टिकोनातून भारतीय शिक्षण पद्धती मजबूत होण्याच्या दृष्टीने हे एक खंबीर पाऊल आहे.
4. शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी अत्यंत अभ्यासपूर्ण असे हे शैक्षणिक धोरण सिद्ध होईल यात शंका नाही.

संदर्भ -

1. https://www.ksagaronline.com/sanshodhanpadhat
   by shashikantannadate,swatianndateksagar publication .html
2. शिक्षण संक्रमण -संपादक :अनुराधा ओक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण .आंधळे राजेंद्र ,पृष्ठ क्रमांक 39, नोव्हेंबर 22.
3. शिक्षण संक्रमण -संपादक: अनुराधा ओक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांच्या बदलत्या भूमिका. लेख प्रा. प्राजक्ता खटाटे, पृष्ठ क्रमांक 19 . डिसेंबर 22
4. शिक्षण संक्रमण- संपादन: अनुराधा ओक राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तंत्रज्ञान शिक्षण .रवींद्र खंदारे पृष्ठ क्रमांक 32 ,जानेवारी 23.

मराठी संतसाहित्यातील विश्वकल्याणाचे विचार - एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. सुरेखा सीताराम बनकर

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

प्रस्तावना :

मराठी सारस्वतातील संतसाहित्य हे समृद्ध असून तो एक वैश्विक अनमोल ठेवा आहे. ज्ञानदेवांपासून तुकाराम-रामदासापर्यंत तसेच संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज इत्यादी महाराष्ट्रातील सर्व संतांनी ओवी अभंगरचना, श्लोक, भारूड, विरहिणी इ. साहित्यप्रकारातून मानवी जीवनास नितीप्रधान विचारांची शिकवण दिली. लौकिक जीवन जगत असताना आपले अलौकिक व्यक्तिमत्व सिद्ध करीत सर्वसामान्य माणसांना भक्तीमार्गातून नितीची शिकवण दिली. संतकालीन समाजजीवनात कर्मठपणाचे अवास्तव बंड माजल्यामुळे नैतिक मूल्यांची जाण समाजाला राहिली नव्हती. अशा परिस्थितीत तत्कालिन समाजाला ख-या नितीमूल्यांची ओळख स्वतःच्या आचार व विचारातून करून देण्याचे महत्कार्य संतांनी केले. असे असले तरी संतांनी एकूण मानवी व समाजजीवनासाठी आवश्यक असलेली नितीच प्रतिपादिली आहे.

संत साहित्याचा पाया संत ज्ञानेश्वर यांनी 'ज्ञानेश्वरी' हा टीकाग्रंथ लिहून घातला. त्या ग्रंथाच्या शेवटी त्यांनी पसायदान लिहिले आणि वैदिक कल्याणाची साद घातली.

व्यक्ती व समाजाच्या उद्धारासाठी जी कटु सत्य सांगावी लागतात ती काही स्वार्थी व व्यवहारी लोकांना अप्रिय वाटू लागतात. त्यामुळे अशा लोकांकडून संतपुरूषांचा छळही होतो पण तो जननिंदेचा छळ सोसूनही जनहितकारक अशा सत्य गोष्टीच ते सांगत असतात. म्हणून ते संतपुरूष होत. 'तुका म्हणजे तोचि संत सोसी जगाचे आघात।' ज्याचा अहंकार गेला आहे, आशा समूळ नष्ट झाली आहे, जो कोणाची निंदा किंवा हिंसा करीत नाही, ज्याच्या बुद्धित कपट नाही, ज्याचे मन स्फटिकाप्रमाणे निर्मळ आहे, 'येती तयापासी अवघी जनें।' अशा सत्पुरूषाजवळ सर्व लोक येतात. सर्व तीर्थांनाही तो तीर्थभूत असतो व त्याच्या केवळ दर्शनानेही मोक्ष मिळतो. त्याने तन-मन-धन सर्व पुरूषोत्तमाला अर्पण केलेले असते. 'तुका म्हणे तो परिसाहुनि आगळा। काय महिमा वर्णू त्याची' अशी रसाळ गोमटी फळे शुद्ध बीजापोटी जन्माला येतात अशा सत्पुरूषाच्या मुखात अमृताची वाणी असते आणि त्याचा देह सत्कार्याकरिता झिजत असतो. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती। देह कष्टविती उपकारे। भूतांचि दया हे भांडवल संता। आपुली ममता नाही देही।' संत तुकोबारायांनी या अभंगात संतपुरूषाचे लक्षण सांगितले आहे. भक्तिमार्गाने ईश्वरप्राप्तीचे ध्येय साध्य झाल्यानंतरही आदर्श भक्त कसे वागतात, स्वतःच्या देहाविषयी ममत्व नाहिसे झाल्याने तो इतरांच्या उपकाराकरिता कसा झिजवितात, भूतदयेमुळे इतरांच्या सुखाने ते कसे सुखी होतात आणि इतरांनाही तसेच वागावे म्हणून अमृतासमान उपदेश ते सतत करीत असतात.

विषय प्रतिपादन:

व्यक्ती व समाजाला या स्पर्धेच्या युगात आपले सुखी व संपन्न् जीवन जगण्यासाठी, दंडेलशाहीला आळा बसविण्यासाठी, आपले कल्याण साधण्यासाठी, व्यक्ती व समाजाचा विश्वास संपादन करण्यासाठी, स्वत:बद्दल इतरांच्या मनात आदराची व प्रतिष्ठेची भावना निर्माण करण्यासाठी, नितीनियमाचे पालन आवश्यक ठरते. संतानी स्वत:चे राहणीमान अत्यंत साधे ठेवून जनसामान्यांना उच्च कोटीची विचारसरणी देण्यासाठी संतपरंपरा आयुष्यभर

झटत राहिली आहे. सर्व संतानी त्यांच्या त्यांच्या कालखंडात केलेले लोकप्रबोधनाचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सर्व संतांनी एकच सांगितले आहे की, नीतिमूल्यांवर आधारित जगलेले जीवनच आपल्याला अंतिम कल्याणापर्यंत नेते. शांततामय सहजीवन, परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव, संयम व ऐक्यभाव, स्वार्थत्याग, निष्काम कर्मसेवा, विशाल दृष्टीकोन, चरासरावर प्रेम, राष्ट्रीय एकात्मता, श्रमप्रतिष्ठा इ. जीवनमूल्यांना केंद्रभूत धरून समाजाची रचना व बांधणी करण्याचा प्रयत्न संतांनी केला. एकंदरीत मनुष्यदेहाला प्राप्त परिस्थितीत सन्मानपूर्वक प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचे सूत्र शिकविले. संतांनी आपल्या चतुरस्त्र बुद्धिमत्तेने मानवताधर्म, राजकारण, समाजकारण, इ. सर्व बाबींची अतिशय चातुर्याने सांगड घातली आहे. मानवी दैनंदिन जीवनव्यवहारात व व्यवसायात नीतिची गरज अनन्यसाधारण आहे. संतांनी संपूर्ण मानवी जीवनास व्यापणारी व उपयुक्त ठरणारी अशी नीती सांगितलेली आहे. त्याचेच पुढे व्यवहारात व समाजजीवनात नीतिनियम म्हणून रूढ झालेले आहेत. संतांनी भक्तीमार्गातून व्यावहारिक नित्युपदेश केलेला आहे. संतांनी व्यक्ती समाजोन्नतीसाठी भक्तीमार्गाची कास धरली असली तरी त्यांचा भक्तीमार्ग हा समाजविमुख नसून समाजाभिमुख आहे. संतांची भक्ती ही सर्वव्यापक ईश्वराविषयीची सर्व प्राण्याविषयीची प्रेमभावना म्हणजे भक्ती होय. कारण ईश्वर प्राणीमात्राच्या हृदयात आहे. आपला दैनंदिन व्यवहार नीतिपूर्ण व्हावा म्हणूनच संतांच्या संगती व विचाराची वाट चालावयाची असते. सांसारिकांनी आपला व्यवहार कसा करावा याविषयी सर्व संतांनी आपल्या अभंगातून नीतिउपदेश केलेले आहेत.

परोपकाराकरिता देह झिजवावा -

मनुष्य देह हा दुर्मिळ आहे. मनाने ईश्वराची भक्ती करावी व बुद्धिने परोपकाराकरिता कर्म करावे. 'मना चंदनाचे परी त्वा झिजावे। तरी अंतरी सज्जना निववावे।' रामदासस्वामी म्हणतात, मना तू या चंदनाचा आदर्श समोर ठेव, सज्जनांना होणारा त्रास आणि ताप घालवायला पुढे हो. स्वतः कष्ट कर आणि सज्जनांना संतुष्ट कर. व्यवसायात सुद्धा व्यावसायिकांनी आपल्या सेवेतून इतरांना सेवा देत असताना जणू ईश्वराची भक्तीभावाने पूजा करत आहोत असा मनात भाव ठेवावा.

प्रयत्नवादाचा पुरस्कार -

सर्व संत हे प्रयत्नवादाचे मूर्तिमंत अवतार आहेत. स्वस्थ बसून देवावर किंवा संचितांवर हवाला न ठेवता आपल्या प्रयत्नपूर्वक साधनेने काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर या अंतःकरण भ्रष्ट करणा-या मनुष्याच्या स्वार्थमूलक विकृतीला त्यांनी दूर केले.

धनाचा सदुपयोग करावा-

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारें। उदास विचारे वेच करी।' संत तुकोबांनी व्यवहारी माणसाला धन प्राप्ती करावी. परंतु ते प्रामाणिकपणे व्यवहार व व्यवसाय करून मिळवावी तसेच ते मिळविलेले धन आसक्तीने स्वतःजवळ ठेवून केवळ स्वतःकरिताच त्याचा व्यय न करिता, स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने त्या धनाचा सदुपयोग करावा.

सेवा प्रामाणिकपणे करावी -

चरितार्थाकरिता जी सेवा, पेशा किंवा व्यवसाय पत्करला असेल तो प्रामाणिकपणे करणे हिच ईश्वरसेवा असते. ज्यामुळे अपकीर्ती होईल असे कर्म वर्ज्य करावे. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे- 'आला भागाशी तो करी वेवसाव। परि राहो भाव तुझ्या पायी॥... (1425) शरीराने आपल्या वाट्याला आलेला व्यवसाय करीत असता

आपले मन ईश्वराच्या पायी पाहिजे. म्हणजेच आपला व्यवसाय हा ईश्वराची सेवा आहे या भावनेने तो प्रामाणिकपणाचा होईल.'

व्यावसायिक नीतिमूल्ये ही प्रामाणिकपणावर आधारित आहेत. नीतिमूल्यांची दुसरी बाजू म्हणजे प्रामाणिकपणा होय. ग्राहकांच्या अपेक्षांची प्रामाणिकपणे पूर्तता करणे हे प्रामाणिकपणावर अवलंबून आहे. म्हणजेच व्यावसायिक नीतिमूल्ये ही प्रामाणिकपणाशिवाय आचरणात आणता येत नाहीत.

सामाजिक समतेचा पुरस्कार -

'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ॥...(46)' संत तुकाराम विषमतेतील भेदभावास विरोध दर्शवतात. सामाजिक समता आणि सुसंस्कृतपणा यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकात समतेचा सद्‌गुण आवश्यक आहे आणि तो इतरांशी वागताना प्रकट झाला पाहिजे. विद्वत्ता, सत्ता, संपत्ती यांच्यामुळे ज्यांना मोठेपणा आला आहे त्यांनी ताठा व गर्व न करता नम्रता व समता अंगी बाळगली पाहिजे. अशा प्रकारची सर्व प्रकारच्या ग्राहकाप्रती व शिष्याप्रती व्यावसायिकाने समता व नम्रता बाळगली पाहिजे.

व्यवहारात दुस-याला फसवू नये-

सामाजिक व्यवहारात खोटी बुद्धी नसावी. 'न यो वाचे अनुचित वाणी। नसो मनी कुडी बुद्धि...॥' (2183) संत तुकाराम या अभंगात जणू व्यावसायिक नीतिनियमच सांगून जातात. सामाजिक व्यवहार करताना वाणीला अनुचित, दुस-यांना लागण्यासारखे शब्द देऊ नयेत आणि मनामध्ये दुस-याला फसविण्याची खोटी बुद्धि नसावी असे ईश्वराजवळ प्रार्थना करण्यास सांगतात. समर्थ रामदासस्वामी म्हणतात, 'भले सत्य बोला, यथा तथ्य चला।' नेहमी हितकारक बोलावे, गोड बोलावे व खरे बोलावे, सरळ मार्गाने वागावे, सदाचार सोडू नये. समर्थ पुढे म्हणतात, 'भला रे भला बोलती ते करावे। बहुतां जनांचे मुखे यश घ्यावें। परी शेवटी सर्व सोडोनि द्यावे मरावे परी किर्तीरूपी उरावे।' ज्या कामामुळे आपल्याला लोकांचा भलेपणा मिळेल. दुवा व आशीर्वाद मिळेल, अशी कामे करावीत. अनेक लोकांच्या तोंडी आपली किर्ती असावी. आपल्या यशाची प्रशंसा असावी; पण एवढे केले तरी शेवटी सर्व सोडून द्यावे. आपल्या माघारी आपली सत्कीर्ती राहिल असे जगावे.

व्यावसायिकाने आपला व्यवसाय निवडताना समाजोपयोगी पडेल, ज्यातून समाजातील लोकांचा आपणास भलेपणा मिळेल याचा विचार जरूर केला पाहिजे. व्यवसायातून मिळणा-या नफ्यातून समाजोपयोगी सार्वजनिक किंवा खाजगी उपक्रम व संस्थास दानधर्म करावा. ज्यामुळे आपल्या माघारी आपली सत्कीर्ती राहील.

आधी केले मग सांगीतले -

संतांचा उपदेश हा कोरडा नसतो, 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण' असा नसतो. उपदेशाप्रमाणे स्वतः ते वागत असतात. संत हा निष्क्रीय नसतो 'क्रिया करुनि दाविती अंगी।' संत हे स्वतः जातीने क्रिया करतात. आपल्या कृतीने नीतिनियम पुढच्या पिढीसाठी वहिवाट करून देतात. रामदास स्वामी म्हणतात, 'आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका।' याप्रमाणे सर्व संतांनी प्रपंचासाठी कोणता व्यवसाय प्रामाणिकपणे केलेला दिसून येतो. संत नामदेव यांनी कपडे शिवण्याचा, संत सावता माळी यांनी पालेभाज्या पिकविण्याचा, संत गोरा कुंभार यांनी मडके तयार करण्याचा, संत सेना न्हावी यांनी न्हाव्याचा निरपेक्षपणे जनता जनार्दनाची सेवा, परोपकार, त्याग, दानधर्म करून सदाचाराने आपले जीवन घालविले. त्यातूनच त्यांना परमार्थ साधल्याचे समाधान मिळाले.

उत्पादक किंवा व्यावसायिकाने फक्त नियम करू नयेत तर केलेले नियम प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी कृती केली पाहिजे. नीती म्हणजे योग्य किंवा अयोग्य यांची निवड करणे असा अर्थ असल्याने व्यावसायिकांनी व्यावसायिक नीतीमूल्ये तयार करून प्रत्यक्ष आचरणात आणले पाहिजेत.

रंजले गांजलेल्यांना मदत -

'जे का रंजले गांजले त्यासी म्हणजे जो आपुले। तो चि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा।' (347) संत तुकारामांनी या अभंगातून समाजातील गोर-गरीब, अडले-नडले, दीन-दुबळे यांना यथोचित मदत करून सन्मार्ग दाखविणे हीच ईश्वरसेवा मानली आहे. संत गाडगेबाबांनी तर देव देवळात नसून माणसात आहे हे त्यांनी लोकांवर बिंबवले. मानवी जीवनासाठी अमर संदेश देताना धनाचा सदुपयोग कसा करावा हे सांगताना गाडगेबाबा सांगत असत. "भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, उघड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा, बेकारांना रोजगार, दुःखी व निराशांना हिंमत, गरीब मुलांना शिक्षण, गरिबांचे लग्न, अंध, पंगु, रोग्यांना औषध, मुक्या प्राण्यांना अभय" हिच खरी देवपूजा आणि हाच खरा रोकडा धर्म याच उद्देशाने त्यांनी धर्मशाळा उघडल्या, अन्नछत्रे उघडली, निरक्षरांसाठी शाळा काढल्या.

याचा विचार करता व्यावसायिकांनी आपल्या अधिक्य मिळकतीतून त्या धनाचा सदुपयोग कसा करावा? याचा जणू आपल्यापुढे संतांनी आदर्शच ठेवला आहे. व्यावसायिकांनी आपली सामाजिक जबाबदारी निश्चितच वाढवली पाहिजे. सामाजिक विकासासाठी तसेच दुर्लक्षित व दुर्बल घटकांसाठी सुद्धा कार्य केले पाहिजे. त्यांच्या संकटकाळात त्यांना भरीव असे योगदान दिले पाहिजे.

व्यवसायामध्येसुद्धा व्यावसायिकाचा दृष्टीकोन हा ग्राहकांच्या अडीअडचणी व तक्रारींची योग्य दखल घेणारा असावा. आपल्या वस्तू व सेवेबद्दलची संपूर्ण माहिती त्यांना दिली जावी. ग्राहकांना वस्तूची निवड करणेबाबत साह्य करावे. अज्ञानी, निरक्षर ग्राहकांनी फसवणूक करू नये. ग्राहकाची सेवा हिच ईश्वरसेवा अशी त्यांची दृष्टी व वर्तन असावे.

आत्म समाधानासाठी सेवा -

ग्रामगीतेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात- 'प्रतिष्ठेसाठी सेवा नोहे। ती स्वाभाविक हौसचि आहे। आत्मसमाधान हेचि राहे। पूर्ण फळ तियेचे॥...(102)' कोणताही पेशा स्वीकारून समाजाची सेवा करतांना त्यामागे आत्मसमाधान हाच हेतू असला पाहिजे. समाजात आपल्याला डॉक्टर, वकील, शिक्षक, करसल्लागार म्हणून प्रतिष्ठा मिळेल या अपेक्षेने ती समाजसेवा निष्फळ ठरते. राष्ट्रसंत पुढे म्हणतात- 'ज्यासि आहे प्रलोभन। ईर्षा, राग-द्वेष जाण। त्याची सेवा विडंबन। समजा ख-या सेवेचे॥...(106)', कोणताही पेशा किंवा व्यवसाय स्वीकारून समाजाची सेवा करणा-याच्या मनात त्या सेवेच्या मागे प्रलोभन असेल किंवा त्या सेवा करणा-याच्या मनात ईर्षा किंवा रागद्वेष असेल तर त्याची ती सेवा ख-या अर्थाने समाजसेवा न ठरता ते एक विडंबन ठरेल. 'सेवेचे अनंत प्रकार ते समजोनि करावी निरंतर। आपणासि साधेल तो व्यवहार। सेवाभावाने करावा॥ (93)', 'सर्वास व्हावे समाधान सेवक-सेवाभावियांसि पूर्ण। घेता, देता दोघेजण। संतुष्ट व्हावेत सेवेने॥.. (79)' 'सेवा नसावी वरपांग दांभिक। आत एक, बाहेर एक। सेवा नसावी कृत्रिम, सुरेख। कागदी फुलांपरि॥..(80)', खरी सेवा म्हणजे निष्काम कर्म। परस्परांच्या सुखाचे वर्म। समजोनि करी तो त्याग उद्यम। तोचि सेवाभावी समजावी॥..(82) अशा प्रकारे संत तुकडोजी महाराज यांनी वरील विचारातून समाजाची सेवा अनेक प्रकारे करता येते. आपणास जमेल ती सेवा व व्यवहार समाजाप्रती

सेवाभाव ठेवूनच करावा त्यामुळेच आपणहून निवडलेला सेवेचा मार्ग हा वरपांगी, ढोंगी, दिखाऊपणाचा, ज्याच्यातून आनंद प्राप्त होणार नाही अशा कृत्रिम स्वरूपाचा नसावा तर त्यातून सेवाकाराचे व समाजातील व्यक्तींचे, दोघांनाही सुख प्राप्त होईल असे समजून सेवा करावी.

नम्र व स्वागतशील बनावे -

'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदू ऐसे॥..(987)' आम्ही मनाने अत्यंत मृदू व नम्र असलो तरी कठीणातल्या कठीण प्रसंगातून आम्ही पुढे जाऊ. संत तुकारामाच्या या विचाराचा सार व्यक्तीच्या जीवनात अत्यंत मौलिक आहे. अगदी त्याप्रमाणेच कोणत्याही व्यवसायामध्ये शांत स्वभावाला महत्त्व आहे. व्यवसायात संयम न पाळल्यामुळे त्या व्यवसायाची अधोगती झालेली उदाहरणे पाहावयास व ऐकावयास मिळतात. व्यवसायात काम करताना स्वागतशील असले पाहिजे. व्यापारी, हॉटेल व्यवसाय, बँकींग, वकील, व्यापारी, वैद्यक व्यवसाय यांचा पदोपदी ग्राहकांशी संबंध येतो. तेथील संबंधित व्यावसायिक व कर्मचारी यांनी आपला स्वभाव नम्र व मनमिळावू ठेवला तरच त्यांना यश मिळते. नुसती कोरडी वागणूक दिल्यास ग्राहक त्या व्यावसायिकांकडे पाठ फिरवतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात नम्रता, स्वागतशीलता, शिष्टाचार इत्यादींच्या नीतीनेच अपूर्व यश मिळू शकते.

दुरितांचे तिमिर जावो :

संत ज्ञानेश्वर पसायदानात म्हणतात, दुष्ट लोकांच्या दुष्टपणाचे कारण त्यांचे अज्ञान असते. त्यांच्या या अज्ञानाचा अंधार दूर होवो अशी प्रार्थना ज्ञानेश्वर करीत आहेत. स्वधर्म म्हणजे 'जीव' म्हणून प्रत्येक प्राणीमात्राचे कर्तव्य, प्रकाश संश्लेषणाद्वारे अन्ननिर्मिती हे वनस्पतीचे कर्तव्य तर मृत प्राणीवनस्पतीचे विघटन हे सुक्ष्म जीवांचे कर्तव्य, मनुष्यजातीचा विचार केला तर शिकविणे शिक्षकाचे, उपचार करणे डॉक्टरांचे तर राज्यव्यवस्था राखणे राज्यकर्त्याचे कर्तव्य. जगाचा पसारा व्यवस्थित चालायला हवा असेल तर प्रत्येकाने आपल्याला नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे करायला हवे. प्रत्येकाने आपापले काम प्रामाणिकपणे केले तर सर्वांच्याच इच्छा पूर्ण होतील कारण 'स्वधर्म' आचरणारा प्रत्येक जीव केवळ मंगल, पवित्र इच्छाच बाळगणारा असेल.

निष्कर्ष :-

थोडक्यात संतांचा मानवी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन समग्र व परिपूर्णतेचा होता. त्यांना जीवन व व्यवहाराचे यथार्थ आकलन झालेले होते. त्यामुळे त्यांच्या विचार, लेखणी व कृतीतून नीतिविषयक नियमांचे जे आकलन होते ते केवळ मानवी जीवनाला किंवा व्यावसायिक क्षेत्राला उपयुक्त आहे असे नव्हे तर सर्व चराचर सृष्टीला पोषक व मार्गदर्शक ठरणारे आहे. संतांनी आपल्या जीवनानुभवातून, सदाचारातून, विश्वाच्या कल्याणाचा मार्ग सांगीतला आहे. श्रमप्रतिष्ठा, निष्काम कर्म, प्रयत्नवाद, परोपकार, संपत्तीचा सदुपयोग, समतादृष्टी, गरजूंना मदत, आत्मसमाधान, प्रामाणिकपणा, नम्रता, प्रसन्नता, बंधुभाव, षड्रिपुंचा त्याग, इ. नीतिगुणांचा पाठपुरावा केलेला आहे. अशाच नीतिगुणांची गरज व्यवसायातसुद्धा व्यावसायिकांच्या अंगी असणे उपयुक्त ठरते.

संदर्भ :-

1) साक्षात्कारी संत तुकाराम - डॉ. शंकर दामोदर पेंडसे
2) सार्थ श्रीमत दासबोध - प्रा. के. वि. बेलसरे
3) संतदीप, नंदादीप व शिदोरी (खंड 1 व 2, अप्रकाशित)-संकलन-डॉ. सुरेखा बनकर
4) व्यवसायाचे सोनेरी नियम - ह. अ. भावे
5) ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

वैश्विक परिदृश्यातून मराठी संत साहित्यातील कृषि संस्कृती दर्शन

प्रा. डॉ. अनिल व्यंकटराव मुंढे

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर

मानवाचे आध्यात्मिक जीवन समृद्ध होण्या करिता संतांनी जे अध्यात्म सांगितले, भक्तीतत्त्वाची रुजवणूक करून मानवी मूल्यांची शिकवण दिली आणि ज्या देहाच्या आधारे परमात्मा स्वरूपाकडे जाण्याची अनुभूती अनुभवायची असते तो देह शुद्ध निसर्ग सान्निध्यात वावरायला हवा यासाठी संतांनी पर्यावरणाच्या संबंधी आणि कृषी संस्कृतीच्या संबंधी आपल्या साहित्य रचनेतून अनेक बाबी उद्धृत केलेल्या आहेत. प्राचीन काळापासून चालत आलेली कृषी संस्कृती आणि पंचमहाभूतांचे महत्त्व या आधारे पर्यावरणाच्या संदर्भातील चिंतन संतांनी संत साहित्यातून प्रभावी पणे मांडले आहे. पर्यावरणातील, कृषी संस्कृतीतील अनेक घटकांचा पदोपदी उल्लेख करून संतांनी निसर्ग चैतन्यास बहर आणलेला आहे. संतांनी पर्यावरणाच्या आणि कृषी संस्कृतीच्या संदर्भात ज्या ज्या भूमिका आपल्या वाङ्मयातून मांडल्या आहेत त्यातून आधुनिक काळाच्या संदर्भात नवी दृष्टी आपल्याला प्राप्त करून देणाऱ्या आहेत. आधुनिक काळात माणसाच्या स्वार्थी केंद्री स्वभावामुळे कृषी संस्कृतीत अमुलाग्र बदल झाला आहे, निसर्गाची प्रचंड हानी झालेली आहे. यावृत्तीमुळे माणसाला आज अनेक प्रकारच्या नैसर्गिक संकटांशी सामना करावा लागत आहे. आधुनिक काळात कृषी संस्कृतीच्या संदर्भात ज्या काही उपाययोजना केल्या जातात त्यासाठी संत साहित्याचे आकलन महत्त्वपूर्ण ठरते. कृषी संस्कृतीच्या जपणुकीसाठी संतांनी विविध रचना करून कृषी जीवनाचे महत्त्व मानवी जीवनाच्या संदर्भात किती महत्वपूर्ण आहे हे विविध रचना प्रकारांतून सांगितले आहे.

भारतहा कृषि प्रधान देश आहे. भारतात मुख्य व्यवसाय हा शेती असून शेती व्यवसाय इथल्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. जगातील अनेक उद्योगधंदे, व्यवसाय शेतीवर आधारित आहेत. आपल्या भारत देशात शेतीपूरक पर्यावरण असल्याने वर्षानुवर्ष शेती करण्याची परंपरा फार प्राचीन काळापासूनची आहे. इथल्या बहुतांश लोकांच्या उपजीविकेचे साधन शेती हेच होते आणि अजूनही आहे." कृषी संस्कृतीत पर्यावरणाला अत्यंत महत्त्व दिले होते. आर्यांच्या पूर्वी पासून भारतात कृषी विद्या आणि कृषी संस्कृती नांदत होती ऋग्वेदव अथर्ववेदात ही कृषी विषयक पुष्कळ उल्लेख आढळतात."१ म्हणजेच भारतातील शेती व्यवसायाला कित्येक शतकांची परंपरा असलेले दिसून येते. शेतीत राबणारा शेतकरी आणि ज्यांच्या साह्याने शेती केली जाते ते गोधने म्हणजे बैल यांनाही कृषी संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे, आदराचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते. याचेच प्रतीक म्हणून शेतकरी जीवनात बैलाला अतिथी संबोधून दरवर्षी पोळा या सणाच्या दिवशी त्याची मिरवणूक काढून त्याला आज ही पुरणपोळीचा नैवेद्य देण्याची परंपरा असलेली दिसून येते. भारतीय कृषी संस्कृतीत बैल हा शेतकऱ्याचा सखा, सोबती असून तो त्याच्या कुटुंबातील सदस्यां इतकाच जिव्हाळ्याचा विषय असतो.

शेतीहा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून शेतीच्या माध्यमातून शेतकरी शेतीत योग्य पिकांची पेरणी करून अन्नधान्य उत्पादन करतो. शेतीमध्ये अहोरात्र काबाड कष्ट करून अधिकाधिक धान्य पिकवून उत्पादन करण्याच्या दृष्टीने शेतकरी सदोदित प्रयत्नशील राहिलेला आहे. शेतीची मशागत करून शेतीला पाणी देऊन शेतीचे योग्य असे व्यवस्थापन करण्याचे प्रयत्न फार पूर्वी पासून होत आलेले आहे. "पाणिनीच्या अष्टाध्यायीत कृषी कर्माचे

अनेक उल्लेख असून नदीचे पाणी कालव्याद्वारे शेतात येणे व विहिरीचे पाणी मोटेने वर खेचून शेतात सोडणे असे उल्लेख अष्टाध्यायीत सापडतात. नांगरणी, पेरणी, कापणी, साठवणी इत्यादी कृषी विषयक क्रियांना अनुलक्षून करावयाच्या विधीचे वर्णन 'श्रोत' व 'गृह्य' या सूत्रात ही केले आहे तर कौशिक सूत्रांत उंदीर, पक्षी, टोळयां पासून पिकांचे रक्षण करण्यासाठी काही उपायही सांगितले आहेत. कौटिल्याच्या काळात 'देव मातृक' म्हणजे केवळ पावसावर अवलंबून असलेला आणि 'नदी मातृक' म्हणजे नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेला असे शेतक़ऱ्याचे दोन वर्ग पाडले जात होते."२ नदीच्या वाहत जाणाऱ्या पाण्याला अडवून शेतीला पाणी देण्याची खास पद्धत प्राचीन काळात ही होती. आज याच नद्यांवर मोठ मोठे धरणे बांधून कालव्याद्वारे अथवा विद्युत पंपाद्वारे शेतीला पाणी दिले जाते. आज जे बंधारे, तलाव निर्माण केले आहेत त्याला मागील अनेक शतकांची परंपरा असलेली दिसून येते. सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीतून जलाशयाचे आणि वृक्षाचे महत्व विषय केलेले होते.

'नगरेचिर चावी। जलाशये निर्मावी।
महावने लावावी। नाना विधे।।'

इतकेच नव्हेतर संतांनी कृषी व्यवस्थेतल्या प्रत्येक बाबीचा अगदी बारकाईने विचार करून मार्गदर्शन केले आहे. अधिक अधिक धान्याचे उत्पादन कसे घेतले पाहिजे, शिवाय धान्यसंरक्षण, बियांचेसंरक्षण, धान्यसाठवण्याची पद्धती, पिकांना केला जाणारा खत पुरवठा याच्याही खास नियोजनात्मक बाबी संतांनी आपल्या रचनेद्वारे सांगितलेल्या आहेत. आज ज्ञान- तंत्रज्ञानाच्या, माहितीच्या युगात ही पिकांवर किडींचा प्रादुर्भाव जाणवतो, शेतीला रासायनिक खतांचा आणि औषधांचा बेसुमार केला जाणारा पुरवठा शेतीच्याच सुपीकतेला आज मारक ठरलेला आहे, याचा प्रचंड विपरीत परिणाम पर्यावरणावर होऊन पर्यावरणाचा समतोल वरचेवर ढासळत चाललेला आहे. आजच्या उत्पादित अन्नधान्यावर रासायनिक खतांचा, औषधांचा वापर झाल्याने त्याच्यातील रोग प्रतिकारकता कमी झाल्याचे दिसून येते; परंतु आज ही खेड्या पाड्यात पारंपरिक शेती करण्याची प्रथा आहे. रासायनिक खतांपेक्षा शेणखत वापरून केली जाणारी शेती सर्व बाबतीत सरस ठरताना दिसते आहे. आज सेंद्रिय शेतीचे महत्व लक्षात येऊन सेंद्रिय पद्धतीने घेतलेल्या फळांना भाज्यांना प्रचंड मागणी निर्माण होऊन शेतक़ऱ्यांना त्याचा योग्य मोबदलाही मिळताना दिसत आहे. शेतीत राबराबराबणारा शेतकरी कृषी संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असल्याने या शेतक़ऱ्यांबद्दलचा आपुलकी भाव संत साहित्यातून व्यक्त झालेला आहे. शेतकरी हा प्रामाणिक पणे शेतीची कामे करतो. त्याच्या जवळ कुठलाही आपपरद्वेष भाव नसतो. शेतकरी कधीही अभिमानाने, अहंकाराने वागत नाही म्हणूनच तर संत तुकाराम महाराज म्हणतात,

"बरे देवा कुणबी केलो। नाही तरी दंभेची असतो मेलो।।
भले केले देवराया। नाचे तुका लागे पाया।।"३

या अभंगातून संत तुकाराम आपण कुणबी झाल्याचा म्हणजे शेतकरी झाल्याचा आनंद व्यक्त करतात. त्याबद्दल ते देवाचे आभार ही माणतात. शेतकरी झाल्यामुळे आपल्या ठिकाणी कसल्याही प्रकारचा गर्व, ताठा, अहंकार निर्माण झाला नाही याची जाणीव संत तुकाराम व्यक्त करताना दिसतात. माणसाच्या जन्माला येऊन ही समाजात असे असंख्य माणसे आहेत की, जी स्वतःच्या सत्ता, संपत्तीच्या लोभाने अंध झालेली आहेत. त्यांना इतर सामान्य माणसाचे काहीही देणे घेणे वाटत नाही. त्यांच्या ठिकाणी प्रचंड अहंभाव, गर्व निर्माण झालेला आहे; परंतु असा ताटा मिरवणारे माणसं ही समाजाच्या भल्यासाठी काडीमात्र ही कामाची नाहीत. स्वतःच्या स्वार्थापाई अशा

प्रकारच्या प्रवृत्ती सामान्य माणसाला प्रचंड छळताना दिसतात. परंतु एक प्रकारे त्यांच्या हातून हा एक अनर्थ घडत असताना याचे त्यांना काही देणेघेणे वाटत नाही, इतकी ही माणसं स्वार्थाने मोहमायेने, गर्वाने पछाडलेली आहेत. माणसाचा गर्व हा त्याला सर्वनाशाकडे घेऊन जाणारा आहे 'गर्वाचे घर खाली' ही म्हण काही उगीच पडलेली नाही. त्यामुळे तर संत तुकाराम महाराज कुणबी केल्याचा आनंद व्यक्त करून देवाचे आभार मानतात. कसलाही अहंकाराचा वारा न लागू देणारा आमचा शेतकरी शेतीत मूठभर धान्य पेरतो आणि ढीगभर धान्य त्याला शेती देते. कृषी संस्कृतीचा महिमाच न्यारा आहे. शेतीही शेतकऱ्याकडून कसल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता धान्याच्या ढिगांच्या राशीच्या राशी उत्पन्न देते. याबाबत संत नामदेवांनी कृषी संस्कृतीचे केलेले वर्णन विचारात घेण्यासारखे आहे. संत नामदेव म्हणतात,

" शेती बीज नेता थोडे।
मोटे आणिता ती गाडे।।"४

विठ्ठल नामाची गुढी किती आगाध आहे हे सांगताना संत नामदेवाने दिलेला हा दाखला कृषी संस्कृतीचे महत्त्व सांगणार आहे. शेतीत पेरणी करताना थोडेच बीज आपण घेऊन जातो; परंतु पिकं आल्या नंतर अगदी गाडीभर धान्य घेऊन येतो. इतके दातृत्व शेती जवळ आहे. म्हणून तिची योग्य मशागत व देखभाल होणे आवश्यक आहे. मूठभर घेऊन ढीगभर देण्याची दातृत्व शक्ती शेतीमध्ये आहे. त्यामुळे या कृषी संस्कृतीचे महात्म्य संत नामदेवाने त्यांच्या अभंग रचनेतून गायलेले आहे.

शेतकरी हा आपल्या शेतीशी प्रमाणिक राहून इमान इतबारे काळया आईची सेवा सातत्यपूर्ण करत असतो. त्याची ती काळी आई शेती त्याच्या पिढ्यान पिढ्यांना जगवत आलेली आहे. त्यामुळे शेतकरी हा खऱ्या अर्थाने कर्मयोगीच असतो. शेतीत राबताना त्याला ऊन- वारा, पाऊस, थंडी याचे काही देणेघेणे राहत नसते. तो सर्व ऋतूत, सर्व काळ शेतीत राबराबराबतो. त्या त्या वेळेत शेतीची सारी कामे व्यवस्थित पार पाडतो. शेतकऱ्याच्या जीवनात 'पेरणी' हा विषय फार महत्त्वाचा असतो. त्याच्या घरात कसले संकट आले तरी तो पेरणी अगदी वेळेवर करतो. पेरणी वेळेत झाली तरच पीक जोमदार येऊन धान्याच्या राशी तयार होतात. म्हणून तो संकटावर मात करून पेरणी वेळेत करतो. या विषयी संत तुकाराम महाराजांनी रचलेला अभंग शेतकऱ्यांच्या जीवनात पेरणीचे महत्त्व सांगणारा आहे. संत तुकोबा राय म्हणतात,

"मढे झांकुनियां करिती पेरणी।
कुणबियाची वाणी लव लाहे।।
तयापरी करी स्वहित आपुले।
ज्यांनी पावले नर देह।।
ओटीच्या परिस मुठीत ते वाढे।
या परि कैवाडे स्वहिताचे।।
नाही काळ सत्ता आपुलिये हाती।
जाणते हे गुंती उगविती।।
तुका म्हणे पाहे आपुली सूचना । करीतो शहाणा मृत्यू लोकी।।"५

काळवेळेचे महत्व सांगताना संत तुकाराम यांनी वरील अभंगातून एक दृष्टांत दिला आहे. कृषी संस्कृतीचे एक उत्तम उदाहरण म्हणून संत तुकारामांच्या या अभंगाकडे पाहता येईल. पाऊस पडल्यानंतर जमिनीला वापसा

झाल्या बरोबर पेरणी करणे आवश्यक असते. जर वापसा जाऊन जमीन कोरडी झाली तर पीक जोमदार येत नाही. इतकेच नव्हे तर पेरणीत मुठीतील धान्य आणि ओटीतील धान्य याच्या उगवण्यात ही फरक पडतो. ओठीतील धान्य आणि मुठीतील धान्य यांच्या क्षमतेत पडणारा अंतर काही क्षणांचा असला तरी त्याच्या उगवण क्षमतेत पडणारा फरक कसा असतो हे संत तुकारामांनी उदाहरणा दाखल पटवून दिले आहे. यावरून आपल्या लक्षात येते की संतांनी देखील शेती हा विषय किती जिव्हाळ्याने जपला आहे. त्यामुळे शेतकरी आपल्या घरात कुणी मृत्यू पावले तरी त्याचे मढे झाकून अगोदर पेरणी करतो हा तुकोबांनी दिलेला विचार शेतीकडे अगदी गांभीर्याने पाहायला लावणार आहे. संतांचा हा उपदेश ध्यानात घेऊन शेती व्यवसायाला महत्त्व दिले तर अन्नधान्याचा तुटवडा पडणार नाही.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी शेतीच्या बाबतीत फारच महत्त्वाचे उपदेश केलेले आहेत. त्यांनी शेतीच्या पेरणीतील निरंतरता सांगून शेतकऱ्यांनी कमी भांडवलात अधिक कष्टाने शेती केली पाहिजे इतकेच नव्हे तर शेतीचे राखणे किती महत्त्वाचे आहे या बाबतचा उपदेश केला आहे. पेरणीची निरंतरता सांगताना माऊली म्हणतात,

प्रतिवर्षी क्षेत्र पेरिजे। पिके तरी वाहतो नुबागिजे।।
पिकांची निवाडू देखिजे । अधिकाधिक।। "६

शेतकऱ्यांनी प्रत्येक वर्षी पेरणी करायलाच पाहिजे. एखाद्या वर्षी पीक जास्त आले म्हणून पुढील वर्षी पेरणी करावयाचे ठेवू नये. तर अधिकाधिक धान्य उत्पादन करावयास पाहिजे शेतीचे भांडवल व कष्ट याबाबत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

"तरी भूमी बीज नांगरू । यया भांडवलाचा आधारू।
घेऊनी लाभू अपारू। मेळविणे जे।।"७

शेतकऱ्यांकडे शेती करण्यासाठी जमीन, बी आणि नांगर इतकेच भांडवल असते. एवढ्या कमी भांडवलात अधिक कष्ट करून भरपूर धान्य पिकविले पाहिजे. खरेतर ज्यांचा हेतू शुद्ध आहे, काहीतरी करण्याची इच्छा शक्ती आहे त्याला नानातहऱ्हेच्या गोष्टींची आवश्यकता नसते. तो आहे त्यातून ही नवनिर्माण क्षमता ठेवून अधिकाधिक यशस्वी कसा होतो हे शेतकऱ्यांच्या बाबतीत लक्षात घेता येईल. शेतकरी अगदी कमी भांडवलात धान्याच्या राशी कशाने निर्माण करतो याबाबत संतांनी केलेले मार्गदर्शन अनमोल स्वरूपाचे आहे. केवळ पेरणी करून पीक वाढवणे इतकेच नाहीतर त्याचे संवर्धन करण्या विषयी देखील मार्गदर्शन केलेले आहे. शेतीची राखण करण्याची काळजी घेण्या विषयी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"कांतृणाचा बाहुला। जो आगरा मेरेठेविला।
सोसांचचि राखता कोल्हा।मानिजेना।।"८

पिकाचे रक्षण करण्यासाठी गवताचे बुजगावणे करून शेतीत उभे केल्यास पीक नासावयास येणारा कोल्हा त्या बुजगावण्यालाच राखणदार समजून घेऊन पळून जातो. इतक्या बारकाईने शेती करण्या विषयी व तिचे संरक्षण करण्याविषयी माऊलींनी त्याकाळात सांगितल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा झालेला आहे. कृषी संस्कृतीचे हे साधे, सोपे तत्त्वज्ञान संतांनी आपल्या साहित्य रचनेतून सांगितल्याने नक्कीच शेती विषयीचा जिव्हाळा सामान्य माणसाच्या मनात निर्माण व्हायला मदत झालेली आहे. म्हणूनच आज ही शेतकरी आपल्या जमिनीला आपल्या माती पेक्षा ही जिव्हाळ्याने जपताना दिसतो.

आधुनिक काळातील शेतकरी मराठी संता विषयी आपुलकी भाव बाळगून आहे संतांच्या शिकवणुकीचा चांगला परिणाम त्यांच्यावर असल्यामुळे संताच्या विचारातून आलेले कृषी संस्कृतीचे जतन शेतकरी करत आलेला आहे. परंतु आजच्या काळात शेती व्यवसायात अमुलाग्र बदल झालेला आहे. शेतीच्या क्षेत्रात यांत्रिकता आली आहे.

मोट जाऊ नविद्युत मोटारी आले आहेत. रासायनिक खते, बी- बियाणे औषधे आलेली आहेत. रात्रंदिन काबाड कष्ट करणारा शेतकरी सततच्या दुष्काळामुळे वरचेवर अल्पभूधारक भूमिहीत होतो आहे. भांडवलदार आणि राजकीय सत्ताधीश जमीनदार बनत आहेत. त्यामुळे उत्तम परंपरा असणारी कृषी संस्कृती विघटनाकडे जाताना दिसत आहे. मोठ मोठ्या पिकांच्या अपेक्षेने पाण्याचा अनिर्बंध वापर होत असल्याने जमिनीतील पाणी पातळी खोलवर गेली आहे. मोठमोठ्या उद्योगधंद्यासाठी जमिनी पडीक पाडल्या जात आहेत. वृक्षतोडीचे प्रचंड प्रमाण दिवसागणित वाढतेच आहे. त्यातुलनेने वृक्ष लागवडीचे प्रमाण कमी आहे. विविध कार्यक्रम प्रसंगी वृक्ष लागवडीचे उपक्रम आज भरपूर घेतले जातात; परंतु त्या वृक्षांचे संवर्धन व जतन पुढे होताना दिसत नाही. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊन पावसाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. तसेच वाढत्या कारखान्यांमुळे प्रदूषण निर्माण होऊन पर्जन्यमान कमी झाले आहे. पर्यावरणाचा सारा समतोल ढासळत चालल्याने आज दुष्काळाचे भयान दुष्टचक्र निर्माण होताना दिसत आहे. संतांनी कृषी संस्कृती सांगताना कुठे ही पर्यावरणाला बाधा येणार नाही याची काळजी आपल्या विचारांतून तंतोतंत घेतली आहे. त्यामुळे संतांनी केवळ परमार्थिकच नव्हे तर शेतीच्या संदर्भाने केलेले प्रबोधन कृषी संस्कृतीला नक्कीच नटवणारे आहे असे म्हणता येईल.

थोडक्यात संत साहित्याने कृषी संस्कृतीतील नैसर्गिक बाबींचे महत्त्व तत्कालीन काळात सांगून शेती व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना दिलेली दिसून येते. ज्या शेतीतून धान्य पिकते ती शेती आणि तिच्या विषयीचे कष्ट याची महती संतांनी तत्कालीन काळात ओळखून त्याबाबत एक प्रकारे समाज प्रबोधन केलेले दिसून येते. समस्त मानवजातीचे उपजीविका भागवण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे शेती व्यवसाय आहे. शेती टिकली तरच मानवाला अन्न खायला मिळणार आहे ही समाजाची गरज संतांनी तत्कालीन काळात ओळखली होती. म्हणून त्यांनी त्याबाबत आपले विचार प्रकट केले आहेत. संतांचे हे कृषि विषयक विचार आधुनिक काळात ही मूलभूत ठरणारे आहे. संतांच्या या शिकवणुकीचा विचार प्रत्यक्ष आचरणात आणल्याने कृषी संस्कृतीचा विकास ही होतो आणि पर्यावरण समतोल राखणे हेही शक्य होते. आज कृषी संस्कृतीला तसेच पर्यावरणाला मारक ठरणाऱ्या अनेक बाबी मानवी स्वार्था पोटी निर्माण होताना दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरणाला उत्तरोत्तर बाधा निर्माण होत आहे. जर याकडे आपण वेळीच लक्ष नाही दिले तर येणाऱ्या काळात ही समस्या आणखीन गंभीर बनत गेल्यास सजीव सृष्टीला याचे विपरीत परिणाम भोगावे लागल्या शिवाय राहणार नाहीत. त्यामुळे संतांनी सांगितलेले कृषी संस्कृतीचे, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व वेळीच ओळखून त्याची काळजी घेतल्यास मानवी जीवन सुखी संपन्न व समृद्ध बनवता येईल.

संदर्भ सूची

1. संत साहित्यातील पर्यावरण विचार- डॉ. रामचंद्र देखणे, पदम गंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९४, पृ. ११, १२
2. संत तुकाराम महाराजांची गाथा- ह. भ. प. देवडीकर प्रत, अभंग१७८
3. संत नामदेवांची अभंग गाथा- संपादक ह. भ. प. दादागोंदकर, गीताप्रेस, गोरखपूर, अभंग१४८४.
4. संत तुकाराम महाराजांची गाथा- ह. भ. प. देवडीकर प्रत, अभंग४५७.
5. ज्ञानेश्वरी- अध्याय दहावा, ओवी ५५.
6. तत्रैव, अध्याय अठरावा, ओवी १८०
7. तत्रैव, ओवी ४३८.

मराठी भाषा : साहित्य, समाज आणि संस्कृतीचा वैचारिक अनुबंध

डॉ. सुरेश वि. शिंदे

प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

प्रास्ताविक :

मराठी भाषा : साहित्य, समाज आणि संस्कृतीचा वैचारिक अनुबंध जोडत असताना महाराष्ट्र या भूप्रदेशातील मराठी भाषा व तिचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोली भाषेतून झाला. मराठी भाषिक संस्कृतीचा पहिला राजवंश म्हणून पैठण येथील सातवाहन राजवटीकडे पाहिले जाते. सातवाहन राजांनी इ.स. सातव्या शतकात मराठी भाषा सर्वप्रथम आपल्या राज्याच्या प्रशासनात उपयोगामध्ये आणली. त्यानंतर देवगिरी येथील रामदेवराव यादव नावाच्या राजांनी तेराव्या शतकात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट केली. या पुढील काळात सतराव्या शतकात भाषेचे बदललेले विकसित रूप आपल्याला रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजवटीत पहावयास मिळते. रामचंद्रपंत यांचा 'आज्ञापत्र' व रघुनाथपंत हणमंते यांचा 'राजव्यवहारकोश' या ग्रंथांनी राज्याच्या प्रशासकीय कारभाराची आदर्श आचारसंहिता मांडली. या ग्रंथांना प्रमाण मानून राज्यकारभारात शिवाजी महाराज व त्यांच्या वारसदारांनी मराठी भाषेचे उपयोजन मोठ्या प्रमाणात केले. राज्याचा पत्रव्यवहार, तवारिखे, खलिते व अन्य काव्यमय स्फुट रचना मराठी भाषेतून केल्या जात होत्या. अर्थात शिवकाळात मराठी भाषेचे अत्यंत विलोभनीय व उन्नत रूप दिसून येते. मराठी समाजाच्या सर्वांगीण जीवन व्यवहाराची अत्यंत प्रागैतिहासिक (Pre-history) भाषा म्हणून मराठी भाषेला दीड हजार वर्षांची अतूट परंपरा लाभली आहे. सुमारे पंधरा कोटी लोकांची ती मातृभाषा आहे. भारतातील ९ घटकराज्ये, ४ केंद्रशासित प्रदेश आणि जगभरातल्या ७२ देशांमध्ये मराठी भाषिकांची वस्ती आहे. तसेच मराठी भाषा बोलणाऱ्यांचे उत्तरोत्तर प्रमाण वाढत आहे. मराठी भाषा भारतासह मॉरिशस, इस्त्रायल या देशांमध्ये बोलली जाते. मराठी ही जगातील दहाव्या व भारतातील तिसऱ्या क्रमांकाची उपयोजित भाषा समजली जाते. मराठी भाषा भारताच्या भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृत भाषेचे हे आधुनिक रूप मानले जाते. आजतागायत मराठी भाषेतून अनेक उत्तम व श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत. सातव्या शतकापासून सुरू झालेली मराठी भाषेची लिखित व वैचारिक परंपरा ताडपत्रे, भूर्जपत्रे व शिलालेखातून प्रत्ययास येतात. आद्यकवी मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधू', 'हेमाडपंडित- 'चतुरवर्गचिंतामणी', म्हाइंभट्ट- 'लीळाचरित्र', केसोबास- 'दृष्टांतपाठ', महदंबा- धवळे व 'साती' ग्रंथाचा आपल्याला आवर्जुन उल्लेख करावा लागतो. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेच्या मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील भाषेचे रूप तपासता येते.

बाराव्या शतकापासून महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, दत्त संप्रदाय व समर्थ संप्रदाय यांनी मराठी भाषेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. संस्कृत वळणाची प्राकृत भाषा अतिशय स्वच्छपणे अपभ्रंश मराठी भाषेची कात टाकून मराठीमय झाली. वैश्विक परिदृश्यातून मराठी भाषेचा विचार करताना संत ज्ञानेश्वर माऊली यांनी या विश्वाला माझे घर मानले. तसेच मराठी भाषेची अवीट गोडी अमृतालाही पैजेत जिंकणारी आहे, असा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला. म्हणून ते आपल्या जगप्रसिद्ध 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात लिहितात,

"हे विश्वची माझे घर।
ऐसी मती जयाची स्थिर।
किंबहुना चराचर आपणची जाला।।"

संत ज्ञानेश्वरांनी बाराव्या शतकात संबंध विश्वाला आपले घर मानण्याची शपथ घेतली. 'ज्ञानेश्वरी' हा जगाचे वैभव असणारा ग्रंथ आहे. यासंदर्भात ज्येष्ठ विचारवंत डॉ.साहेब खंदारे लिहितात, "संत ज्ञानेश्वराचा ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' हा गीतेवर आधारित सर्वांगसुंदर काव्यग्रंथ आहे की, भाषांतरित हा वादाचा मुद्दा तूर्तास बाजूला ठेवून संत साहित्याकडे पाहिल्यास संत नामदेवांपासून संत तुकारामांपर्यंत व त्या पुढेही वारकरी संप्रदायातील संतांच्या मांदियाळीतील कोणाही संताने कोणत्याही संस्कृत ग्रंथाचे भाषांतर व अनुवाद करून साहित्याची निर्मिती केल्याचे दिसत नाही. महानुभाव संप्रदायातील नरेंद्रकृत 'रुक्मिणी स्वयंवर', भास्करभट्टकृत 'शिशु पालवध' व 'उद्धवगीता' असे काही मोजके ग्रंथ प्राचीन साहित्यावर आधारित असले तरी त्याचे स्वरूप स्वतंत्र काव्यसंग्रंथाचे आहे."१ या विवेचनावरून हे स्पष्ट होते की, मराठी भाषा स्वतंत्रपणे आपल्या विचाराचे रूप सर्जनशीलरीत्या अभिव्यक्त करीत होती.

संत, पंत व तंत कविता, बखर वाङ्मय, ब्रिटिश कालखंडातील भाषांतरित साहित्य, आधुनिक साहित्य, उत्तर आधुनिक व जागतिकीकरणाच्या काळातील साहित्य व भाषा यामध्ये कालखंडानुसार मराठी भाषा कसकशी घडत गेली हे भाषिकदृष्ट्या आपल्या ध्यानात येते. संत साहित्य हे मराठी भाषेच्या प्रारंभ काळातील वैशिष्ट्यपूर्ण व सामाजिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. पंडिती काळातील साहित्याची भाषा वैदिक धर्मग्रंथाचा प्राकृत भाषेत मिश्र स्वरूपाचा संस्कृतमय वेध घेणारी ठरते. शाहिरी काव्याची भाषा ही अवैदिक परंपरेतील लोकभाषेचा वापर करणारी आहे. बखर वाङ्मयात अन्य् भाषांच्या प्रभावातून निर्माण झालेले शब्द अवतरतात. ऐतिहसिक पत्रव्यवहाराची भाषा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाचे संकेत घेऊन निर्माण होते. ब्रिटिश कालखंडातील भाषा ही पाश्चात्य शैलीतून जन्म पावते. त्यानंतर इथल्या एतद्देशीयांनी आपल्या रचना प्रकारांची गद्य व पद्य शैलीनुरूप भाषा घडविली. तिला प्रमाण घाटाचा आधुनिक बंध जोडला. जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषा अभिवृद्धीसाठी आपण जोरकसपणे प्रयत्न केले पाहिजेत. शेवटी ती भाषा वापरणारा समूह महत्त्वाचा ठरतो. त्यावर तिच्या अस्तित्वाचे यश अवलंबून असते. भाषेच्या संदर्भात असा विचार आपण सर्वांनी केला तर तिच्या अस्तित्वासाठी काळजी करण्याचे कारण शिल्लक राहणार नाही. मराठी साहित्याचे अभ्यासक व समीक्षक डॉ.रा.ग. जाधव लिहितात, "भाषा भयाचा मनोगंड दूर केल्याखेरीज वास्तव भाषा विवेक रूजू शकत नाही. हिंदी व इंग्रजी या दोन भाषांशी तुलना किंवा स्पर्धा करण्याची शंकाकुल सवयही टाकून देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे इस्त्राएल, जपान यासारख्या निखालसपणे भिन्न राजकीय, सांस्कृतिक व भाषिक इतिहास परंपरा असलेल्या देशांतील भाषाव्यवहारांशी मराठी भाषा व्यवहाराची तुलना करत राहणेही निरर्थक ठरणारे आहे. आपला मृतभाषाविषयक आत्मविश्वास दृढ राखणे, हेच आज अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा आत्मविश्वासासाठी आपल्या भाषिक प्रश्नांची यथार्थ ओळख असावी लागते, हेही जाणले पाहिजे."२ थोडक्यात असे म्हणता येईल की, दीड ते दोन हजार वर्षांपासून निर्माण झालेल्या भाषेला टिकवून ठेवण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणात शासकीय व लोकव्यवहाराच्या पातळीवर उपयोजन केले तर, मराठी भाषेला जिवंत ठेवण्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. कारण भाषा ही मानवी जीवनाचा गाभा आहे. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा आणि मानवी जीवनाचे अस्तित्व

सर्वव्यापक आहे. मानवाने भाषिक अंग व्यापक व विकसित केल्याने तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरला. यासंदर्भात मराठी भाषेचे अभ्यासक व भाषातज्ज्ञ कृ.पा. कुलकर्णी लिहितात, "मानवाने भाषा निर्माण केली व भाषेने मानव निर्माण केला. असा थोडासा विरोधाभासात्मक दिसणारा सिद्धांत भाषेसंबंधी घालता येण्यासारखा आहे. मानवानेच आपल्या बुद्धिसामर्थ्याने मूळ एकसुरी आवाजात निरनिराळे प्रकार उत्पन्न केले. त्यांचे पुन: निरनिराळे वरसमूह किंवा उच्चारसमूह तयार केले व त्या उच्चारसमूहांना निरनिराळे अर्थ दिले. ही सर्व मनुष्याची कमाई आहे. ही त्याच्या बुद्धिसामर्थ्याची फलश्रुती आहे. मानवाने भाषा निर्माण केली, ह्या सिद्धान्ताच्या मुळाशी हीच विचारसरणी आहे."[३] भाषेच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधाने कुलकर्णी यांचे मत विश्वसनीय व स्वीकाराई आहे. मराठी भाषेचा साहित्य आणि संस्कृतीवर कोणता परिणाम झाला, काय प्रभाव पडला याचा भाषिक संबंध जोडणे हे शोधनिबंधाचे मुख्य प्रयोजन आहे.

साहित्य :

साहित्य ही भाषेची निर्मिती असते. (Literature is a product of language) साहित्य हे मानवतावादी असते. माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. माणसाचे आचार, विचार, स्वभाव, उक्ती, कृती, संवेदना, जाणिवा व भावभावना या गोष्टींची अभिव्यक्ती ही साहित्याद्वारे होत असते. मानव प्राणी हा वस्त्यांनी बनलेल्या समाजात राहतो. मानवी व्यक्तित्व हे स्वभाव, अनुभव व वर्तनामुळे घडत असते. साहित्य हे मानवसापेक्ष आहे. साहित्याचे मौखिक आणि लिखित साहित्य असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही प्रकारांमध्ये भाषा ही निराळ्या पद्धतीने कार्य करते. लिखित साहित्य हे प्राचीन काळापासून वेद, उपनिषदे, श्रुती स्मृती पुराणे व महाकाव्याच्या रुपाने लिहिले गेले. तर मौखिक वाङ्मय लोकवाङ्मयाच्या रुपाने संक्रमित होत एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत आपला वारसा हस्तांतरित करण्याचे कार्य करते. ती मौखिक साहित्य परंपरा होय. लोकगीते, लोककथा, म्हणी, उखाणे, आहाणे, वाक्प्रचार व विविध सण उत्सवाच्या प्रसंगी गाईलेली विधीगीते हे परंपरेने चालत आलेले असते. त्याचा कर्ता अनामिक असतो. तर याउलट कविता, कथा, कादंबरी, नाटक, लघुकथा, दीर्घकथा, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथा, ललित गद्य, निबंध व लघुनिबंध इत्यादी अनेक प्रकार लिखित साहित्यामध्ये येतात. सर्व रचनाप्रकारांमध्ये भाषा एकसारखी कार्य करत नाही तर प्रकानिहाय त्यामध्ये बदल संभवतो. साहित्याला मानवतावादाचे अधिष्ठान असते. माणूस साहित्याचा केंद्रबिंदू आहे. साहित्य हे मानवसापेक्ष असल्याकारणास्तव 'माणूस' हा केंद्रबिंदू मानून साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे. कोणतेही साहित्य हे शेवटी मानवतावादी दृष्टिकोनातून जन्माला येत असते. साहित्य म्हणजे काय? तर ज्यामध्ये सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाच्या संबंधात मनुष्यमात्रांचा अभ्यास केला जातो, त्याला साहित्य म्हणावे. 'मानुषता' हेच साहित्याचे सारतत्व आहे असे शरच्चंद्र मुक्तिबोध यांना वाटते. या संदर्भात डॉ.सदा कऱ्हाडे लिहितात, "साहित्य हे सामाजिक अंत:सत्वाचे (Social ethos) निर्देशक असते. तसेच साहित्य हे सामाजिक अंत:सत्वाचे निर्माणकही असते. साहित्य ही सामाजिक निर्मितीही असते आणि सामाजिक शक्तीही असते. साहित्यिक हा ठरवला गेलेलाही असतो. तसाच ठरवणाराही असतो. म्हणून साहित्यामध्ये सामाजिकता आणि कलात्मकता यांचे अटळ साहचर्य असते."[४] साहित्य हे शेवटी या समाजाचे अपत्य आहे. हे अपत्य समाज आणि भाषा या माध्यमातून उदयाला येते. म्हणून भाषा, साहित्य आणि समाज यांचे अन्योन्यश्रयी संबंध आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. थोडक्यात लेखक साहित्यकृतीची निर्मिती करतो. वाचक साहित्यकृतीचा आनंद घेतो. साहित्यनिर्मिती ही संश्लेषणाची प्रक्रिया आहे. तर, साहित्यसमीक्षा ही विश्लेषणाची प्रक्रिया असते.

समाज :

साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध असतात. ते संबंध अत्यंत व्यामिश्र व गुंतागुंतीच्या स्वरूपाचे असल्यामुळे कलाकृती ही त्या समाजातील कलावंताच्या प्रातिभिक व बौद्धिक संपदेचा अंश बनते. कलाकृतीची निर्मिती ही व्यक्तिगत असते. पण हा सर्व व्यवहार समाजाचा भाग असतो. सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक घटकांचा परिणाम हा लेखकाच्या मनावर होत असतो. शेवटी लेखक व वाचक हा देखील सामाजिक पर्यावरणात घडत असतो. साहित्य निर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम असतो. साहित्याचे स्वरूप आणि त्याच्या निर्मितीच्या पाठीमागे असणारे हेतू याला देखील सामाजिक संदर्भ असतो. अशा प्रकारे साहित्य आणि समाज यांच्या संबंधाविषयी बहुविधदृष्ट्या अनेक विचारवंतांनी आपले सिद्धांतन केले आहे. सुप्रसिद्ध फ्रेंच विचारवंत तेन याने जो विचार मांडला आहे, तो अत्यंत मूलभूत स्वरूपाचा ठरतो. या संदर्भात डॉ.सदा कऱ्हाडे लिहितात, "साहित्यकृतीतून मानवी अनुभवाचे दर्शन घडते. मानवी वर्तनाचा प्रत्यय येतो. मानवी संपन्नतेचे दर्शन घडते. म्हणून कलाकृती अथवा साहित्यकृती, कलावंत (व्यक्ती) आणि समाज यांच्यातील संप्रेषणाचे साधन बनते."[५] थोडक्यात तेन या समाजशास्त्रज्ञाने मांडलेल्या घटकांचा परामर्श डॉ.कऱ्हाडे यांनी मांडलेल्या मताचा विचार करून करता येईल. वंश, काळ आणि परिस्थिती हे तीन घटक साहित्य निर्मितीस अनुकूल ठरतात. माणसाला अनुवांशिकदृष्ट्या वंश प्राप्त होतो. त्यामुळे त्याची जडणघडण ही वंशपरत्वे होत असते. काळ हा युगप्रवृत्तीशी संबंधित असतो. काळाचाही परिणाम शेवटी व्यक्ती आणि साहित्यावर होतो. परिस्थिती ही काळाच्या ओघात निर्माण होते. म्हणून लेखकाच्या निर्मिती प्रक्रियेवर त्याचाही परिणाम जाणवतो. शेवटी कलावंत हे सर्व हेतूपुरस्सर करतोच असे नाही. त्याला आलेले अनुभव तो मांडतो. तो समाजशील प्राणी असतो. समाजाचा तो घटक असल्यामुळे स्वत:ला समाज जीवनापासून वर्ज्य करू शकत नाही. तसेच स्वत:च्या अनुभवविश्वातून समकालीन समाजजीवनालाही वर्ज्य करू शकत नाही. म्हणून साहित्यकृतीत असे संप्रेषण महत्त्वाचे ठरते. साहित्य आणि समाज यांच्यातील अतूट संबंध अधोरेखित झाले तर समकालीनत्वाचे भान येते. अशी निर्माण झालेली कलाकृती शेवटी अक्षय व अजरामर ठरते.

संस्कृती :

भाषा ही मानवी जीवनाचे अभिन्न अंग आहे. अशी भाषा जेव्हा पुढील पिढ्यांसाठी अपरिचयाची बनते. खरे तर हे भाषेचे मरण असते. ते मरण हे लोकसंस्कृतीचे देखील असते. कारण भाषा ही संस्कृतीची वाहक असते. भाषा ही संस्कृती आहे आणि संस्कृती ही भाषा आहे. एवढे दोघींचे अभिन्न असे नाते आहे. संस्कृती हा समाजाचा परिवेश, (पोशाख) साहित्य आणि कला हे संस्कृतीचे घटक आहेत. मनुष्य हा समाज करून राहू लागला तेव्हापासून त्याचे समूहात्मक व संस्थात्मक जीवन सुरू झाले. संस्थात्मक जीवन हा माणसाच्या सामाजिक जीवनाचा एक आविष्कार आहे. संस्थात्मक गरजेनुसार लिखित व अलिखित नियम सिद्ध झाले. त्यामधून चालीरिती आणि रिवाज परंपरा जन्माला आल्या. त्यातून माणसाची कला (Art), संस्कृती (Culture) आणि सभ्यता (Civilization) विकसित होत गेली. सभ्यता ही नागरी जीवन जगण्याची पद्धत आहे. अगदी सखोलपणे विचार केला तर संस्कृती ही देखील जीवन पद्धतीच आहे. या संदर्भात डॉ.अनिल गवळी लिहितात, "जीवनातल्या शिस्तबद्ध, सर्वमान्य आणि आवश्यक सवयींचा संग्रह म्हणजे संस्कृती होय. संस्कृतीत सर्व सामाजिक संस्था, रुढी, परंपरा, श्रद्धा, संकेत यांचा समावेश होतो. एखाद्या विशिष्ट समाजाची विशिष्ट संस्कृती असते. अर्थातच मानवी जीवनाची सर्व अंगे श्रुतिगोचर करणारी भाषा आणि संस्कृती यांचा निकटचा संबंध आहे."[६] संस्कृती या संज्ञेने समुहाच्या जीवन जगण्याच्या व त्याचबरोबर भाषा जाणून घेण्याच्या पद्धतीचा खऱ्या अर्थाने बोध होईल. यावरून संस्कृतीची दोन रूपे प्रत्ययाला येतात. एक

व्यक्त रूप तर दुसरे अव्यक्त रूप होय. व्यक्त रुपाला भौतिक संस्कृती असेही म्हणतात. यामध्ये शेती, व्यापार, व्यवसाय, रस्ते, वाहने, अवजारे, भांडीकुंडी, यंत्रसामुग्री, घरेदारे व गुरेढोरे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. तर अव्यक्त करूपात धर्म, तत्त्वज्ञान, नीती, कायदा, वाङ्मय, कला व करमणुकीची साधने या घटकांचा समावेश होतो. या दोन्ही घटकात विभागली गेलेली संस्कृती ही मानवाला उपकारक ठरणारी आहे. माणूस हा समाजात राहतो. त्याच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. एका पिढीकडून तो दुसऱ्या पिढीला वारसा देण्याचे कार्य करीत असतो. आपल्या अनुभवाद्वारे तो संस्कृतीत भर घालीत असतो. त्यामुळे संस्कृतीचा विकास होतो. प्रत्येक समूहाच्या संस्कृतीचे व भाषेचे गुणधर्म व आचरणाच्या पद्धती, भाषा वापराच्या सवयी भिन्न असतात. या संदर्भात डॉ.सुधीर रसाळ यांचे मत चिंतनीय वाटते ते लिहितात, "भिन्न-भिन्न गुणधर्माच्या भूभागांवर स्वाभाविकपणे भिन्न-भिन्न संस्कृती उभ्या राहत असल्यामुळे प्रत्येक संस्कृती ही दुसऱ्या संस्कृतीपेक्षा वेगळी असते. प्रत्येक संस्कृतीला आपापला स्वत:चा चेहरा असतो. तिला स्वत:ची ओळख असते. तिच्यातील प्रत्येक व्यवस्थेतून तिचा हा खास चेहरा प्रकट होत असतो."[७] म्हणून असे म्हणता येईल की, संस्कृती ही साहित्याप्रमाणे निसर्गदत्त नसून मानवनिर्मित आहे. संस्कारातून जी घडते ती संस्कृती होय. प्रकृती, विकृती आणि संस्कृती या तीन संज्ञा आहेत. मानव व निसर्ग यांचे निकटचे नाते व साहचर्य लक्षणीय आहे. या बळावरच ती टिकून आहे.

निष्कर्ष

१) भाषा, साहित्य, समाज, संस्कृती आणि इतिहास आपल्या जगण्याचे आधारस्तंभ असतात. आपल्याला मानसिक आधार पुरवून ते आपला देशाभिमान जागवितात.

२) साहित्य व भाषेमुळे संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन होते.

३) साहित्य हे जीवनसापेक्ष असते. त्यामुळे साहित्याचा संस्कृतीशी असणारा अतूट संबंध नाकारता येत नाही.

४) शुद्ध कला या हेतूरहित असतात. त्यांची निर्मिती हीच त्यांचा हेतू असतो. परंतु साहित्यासारख्या व्यामिश्र कलेत ही संभाव्यता नसते.

सारांश :

मराठी भाषा, साहित्य, समाज, कला आणि संस्कृतीचा वैचारिक अनुबंध जोडताना पाचही घटकात एक परस्परान्वयी नातेसंबंध निर्माण होतात. संस्कृती ही सर्वसमावेशक अशी संकल्पना आहे. मानवी जीवनाच्या भौतिक आणि अभौतिक गरजा संस्कृतीमुळे पूर्ण होतात. संस्कृतीमुळे भाषा, साहित्य आणि समाजाला एक प्रकारचा अर्थ प्राप्त होतो. साहित्यातील लेखकनिष्ठ अनुभवात संस्कृतीचे रूप प्रत्ययाला येते. एका अर्थी ते सामाजिक परावर्तन असते. म्हणून भाषेच्या माध्यमातून निर्माण झालेले साहित्य सामाजिक व सांस्कृतिक बदलाचे बलस्थन असते; असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

संदर्भ सूची

१) खंदारे, साहेब (२०१९) : 'उपयुक्त आणि अनिवार्यही', अंतर्भूत : अनुवाद : सिद्धांत आणि प्रक्रिया, डॉ.सुरेश शिंदे, प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, आवृत्ती पहिली, पृ.९

२) जाधव, रा.ग. (२००६) : 'निवडक समीक्षा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, पृ.१२३

३) कुलकर्णी, कृ.पा. (२००९): 'मराठी भाषा उद्गम व विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, पृ.१८

४) कऱ्हाडे, सदा (२००७) : 'समाज आणि साहित्य', लोकवाङ्मय गृह, मुंबई, आवृत्ती तिसरी, पृ.४, ३१

६) गवळी, अनिल व इतर (२०१३): 'भाषासंवाद', सायन पब्लिकेशन्स, पुणे, आवृत्ती पहिली, पृ.३४

७) रसाळ, सुधीर (२०१०) : 'वाङ्मयीन संस्कृती', मौज प्रकाशन गृह, मुंबई, आवृत्ती पहिली, पृ.२

भारतीय परिप्रेक्ष्यातील समाजाभिमुख ग्रामीण कादंबरी

प्रा. डॉ. रेखा रा. जगनाळे - मोतेवार

श्री भैय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क हनुमान नगर नागपूर

भारतीय साहित्याच्या संदर्भात एकोणिसावे शतक फलदायी ठरले.या शतकात आधुनिक भारताचा जन्म झाला. वेगवेगळ्या बदलाबरोबरच सर्वांगीण परिवर्तनातून समाजजीवनात बदल घडून आला आणि या परिस्थितीमध्ये ग्रामीण कादंबरी उदयाला आली आणि आजही ती विकास पावत आहे.भारत देश हा खेड्यापाड्यांचा कृषिप्रधान असा देश आहे. याला महाराष्ट्र देखील अपवाद नाही. भारत देशाबरोबरच महाराष्ट्राची खरी संस्कृती व जीवनपद्धती खेड्यामधून स्पष्टपणे जाणवते. देशातील जवळपास अंशी टक्के जनता ही खेड्यातच असल्याचे प्रामुख्याने जाणवते अशा या मोठ्या प्रवाहाच्या जीवनजाणिवा ग्रामीण कादंबरीतून चित्रित होऊ लागल्या. ग्रामीण जीवनात अनेक रोमहर्षक घटना घडत होत्या परंतु या घटनांची दखल मराठी साहित्यातून व्यक्त होत नव्हती. मराठी साहित्यावर या कालावधीत पांढरपेशा समाजाचे वर्चस्व असल्याने ग्रामीण जीवन साहित्याच्या दृष्टीने दुर्लक्षितच होते. शहरातील लोकांची सुखदुःखे त्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांच्या धडपडी यांनाच जणू वाङ्मयीन मूल्ये प्राप्त झालेली होती. उलट ग्रामीणांचे जीवन रंगविणे, ग्रामीणांच्या बोलीतून ग्रामीणांना त्यांच्या वास्तव समस्यांसहित उभे करणे हे जणू कलासंरक्षकांनी कलाबाह्य ठरविले. ही जाणीव महात्मा फुले तसेच महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या घोषणेमुळेही झाली. स्वातंत्र्य आंदोलनाच्या निमित्ताने ग्रामस्थांकडे लक्ष वेधण्याचे फार मोठे कार्य महात्मा गांधींनी केले. साहित्याच्या आधारे सामाजिक परिवर्तनाचे कार्य करू शकतो याची जाणीव या दोन्ही महात्म्यांना झाली.

१९२० च्या आसपास सुरू झालेला हा ग्रामीण साहित्याचा प्रवाह साठोत्तरी कालखंडात विविधांगांनी विकसित होत गेला. आज या साहित्य प्रवाहात कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारातून विपुलपणे लिहिले जात असले तरी ग्रामीण कादंबरीने मराठी कादंबरीच्या क्षेत्रात आपला निराळा ठसा प्रस्थापित केला. या साहित्यावर महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव जाणवतो.महात्मा फुले यांची वैचारिक भूमिका ग्रामीण साहित्याने स्वीकारली आणि ग्रामीण, दलित,आदिवासी जीवन ग्रामीण साहित्यातून अभिव्यक्त होऊ लागलं. त्यातून मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान प्रकट होऊ लागले.

मानवी हक्क, न्याय, शांतता आणि मानवाची उन्नती या महात्मा फुले यांच्या तत्त्वांना स्थान मिळाले. शूद्र आणि अतिशूद्र यांची होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची व अधिकारांची शिकवणूक देणे आणि परंपरेच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे हे 'सत्यशोधक' मधून सांगितलेले ध्येय धोरण ग्रामीण साहित्याचे उद्दिष्ट ठरले.

मराठी साहित्यातील कादंबरी या साहित्य प्रकारामध्ये प्रारंभापासून मुख्यत: तीन प्रवाह स्पष्टपणे आढळतात. ते म्हणजे रंजनप्रधान, सामाजिक आणि ऐतिहासिक हे प्रवाह ठळकपणे रुजत असतानाच कमी अधिक प्रमाणात मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह आपले अस्तित्व दाखवू लागला. याशिवाय ग्रामीण साहित्याची वेगळी अशी प्रेरणा घेऊनही ते जन्मास आले नव्हते. त्यामुळे ग्रामीण जीवन उपेक्षितच राहिलेले दिसते. विशेषतः १९२०

पासून मराठीत ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली. या काळात मराठी साहित्यावर गांधीवादी, मार्क्सवादी, समाजवादी विचारसरणीचा विशेष प्रभाव होता ग्रामीण कादंबरीच्या प्रथम कालखंडावर महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा अधिक प्रभाव जाणवतो. महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला', 'भारताचा आत्मा खेड्यात आहे.' या उपदेशामुळे ग्रामीण साहित्याच्या निर्मितीवर लोकांनी अधिक भर देण्यास सुरुवात केली. त्यांच्या विचारसरणीने या कालखंडातील लेखकांना अंतर्मुख केले. या सर्व बाबींमुळे प्रेरित होऊन साहित्याची निर्मिती तर होऊ लागली. परंतु या कादंबऱ्यांमधून येणारे ग्रामीण वास्तव हे वरवरचे जाणवू लागले. त्यात आत्मीयतेचा अभाव वाटू लागला. एकूणच एकोणीसशे वीस नंतरचा काळ हा अनेक बाबतीत महत्त्वाचा काळ ठरला. या काळात महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या विविध घडामोडी होऊ लागल्या. परिवर्तनवादी विचारांचे प्रवाह साहित्यिकांना भेडसावू लागले.या घटनांमुळे मराठीत ग्रामीण कादंबऱ्यांची निर्मिती होऊ लागली. आज ग्रामीण या संज्ञेचा अर्थ व्यापक झालेला असला तरी केवळ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे ग्रामीण कादंबरीत अभिप्रेत नाही तर वास्तवामागचे वास्तव चित्रित करणे हा प्रमुख हेतू आहे. त्यामुळेच ग्रामीण कादंबरी अनेक अर्थाने लक्षवेधक आणि निराळी ठरली. यामुळेच ग्रामीण कादंबरीला सुमारे शंभर वर्षांचा समृद्ध वारसा लाभला.

'अमृतातेही पैजा' जिंकणाऱ्या मराठी भाषेतील पहिली कादंबरी ही भाषांतरित आहे हे सर्वश्रुत आहे. या समृद्ध अशा मराठी भाषेचा अभ्यास करताना मराठी ग्रामीण साहित्यातील पहिली कादंबरी कोणती याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. पण आजवरच्या साहित्यिकांनी काढलेल्या अनुमानानुसार रा.वि.टिकेकरांची १९०३ सालची 'पिराजी पाटील' ही कादंबरी पहिली ठरली, तर या दृष्टीने पाहिल्यास मराठी कादंबरीच्या वाटचालीत अनेक चढउतार दिसून येतात. मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीपासून ग्रामीण कादंबरीचा प्रवास बघावयाचा असल्यास या कादंबऱ्यांची निर्मिती प्रेरणा काय होती, कोणत्या कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरी विश्वाला विशिष्ट वळण लावले, निवेदन व पात्र संवाद यात कसा फरक पडत गेला.

भारतीय जीवन जाणिवेचा आत्मा ग्रामीण असल्यामुळे आणि कृषी संस्कृती हीच भारतीय जीवन व्यवस्थेचे अंग असल्यामुळे महात्मा फुले आणि महात्मा गांधी यांच्या प्रेरणेने ग्रामीण लेखकांनी ग्रामीण कादंबरीचे रूप विस्तारून ग्रामीण कादंबरीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली या दृष्टिकोनातून भारतीय परिप्रेक्षात वास्तवदर्शी समाजाभिमुख झालेल्या काही निवडक कादंबऱ्यांचा विचार येथे करता येईल.

फकीरा' ही अण्णाभाऊ साठे यांची कादंबरी. वारणेच्या खोऱ्यातील अन्यायाविरूद्ध चीड असलेल्या एका विराची शौर्यगाथा आहे. 'फकिरा' कादंबरी अनेक दृष्टींनी महत्त्वाची आहे. ग्रामीण- प्रादेशिक, दलित,ऐतिहासिक कादंबरी म्हणून जशी महत्त्वाची आहे. तशीच ती एका उपेक्षित समाजातील नायकाचे बंडखोर जीवन समाजासमोर आणणारी कादंबरी म्हणूनही महत्त्वाची आहे.कादंबरीतील नायकाचे बंड सामाजिक न्यायाची आणि स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊन येते. त्याचे जगणे व जगवणे त्याचा संघर्ष हा व्यवस्था परिवर्तनाचा इतिहास ठरणारा आहे.या इतिहासात अनेक वीर आहेत उदा. बिरसा मुंडा ,बारा मोकाशी चंद्रपूर जिल्ह्यातील उमाजी नाईक अशा अनेक समाजासमोर न आलेल्या शूरवीरांच प्रतिनिधीक रुप फकिरा आहे'या शूरवीरांनी इंग्रजांशी लढताना स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे .फकीरा'मध्ये नैतिकतेचे वेगळेच चित्र पाहायला मिळते. याचे कारण गावांत दुष्काळ पडतो भूकेने माणसे मरायला लागतात. त्यावेळी धान्य मागण्यासाठी फकीरा विष्णुपंतांच्या वाड्यावर जातो. त्यावेळी विष्णुपंत कुलकर्णी सांगतात, 'कोणी कोणाचा धनी नाही'. 'तुमचे हे ही दिवस

जातील,दिवस घर बांधून राहत नाहीत! 'दुष्काळ आणि उपासमारी व महामारीमुळे हतबल झालेल्या फकीराला आणि गावकऱ्यांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढून आशेचा नवीन किरण दाखविणारे विष्णुपंतांचे हे लाखमोलाचे वाक्य आजच्या काळातही तंतोतंत लागू पडतात. माझ्याभोवती आक्रोश सुरू झाला आहे, 'तुम्ही जगलंच पाहिजे. मरणापेक्षा आज जगणं खूप महत्त्वाचं आहे.' येथे त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसतो.त्याचबरोबर मी संकटात आहे.येथे त्यांचा प्रामाणिकपणा दिसतो.एवढे दुष्काळाचे सावट गावावर असतानाही माणसं जगली पाहिजे.' या त्यांच्या उद्गारातून त्यांचे गावातील लोकांप्रति अपार प्रेम दिसून येते. ज्यावेळी स्वत:हून फकीरा माळावर जाऊन अटक करून घेतो, त्यामुळं त्याच्या कुटुंबातील लोकांची सुटका होते. त्यावेळी फकीराला तेथील एक इंग्रज अधिकारी विचारतो, ही तलवार तुला कुठे मिळाली. तेव्हा ही तलवार माझ्या पूर्वजांना शिवाजी महाराजांनी दिली हे फकिरा गंभीर होऊन सांगतो.---ही तलवार घेऊन माझा बाप लढला आणि मी आज तुमच्याशी लढत आहे. या संवादात फकीरचा निर्भीड व प्रामाणिकपणा दिसतो.यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचा आदरभाव, वडिलांच्या पराक्रमाबद्दल अभिमान दिसतो. नैतिकतेच्या दृष्टीनेही 'फकिरा' ही कादंबरी महत्त्वाची आहे.

अण्णाभाऊंनी 'फकिरा' हा परिवर्तनवादी नायक म्हणून उभा केला.या नायकाने भारतातील वंचित समाजाला जगण्याचे आशावादी धडे दिले.अशाच वंचितांचा प्रेरणास्त्रोत आजही फकिराच आहे.दुष्काळात मरणारी माणसं वाचवणारा, छळछावणीतून दुर्बलांची मुक्तता करणारा आणि खजिना लुटून गरिबांना वाटून देणारा.असा हा फकीरा आहे.वास्तवाचे भान आणि जनसामान्यांचा प्रतिनिधी फकिरा हा या कादंबरीचा नायक म्हणून श्रेष्ठ ठरतो. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही सर्वोत्कृष्ठ कादंबरी.या कादंबरीच्या माध्यमातून ते सामाजिक एकीकरण, संस्कार, राजकीय व्यवस्था, प्रेम अशा उच्च मूल्यांची पेरणी करताना दिसतात. सोबतच दीन दलितांचे हीन जीवन, सहिष्णुता, लढवय्येपणा, राष्ट्रीय कर्तव्य या मूल्यांचीही शिकवण देतात. म्हणूनच 'फकिरा' कादंबरी सामाजिक दृष्टीने उदात्त व उन्नत भावनेने भरलेली एक अविस्मरणीय अशी कथा ठरते. 'फकीरा' कादंबरी मधून इंग्रजी राजवटीच्या दरम्यान भारतीयांची झालेली होरपळ त्याविरुद्धचा लढा, उपेक्षित समाजाची होणारी हालअपेष्टा, इंग्रजी राजवटीचा जुलूम व या सर्वांच्या विरोधात बंड पुकारणारा मातंग वाड्यातील फकीरा हा कादंबरीतील नायक ज्याला ब्रिटिश फौजा कधीही पकडू शकल्या नाहीत. फकीराने ब्रिटिशांसमोर समर्पणही केले नाही. परंतु सर्व गावकऱ्यांच्या जीवाचा धोका ओळखून गावाकरिता हसत, हसत आत्मसमर्पण करणारा व फासावर जाणारा उमदा व दिलदार लढवय्या म्हणजे अण्णाभाऊंचा 'फकिरा' होय. फकीरामधून सामाजिक प्रबोधन भारतीय खेड्यांतील चिवट परंपरा जातीयतेच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या उतरंडी, त्यातून मानसिकदृष्ट्या विभागलेला समाज आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी जिवाची बाजी लावणारे राणोजी मांग यांचा मुलगा फकीरा, विष्णुपंत कुळकर्णी आणि असंख्य आदर्शवत पात्रे यांसोबत ब्रिटिश सरकारचे हजरुक बापू खोत, रावसाहेब पाटील यासारखी अनेक पात्रे साकारली आहेत.

कोण्या दुसऱ्या गावातील जोगतीण हिमतीच्या व शस्त्राच्या जोरावर आपल्या गावात पळवून आणल्याने गावाची जमीन सुपीक होईल, पाऊस पडेल. अन्नधान्य पिकेल व वाटेगावात सुबत्ता येईल. या भावनेने राणोजी जिवाची बाजी लावून जोगतीण पळवून आणण्याचे अलौकिक कार्य करतो. म्हणतो,'मी मेलो तरी चालंल पण गाव जिता राहिला पाहिजे.' या उदात्त भावनेने प्रेरित होतो. व गावावरून जीव ओवाळून टाकण्यास सज्ज झालेला राणोजी शौर्य दाखवून तीनशे माणसांच्या घोळक्यातून शिगावची जोगतीण पळवून वाटेगावच्या हद्दीत आणतो.

परंतु शिगावात येताच बापू खोत राणोजीचे शीर कापून नेतो. हाच वाटेगाव व शिगावमधील संघर्षाचा मुद्दा ठरतो. राघोजींचा मुलगा फकीरा बापाच्या खुनाचा बदला घेण्याचा निश्चय करतो.' विंचू ठार मारण्याऐवजी त्याला नांगी तोडून जिवंत ठेवणारा' फकिरा हा गावकऱ्यांचा अत्यंत प्रिय होतो. रावसाहेब पाटील व बापू खोत ब्रिटिश सरकारला फकिरा व त्याच्या साथीदारांना गुन्ह्याचा आरोप लावून सोपविण्याकरिता प्रयत्नशील असतात. परंतु फकिराच्या बाजूने वाटेगावचा विष्णुपंत कुलकर्णी खंबीरपणे उभा राहतो. गावकऱ्यांना म्हणतो, 'जगा कुत्र्याच्या माैतिनं मरू नका' हे विष्णुपंतांचे शब्द फकीराला प्रेरीत करतात. फकीरा दरोडे टाकून गावांतील दुष्काळात मरणाऱ्यांना जीवदान देतो. पुढे फकीराला धान्य लुटल्या कारणाने अटक होते.परंतु अत्यंत निर्णायक क्षणी विष्णुपंत कुलकर्णी फकीराला अटकेतून सोडवतात. फकीरा अखेर शिगावची जोगतीण पळवून आणतो.बापू खोताचे मुंडके कापतो व आपल्या बापाच्या खुनाचा बदला घेतो. यामुळे फकीरा संपूर्ण वाटेगावचा व मांग समाजाचा नायक ठरतो. अस्पृश्यांच्या असहाय्यतेला अण्णाभाऊंचा फकीरा वाचा फोडताना दिसतो. समाजाच्या अंतर्मनातील पेटते अस्मितेचे निखारे विजेप्रमाणे कडाडणारे त्याचे 'शब्द' थरकाप उडवणारी जिद्द व शौर्य अण्णाभाऊंच्या शब्दांतून 'फकीरा'त प्रकट होते. 'फकीरा' ही कादंबरी सामाजिक स्मितेचा ठेवाच आहे. जातीपाती विसरून आपला गाव म्हणून एकत्र लढण्याचा संदेश स्पृश्य अस्पृश्यांनी एकत्र लढण्यातून दिला तो 'फकिरा'नेच. फकिराच्या रक्तात ओतप्रोत भरलेला गुण म्हणजे माणूसकी! रघुनाथ या ब्राह्मणाच्या वाड्यावर खजिना लुटायला गेलेला.फकीरा त्याच्या माणुसकीचे दर्शन घडवतो. याचबरोबर स्त्रियांची अब्रू व चरित्र स्वत:च्या जीवापेक्षा अधिक महत्त्वाचे मानणारा फकीरा त्याची साक्ष देतो. फकीरा हा दरोडेखोर नाही तर माणुसकीची जाण असणारा स्वाभिमानी निर्भयी,निर्मळ मनाचा व अन्यायाविरोधात बंड करण्याची धमक असणारा नायक आहे. इंग्रजी सत्ता व ब्रिटिशांना न जुमानणारा फकिरा देशातील पारंपरिक श्रद्धा-भक्तिभाव घेऊन अत्यंत स्पष्टपणाने या कादंबरीत साकारला आहे. कादंबरीतील जोगीणीची कल्पित कथा अंधश्रद्धांवर आधारलेली असली तरी लोकसंस्कृतीशी नाळ जोडणारी आहे. शंकर पाटील व विष्णुपंत कुळकर्णी हे संस्कृतीचे पुढारी आहे.विष्णुपंत हे एक आदर्श करारी दमदार व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या मते, 'मरण्यापेक्षा जगणं महत्त्वाचं आहे.' असं ते गावकऱ्यांना सांगतात. वंचित समाजातील अंधश्रद्धा अशिक्षितपणा आणि दारिद्र्यावर फकीरा प्रहार करते. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दारिद्र्य फकिरा मधून प्रकट होते. वास्तवाचे भान आणि जनसामान्यांचा प्रतिनिधी फकिरा हा या कादंबरीचा नायक श्रेष्ठ आहे. म्हणूनच मराठी साहित्यात 'फकिरा' ही कादंबरी मैलाचा दगड ठरते.

साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे.या आरशामध्ये समाजमनाचे आणि समाज जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब दिसते. समाजात सौंदर्य असते तसेच कौरुप्य-सुरुपता -विकृती असते. तसेच नीती- अनीतीही असते. या सर्व बऱ्या-वाईट वास्तवपूर्ण आणि कलात्मक पातळीवरिल दर्शन शंकर बाबाजी पाटील यांच्या 'टारफुला' या कादंबरीतून आले आहे.

'टारफुला' म्हणजे शेतात रानात उगवणारे अनावश्यक तण/गवत, पिकाला मारक ठरणारे तण. शेतात टारफुला वाढला की, तो पिकालाच खाऊन टाकतो.पिके वाढू देत नाही. म्हणून तो सारखा काढून टाकावा लागतो. पण तो कितीदा जरी काढला तरी जरासं खत पाणी मिळताच डोकं वर काढतो, म्हणूनच त्याच्या नष्ट होण्याच्या प्रक्रियेतूनच त्याच्या नव्या अस्तित्वाची सुरूवात होते असं म्हणतात ते याचमुळे. अशी कित्येक टारफुलं समाजात

जगत असताना, वावरताना पाहायला मिळतात आणि यातून जर प्रश्न राजकारणाचा, सत्ताचक्राचा असेल तर असं अनावश्यक तण माजायला वेळ तरी किती लागतो.

शंकर पाटलांनी पहिल्याच कादंबरीमधून गावागावात पसरलेल्या या सत्ताचक्राच्या, राजकारणाच्या विषयाला आपल्या अस्सल ग्रामीण बोलीभाषेत साकारले. तत्कालीन पाटीलकी सारख्या विषयावर हे कथाचक्र फिरतं राजकारणातील ईर्षेने व त्यातून बदलत जाणारा मानवी स्वभावाचा प्रवास 'टारफुला' कादंबरीतून आपल्याला घडतो. तसं पाहता राजकारणासारख्या क्षेत्रात नायक हा केवळ काही काळापुरता स्थायी असतो, कारण सत्तेची चक्र बदलताच नायकही बदलतो. शंकर पाटीलांनी बहुधा याच निरीक्षणाच्या जोरावर कादंबरीतला नायक कोणा एका व्यक्तीला केलेला नाही हेच या कादंबरीचं वेगळेपण आहे.

'टारफुला'मधे ग्रामीण जीवनातील घटनांचा आढावा घेतलेला आहे. कोल्हापूर जवळपासच्या एका दुर्गम खेड्यातील पहिल्या पाटलाचा गावावरील प्रभाव संपताच पाटलीन बाईकडे दत्तक म्हणून आपल्या मुलाची वर्णी लावण्याचा प्रयत्न करणारे गाव-गट, त्यातून फरारी- रामोशी- गुन्हेगारांना जवळ करण्याची प्रवृत्ती, कुलकर्णी यांचा खुन, त्यानंतर नव्या पाटलाचे आगमन, त्याची गावावर बसलेली जरब आणि शेवटी त्यालाही झालेला त्रास-- --- यात 'टारफुला' हे प्रतीक बनलेले आहे. सत्तेचा प्रभाव संपला की अराजकता माजते. स्वार्थासाठी ग्रामीण लोकं एकमेकांचे खून पाडण्यासही मागेपुढे करीत नाहीत. शेतजमीनी लाटण्याची त्यांची प्रवृत्ती व त्यातून परस्परांबद्दल वाटणाऱ्या अविश्वासू ग्रामीण जीवनाचे चित्रण शंकर पाटील या कादंबरीतून करतात.

'टारफुला'मधे हुकूमत गाजवणाऱ्या माणसाची कथा आहे पण तेवढीच त्याला डावलून स्वतः जागा बळकावणाऱ्या व्यक्तीची कथा आहे. सत्तेसाठी चाललेल्या वैरात मग गावातील मंडळी कोणतीतरी बाजू घेतात. तेथे त्यांना तटस्थ राहता येत नाही. सुभानराव पाटील, आबा कुळकर्णी, लखु भटजी, पाटलीण बाई तसेच पाटलीण बाईने आपल्याच पोराला दत्तक घ्यावे म्हणून दाजीबा गायकवाड व केरूनाना पवार यांच्यात चाललेली शक्तिपरीक्षा, आणि त्यासाठी घळीतल्या पिऱ्या दरोडेखोराचा केला जाणारा वापर यातून ही कथा गुंफली गेली आहे. या गावचा न्याय म्हणजे एकाला डावलून दुसऱ्याने त्याच्या जागी येणे, आणि अखेर मागीलांच्याच मार्गाने जाणे म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती वठविणे. ग्रामीण जीवनात सावकार व कुळे, शेती आणि मालकी, पाटीलकी आणि कुळकर्णीपण, मारामारी या सारयांचे ग्रामीण भागातील स्थान टारफुलासारखेच असते. कोणी कोणाला तरी नष्ट करायचे आणि त्याला नष्ट करण्यासाठी दुसऱ्याने उभे राहायचे. 'टारफुला' हे एका अर्थाने अशाच वृत्तीचे द्योतक आहे.

वर्षानुवर्षे पाटीलकी सांभाळणाऱ्या सुभानराव पाटलांच्या मृत्यूनंतर टारफुलास खऱ्या अर्थानं सुरुवात होते. पाटलाचा कारभार सांभाळणाऱ्या कुलकर्णींना त्याच्या निधनानंतर गावगाडा सांभाळण्यात आलेला असमर्थतेचा फायदा गावातला बंडखोर गट उठवतो. पाटीलकी सोबत होणाऱ्या गावाच्या हेळसांडीमध्ये आबा कुलकर्णींचा निर्घृण खून होतो. हे सगळं बेबंदपणे सुरू असताना अचानक एक दिवस गावात दादा चव्हाण नावाचं वादळ येऊन धडकतं. या नवीन पाटलामुळे गावगाडा सुरळीत चालू होतो.चावडीवर नेमाने जोहार सुरू होऊन दादा पाटलांचा एकछत्री अंमल सुरू होतो. परंतु सत्ता कधी एकटी येत नाही. त्यासोबत येणारी सत्तेची नशा, पैशांची लालसा माणसाला पोखरून टाकते. आपसूकच मग त्यातून विवेकबुद्धीचा लोप होत जातो आणि सुरूवात

होते माणसाच्या र्‍हासाची ! अशीच काहीशी अवस्था दादा चव्हाणांची झालेली इथे पाहायला मिळते. सर्वस्वाचा र्‍हास होत असताना सत्ताचक्र बदलत जाऊन, पुन्हा नवा नायक जन्माला येतो.

गावपातळीवरील संस्कृती तिथले रीतिरिवाज आणि मानवी विचारामधली विविधता याचं सांगोपांग दर्शन कादंबरीतून घडतं. एका साध्या खेडेगावातील सत्ताकारण देखील किती भयंकर असू शकतं याचं वास्तव दर्शन या 'टारफुला' कादंबरीतून घडते. पिढ्या बदलल्या तरी राजकारणाचा पोत बदलत नाही. याची जाणीव देऊन जाते. सत्तेचा खेळ आजदेखील लोकशाहीत तसाच आहे. निरनिराळ्या प्रांतांत आपल्याला तो पाहायला मिळतो

असं हे अनावश्यक असणारं, समाजात खोलवर फोफावलेलं व वेळोवेळी आपली मान जमिनीतून वर करणारं 'तण' काही क्षणात होत्याचं नव्हतं करून जातं. ते मरत नाही, मीटतही नाही कारण त्याच्या नाशातच त्याचं बीज रोवलेलं असतं. असं हे टारफूल सत्ता चक्रातही आढळतं, ते अव्याहतपणे पसरतं, त्याला ना आदी ना अंत! माणसांना मात्र ते सत्ताधारी व विरोधक या दोन गटात सहज विभागून टाकतं! अन् त्यातून उद्भवत जातो राजकारणाचा रक्तरंजित डाव! 'टारफुला' साहित्यकृतीच्या साडेचार दशकानंतरही ते समाजात तसंच आहे.जनमानसात फोफावत सतत आपलं काम चोख बजावत आहे.

'टारफुला' हे मानवी जीवनाच्या जगण्याचाच एक भाग आहे. इर्षेने पेटलेल्या समाजाचं वास्तव यात आहे. आज गरज आहे त्यातून धडा घेण्याची व सर्वत्र फोफावणार्‍या टारफुलाला प्रत्येकवेळी थोपविण्याची अन् माणसाने माणुसकिवर विजय मिळविण्याची.

व्यंकटेश माडगूळकरांनी मराठी साहित्याला समृद्ध करण्यात मोलाचा हातभार लावला. ज्या नजरेतून माडगूळकरांनी मराठी साहित्यात बारकाव्यानिशी माणदेशचा प्रांत उभा केला. त्याच नजरेतून त्यांनी तिथला निसर्ग, प्राणी, पक्षी आणि माणसांचे दैनंदिन व्यवहार टिपले आहे. विविध प्रसंगानुरूप तिथल्या साध्या पण कणखर प्रेमळ माणसांना शब्दांत बांधले. ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात माडगूळकरांनी मोलाची कामगिरी बजावली 'बनगरवाडी', 'वावटळ',' पुढचं पाऊल', 'कोवळे दिवस', 'करुणाष्टक', आणि 'सत्तांतर' ह्या त्यांच्या उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत. 'वावटळ' या कादंबरीत अत्यंत वास्तव अनुभवाचे चित्रण आले आहे. ३० जाने.१९४८ला ५ वाजून ३० मिनिटांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा वध झाला. त्याची जी प्रतिक्रिया प्रथम शहरात आणि नंतर महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून उमटली व त्यामुळे खेड्यातील जनजीवन बेबंद झालं. ही 'वावटळ' एकदम आली आणि शांत झाली पण त्यामुळे ग्रामीण भागातील सहजीवनात रुंद आशी दरी निर्माण झाली. ती आजही तशीच आहे. ही 'वावटळ' नुसती विध्वंसक ठरली नाही विचारप्रवर्तकही ठरली.

म.गांधींच्या वधानंतर महाराष्ट्रात सर्वत्र दंगली उसळल्या त्याचे पडसाद खेडोपाडी उमटले. जुने वैर वैमनस्याचा सूड उगवण्यास खेडय़ातील गुंडांना ही नामी संधी लाभली होती. पुण्याच्या दंगलीचे पडसाद सातारा जिह्यातील 'सारंगपूर ते नांदवडी' या दरम्यानच्या सोमेवाडी, वळवडे, चोपडी अशा खेडोपाडी उमटले. त्यानिमित्ताने त्या क्षेत्रातील तेवढय़ा कालखंडापुरते जनजीवन, त्यातून व्यक्त झालेले स्वार्थ, हेवेदावे, आत्मनिरीक्षण इत्यादीचे चित्रण या कादंबरीतून आलेले आहे. कादंबरीतील जनजीवन जणू विशिष्ट जमातीचे अस्तित्व नामशेष करायला टपलेले, फक्त प्रसंगाची वाट पाहणारे, संधी मिळताच राग-द्वेष प्रगट करणारे असे चित्रीत झालेले आहे. देशात घडलेल्या एका प्रसंगाने ग्रामजीवनात झालेली खळबळ हा या कादंबरीचा विषय.

वावटळ'मधून एका वर्गाच्या स्थानांतर प्रक्रियेचा वेध माडगूळकर घेतात. गांधीवधानंतर ग्रामीण भागात जो ब्राह्मण जातीविरुद्ध उठाव झाला त्याची कथा शंकर नावाच्या एका तरुण ब्राम्हण विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकवली. पुण्यात अस्थिरता निर्माण झाल्यानंतर शंकर आपलं सर्व सामान गुंडाळून आपल्या मित्रांसमवेत बेचिराख झालेल्या गावांना वळसे घालत घरी जात असताना त्याने अनुभवलेल्या प्रसंगांतून संशय, अविश्वास, धैर्य, कौर्य, पराकोटीचा अविचारीपणा यांचे चित्रण माडगूळकरांनी साकारलेलं आहे. शंकर सारख्या कुटुंबातील माणसं असल्या वावटळीत निरर्थक होरपळून निघतात. शंकरचे कुटुंब ज्यांनी उभी हयात कधी अध्यात-मध्यात केलं नाही. गावक़ऱ्यांच्या विश्वासावर जगलेलं आयुष्य आणि दंगलीच्या वेळी कोणीही मदतीला न येणं यामुळे त्यांच्या मनात कळत नकळत एक अढी पडते. शेवटी एका उद्विग्न मनाने त्यांना अविश्वासापायी गावातील आपलं हक्काचं घर सोडून जावं लागतं. त्यांचा शेवट तिकडेच होतो. सुसंस्कृत समाजात घरांना लागून असलेली घरे अडीनडीला एकमेकांची मदत घेणारी एक दुसऱ्याला मदत करणारी पण ज्यावेळी स्वत:च्या गावातील हीच माणसं शत्रू होऊ शकतात असे ज्यांना कधी वाटलं नव्हतं. त्यांच्यापासून धोका आहे ही जाणीव देखील त्यांना पहिल्या प्रथमच होत होती. हा धक्का त्यांना अनपेक्षित होता. त्यानेच ही मंडळी मनापासून खचली. कधी नव्हे ती तुटलेपणाची जाणीव त्यांना होत होती.की आपण अनाथ आहोत आपले असे म्हणायला कोणी नाही. आता कशाची शाश्वती नाही. केव्हा काय होईल याचा नेम नाही.एका वावटळीमुळे हे सर्व घडलं. केवळ एक घटना एक 'वावटळ' घेऊन येते अन् सर्व उद्ध्वस्त करून जाते. म्हणून मनापासून दुखावलेला माणूस, मनापासून दुखावला अन् दुरावला जातो.त्याचे हे तुटलेपण त्याला भीतीच्या गर्तेत घेऊन जाते. जातीवरून होणारा अत्याचार हा भारतीय इतिहास आहे. असे प्रसंग अनेक समाजावर उमटलेले आहेत. पण असं का होतं याचाही विचार व्हायला हवा नाही का?कुणा एका व्यक्तीची शिक्षा सर्व समाजाला मिळावी? आणि तेही निरपराध! आणि मग त्याची 'धग' सर्वच समाजाला सोसावी लागवी. मग कारण कुठलंही असो पण दुभंगलेल्या मनावर फुंकर घालणं अशक्य. 'एकदा विश्वास तुटल्यावर कुठल्याच गोष्टीला फारसा अर्थ उरत नाही!

म.गांधीच्या वधानंतर झालेल्या होरपळीची 'वावटळ' समाजात कशी आली याचे चित्रण म्हणजे माडगूळकरांची 'वावटळ' कादंबरी होय. यात ब्राह्मण समाजाच्या घरांची झालेली होरपळ, लुटालूट आणि त्यातून मानवी मनाची झालेली तगमग येथे स्पष्ट दिसते. येथे धर्म जात या गोष्टी ग्रामीण जीवनातही भिनलेल्या दिसतात. जातीधर्माच्या नावाने सत्ताकारण, राजकारण करणारे काही लोक व प्रवृत्ती खेडोपाडी आढळून येतात. तर एक जात दुसऱ्या जातीला पाण्यात पाहते. तरी तेथे कधीकधी माणुसकीचाही प्रत्यय येऊन जातो. महादा म्हणतो,"गावाच्या लोकांनी अक्कल नाही. अरे तुमच्यासारख्या मूर्ती कशाला येतील ह्या गावात ?ऑ ?चला माझ्या घरी. कोण काय करते ते बघू. तुमच्या केसाला धक्का तर माझ्या प्राणाला धक्का.मग तिघेही पिशव्या उचलून महदा बरोबर चालू लागतात." यामध्ये या महादूमधील माणुसकी स्पष्ट होते. धर्म हा शब्द शेजारधर्म, लोकधर्म, मानवधर्म यांनाही कवेत घेत असतो नाही. ग्रामीण माणसामध्ये धार्मिकता असल्याने आपो-आप माणुसकीची, संवेदनशीलतेची भावना वेळप्रसंगी जागृत होत असते. हे वरील वक्तव्यातील 'मूर्ती' हा शब्द देवत्वाचा साक्षात्कार करून देते. कारण माणसांची मदत करणे हा धर्म आहे. ही शिकवण आपलीच संस्कृती देऊ शकते. म्हणूनच भारतीय ग्रामीण संस्कृती ही शहरी संस्कृतींपेक्षा महान आहे.

ना.धों.महानोर यांनी मराठी साहित्यावर अमीट अशी नाममुद्रा उमटविली आहे. त्यांच्या अद्‌भुत निसर्ग कवितांनी रसिकांना अक्षरशः वेड लावलं, गद्य लेखनातही महानोरांचा हातखंडा आहे. 'गांधारी' ही कादंबरी त्याची साक्ष आहे. निजामी राजवट संपुष्टात आल्यानंतर एका खेड्यात आलेल्या परिवर्तनाची प्रत्ययकारी कहाणी 'गांधारी' कादंबरीतून साकारली आहे. निजामी राजवटीत अनेक उत्पातांना तोंड देऊनही जिवंत राहिलेलं पुन्हा तरारलेलं खेडं म्हणजे 'गांधारी'. गांधारी महाभारतातील राणी गांधारी सारख्याच नशिबाची! 'राजयोगी' पण 'दुर्दैवी' निझामी पाशातून सुटताना नेमकं गांधारींचंच नशीब वाईट! निझामीतून सुटताना शेवटच्या दंगली लढ्यात मुफ्ती सेनेनं जिवाचं रान केलं. स्वातंत्र्य मिळालं त्यावेळी फारच थोडी गावं दुर्दैवी ठरली. अगदी गांधारीसारखी ज्यांच्या सगळ्या इभ्रती टांगल्या गेल्या. अगदी सगळयांनी पराकाष्ठा करुनही निजामीतील भोग भोगावे लागलेच. नंतरच्या काळातही आलेल्या गावातील संधिसाधू महाभागांनी घेतलेले भोग, तिच्याच साम्राज्यातील विलासी आणि दूर्विलासामुळे डोळे असून पाहाता येत नव्हते असे! गांधारी हे एका गावाचं नाव रझाकारी निजामांच्या राजवटीतील हे गाव. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामी अमलाखाली असलेला मराठवाडा प्रांत, पण तत्पूर्वी ग्रामीण माणसांवर रझाकारांनी जो अन्याय अत्याचार केला. त्याचं हृदय पिळवटून टाकणारं चित्रण 'गांधारी' कादंबरीतून येतं. शेतकरी-शेतमजूर, स्त्रिया, लहान मुलं-मुली यांच्यावर झालेल्या अत्याचाराचं वर्णन वाचून अंगावर काटे येतात. कादंबरीकारांचं वास्तव्य याच भागात असल्यानं जनमानसातील जखमांचे ताजे व्रण ते सहजपणे शब्दबद्ध करु शकले.

लष्करी हस्तक्षेपानंतर रझाकारी जुलूम संपून गंधारी गावांतील लोकं शेतीवाडीच्या कामाला लागतात. एकोप्याने आणि गुण्या गोविंदाने ही अठरापगड जाती जमातीची माणसं नांदत असताना, गावात शेती करायला आलेेले जगदेव आणि अमराठी शेठ रामलाल हे, राबून खाणाऱ्या शेतक-यांना लुबाडून खाणाऱ्या व्यवस्थेचे दोघेही प्रतिनिधी ठरतात. पुढील काळात समाजव्यवस्थेला वेढून ग्रामीण संस्कृतीला छिन्नभिन्न करणाऱ्या चंगळवादाची जाणीव देणाऱ्या जागतिकीकरणाचे प्रतिनिधीही हे दोघं ठरतात. साधेभोळे गावातील लोकं दरिद्री आणि हे बाहेरून आलेले फसवेगिरी करणारे उपरे लोकं श्रीमंत कसे बनतात. या़चं प्रभावी चित्रण गांधारी मधून येतं. म्हणूनच 'गांधारी' कादंबरी महाभारतकाळातील प्रतीक म्हणून उभी राहते. गावात पतसंस्थेच्या माध्यमातून शेतक-यांचा विकास होईल असं भासवून लोकांना मोहात पाडलं जातं. शेतकरी कर्ज काढतात पण त्यातला अर्धा पैसा पाट्यांसाठी म्हणून जगदेव हडप करतो. रामलालही तेच करतो. सावकारीचा हा नवा फंडा गावाला अशारीतीने कर्जाच्या गर्तेत घेऊन जातो. त्यामुळे कृषिव्यवस्था मोडकळीला येते आणि या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करण्याशिवाय शेतकर्यांना पर्याय ऊरत नाही. याचे सूचन या कादंबरीच्या माध्यमातून होते. गावाला या गर्तेपासून सावध करण्याचा प्रयत्न शेतीनिष्ठ भागवत हा सुशिक्षित शेतकरी करतो. पण तो गावातील लोकांना सावध करतो म्हणूनच शेतातील त्याचं ऊभं पीक जाळलं जातं. गावातील विठ्ठल महाराज गावातल्या सुंदर स्त्रियांना फसवून मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी त्यांच्यावर अत्याचार करण्याचे कृत्य करतो. या नराधम बुवा बाबांच्या लैंगिक विकृतीच्या कितीतरी कथा आपण आजही ऐकतो आहोतच, पण बुवाबाजी म्हणजे संधिसाधू अत्याचारी असा धोक्याचा इशारा देणारी ही कादंबरी म्हणून 'गांधारी'कडे आपल्याला पाहाता येते. कादंबरीतील तृतीयपंथी हरिबाच्या भोवती गोळा होणाऱ्या बायाबापड्या, गावातील रिकामटेकडे व व्यसनी यांच्या बोलण्यातूनही ग्रामजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांचा राजकीय सामाजिक घडामोडींचा, गावातील अनैतिक भानगडींचा संदर्भ येतो.

मात्र शेतीनिष्ठ भागवत आणि मानवतावादी वृत्तीचा कलासक्त लालजी या दोन्ही व्यक्तिरेखा गावातील नवजागृत सकारात्मक विचारपरिवर्तनाकडे संकेत करतात. म्हणूनच खेड्यातील बदलत्या मानसिकतेचा 'गांधारी' ही कादंबरी वास्तवदर्शी वेध घेतानाच कृषीसंस्कृतील अंतर्विरोधावर प्रकाश टाकताना दिसते.

'गांधारी'मधून ग्रामीण भागात फोफावलेल्या अंधश्रद्धा, लोकांच्या भावनेचा विकृत लाभ उठवणारी बुवाबाजी, तसेच 'गांधारी'मध्ये भ्रष्ट महाराज महंतांचे तर हंसा कुंटिनीचे प्रतीक म्हणून आले आहे. यातून ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना आणि भोगवटा कशा आहेत त्यांच्या आयुष्याचं दर्शन या कादंबरीतून होतं. शेतीनिष्ठ शेतक़्याला त्याच्या पत्नीची कशी साथ लाभते व कृषिनिष्ठ व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी ती कशी आवश्यक ठरते.याचं वर्णन करणारी ही कादंबरी आहे.कादंबरीतील नायक भागवत आणि गंगा या पती पत्नींच्या माध्यमातून हे साकारले आहे. 'गांधारी'मधून जात, प्रांत इत्यादी बाबी महत्त्वाच्या नसून, कुटुंब व्यवस्था टिकून राहण्यासाठी हृदयातील खरं प्रेमच कारणीभूत असतं, याची साक्ष आंतरजातीय आंतरप्रांतीय विवाह करणार्या लालजी आणि सावित्री या पात्रांच्याद्वारे लेखक देतात स्वातंत्र्यानंतर जगदेवसारख्या समाजघातकी लोकांकडून गावाचं कसं शोषण होतं. हे सांगणारी 'गांधारी' ही कादंबरी आहे. त्याचबरोबर भागवतसारख्या कष्टाळू शेतीनिष्ठ शेतक़्याला कसा त्रास दिला जातो आणि गावातील सज्जन सात्विक माणसांना सुद्धा त्यांच्या मनाविरोधात संघर्ष कसा करावा लागतो, त्यातही कृषिप्रधान खेड्यांची कशी वाताहत होत जाते. याचं चित्रण करणारी ही कादंबरी आहे. म्हणूनच समाजव्यवस्थेतील बदलांच्या पाऊलखुणा नोंदविणारी 'गांधारी' ही कादंबरी मराठी साहित्यात श्रेष्ठ दर्जा मिळविते.

भारतीय मराठी ग्रामीण कादंबरीविषयी वरील काही कादंब़्यांमधून जे चिंतन आले ते बहुआयामी समाजाभिमुख आहे. या कादंबरीला जरी महाराष्ट्रातील लोकजीवनावर आधारित असल्यातरी भारताचं प्रतिनिधित्व करणार्या आहेत. ग्रामीण समाज म्हणजेच समग्र भारतीय समाजाचा एक भाग आहे. ग्रामीण समाज म्हणजे समग्र समाज नव्हे, तसेच ग्रामीण समाज म्हणजे काही स्वतंत्र अलिप्त समाजही नव्हे. त्यामुळे ग्रामीण समाजाचा विचार समग्र भारतीयतेच्या संदर्भातच करावा लागतो. भारताच्या अस्मितेतच ग्रामीण समाजाची अस्मिता आणि भारताच्या हितातच ग्रामीण समाजाचे हित सामावलेले आहे. भारतीय विशाल समाजात अनेक धर्म, जाती, संप्रदाय, भाषा, सीमा, लिंगभेद आहेत. त्यांचा मुक्तपणे स्वतंत्र आविष्कार व्हावा म्हणून निरनिराळ्या साहित्यप्रवाहांचे अपरिहार्यता आहे पण ग्रामीण समाजाचे वास्तव प्रतिबिंब ग्रामीण साहित्य प्रवाहातच उमटले हे स्वाभाविक नाही का ? अंतिमतः समता स्वातंत्र्य बंधुता लोकशाही समाजवाद धर्मनिरपेक्षता विज्ञाननिष्ठा भयमुक्त शोषणविरहित समाज निर्मिती व्हावी अशीच आकांक्षा ग्रामीण साहित्यांची आहे. ग्रामीण विश्वबांधवांविषयी, समाजजीवनाविषयी ग्रामीण लेखक काय विचार करतो?हे ग्रामीण कादंबरीतून पाहता येतं.

संदर्भ सूची :

1. 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव': आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती १९९३
2. 'मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह' गो कुलकर्णी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती
3. 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' संपादक प्रा. चंद्रकुमार नलगे सुरेश एजन्सी
4. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या डॉ आनंद यादव
5. 'ग्रामीण साहित्य ' रा रं बोराडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती
6. 'सुनिता' मनोगत श्रीराम बिवलकर प्रथम पृष्ठ
7. 'फकिरा' अण्णाभाऊ साठे :दोन शब्द प्रस्तावना वि.स.खांडेकरा

वैश्विक परिदृश्यातून संत कान्होपात्रांच्या अभंगांचे साहित्यिक योगदान

कराड बाळासाहेब निवृत्ती
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

मध्ययुगीन महाराष्ट्रात भक्ती मार्गाचे जे अनेक पंथ निर्माण झाले त्यातील एक प्रमुख आणि जनसामान्यांच्या मनावर आजही अधिराज्य गाजवणारा पंथ म्हणजे वारकरी संप्रदाय होय. समाजातील रंजल्या-गांजल्या भक्तांची चळवळ संप्रदायाच्या रुपाने आणि 'स्व' अस्तित्वाच्या प्रेरणेने पुढे आली. आमचा देव, आमची भक्ती आणि आमचे साहित्य ही त्रिसूत्री वारकरी संप्रदायात महत्त्वाची ठरली. पंढरपूरच्या चंद्रभागेतीरावरील वाळवंटातही भक्तांची मांदियाळी वारकरी संप्रदायी कचळवळीत स्व कर्तृत्वाने 'यारे यारे लहान थोर । याती भलत्या नारी नर ॥' किंवा 'सकळांसी येथे आहे अधिकार' म्हणत तत्कालीन समाज जीवनातील सर्वांना बरोबरीच्या म्हणजे जात, धर्म, वर्ण, लिंग असा भेदाभेद न करता संत पदाला घेऊन गेली.

समाजाला धर्म, संस्कृती आणि सदाचार शिकवून समाजातील सर्व स्तरापर्यंत जीवन जाणीवेचे बीज पेरण्याचे महत्त्कार्य वारकरी संप्रदायाने अविरतपणे चालू ठेवल्याचे दिसून येते. सर्वसमावेशक अशी भूमिका स्वीकारलेल्या वारकरी संप्रदायात पुरुष संतां इतकीच स्त्री संतांची ही कामगिरी उजळ असलेली दिसून येते. अशा वेळी या संप्रदायात जे साहित्य निर्माण झाले ते पुरुषां इतकेच स्त्रियांसाठी सुद्धा महत्त्वपूर्ण ठरले.

तत्कालीन परिस्थिती, वारकरी संप्रदायाच्या सततच्या संपर्काने आणि सहवासाने महाराष्ट्रातील स्त्रियांसुद्धा लेखन करू लागल्या; त्यातूनच वारकरी संप्रदायात हळूहळू स्त्री संत कवयित्रींचा उदय झाला. या संत कवयित्री वारकरी संत कवींच्या सततच्या संपर्काने, सहवासाने राहिल्या व वाढल्यामुळे त्यांच्यात अध्यात्म आणि साहित्य निर्मितीची प्रेरणा वारकरी संत आणि संत कवींपासूनच मिळालेली दिसते.

महाराष्ट्रात मध्ययुगीन काळात होऊन गेलेल्या संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून अध्यात्मा सारख्या विषयाची मांडणी केली असली तरी अध्यात्मिक विषयाची सहज व सोपी मांडणी करण्यासाठी त्यांनी तत्कालीन समाज जीवनात रूढ असणारे उदाहरणे, दाखले, दृष्टांत, रुपके वापरलेले दिसून येतात. त्यामुळे समाज व काव्याचा किती व कसा निकटचा संबंध आहे; हे त्यांनी 'स्व' उदाहरणाने व स्व कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. हे संत कवयित्री रचित साहित्य तत्कालीनच नाही तर आजच्या आधुनिक काळातील स्त्री जीवनांच्या अनुभवांना स्पर्श करणारे आहे. म्हणून मध्ययुगीन महाराष्ट्रातील वारकरी संत कवयित्रींचे स्व रचित काव्य म्हणजे समाजातील स्त्री-मनाचा आणि स्त्री-जीवन जाणिवांचा आरसाच म्हणावा लागेल.

भक्तीच्या तत्त्वाखाली आणि वारीच्या वाटेवर वारकरी संप्रदायात दाखल झालेल्या या संत कवयित्री समाजातील सर्व स्तरांतून, जातीतून आलेल्या होत्या. यात काही सामान्य कुटुंबातून तर काही समाजाने ठरवलेल्या ही नवर्गातूनही आलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना जीवन जगत असताना जे दुःखमय क्लेश पूर्ण जीवन जाणिवांचे अनुभव आलेत्यांचे ही प्रतिबिंब त्यांच्या भक्ती काव्यातून उजागर होताना दिसते. मध्ययुगीन महाराष्ट्रात सामाजिक आणि धार्मिक बंधनात अडकलेल्या स्त्री-जीवनाच्या मूक वाणीला भक्ती काव्याच्या माध्यमातून आविष्कृत करताना वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींनी स्व अनुभूतींच्या आधारे तत्कालीन समाजात रूढ असणाऱ्या अनिष्ट प्रथा, परंपरा व पद्धती, आचार-विचार, अनीतीची कृत्ये, अनिष्टा व अंधश्रद्धेला साहित्याच्या वेशीवर मांडले.

संत कान्होपात्रा:

जन्मतःच कायेचं देखणे पण लाभलेली कान्हो पात्रा मंगळवेढ्याच्या शामा नामक नायकिणीची मुलगी होती. तिच्या जन्मा बद्दल अनेक मतमतांतरे असले तरी साधारणतः तिचा जीवन काळ १४५० ते १४८० या काळातील मानला जातो. काही अभ्यासकांच्या मते ती संत ज्ञानेश्वर यांच्या समकालीन असावी असे मानले जाते. कारण तिच्या एका अभंगात तीने संत ज्ञानेश्वर भेटीचे वर्णन करूनत्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली आहे. भेटीने आपण भाग्यवान झालो आहोत. असे ही ती अभंगात नमूद करते.

शिव तो निवृत्ती । विष्णू ज्ञानदेव पाही ।
सोपान तो ब्रह्मा । मूळ माया मुक्ताई ।
धन्य कान्हुपात्रा । आजी झाली भाग्याची ।
भेटी झाली ज्ञानदेवाची । म्हणूनिया ॥

या अभंगावरून संत ज्ञानेश्वरांची आणि संत कान्होपात्रेची प्रत्यक्ष भेट झाली असावी असे वाटत असली तरी ही भेट ज्ञानेश्वरांची प्रत्यक्ष भेट होती की, त्यांच्या समाधीची भेट होती. हे निश्चितपणे सांगता येत नाही. कारण तिच्याच एका अभंगात आळंदी क्षेत्राच्या महात्म्यासह संत ज्ञानेश्वरांच्या समाधी भेटीचे वर्णन आले आहे.

अलंकापुरी पुण्यठाव । तेथ समाधी ज्ञानदेव ।
पांडुरंगे दीधला वर ।भेटी निर्धार कृष्णपक्षी ॥

रूपाने सुंदर असलेल्या कान्होपात्रेची कीर्ती परिसरात सर्वदूर पसरली होती. आईच्या म्हणण्याप्रमाणे वागूनकान्होपात्रा जगली असली तर लौकिक जगात ती श्रीमंतही झाली असती. परंतु आईचे जगणे आणि वागणे, शरीर आणि संगीताचा विक्रय करून आयुष्य जगणे तिला मान्य नव्हते. ऐहिक जगण्यातील असारता तिला पदोपती जाणवत होती. तिच्या विश्रांतीचा ठाव पंढरपूरात होता. म्हणून एक दिवस मंगळवेढ्यातून निघालेल्या काही वारकऱ्यांच्या दिंडी सोबत तिने जगण्याचे अनेक प्रश्न घेऊन पंढरपूर गाठले. परंतु तिच्या रुपाची ख्याती बेदरच्या बादशहाच्या कानी गेली. तिच्या प्राप्तीची ओढ मनात निर्माण झाल्याने, खुशीने अथवा सक्तीने तिला आणण्यासाठी त्याने आपले सैनिक पाठवले. आता आपली काही धडगत नाही हे जाणून पांडुरंग दर्शनाची शेवटची इच्छा तिने शिपायाजवळ व्यक्त केली. परवानगी मिळताच ती अनन्यभावे पांडुरंगाला शरण गेली. आपल्या देहाचा त्याग करून ती परमात्म्यामध्ये कायमची विलीन झाली. मंदिराच्या दक्षिण दरवाजा जवळ तिच्या शरीरावर अंत्यविधी केला गेला. पुढे त्या ठिकाणी तरटीचा वृक्ष उगवला. आपल्या देहाची समिधाच जणूतिने पांडुरंग चरणी अर्पण केली. अपार निष्ठा आणि श्रद्धेचं प्रतीक म्हणजे संत कान्होपात्रांचं व्यक्तिमत्व होतं.

संत कान्होपात्राच्या नावे सकल संत गाथेत २३ अभंग उपलब्ध आहेत. यात सर्वाधिक अभंग हे विठ्ठल भक्ती आणि महती विषयीचे अभंग संख्येने जास्त आहेत.

पंढरपूरचा विठ्ठल हा रंजल्या गांजल्या जीवाचा विसावा आहे. तो अनाथाची माय आहे आणि या विठू माऊलीचे गाव म्हणजे माझे माहेर पंढरी आहे. आईच्या दर्शनाने जसा लेकराचा शिण भाग जातो तसा माझ्या विठु माऊलीच्या दर्शनाने माझी चिंता, दुःख कायमचे संपते. सांसारिकता पाने तापलेल्या जीवाला आंतरिक गारव्याची शीतलता लाभते. अशा या विठेवर उभा असलेल्या माझ्या शोभाय मान विठू माऊलीला पाहून माझ्या मनाला धन्यता लाभते.

माझे माहेर पंढरी। सुखे नांदू भीमा तीरी॥१॥
येथे आहे माय बाप। हरे ताप दरूशने॥२॥
निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरीची॥३॥
कैशी विटेवरी शोभली। पाहूनी कान्होपात्रा धाली॥४॥

विठेवरचा विठ्ठल हा दीनाचा दयाळ आहे. भक्तांचा कनवाळू आहे. तो कृपावंत असून तो भाव भक्तीचा भुकेला आहे. जो निर्मळ अंतःकरणाने भक्ती करतो. त्याची सगळी चिंता तो वाहतो. सर्व सुखाचे सार म्हणून कान्होपात्रा श्री विठ्ठलाकडे पाहते आणि शब्द रूप करताना म्हणते.

विठू दीनाचा दयाळ । वागवी दासाची कळकळ॥
देव कृपावंत मोठा । उणें पडेनेदी तोटा ॥
देव भक्तांचा अभिमानी।वाहे चिंता सकळमनी ॥
देव भावाचा भुकेला । कान्होपात्रे आनंद झाला ॥

विठेवरच्या विठ्ठल भेटीचा भेटीचा प्रत्यक्ष अनुभव अनेक संतांनी आपल्या साहित्यिक शब्दांतून आपापल्या परीने सांगितला. अनेक संत मंडळी इतरे जनांना ही हाच मार्ग सांगून विठ्ठल भेटीची त्यांची वाट मोकळी करून देतात. संत कान्होपात्रा ही विठ्ठल भेटीचा, विठ्ठल प्राप्तीचा मार्ग सांगताना म्हणते की, विठ्ठल प्राप्तीसाठी कुठलेही इतर साधने करण्याची आवश्यकता नाही. फक्त मुखाने नामस्मरण करत पंढरपूरला या आणि माझ्या विठूरायाचे दर्शनघ्या. चार वेद, सहा शास्त्र आणि आठरा पुराण ज्याचे गुणगाण करताना दमले तो पंढरीनाथ भक्ताचा कैवारी असून त्याच्या नामस्मरणाने तुमच्याही जन्माचे कल्याण होईल.

जन्मांतरीचे सुकृत आजी फळासी आलें ।
म्हणोनी देखिले विठ्ठल चरण॥
धन्य भाग्य आणि डोळिया लाधले ।
म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ॥

घ्यारे घ्यारे मुखी नाम।
अंतरी धरोनिया प्रेम॥
माझा आहे भोळा बाप।
घेतो ताप हरोनी ॥
आपुलिया नामासाठी।
धावे संकटी लवला हे ॥
घ्या रे घ्यारे अनुभव।
कान्होपात्रेचा माधव॥

तर नामस्मरणाची महती सांगताना कान्होपात्रा म्हणतात. माझ्या विठ्ठलाचे नामस्मरण केल्याने दुःख नष्ट होते. त्याच्या नामस्मरणाने पापाचे दोष जळतात आणि त्यांचा उद्धार होतो.

नामे दोष जळती। नामे पापी उद्धरती ॥
हे आले अनुभवा। सत्य जीवा प्रत्यया ॥
नामे अपार तारिलें। नामे जीवन मुक्त केले॥
कान्होपात्रा नाम घेता। पायी जडली तत्वता ॥

पांडुरंग प्राप्तीचा सहज सोपा मार्ग संतांनी दाखवून दिला. त्यांच्या मार्गाचा अवलंब केल्याने इतरही संकटांचे मार्ग सुकर होतात. त्यामुळे संतांबद्दल कान्होपात्रेच्या मनात अतीव आदर आहे. विठ्ठल भेटीचे भाग्यही आपणास त्यांच्या मुळेच लाभले. अशा संतांचा सहवास मिळाल्याने आपली तहान भूक ही हरपली. त्याबद्दलचा कृतज्ञ भाव आपल्या अभंगातून ती व्यक्त करते.

अलंका पुरी पुण्य ठाव । तेथ समाधी ज्ञानदेव॥
पांडुरंगे दीधला वर । भेटी निर्धार कृष्णपक्षी॥
नित्य स्नाना लागी जाणा। भागीरथी दिधली ज्ञाना॥

सरस्वती मणिकर्णिका। त्रिसंग मी वाहती देखा॥
येथे स्नान करीता। वास वैकुंठी तत्वता॥
ऐसे देव सांगत। कान्होपात्रा आनंदत॥

हरलीतेभूकतहाननिमाली।
संतांचीदेखिलीचरणांबुजे॥
कीर्तनाचेरंगीआनंदेनाचता।
कान्होपात्राचित्तासमाधान॥

कान्होपात्रा जेव्हा परमार्थाच्या प्रवासाला निघाली होती तेव्हा तिच्या मनात आपल्या अज्ञानासह आपल्या जातीची खंत होती. याचे ही ती आठवण करून देते. मी याती हीन, कुठला ही शुद्ध भाव मला माहित नाही. आचरण माहीत नाही. माझ्या मुखात नामस्मरण येत नाही. तरीही विठ्ठलातू मला भेट दे. तुझ्या चरणाची जागा मला दे कारणतू अनेकांचा उद्धार केलास अनेक पतितांना तू पायाशी जागा दिलास. मग माझाच स्वीकार तू करणार नाहीस का ? अशी आर्त विनवणी ती करते.

जीवींचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई ।
सावळे, डोळसे करुणाये ऊदे काही ॥

कनवाळू, कृपाळू असा माझा पांडुरंग माझा धावा नक्की ऐकेल अशी तिची खात्री होती. पण तिच्या वर अचानक एक वाईट प्रसंग आला, बेदरच्या बादशहाची वाईट नजर तिच्यावर पडली. यातून आपली सुटका नाही हे लक्षात आल्यावर तिने श्री विठ्ठलाला विनवणी केली की, तू पतित पावन असताना आम्हांवर येणारे संकटं हा तुझा कमी पणा नाही का ? असा प्रश्न विचारताना कान्होपात्रा म्हणते–

सिंहाचे भातुके जंबूकपै नेता।
थोराचिया माथाला जवाटे ॥
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे।
करावा जतन ब्रीदासाठी॥

अती व अशा करुणेने कान्होपात्रा श्री विठ्ठलाला आळवते की, "हे देवराया माझा अंत पाहू नको. माझा प्राण आता जाऊ पाहत आहे. ज्याप्रमाणे हरिणीच्या पाडसाला वाघाने खाण्यासाठी पकडावे तशी माझी गत झाली आहे. मी आता उदासले आहे. तू तुझ्या हृदयात मला स्थान दे. "आणि खरोखर पांडुरंगाने तिची करुणा ऐकली आणि तिला आपलेसे केले.

नको देवराया अंत पाहू आता।
प्राण हा सर्वथा फुटो पाहे ॥
हरिणीचे पाडस व्याघ्र धरियेले।
मज लागी जाहले तैसे देवा ॥
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी।
धावे हो जननी विठाबाई ॥
मोकलोनी आस झाले मी उदास।
घेई कान्होपात्रेस हृदयात॥

वारकरी सांप्रदायात करूण रसाची मांडणी करणारी संत कवयित्री म्हणून संत कान्होपात्रा भक्ती सामर्थ्याने उच्च पदाला पोहोचते. उपेक्षीत जीवन घेऊन जगताना सात्त्विक, उज्जवल आणि व्रतनिष्ठ व्यक्तिमत्वाने तेजस्वी जीवन समर्पण करून श्री विठ्ठल दरबारात स्थान प्राप्त होते आणि कित्येक पिढ्यांपासून आज ही येणाऱ्या वारकऱ्यांच्या

पिढ्यांना आपल्या आस्तित्वाने प्रेरणा देते. त्यामुळेच संत कान्होपात्रा वारकरी संप्रदायात जगावेगळी भक्त ठरते. एका समर्पित जीवनाची गाथा गात पंढरपुरातील विठ्ठल मंदीराच्या दक्षिण दरवाज्याशी असणारा तरटीचा वृक्ष संत कान्होपात्रांच्या विठ्ठल प्रेमाची व त्यागाची साक्ष देत आज ही उभा आहे.

संदर्भग्रंथ सूची:

१. 'श्री सकल संत गाथा', खंड पहिला, संपा. गोसावी प्रा. डॉ. र. रा. (संपादक), सारथी प्रकाशन १००५, सदाशिव पेठ, पुणे. द्वितीय आवृत्ती (२०१६).

२. गावंडे डॉ. शैला, '१० संत कवयित्री', पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे.

३. मराठी संत कवयित्रींचा इतिहास' संपा. पाटंगणकर विद्याधर,साहित्य अकादमी, २०१५.

४. पोटे देवी दास (संपादक) 'मुक्त आनंद घन – संत कवयित्री विशेषांक 'वार्षिक २००४, न्यूएज प्रिटिंग प्रेस, प्रभादेवी, मुंबई.

५. यादव प्रा. मा. के. 'मराठी संत कवयित्री', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

६. कौठेकर भगवान, 'संत कवयित्री', निर्मल प्रकाशन, नांदेड.

लक्ष्मण माने यांच्या 'किटाळ' आत्मकथनातील गुन्हेगारी विश्वाचे चित्रण

डॉ. मारोती द. कसाब

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

१९८० ते ९० हे खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतात सामाजिक परिवर्तनाचे दशक होते. महाराष्ट्रात महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडलेली दलित, उपेक्षित, वंचितांची पहिली पिढी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर याच काळात दाखल झाली. एका बाजूला दलित पँथरचा सर्वंकष आंबेडकरी क्रांतीचा जात मुक्तीचा नारा; तर दुसऱ्या बाजूला कम्युनिस्टांचा सर्व हारांच्या वर्ग मुक्तीच्या क्रांतीचा नारा सर्वदूर दुमदुमत होता. आणि या दोन्ही चळवळींना खो देणारा, क्रांतीला अवरोध निर्माण करू इच्छिणाऱ्या समाजवाद्यांचा तिसराच गट या काळात सक्रिय झालेला होता. चळवळीचा नेता मार्क्स, गांधी का आंबेडकर ? असा संभ्रम याकाळात जाणीव पूर्वक निर्माण केला गेला. मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी या दोन्ही क्रांतिकारक चळवळींना मागे टाकून समाजवाद्यांनी वंचित समूहातील तरुणांना आपलंसं करुन त्यांच्यात नुकतीच उमलू पाहणारी क्रांतीची उर्मी मारून टाकली होती. कथित उच्च जातीय मुलींची दलितांतातील हुशार मुलांशी लग्नं लावून देऊन जाति अंताचा आणि सामाजिक क्रांतीचा आभास निर्माण करण्यात समाजवादी पुढारी यशस्वी झाले होते.

या काळात दलित चळवळीचे नेतृत्व नामदेव ढसाळ, राजाढाले, अर्जुन डांगळे, केशव मेश्राम, अरुण कांबळे, ज. वि. पवार, भाई संगारे, दया हिवराळे यांच्या सारख्या विद्रोही साहित्यिकांच्या हाती आले. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या औरंगाबाद आणि मुंबई येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांतून नवे तरुण लेखक घडत होते. प्राचार्य म. भि. चिटणीस, म. ना. वानखेडे, य. दि. फडके यांच्या नेतृत्वा खाली तरुण विद्रोही लेखकांची पिढी घडत होती. मराठवाड्यातील उदगीर, अहमदपूर, जळकोट या डोंगराळ भागातील प्र. ई. सोनकांबळे या तरुणाचे आत्मकथन 'आठवणींचे पक्षी' या नावाने; तर पश्चिम महाराष्ट्रातील दया पवार या लेखकाचे 'बलुतं' हे आत्मकथन याच काळात प्रकाशित झाले. या दोन्ही आत्मकथनांनी दलित जीवनाचे आगळे वेगळे दर्शन वाचकांना घडविले.

दरम्यान निरगुडी ता. फलटण जि. सातारा येथील विमुक्त भटक्यांच्या पालात जन्मलेले लक्ष्मण बापूराव माने यांचे 'उपरा' हे आत्मकथन आले. या आत्मकथनाने दलितांपेक्षा ही विमुक्त भटक्यांची अवस्था किती वाईट आहे हे दाखवून दिले. आणि त्याला दलित बहुजनांसह सवर्णांनी ही डोक्यावर घेतले. काडीकाडी जमवून संसार करणाऱ्या कैकाड्यांची व्यथा तर लक्ष्मण माने यांनी मांडलीच; त्याच बरोबर एकूणच विमुक्त भटक्यांची गाथा ही त्यांनी आपल्या लेखनातून मांडली. या पुस्तकाने माने यांना साता समुद्रापार पोहोचविले. अनेक मानसन्मान मिळवून दिले. तसेच दलित साहित्याची आणि चळवळीची व्याप्ती ही वाढवली.

लक्ष्मण माने जरी समाजवादी चळवळीत वाढलेले असले तरी पुढे त्यांनी आंबेडकरी चळवळीशी स्वतःला जोडून घेतले. त्यांना समाजकारणा बरोबरच राजकारण ही जमले. शरद पवारांनी त्यांच्यातील कार्यकर्ता हेरून त्यांना विधान परिषदेवर १९९० ते ९६ या काळात आमदार म्हणून संधी दिली. ४२ जाती- जमातीच्या विमुक्त

भटक्यांची एकजूट उभी करीत असतानाच माने यांनी स्वतःच्या शैक्षणिक संस्थाही उभ्या केल्या. शरद पवार, बाबा आढाव यांना सोबत घेऊन चार आश्रम शाळा, एक कनिष्ठ महाविद्यालय, एक वरिष्ठ महाविद्यालय असा मोठा पसारा त्यांनी निर्माण केला.

सामाजिक कार्यकर्ता ते संस्थाचालक आणि लेखक ते दुसऱ्या बौद्धधर्मांतर सोहळ्याचा मुख्य प्रवर्तक या उर्ध्वगामी प्रवासातच घोटाळा झाला. शैक्षणिक संस्थेच्या जागेसाठी हट्टाला पेटलेले स्थानिक संस्थानिक आणि राजकारणी यांच्या नाराजीचा फायदा घेत मनुवादी शक्तीने मानें कडून दुखावले गेलेले आणि निलंबित केले गेलेले शिक्षक, कर्मचारी यांना एकत्र करून मानेंच्या बदनामीचा कट रचला आणि त्याचा फटका त्यांना बसला .

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर मोठ्या संख्येने धर्मांतर चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या, दलित वंचित आणि बहुजनांसह ४२ विमुक्त भटक्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या, राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य राहिलेल्या, पद्मश्री किताब मिळविलेल्या मोठ्या लेखकास व नेत्यास एक नाही दोन नाही तर सहा महिलांवरील बलात्काराच्या आरोपा खाली तब्बल तीन महिने जेलात कारागृहात अडकून पडावे लागले. त्याची कर्म कहाणी म्हणजेच ग्रंथालीने प्रकाशित केलेले लक्ष्मण माने यांचे अलीकडचे पुस्तक 'किटाळ' हे होय.

या पुस्तकातून लक्ष्मण माने यांनी स्वतःचे निर्दोषत्व न्यायालयाच्या निकाला नुसार सिद्ध केले आहे. आपल्या विरुद्ध जातीयवादी, भांडवलदार आणि मनुवाद्यांनी कसा कट रचला हे दाखवून दिले आहे. तीनदा जीवे मारण्याचा प्रयत्न करून ही लक्ष्मण माने थांबत नाहीत, म्हणून व्यवस्थेच्या हस्तकांनी खालच्या पातळीवर जाऊन त्यांना सार्वजनिक जीवनातून उठविण्याचा रचलेला कट म्हणजे तथा कथित बलात्काराचे प्रकरण होय.

एका अर्थाने हा आपल्या विरुद्ध रचल्या गेलेल्या सामुहिक कटाचा डाव उघडकीस आणण्याचा प्रयत्न असला, आणि स्वतःच्या निर्दोषत्वाचा कबुली जबाब असला तरी ही या पुस्तकाचे महत्त्व साहित्यिक दृष्टीने ही खूप उंचीचे आहे. एवढा मोठा अन्याय होवूनही लेखकाने आपला संयम कुठेही सोडलेला नाही. सर्व घटना प्रसंगांची नोंद घेतघेत लेखकाने वाचकांना नव्या जगाची सफर घडवून आणली आहे. भारतीय राज्यघटनेतील गुन्हेगार आणि आरोपी या विषयीच्या तरतुदी, भारतीय दंड विधान आणि स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्य, त्यांचा गैर फायदा घेणारी हुकूमशाही प्रवृत्तीची माणसं, भारताची न्याय व्यवस्था, पोलीस यंत्रणा, तुरुंग व्यवस्था, कायदे आणि कायदेतज्ञ, जेल आणि जेलमधील माणसं, त्यांचं भावविश्व अशा कितीतरी अनोळखी बाबी 'किटाळ' च्या वाचनाने वाचकांच्या ओळखीच्या होतात.

पुस्तक एकदा हातात घेतले की संपवल्या शिवाय सोडूच नये, अशा प्रकारची उत्कंठावर्धक लेखन शैली लक्ष्मण माने यांना जमलेली आहे. या पुस्तकात अनेक पात्रे असून, त्या त्या पात्रांची स्वतंत्र भाषा ही आहे.

या पुस्तकातील सर्व घटना या सांगली, सातारा, कोल्हापूर या परिसरातील असून, त्या परिसराचाही चेहरा मोहरा वाचकांच्या ओळखीचा होतो. लेखकाने आपल्या खास शैलीने हा सगळा परिसरच बोलका आणि जिवंत केला आहे.

ज्याने 'उपरा' वाचले; त्याने 'किटाळ' वाचलेच पाहिजे. यात यशवंतराव चव्हाण आहेत, शरद पवार आहेत. डॉ. बाबा आढाव आहेत, नरेंद्र दाभोळकर, अनिल अवचट, भाई वैद्य आहेत. तसेच विद्याबाळ, बाळकृष्ण रेणके, हरीनरके ही आहेत. प्रसंगानुसार माणसं कशी वागतात आणि बदलतात याचे उत्तम दाखले दिले आहेत.

कार्यकर्त्यांनी स्वतःच्या घरादाराकडे ही लक्ष दिले पाहिजे. कारण संकटाच्या काळी घरचीच माणसं कशी धावून येतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे लेखकाचा मुलगा-भाई, मुलगी समता, सून कादंबरी, जावई जीवन

आणि पत्नी शशी. लेखकावर प्रचंड मोठे संकट आले असताना ही घरची माणसं अजिबात डगमगली नाहीत. कारणती सर्व उच्चशिक्षित होती. मुलगा, मुलगी, सून, जावई चौघेही नोकरीला होते, त्यामुळे लेखकाच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहू शकले. एवढ्या मोठ्या संकटाच्या प्रसंगी जशी घरच्यांनी मदत केली ; तशीच किसन चव्हाण, बाबुराव धोत्रे, एकनाथ आव्हाड, सुषमा अंधारे, विलास माने या कार्यकर्त्यांनी ही.

पोलिस कस्टडीमध्ये, तुरुंगामध्ये भेटलेल्या तथाकथित आरोपींमध्ये सुद्धा कशी माणुसकी असते हे लक्ष्मण माने यांनी फार सुंदर शब्दात दाखवून दिले आहे. तसेच तपासकरणारे पोलिस अधिकारी, त्यांची अरेरावीची गलिच्छ भाषा, आरोपीं बाबतचा, विशेष म्हणजे आरोपींच्या जाती बद्दलचा त्यांचा पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन हे ही येथे आपल्याला पाहायला मिळते. जेलमधील वातावरण, तिथलं एकूणच भाव विश्वलेखकाने फार सुंदर पद्धतीने उलगडले आहे. वकील आणि न्यायाधीश, तपास, सरतपास, साक्षीपुरावे, जाबजबाब, निकाल तसेच एकूणच न्याय व्यवस्थेतील बारकावे टिपले आहेत. तीन वर्षा नंतरका होईना, न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले. यावरून न्याय व्यवस्थेवरचा वाचकांचा विश्वास वाढत जातो.

'किटाळ' या आत्मकथनातून लक्ष्मण माने यांनी गुन्हेगारी विश्वाचे अनोखे दर्शन घडविले आहे. भारतात किती ही पुढारलेपणा आलेला असला तरी जात व्यवस्था किती पक्की आणि मजबूत आहे याचे दर्शन या लेखनातून घडते. जगात सर्वत्र विविध कारणावरून माणसामाणसात भेदभाव केला जातो. कुठे कातडीच्या रंगावरून, कुठे धर्मावरून, कुठे गरिबी श्रीमंती वरून, कुठे लिंगावरू नतर कुठे जाती वरून एवढाच काय तो फरक. मानवी भेदभाव हे जगाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. लक्ष्मण माने सारखा कैकाडी समाजातील मुलगा शिकून शहाणा होतो, स्वतःचं नाव कमवतो, त्याच बरोबर आपल्या अज्ञानी समूहाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी जीवाची बाजी लावतो. इथल्या दुःखाचे मूळ धर्म व्यवस्थेत आहे हे समजून घेत सामूहिक धर्मांतर करतो हीच गोष्ट या व्यवस्थेला आव्हान देणारी आहे. लक्ष्मण माने जोपर्यंत समाजवादी असतात तोपर्यंत व्यवस्थेला चालते. ते राजकारणी होतात आमदार होतात तेही चालते. संस्थाचालक होतात शाळा महाविद्यालय काढतात तेही व्यवस्था खपवून घेते. मात्र जेव्हा ते बौद्धधर्मात प्रवेश करतात तेव्हा व्यवस्थेचे पित्त खवळते आणि या माणसाला जीवनातून उठविण्याचा प्रयत्न व्यवस्थेकडून केला जातो. 'ज्यांची करावी कीव तेच घेतात जीव' याचा प्रत्यय लक्ष्मण माने यांना येतो. ज्या सर्व हारा महिलांना लक्ष्मण माने यांनी आपल्या संस्थेत नोकरी दिली, त्यांनाच हाताशी धरून वेगवेगळी आमिषे देत व्यवस्थेकडून लक्ष्मण माने यांच्या विरोधात गुन्हे दाखल करायला भाग पाडले जाते. बुद्धाच्या सम्यक मार्गावरून निघालेल्या लक्ष्मण माने यांना बदनाम करण्यासाठी कटरचला जातो. मात्र भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहूमहाराज अशा महामानवांच्या विचारांवर प्रखर निष्ठा असलेले लक्ष्मण माने या किटाळातून सही सलामत सुटतात ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. लक्ष्मण माने यांच्यातील खंबीर कार्यकर्ता व्यवस्थेला पुरून उरतो ही गोष्ट चळवळीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरते.

एकंदरीत अत्यंत वाचनीय अशा स्वरूपाचे हे आत्मकथन म्हणजे व्यवस्थेच्या जीवघेण्या सापळयातून सहीसलामत सुटलेल्या एका बहाद्दर कार्यकर्त्याचं मन मोकळेपणानं केलेलं अनुभव कथन आहे. सर्व सामान्यांना अपरिचित अशा वेगळया जगाचे दर्शन घडविणारे हे आत्मकथन मराठी साहित्यामध्ये मोलाची भर टाकणारे आहे.

संदर्भ -

१. माने लक्ष्मण, किटाळ, ग्रंथाली प्रकाशन, १०१, १/ बीविंग, दनेक्स्ट, पिंपळेश्वर को- आॅप. सोसायटी, माटुंगा, मुंबई - ४०००१६, पहिली आवृत्ती – ६ डिसेंबर २०१९

२. लिंबाळे शरणकुमार (संपा.), दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर , प्रथम आवृत्ती - एप्रिल -१९९१.

३. नलगे चंद्रकुमार वपानतावणे गंगाधर (संपा.), दलित आत्मकथने, सुरेश एजन्सी पुणे, प्रथम आवृत्ती- जानेवारी १९८६.

४. मुलाटे वासुदेव, दलितांची आत्मकथने: संकल्पना व स्वरूप, स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद, प्रथम आवृत्ती- १९९९.

'फरफट' या कादंबरीतील स्त्री विषयक वैश्विक जीवन जाणीवाः एक आकलन

मेघा भास्करराव ढवळे

संशोधक विद्यार्थीनी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कादंबरी हा एक प्रवाही व सतत बदलणारा वाङ्मय प्रकार आहे. 'नॉव्हल' या संज्ञेचा 'कादंबरी' हा मराठी पर्याय असून तो बाणभट्टाच्या 'कादंबरी' या संस्कृत कथात्मक ग्रंथ नामावरुन मराठीत रुढ झाला. सुरुवातीला 'नॉव्हल' या शब्दासाठी मराठी भाषेत 'नावल' असा शब्द उदयास आला होता. बाळकृष्ण मराठे यांनी १९७२ मध्ये 'नावल' म्हणजे 'नवल समूह' असा अर्थ स्पष्ट केला होता. रा. ग. जाधव यांनी 'कादंबरीचा' उदय सांगत असते वेळी असे स्पष्ट केले आहे की, कादंबरी हा वाङ्मय प्रकार इंग्रजी साहित्यात आठराव्या शतकाच्या मध्यास आला, तर भारतीय साहित्यात तो एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आला. यावरुन असे स्पष्ट होते की, मराठी कादंबरीच्या उत्पत्तीमागे इंग्रजी साहित्याचा मोलाचा सहभाग आहे. कादंबरीच्या व्याख्या अनेक लेखकाने केल्या आहेत. त्यापुढील प्रमाणे पाहू.

श्री. मा. कुलकर्णी - 'कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी' अशी व्याख्या श्री. मा. कुलकर्णी यांनी स्पष्ट केली आहे. **भालचंद्र नेमाडे -** 'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशय सुत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्र, प्रसंग अपूर्ण ते पेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत, अशी साहित्यकृती असते.' स्त्रियांच्या लेखन कर्तृत्वाचा विचार साहित्य क्षेत्रात करत असते वेळी स्त्रियांचे लेखनकार्य समग्र आहे. साहित्यातील 'स्त्री लिखीत मराठी कादंबरी (१९५० ते २०१०)' पहिला कालखंड दिसून येतो. त्याचे संपादन करुणा ढेरे यांनी केले आहे. गेल्या पाच दशकाच्या काळात मराठी कादंबरीच्या इतिहासात ज्यांनी विशेष ठसा उमटवला, अशा अकरा लेखिकांच्या कादंबऱ्यांचा अकरा अभ्यासक- समीक्षकांनी परामार्श घेतला आहे. कमल देसाई, ज्योत्सना देवधर, आशा बगे, निर्मला देशपांडे, गौरी देशपांडे, तारा वनारसे, रोहिणी कुलकर्णी, अंबिका सरकार, शांता गोखले, कविता महाजन या तीन पिढ्यांच्या स्त्री कादंबरीकारांचा या खंडात समावेश होतो.

२०१० नंतर अशीच नावारुपाला आलेली व मूळात कवयित्री असलेली लेखिका छाया बेले. या नांदेड जिल्ह्यातील माकणी या छोट्याशा गावात जन्माला आल्या. पण आपल्या 'लढाई अस्तित्वाची', 'घरयाचे हृदयी माझ्या असे' (कविता संग्रह) व 'चकवा', 'वैशाख वणवा' हे (कथा संग्रह) अशा आपल्या साहित्यकृतीच्या यशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार, राजर्षी शाहू साहित्य गौरव पुरस्कार, थेरगाव, कोल्हापूर अश पुरस्काराने त्यांना सन्मानीत करण्यात आले आहे. अशा या त्यांच्या साहित्य लेखनातील महत्त्वाचे व संवेदनशील असे साहित्य म्हणजे 'फरफट' ही कादंबरी होय.

'फरफट' ही छाया बेले यांची सामाजिक वास्तवावर आधारित कादंबरी आहे. छाया बेले यामुळात कवयित्री आहेत. त्यांनी या कादंबरीतून दलित स्त्रीच्या जीवन जाणीवा मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला. दलित स्त्रीच्या

वेदनांची संवेदनशील मांडणी करण्याचे श्रेय छाया बेले यांना जाते. या लेखिकेच्या 'फरफट' या कादंबरीतील सगुणा या दलित स्त्रीवर तिच्या मुक्ताई नावाच्या सासू कडून होणारा छळया कादंबरीत लेखिकेने मांडला आहे. मुक्ताई व सगुणाचा नवरा हनुमंत यांच्या दोघांतील वादामुळे मुक्ताई सगुणाला तिच्या मुलाबाळांसह रात्री घराबाहेर काढते मात्र सगुणा नहार मानता हनुमंताच्या साथीने नवीन घर उभे करण्याचे सामर्थ्य सगुणा दाखवते. ती संकटांना न घाबरता खंबीर पणे सामोरे कशी जाते याचे वर्णन लेखिकेने या कादंबरीत केले आहे.

मात्र सगुणा समोरील संकटे येथेच न थांबता पुढे अनेक येतात. त्यामध्ये हनुमंताचा मृत्यू होतो. तसे एका मुलाचाही मृत्यू होतो; मात्र ती न कोसळता वादळात थांबलेल्या वटवृक्षावाणी खंबीर पणे उभी राहते, याचे वर्णन लेखिकेने स्पष्ट केले आहे. कितीही दुःख झाले तरी ती आशेने उभी राहत होती व हे सांगतेवेळी असे लक्षात येते की, हनुमंताच्या मृत्यूनंतर गर्भात असलेले मूल मुलगाच होईल या आशेने ती जगत होती. कादंबरीतील संवेदनेने भरलेले स्त्री पात्र म्हणजे, सगुणाची मोठी मुलगी कचरी. अनेक प्रकारचे कष्ट सहन करुन ती कशीबशी मोठी होते आणि तिच्या आयुष्यात सूर्य उगवून प्रकाश पडावा तसे झाले तिचे. लग्न किस्ना नावाच्या श्रीमंत मुलासोबत झाले. मात्र ते ही पती सुख तिला चार दिवसाचेच लाभले. ती वडिलांच्या मृत्युमुळे आईला व भावंडांना सहारा देण्यासाठी माहेरी जाते. आणि कमळी सारख्या लावालावी करणाऱ्या स्त्रीमुळे कि स्नासंगी नावाच्या मुलीच्या नादाला लागतो. माहेरचे दुःख सारुन सासरी येताच किस्ना कचरीचा छळ करायला सुरुवात करतो व संगी सोबत दुसरे लग्न करतो. यामुळे तिच्यावर आणखी दुःखाचे डोंगर कोसळतात याचे वर्णन लेखिकेने 'फरफट' मध्ये अत्यंत तळमळीने वास्तव चित्रण केले आहे.

कचरी ही एक दलित स्त्री असल्यामुळे पाटलांकडून तिच्यावर होणारा अत्याचार लेखिकेने या कादंबरीत अतिशय संवेदनशील पणे मांडला आहे. कचरी सोडून दिलेली स्त्री. समाज तिच्याकडे वाईट नजरेने पाहणे, वाईट बोलणे अशी तिची अवहेलना करत होता. मात्र ती त्यांना न घाबरता खंबीरपणे उभी होती. अशा वाईट लोकांसाठी व मायच्या काळजी पोटी कचरी दुसरे लग्न करते मात्र तेथे ही तिला मूलं जन्माला घालणारी वस्तू समजून लग्न केलेले असते. मात्र पहिल्या पत्नीला मूल झाल्यामुळे तिचा छळ करण्यास सुरुवात होते. म्हणून ती माहेरी येते मात्र ती गर्भावती असते हे तिला माहित नसते. तिला जाणीव होताच ती सासरी जाते, पण त्या लेकराला सासरचे लोक लेकरु आमचं नसल्याचं स्पष्ट करतात. पण ती न घाबरता त्या मुलाला जन्म देते आणि त्याचा कष्ट करुन सांभाळ करते.

या कादंबरीत सगुणा आणि कचरी यांच्या नात्यातील संबंध स्पष्ट करते वेळी लेखिकेने असे स्पष्ट केले आहे की, मायला ठेच लागली तर त्याची इजा मुलीला होतो आणि मुली समोर संकट उभे राहिले तर मुली आधी माय त्याच्या पुढे ताठ उभी राहते. तसेच दुसरा संबंध सासा- सुनाचा स्पष्ट करीत असताना मुक्ताई आणि सगुणा यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. सगुणाचा दोष नसलेल्या ही गोष्टीत मुक्ताई तीला आरोपी ठरवून कशी जाच करते याचे वर्णन केले आहे. तसेच कचरी आणि तिच्यातील द्वेषाचा संबंध स्पष्ट केला आहे. तसेच लेखिकेने श्रावण व कचरी यांच्यातील माया नाते संबंध अतिशय संवेदनशील पणाने स्पष्ट केली आहे. श्रावणाने गुरं राखून एक भाकरीचा मायच्या चेहऱ्यावर आनंद पाहून झालेली खुशी स्पष्ट केली आहे. यांच्यातील प्रेमाचे वर्णन लेखिकेने गाय- वासराची उपमा देऊन केली आहे. त्याच प्रमाणे शिक्षक व विद्यार्थ्यांतील नाते एक वडील व मुला प्रमाणे लेखिकेने या कादंबरीत स्पष्ट केले आहे. लेखिकेने या कादंबरीमध्ये दारिद्र्याचे वर्णन अगदी उरभरुन यावे असे केले आहे.

झड लागल्यामुळे सगुणा कुरडूची भाजी आणून लेकरांचे कसे पोट भरते, घरी मिरची नसल्यामुळे वाणीने फेकलेल्या मिरच्यांचे देठ वापरुन भाजी केली या अतिशय गंभीर खडतर परिस्थितीचे वर्णन लेखिकेने या कादंबरीत केले आहे. या दारिद्र्यातून वर निघण्यासाठी काबाड कष्टा बरोबरच शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे श्रावणाच्या शिक्षणामुळे कचरी आणि सगुणाचे दारिद्र्य कसे नाहीसे झाले हे स्पष्ट केले आहे.

निष्कर्षः-

शिक्षण मानवाच्या जीवनात किती महत्त्वाचे आहे हे जगाला पटवून देण्यासाठी व अज्ञानामुळे माणसाला किती प्रकारचे अन्याय सहन करावे लागतात हे लेखिकेने या कादंबरीतून स्पष्ट केले आहे. स्त्री सुशिक्षीत व स्वावलंबी नसेल तर तिच्या जीवनाची कशी फरफट होते, हे या कादंबरीतून विश्वाला पटवून देण्याचे कार्य लेखिका छाया बेले यांनी आपल्या 'फरफट' या कादंबरीतून केले आहे.

संदर्भ सूची –

१. बेले छाया, 'फरफट', प्रकाशक – यशोदीप पब्लिकेशन्स्, २१६ बजोरी निवास, नारायण पेठ, पुणे- ३०, प्रथम आवृत्ती- २८ डिसेंबर २०२०.

'बनगरवाडी' या कादंबरीतील वैश्विक जाणीवा: एक अभ्यास

रमेश गोविंदराव शेंडगे
संशोधक विद्यार्थी, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

प्रस्तावना:

कादंबरी हा वाङ्मय प्रकार मूळ पाश्चात्य असून तो आपल्याकडे आयात केलेला आहे१८५० पर्यंत आपलं भारतीय जीवन आध्यात्मिक सुख-दुःखात बुडालेलं होतं. 19 व्या शतकात महाराष्ट्रात उदयास आलेली कादंबरी सामाजिक जाणीवेतून निर्माण झाली.१८५७ मध्ये प्रथम मराठी मध्ये कादंबरी लेखनाला प्रारंभ झाला १८५७ ते १८९०या काळात मराठीमध्ये कादंबरीच्या नावाखाली अनेक प्रकारचे लेखन सुरू झाले.

मुक्तामाला, मंजूघोषा या कादंबऱ्या वाचकांच्या रंजन करणाऱ्या होत्या हरिभाऊंच्या उद्यापर्यंत कादंबरीचे घटक माहीत नव्हते. हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो?' आणि 'मी' या दोन कादंबऱ्यातून आलेले मध्यमवर्गीय समाजाचे वर्णन हे सर्वसामान्य वाचकाला खूप आवडले. कादंबरी लेखनामध्ये वातावरण निर्मिती महत्त्वाचे कार्य करीत असते. हे वातावरण ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, पौराणिक स्वरूपाचेअसते. कादंबरी हेच जीवनचित्र आहे. जीवनाच्या अनेक घटकाचा समावेश त्यात होतो. कादंबरी हा मनाच्या अंतर्मनाचा शोध घेणारा वाङ्मय प्रकार आहे.

कादंबरीची व्याख्या:

अर्नेस्ट बेकर –

"ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय."

उषा हस्तक –

"कादंबरी म्हणजे एक संसार चित्र होय."

वि.का.राजवाडे –

"कादंबरी म्हणजे समाजाचा एक दस्तऐवज आहे, की ज्याच्या मध्ये मानवी जीवन आणि मानवी समाजाचे प्रतिबिंब असते. संबंध जीवनाला हा प्रकार कवेत घेतो."

वरील व्याख्येवरून कादंबरीचे विस्तारित रूप लक्षात येते. कादंबरीचा आवाका विशाल सागरासारखा आहे. कादंबरीत स्थळ काळाचा व्यापक विचार आलेला असतो. कादंबरी जीवनाचे दर्शन घडवते. असेच जीवनाचे दर्शन घडविणारी कादंबरी म्हणजे व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही होय. यात निसर्ग, व्यक्ती, समाजव संस्कृती यांचे दर्शन घडते.

बनगरवाडीतील मानवी स्वभावाचे चित्रण:

बनगरवाडी या कादंबरीत अनेक मानवी स्वभावाचे सूक्ष्मतेने चित्रण करण्यात आले. त्यातील एक महत्त्वाचं व्यक्तिमत्व म्हणजे 'कारभारी'. सर्वांना एकत्र करणारा, आधार देणारा, मदत करण्याची वृत्ती असणारा, सर्वांना सोबत घेऊन चालणारा हा व्यक्ती. त्याच्या बोलण्यातून पाणी आणून देणे, चिमणी आणणे, दूध देणे यातून माणुसकीचे दर्शन घडते.

टिवल्याबावल्या करून जगणारा, चाडीचुगली लावणारा, तालुक्याच्या अधिकाऱ्यांशी बसउठ करणारा, थोडेफार लिहायला वाचायला येणारा दादू आपल्या गावगाड्यात इतरांचा हस्तक्षेप नको. आपापली कामे मास्तरांनी करावीत अशी अपेक्षा ठेवणारा दादू! लहान मुलासारखा मिळेल ते खाणारा आयबू अशा या पात्रातून मानवी स्वभावाचे चित्र लक्षात येते .

बनगरवाडीतील बालविश्व:

बनगरवाडीचा आजूबाजूचा प्रदेश माळरानअसल्यामुळे मेंढपाळ हा मुख्य व्यवसाय. या व्यवसायात आपल्या वडिलांना मेंढ्या राखण्यात मुले मदत करत. मुलगा थोडा मोठा झाला की त्याला मेंढ्या मागे धाडले जायचे त्यामुळे शाळेत जाणे जवळपास नसेच. काही मुले शाळेत येत त्यातलाच एक म्हणजे सत्ता. तो थोडा हुशार चार अक्षरे नीट शिकल्यामुळे चार-सहा मुलात तो उजवा होता. स्वतःमध्ये शिकण्याची इच्छा होती. तसेच मुलाणी, आनंदा रामोशी व रामा बनगर ही शाळेत येणारी मुले. आनंदा रामोशी पोट भरण्यासाठी रात्रभर शिवार धुंडाळायचा आणि दोन-चार दिवसांनी मालकालाच चोरी बद्दल कबुली द्यायचा यावरून त्याच्या ठिकाणी असलेला प्रामाणिकपणा लक्षात येतो.

शिक्षण विषयक जाणीवा:

बनगरवाडीत विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी समज नव्हती. शिक्षणामध्ये वेळ घालवण्यापेक्षा सद्यस्थितीत काम होणे महत्त्वाचे वाटत असे. मुलगा थोडा थोराड झाला की लगेच त्याला मेंढरा मागे पाठवले जायचे लेखक आल्यापासून विद्यार्थ्यात शिक्षणाविषयी गोडी निर्माण झाली होती. स्वतः चार अक्षर लिहिता वाचता येणारा मुलगा पण यालाही वडिलांच्या अनुपस्थितीत मेंढरामागे जावे लागत असे. गुरुजीमुळे तीस-पस्तीस खोपट्याच्या बनगरवाडीत आठ दहा मुले शाळेत येऊ लागली. ज्ञानसंवर्धनाबरोबर बलसंवर्धनासाठी तालीम बांधण्यात आली. शिकून कोणी अंमलदार होणार आहे का? अशी भावना येथील लोकांचीहोती. शिक्षणापेक्षा मुलाला आपल्या व्यवसायात आणणे हेच त्यांच्यासाठी खरे शिक्षण होते.

सामाजिक जाणीवा:

बनगरवाडीत रामोशाची आणि धनगराची खोपटे होती. बनगरवाडीत दगडगोट्यांची जमीनवसतत पडणारा दुष्काळ यामुळे दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पुजलेले होते. उघडी नागडी माणसे कष्टाळू होती. बाहेरगावशी संपर्क नसल्यामुळे आपल्या रहाटगाड्यातच गुंतलेली होती. शेकूचा एक बैल मेल्यामुळे पेरणीच्या काळात मदत न झाल्यामुळे शेकूची बायको हतबल न होता स्वतः जू खांद्यावर घेऊन तिफणओढते आणि दोन एकर शेत दिवसभरात पेरले जाते.

तालीम बांधण्यासाठी एक गाव एकत्र येतो. ही माणसेसामाजिक रूढी, परंपरा यांना धरून जीवनजगतात. जत्रा -यात्रा साजरे करतात एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतात.यातून सामाजिक जाणीवा लक्षात येतात.

निष्कर्ष :

बनगरवाडी या कादंबरीमध्ये वास्तवदर्शन पाहायला मिळते.या कादंबरीचा नायक मास्तर वाटत असला तरी खरा नायक निसर्गच वाटतो. बनगरवाडी हे दुष्काळी गावाचे प्रतीक आहे. चारा,पाणीव अन्न या चक्रव्यूहात माणसासोबत तो मेंढरानाहीदुष्काळात ओढतो. यात जगण्याची धडपड आहे. येथील माणसाने दुष्काळ मनाला लावून घेतला नाही. या माणसाने कायम आपल्या कष्टाला आणि भावनांना जिवंत ठेवलं.यातीलदुष्काळ माणसांना लढायला, संघर्ष करायलाशिकवतो.

संदर्भ :

१. माडगूळकर व्यंकटेश,'बनगरवाडी' मौज प्रकाशन, दहावी आवृत्ती - ऑगस्ट १९८३
२. https://wikipedia.in

जागतिक दृष्टिकोनातून मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती

संतोष मारोती चमकुरे

संशोधक विद्यार्थी, रा. धावरी ता लोहा जि नांदेड पिनकोड.४३१७०८.

प्रस्ताविक -

भारत हा एक मोठा खंडप्राय देश आहे. निरनिराळे मानववंश, निरनिराळ्या चालीरीती धर्म ,जाती, परंपरा, भाषा विचार, भौगोलिक रचना या सर्वांनी मिळून हा खंडप्राय देश बनला आहे. भारतीय संस्कृतीचा जागतिक मानवतावादी आणि निसर्ग विषयाचा दृष्टिकोन भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे आपल्या परंपरांमध्ये वृक्ष, नद्या, झाडे, पशु, पक्षी, प्राणी, अग्नी, वायू, सूर्य, चंद्र, धरणी त्याच बरोबर मूर्ती पूजेचे उपासक ही मोठ्या प्रमाणावर दिसून येतात या संस्कृती पासून मानवाला दूर करता येणार नाही. अशा संस्कृतीचा अभिमान असतो.

मानवाचा संचार पृथ्वीवर जसा होऊ लागला त्याच बरोबर भाषेचा वापर ही तो करू लागला. प्रारंभीच्या अशा ही समाजभिमुख असून प्रारंभी काळात मौखिक भाषेचा वापर करत असे त्यानंतर श्रवणातून मग तो वेगवेगळ्या आवाजाच्या द्वारे, देह बोलीच्या द्वारे बोलण्याचा प्रयत्न करू लागला आणि भाषा अस्तित्वात येऊ लागली.

१ मौखिक भाषा

२ खाना खुणांची, इशाऱ्याची भाषा

३ चित्ररूपी आकार मानाची भाषा

अशी भाषेचे हे रूप आढळते त्यानंतर भौगोलिक रचने नुसार बोलण्याची, लिपीबद्ध करण्याची, आवाजात चढ उतार करून शैली अवगत करण्याची कला मानव जोपासू लागला आणि भाषेला महत्त्व प्राप्त झाले. विचार व्यक्त करण्यासाठी, परस्पर व्यवहार करण्यासाठी निर्माण समाजभिमुख निर्माण झालेल्या भाषेला, मानवाला अत्यंत उपयोगी कशी भाषा आहे याचे महत्त्व पटू लागले. भाषा ही व्यक्तीची समाजाची समूहाची महत्त्वाचा घटक बनली भाषा त्या समूहाची त्या व्यक्तीची ती भाषा, मातृ भाषा झाली.

जगात अशा कितीतरी भाषा उदयाला आल्या आहेत त्या भाषेतून संस्कृती निर्माण झाल्या प्रादेशिक भाषेपेक्षा मातृभाषेला अधिक महत्त्व व्यक्ती अथवा तो समाज देत असतो. ती समुदायाची जननी असते.

मराठी भाषेचा उदय. -

ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे आणि भाषा ही त्याची जननी आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे एवढेच वेद आहेत असे नाही तर जीवनाला आनंद देणारा विचार म्हणजे एक वेदच होय. वेद हे ईश्वर लिखित असून त्यातून संस्कृत भाषेचा उदय झाला आणि त्यातून मग मराठी, हिंदी, गुजराती अशा भाषेचा जन्म झाला असे ही पुराव्याद्वारे सांगता येईल. ज्ञान प्राप्तीसाठी भाषा किती महत्त्वाची आहे हे वेगवेगळ्या भाषा वैज्ञानिकांनी पाश्चिमात्य आणि भारतीय भाषा वैज्ञानिकांनी भाषेच्या संशोधनाच्या बाबतीत खूप मोठे योगदान दिले, वि. का. राजवाडे यांनी मराठी भाषेचा शोध इसवीसनाच्या चौथ्या शतका पर्यंत घेतला असता तिथपर्यंत मराठी भाषेचे अस्तित्व आढळून आले याचाच अर्थ असा होतो की मराठी भाषेचेमूळ हे मराठवाड्यातच रुजलेले दिसते.

महानुभव पंथा पासून ते ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व समकालीन संत मंडळी संत, पंत, तंत आज पर्यंतच्या सर्व भाषा वैज्ञानिकांनी मराठी भाषेची थोरवी गायली आहे.

मौखिक साधने, लिखित साधने, भौतिक साधने, वदृक श्राव्य साधने या साधनांच्या द्वारे काही ऐतिहासिक पुरावे भाषेच्या बाबतीमध्ये आढळून येतात. शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्रे या साधनांच्या माध्यमातून ओवी, अभंग, रामायण, महाभारत, खंडकाव्य, आरत्या, भूपाळी, भारुड लावणी, कटाव, पोवाडे, खलिते, बखर अशा माध्यमांच्या द्वारे मराठी भाषेला आणि त्यातील ज्ञान हे अधोरेखित होते. बदलत्या प्रवाह नुसार वेगवेगळ्या काळानुसार भाषेमध्ये चढउतार आणि शब्दांचे आदान, प्रदान होत असते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भाषेच्या आधारावरच भारतातील राज्यांची निर्मिती झाली इथे ही आपल्याला भाषेला किती महत्त्व आहे याची जाणीव होते.

भाषिक आक्रमण आणि लोभसपणा -

भाषेचा उदया पासून जर विचार केला तेव्हा पासून तिच्यामध्ये खूप बदल झालेला दिसतो मूळ भाषेपेक्षा इतर भाषेतील शब्दच अधिक प्रमाणात दिसतात संदर्भ असा लावला जातो की मराठी भाषेवर इतर भाषेचे आक्रमण झालेले दिसते. संस्कृत, उर्दू, पार्शियन, इस्लामी, पेशवाई हिंदी, गुजराती, बंगाली, असामी, तमिळ, केरळी, मल्याळम ओडिसा, तेलुगु, इंग्रजी अशा अनेक भाषेचे शब्द मराठी भाषेत आले त्याच मानाने मराठीतील शब्द इतर भाषेमध्ये ही गेले केवळ मराठीच्या बाबतीतच असे होते नाही तर इतर भाषेच्या बाबतीमध्ये ही याहून परिस्थिती वेगळी नाही.

भाषिक सौंदर्य -

भाषेच्या आदान-प्रदान या क्रियेमुळे काही मूळ शब्द लुप्त झाले असले तरी त्याजागी नवीन शब्दाच्या भरीमुळे भाषेची हानी झाली असे म्हणता येणार नाही तर त्या शब्दातून तिच्या सौंदर्यात अधिक भर पडली लोभस पणा निर्माण झाला भाषा जरी बारा कोसावर भाषा बदलत असली तरी भाषेतील बोली बदललेल्या दिसतात, त्यातील ढग निरनिराळी दिसते भाषा ही भाषा कायम असते फक्त आकारमानाने ढभी वरून बदल आणि बोलीच्या रूपातला बदल हे पाहायला मिळतो. अशा बोली भाषेमुळे भाषेला सौंदर्य लाभते, मराठी भाषेला अधिक सौंदर्य प्राप्त झाले बोलीमुळे त्या त्या भागातील शब्द रचनेच्या आकर्षण कायम राहते आणि अशा बोलीतून येणारे संदर्भ, साहित्य निर्मिती, संस्कृतीचे दर्शन नेहमीच जगाच्या आकर्षणाचे केंद्र बिंदू ठरते.

ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथातील संस्कृत भाषेचे शब्द, एकनाथाच्या भारुडातील लोक भाषेचे संदर्भ, तुकारामाच्या गाथेतील साधी सरळ भाषा, त्याच बरोबर लावणी, पोवाडे सारखे शृंगारिक व वीर रस प्रदान युक्त शब्दरचने मुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतातच शिवाय भावनिकतेची जोपासना ही दिसून येते आणि आणि त्या भाषेला लोभस पणा प्राप्त होते. इतर भाषेपेक्षा मराठी भाषेमध्ये बोलीचे प्रमाण जास्त आहे मराठवाडी बोली, अहिराणी बोली, खानदेशी बोली, वऱ्हाडी बोली, कोकणी बोली, डोंगरी बोली, पोवारी बोली, डांगी बोली बंजारा बोली आदिवासी बोली, अशा भाषेला स्वतंत्र लिपी नाही ती फक्त विविध बोलीमुळे भाषिक सौंदर्य वाढवते, भाषाही प्रवाही आहे बदलामुळे तिची हानी होत नसून लोभसपणा अधिक जाणवतो सौंदर्यामध्ये भर पडते.

साहित्य आणि संस्कृती-

भाषेच्या उदया बरोबरच संस्कृतीचा उदय होत असतो. जगाच्या पाठीवर जशी जशी भाषा उदयाला आली त्याच बरोबर भाषेतून परस्पर व्यवहार सुरू झाले. वस्तूची विचाराची देवाण घेवाण होऊ लागली आणि कळतनकळत संस्कृतीचा उदय होत राहिला. दिवसभराच्या कामकाजातून तो जणु थकू लागला आपसूकच तो विरंगुळकडे वळला तेंव्हा त्याला त्याचे आकर्षण वाटू लागले मनोरंजनातून नवीन ऊर्जा मिळू लागली तो अधिकच

ताजा तवांना दिसू लागला. मनोरंजनातून शारीरिक, मानसिक विकास होऊ लागला इतिहासाचे साधना द्वारे मौखिक, लिखित, भौतिक साधनांच्या साह्याने संस्कृतीचा शोध होऊ लागला आणि साहित्य निर्माण होऊ लागले. रामायण, महाभारत शिवलीलामृत, रुक्मिणीस्वयंवर, भागवत, अभंग, ओवी भारुड, कथा, कविता, कादंबरी, नाटक, स्त्रीगीते, जात्यावरच्या ओव्या, शेतकरी गीते, लग्नविधीतील गीते, सण उत्सवाच्या वेळी गायली जाणारी वेगवेगळी गाणी यासर्व गोष्टीच्या धांडोळा केला असता भाषेतून संस्कृती संस्कृतीतून साहित्य निर्माण झाल्याचे दिसते.

बदलत्या काळानुसार साहित्यामध्ये आणि संस्कृतीमध्ये बदल होत असतो कागदाचा शोध लागल्यानंतर धोबड मांडणीचे पुरावे दिसतात. साहित्याचा आकारमान बदलत असतो बदललेल्या साहित्याच्या माध्यमातून साहित्याचे अनेक प्रवाह ही दिसतात सामाजिक जाणीव असलेले, शृंगार प्रधान असलेले, समाजाच्या उनिवा मांडणारे देशभक्ति, मातृभूमि, चळवळी, स्त्रीवादी, बालसाहित्य, प्रौढसाहित्य, लोकसाहित्य, संतसाहित्य, प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, वैज्ञानिक साहित्य आणि अशा सारख्या साहित्यातून वेगवेगळया विषयाची मांडणी करणारे समाजाच्या अंगोपंगाची चर्चा करणारे बोली भाषेतील साहित्य हे उदयाला आले आणि येते आहेत. यामधून भाषा आणि संस्कृती याचे महत्त्व अधोरेखित होते बदल त्याकाळा नुसार बदलते विषय, बदललती भाषा, बदलते साहित्य हे मराठी भाषेचे, साहित्याचे आणि संस्कृतीचे वेगळेपणा जाणवते.

भारतीय संस्कृती ही विज्ञानवादी संस्कृती -

जगाला हेवा वाटावा अशी भारतीय संस्कृती विविधतेने नटलेली आहे अग्निपूजा, वृक्षपूजा, जलपूजा, पूजाधरणी पूजातत्त्वज्ञान, धार्मिकता, कुटुंबव्यवस्था, लग्नविधी, सणउत्सवाचा आनंद, वेगवेगळया भागातल्या परंपरा जो पासून आणि त्यातून मिळालेले तत्त्वज्ञान हे वाखण्या जोगे आहे, अद्वैताचे अधिष्ठान, अद्वैताचा साक्षात्कार, बुद्धीचा महिमा, प्रयोग करणारे ऋषी, वर्ण, कर्मभक्ती, ज्ञान, संयम कर्मफल त्याग, गुरु, शिष्य, चार पुरुषार्थ, पुरुषमानवतेशी व सृष्टीचे प्रेमाचे संबंध, अहिंसा, ध्येयाची परकाष्टा, अवतार कल्पना, श्रीकृष्ण व त्याची मुरली, मृत्युकाव्य अशी असे तत्वज्ञान, विचाराने, समाज सुधारकांनी, जिज्ञासू व्यक्तींनी अंधश्रद्धेला कधीच थारा दिला नाही, भारतीय संस्कृती ही विज्ञानवादी संस्कृती आहे याची प्रचिती वारंवार करून दिली वैज्ञानिकांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. भारत हे अनेक भाषा आणि संस्कृतीचे माहेरघर आहे आणि मराठी भाषा आणि महाराष्ट्र अशा संस्कृतीचे केंद्रबिंदू आहे ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथ आणि इतर संतांचे साहित्य आणि लोकसाहित्य, परंपरा संस्कृती याचा अभ्यास जगभरामध्ये केला जातो इतर भाषेमध्ये साहित्य अनुवादित होते भारतीय परंपरा त्यातील तत्त्वज्ञान याचा विचार जगभरात मोठ्या प्रमाणामध्ये केला जातो.

समारोप -

भाषा ही प्रत्येक संस्कृतीची जीवनवाहिनी असते आणि भाषाही संस्कृतीला बळकट करत असते जग राहाटी प्रमाणे भाषा बदलते भारतासारख्या देशात अनेक धर्म, जाती, भाषा बोली भाषा आणि त्यातून निर्माण झालेले साहित्य आणि एकात्मतेचे दर्शन घडवणारे संस्कृती जगाच्या पाठीवर कुठेही पाहायला मिळत नाही, भाषा टिकली तर संस्कृती टिकते संस्कृतीची जोपासना होते आपली भाषा आणि परंपरेच जतन करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे शिवाय इतर भाषा आणि संस्कृतीचा सन्मान ठेवणे ही महत्त्वाचे आहे बदलत्या काळानुसार बदल ही स्वीकारायला पाहिजे. !

संदर्भ ग्रंथ

1. भारतीय संस्कृती - साने गुरुजी साधना प्रकाशन१९३७

मध्ययुगीन मराठी संतकवितेतील वैश्विक जाणिवा

प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी

मराठी विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

महाराष्ट्रातील वारकरी, महानुभाव, नाथ, समर्थ, वीरशैव आदी वेगवेगळ्या भक्तीसंप्रदायातील संतकवींनी मराठी साहित्यक्षेत्रात विपूल अशीनिर्मिती केलेली आहे. मध्ययुगीन काळात उदयास आलेल्या या संप्रदायांची भक्तीच्याक्षेत्रातील अधिष्ठान दैवते व उपासना पद्धती ही वेगवेगळी होती. तसेच साहित्यक्षेत्रातही त्यांनी ओवी, अभंग, दृष्टांत, लीळा, धवळे, आख्यान, भारुड, श्लोक, अष्टके, वचनअशा वेगवेगळ्या रचनाप्रकारांतून निर्मिती केलेलीआहे. परंतु या भक्तीसंप्रदायातील एक समान वैशिष्ट्ये असे की, या संप्रदायांनी सर्वसामान्यांसाठी त्यांच्याच बोलीभाषेत भक्तीचा सोपा मार्ग सांगितला असून, त्यांच्या साहित्यातून मानवी-वैश्विक कल्याणाची जाणीव प्रकट झालेली पाहावयास मिळते.

'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे|' अशी संतांची प्रामाणिक भूमिका होती. याच भूमिकेतून संतांनी आपले आयुष्य समर्पित केलेले आहे. तत्कालीन धर्मकेंद्रित समाजजीवन रूढी, परंपरांनी जखडलेले होते. चातुर्वर्ण्यावर आधारित समाज अनेक धर्मपंथ, जाती-जमाती आणि आचारविचारात विभागलेला होता. शुद्ध भक्तीपेक्षा उपासनेच्या तंत्रांना अधिक महत्त्व दिले जात होते. वृत्तवैकल्ये, नवसायास, तीर्थयात्रा, श्राद्धविधी यामध्येच मुख्यतः समाज गुरफटलेला होता. अनेकप्रकारची क्षुद्र दैवते पूजली जात होती. कर्मकांडांना अनावश्यक महत्त्व दिले जात होते. अशापरिस्थितीत 'बुडताहे जन देखवेना डोळा, येतो कळवळा म्हणवुनी' संत पुढे आले आणि अंधश्रद्धेवरकठोर आघात करून अज्ञानमूलक उपासनेचा त्यांनी निषेध केलाव धर्माचे खरे स्वरूप स्पष्ट केले. परमेश्वर हा एकचअसून, तो सर्व प्राणिमात्रांमध्ये भरलेला आहे; म्हणून सर्व माणसे समान आहेत, हेच संतांनी सांगितले. तसेच माणसांविषयीचे प्रेम याच्या बळावर व्यक्तीची उन्नती होऊ शकते, त्यासाठी कुठलेही यज्ञयाग, वृत्तवैकल्ये, पशूहत्या किंवा कसलेही अघोरी कृत्य करण्याची गरज नाही, असे संतांचे ठाममत होते. संतांच्या साहित्यामागे समानतेची, करूणेची भावना समाजापर्यंत पोहोचविण्याची उत्कट प्रेरणा होती.'या रे या रे लहान थोर' असे म्हणून संतांनी बाराव्या-तेराव्या शतकात सर्वजाती, वर्ण, व्यवसायातील लहान थोर स्त्री-पुरुषांना व अठरापगड जाती-जमातीत विभागलेल्या समाजाला अध्यात्मिक लोकशाहीच्या एकाच छताखाली आणले. आणि प्रस्थापित वर्णव्यवस्थेची बंदिस्त चौकट मोडण्याचा प्रयत्न केला. मनुष्य कोणत्याही जातीचा असो त्याला आत्मोद्धाराची संधी आहे, असा विश्वास त्यांनी निर्माण केला. एवढेच नव्हे, तर 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' या उक्तीप्रमाणेच संतांचे आचरण होते, म्हणून कृती आणि उक्ती या दोन्ही बाबतीत जगाने कायम आदर्श घ्यावा अशी मूल्ययुक्त जगण्याची शिकवण संतांनी दिलेली आहे.

संत कवितेतील वैश्विक जाणिवांचा आपण विचार करू लागतो; तेव्हा वारकरी पंथातील संत नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, गोरा कुंभार, सावता माळी, संत जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा आदी सर्वच संतकवी व कवयित्रींची रचनाही ठळकपणे आपल्या नजरेस भरते. या संतांनी 'वसुधैव कुटुंबम्' यादृष्टीने जगाकडे पाहिले आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दाशब्दांतून याचा आपणास प्रत्यय येतो.'हे विश्वचि माझे घर, ऐसी जयाची मती स्थीर' असे जेव्हा संत ज्ञानेश्वर म्हणतात, तेव्हा ते संपूर्ण जगासमोर एक उच्च आदर्श ठेवतात. तसेच 'म्हणोनी कुळ जाती वर्ण, हे अवघेची गा अकारण' असे म्हणून ज्ञानेश्वरांनी स्त्री, पुरुष, कुळ, जाती, वर्ण अशा सर्वप्रकारच्या भेदाभेदांवर प्रहार

केले आहेत. तर संत तुकाराम 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ' म्हणून सामाजिक जीवनाबरोबरच शैव, वैष्णव वगैरेतत्कालीन भक्तीच्या क्षेत्रातील द्वैत मिटवण्याचा प्रयत्न करतात. तसेच, लौकिकजीवनातही सर्व समान आहेत, असा जगाला संदेश देतात. संत नामदेवांनीही 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' म्हणून संपूर्ण जगातील अज्ञान, अंध:कार दूर सारून चोहीकडे ज्ञानाचा प्रकाश पडावा, अशी प्रतिज्ञा केलेली आहे. ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' हे तर त्यांच्या हृदयातून उचंबळलेली विश्वाच्या कल्याणाचीच प्रार्थना म्हणता येते.

जे खळांची व्यंकटी सांडो| तया सत्कर्मी रती वाढो|
भुता परस्परे पडो| मैत्र जीवांचे||
दुरितांचे तिमिर जावो| विश्वस्वधर्मसूर्य पाहो|
जो जेवांछील तोते लाहो| प्राणीजात||

विश्वातील प्रत्येक घटकाच्या कल्याणाचा 'एवढा उच्च विचार जगाच्या साहित्यात कुठेही आढळत नाही'१हे जनार्दन वाघमारे यांचे विधान निर्विवाद सत्य आहे. ज्ञानेश्वरांच्या उदार, मानवतावादी दृष्टीचाया प्रार्थनेतून परिचय घडतो. सर्व कल्याणाच्या भावनेने विश्वात्मक परमेश्वराजवळ ज्ञानेश्वरांनी जे मागणे मागितले आहे, ते वैयक्तिक लाभाचे नाही तर सर्व प्राणिमात्रांच्या सुखाचे, कल्याणाचे मागणे मागितले आहे. म्हणून वर्ण, वंश, प्रांत व भाषा यापलीकडील ही वैश्विक जाणीव ठरते.

संतांच्या जीवनात अनेक संघर्षाचे, कसोटीचे प्रसंग आले. परंतु संतांनी कधीही आपला विवेक ढळू दिला नाही. कारण संत वैयक्तिक जीवनातील सुख-दुःख, राग-लोभव आपपर भाव या पलीकडे जाऊन स्थितप्रज्ञवृत्तीने जगले. सुरेश द्वादशीवार यांनी म्हटल्याप्रमाणे,''आपल्या दुःखाला व आनंदाला विराट परिमाण देणे हेप्रतिभेचे काम आहे. ती फोटोग्राफी नाही, चित्रकृती आहे.''२ आणि मराठी संतांनी अगदी तटस्थपणे ही चित्रकृती रेखाटलेली आहे, असे म्हणता येते.'बरे झाले देवा निघाले दिवाळे, बरी या दुष्काळे पीडा गेली' किंवा 'बरे देवा कुणबी केलो, नाही तरी दंभेची असतो मेलो' असे संत तुकारामाने आपल्या जीवनातील दुःख व आपदांबद्दल ईश्वराचेच आभार मानणे, किंवा 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास','डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी' असे जनाबाईने प्रचंड आत्मविश्वासाने प्रस्थापित व्यवस्थेच्या विरुद्ध कृती करण्याचा दाखविलेला धीटपणा असो, की 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा, काय भुललासी वरलीया रंगा' म्हणून संत चोखामेळा यांनी केलेला सवालअसो, किंवा 'आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचे' हे संत तुकारामाच्या अभंगातील 'आनंदाचे कोंदण' म्हणजे आपल्या दुःखाला व आनंदाला संतांनी विराट परिमाण प्राप्त करून दिल्याचे दाखले आहेत.'अणू रेणूहुनिया थोकडा, तुका आकाशाएवढा' असे संत तुकाराम म्हणतात, तेव्हा ते नुसते अध्यात्म व भक्तीभाव सांगत नाहीत, तर सार्वत्रिकमाणसाच्या अंगी असलेल्या व्यापकतेची जाणीव करून देतात, हे आपणलक्षात घेतलेपाहिजे.तुकारामाच्या गाथेतील अभंगांचे हे सामर्थ्य लक्षात येताच ब्रिटीशकालीन मुंबईचा गव्हर्नर सर अलेक्झांडर या ख्रिश्चन अधिकाऱ्याने गाथेचा इंग्रजी अनुवाद करण्यासाठी मुंबईच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. तसेच, युनेस्कोने तयार केलेल्या 'वर्ल्ड हेरिटेज ऑफ बुक्स' म्हणजेच जागतिक वारसा ग्रंथामध्येही मराठीतील 'ज्ञानेश्वरी' आणि 'तुकोबाची गाथा' या ग्रंथांचा समावेश झालेला आहे. याचा अर्थ मराठी संतांच्या काव्यातील वैश्विक जाणिवांचे महत्त्व जागतिक पातळीवर आधोरेखित झालेले आहे.

संतकविता ही मानवतावादी बैठक असलेली निर्मिती आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता याबरोबरच सत्य, अहिंसा, करुणा, सहिष्णुता ही माणसाला महान मानणारी उच्चतम तत्वे संतांच्या कवितेचे मुख्य गाभा

घटकराहिलेले आहेत. व्यक्तीचे उत्तम चारित्र्य, शुद्ध मन व पवित्र भाव हाच त्याच्याआत्मोन्नतीचा खरा मार्ग आहे, हे संत कवितेतून प्रत्ययाला येते. संत चोखामेळा, निर्मळा, जनाबाई किंवा गणिकेची मुलगी म्हणून जन्माला आलेल्या संत कान्होपात्राने ते प्रत्यक्ष दाखवून दिले आहे. कर्मनिष्ठा, भूतदया, परोपकार, प्रेम, शांती, दया, क्षमा अशा अनेक मानवतावादी जीवनमूल्यांची जोपासना संतांनी केली व ती प्रचारात आणली. ही मूल्ये संपूर्ण जगासाठी प्रेरक व आदर्श अशीच आहेत.

'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले|
तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा||

किंवा 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती|' असे तुकोबा म्हणतात तेव्हा, देव देवळात किंवा दगडात नसून तो माणसात आहे, दीन-दुबळे व रंजल्या गांजल्यांच्या सेवेमध्ये आहे, असा मानवतावादी विचार सांगतात. तसेचपशू, पक्षी, वनस्पतीव चराचरांमध्ये परमेश्वर असून, सृष्टीतील प्रत्येक घटकाचे संरक्षण व संवर्धन करणेहेच माणसाचे खरे पवित्र कार्यआहे, अशी विश्वात्मक जाणीव त्यातून व्यक्त झालेली दिसून येते. 'जग झाले वन्ही, तेथ संतमुखे व्हावे पाणी' असा मुक्ताबाईने जो उपदेश केला आहे, तो वैश्विक शांततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, जगातील प्रत्येक व्यक्तींनी नेहमीसाठी ध्यानात घेतल्यास जागतिक शांतता परिषदेची सुद्धा गरज भासणार नाही, असे म्हणता येते. 'पुण्य परोपकार, पापते पर पीडा' ही पाप-पुण्याची केलेली सोपी व्याख्या, 'परस्त्रिया सदा बहिणी माया' म्हणूनस्त्रीत्त्वाचा संतांनी केलेला सन्मान, 'येत्ने रगडिता वाळूचे तेलही गळे' किंवा 'ओले मूळ भेदी खडकाचे अंग' अशी प्रयत्नवादाची दिलेली शिकवण, 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' म्हणून केलेला व्यावहारिक उपदेश, तसेच 'मढे झाकूनिया करिती पेरणी' म्हणून मानवी जीवनातील सांगितलेले वेळेचे महत्त्व किंवा 'समयासी सादर व्हावे' असा व्यक्त केलेला कालगतीचा महिमा ही आणि संपूर्ण मानव जातीला पदोपदी मार्गदर्शक ठरावी अशी अनेक संत वचने मध्ययुगीन मराठी संत कवितेतून व्यक्त झालेली आहेत. जी देश, काल व परिस्थितीच्या पलीकडे जाऊन विश्वात्मक व सार्वकालिक मानवाच्याकल्याणाची प्रामाणिक भावना व्यक्त करतात. बाळासाहेब विखे-पाटील यांनी म्हटल्या प्रमाणे, ''ज्ञानोबा, तुकोबा, गोरा कुंभार यांच्यापासून गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत सर्वच संत वारकरी संप्रदायाकडे सामाजिक प्रबोधनाचे साधन म्हणून पाहत होते. हे सर्व संत काळाच्या पुढे पाहून समाजामध्ये जागृती व क्रियाशीलता निर्माण करत होते. कर्मकांड व धर्ममार्तंडांच्या जोखडातून मुक्त होऊन नवीन ते स्वीकारावे, काळाची पावले ओळखावीत, असा त्यांचा आग्रह होता.''३संत हे दृष्टे होते. तसेच त्यांनी कायम विश्वाच्या कल्याणाचाच विचार केलेला आहे. माणसाच्या उन्नतीस उपकारक होतील अशी प्रत्येक गोष्ट संतांनी सांगितली असून, ज्ञान आणि कर्म, विवेक आणि नीती यांची त्यांनीउत्तम सांगड घातलेली आहे. प्रामाणिकपणे व परिश्रमपूर्वक धनार्जन न करता आपली कर्तव्य सोडून भक्तीच्या नावाने भिक्षा मागणे ही प्रवृत्ती सर्वांसाठी घातकच असून, 'भिक्षापात्र अवलंबिणे, जळो जिने लाजिरवाणे' (संत तुकाराम) असे म्हणून संतांनीया प्रवृत्तीचा धिक्कारच केला आहे. म्हणून संत कविता म्हणजे केवळ आध्यात्मिक भक्तीभावच व्यक्त करीत नाही तर, मानवाच्या कल्याणाचा ती विवेकी विचार मांडते. म्हणून संत कवितेतून सत्य, अहिंसा, प्रेम, दया, शांती अशी सार्वत्रिक, शाश्वत व वैश्विक मूल्ये व्यक्त झालेली दिसून येतात.

संदर्भ:

१. डॉ जनार्दन वाघमारे:'साहित्याचे तत्त्वज्ञान'(लेख), 'अश्मक', स्मरणिका ९५ वे अ. भा. मराठीसाहित्य संमेलन, उदगीर २०२२ पृ. २४२
२. सुरेश द्वादशीवार:'वैश्विकता आणि आत्मग्रस्तता'(लेख),'लोकराज्य', ऑक्टोबर२०२१ पृ.४९
३. बाळासाहेब विखे-पाटील:'काळाबरोबर बदलण्याची तयारी हवी..'(लेख), मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा, राम जगताप/ सुशील धसकटे(संपा), राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पाचवी ऑक्टोबर २०१६पृ.२१५

वैश्विक परिदृष्यातून भारतीय मूल्य शिक्षणाचा अभ्यास

प्रा. विजयकुमार पाईकराव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

जगामध्ये गेल्या ५०० वर्षात नवीन धर्मसंस्थापक झालेला दिसून येत नाही याचे कारण धर्म म्हणजे काय आणि मूल्यशिक्षण म्हणजे काय ? तसेच नैतिकता म्हणजे काय याच्या संकल्पना निरनिराळ्या धर्म संस्थापकांनी आपापल्या संदेशामधून दिलेल्या आहेत. मुस्लिम धर्माचा धर्मसंस्थापक पैगंबर मानला जातो. ख्रिश्चन धर्माचा धर्म संस्थापक येशू ख्रिस्त मानला जातो. बौद्ध धर्माचा संस्थापक तथागतबुद्ध तर जैन धर्माचा दिगंबर-श्वेताबंर आदी तत्ववेत्ते समजले जातात. हिंदू धर्मामध्ये धार्मिक भावना व धर्मविचार प्रथम कोणी मांडले हे सांगता येत नाही. पुराणातील कथानके आणि धर्मतत्त्वे यांना आधार म्हणून चार प्रकारचे वेद सांगितले जातात. वेद हे हिंदू धर्माचे तत्वज्ञान सांगणारे ग्रंथ समजले जातात. परंतु वेद कुणी तयार केले याची सत्य माहिती आजही उपलब्ध होत नाही. त्यानंतर महाभारत, गीता, रामायण यासारखे धार्मिक व नैतिक मूल्य सांगणारे धर्मग्रंथ कुणी आणि कधी लिहीले याबाबत देखिल विद्वानांमध्ये मतभेद दिसून येतात. तथापि मूल्य म्हणजे या धर्मग्रंथातून सांगितलेल्या जीवनपद्धती असे समजण्यात येते. गीतेचा अभ्यास करताना भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश म्हणजे धार्मिक मूल्य समजण्यात येतात. अर्जुनासारख्या शिष्याने द्रोणाचार्यसारख्या गुरुवर हत्यार चालवले किंवा भिष्मासारख्या नातेवाईकावर हल्ला करणे किंवा आप्तेष्टांवर प्राणघातक हल्ला करून युद्ध जिंकले याला नितीमूल्ये समजण्यात आलेले आहे. तसेच सीतेला रावणाने पळवून घेऊन जाणं याला अनिती व मूल्याचा ऱ्हास होण असं संबोधण्यात येते. त्याचवेळी पभू रामचंद्रांनी राज्य सिंहासनाचे पालन करण्यासाठी स्वतःच्या पत्नीवर अन्याय करून तिला सोडून देणं हे अनैतिक कृत्य देखिल धर्माच्या नावाखाली मूल्यात बसवल जात.

गौतम बुद्ध स्वत:चे राज्य सोडून बायको मुलांचा त्याग करून सांसारिक जबाबदारी झटकून वनवासात निघून जातात ह्याला कोणी नावे ठेवत नाही. परंतु त्याचवेळी ज्ञानेश्वराच्या वडिलांनी संन्यास घेवून परत संसारात आले म्हणून त्यांना वाळीत टाकले जाते. यावरून धर्म व धार्मिक मूल्य यांच्यामध्ये एकसूत्रीपणा दिसून येत नाही, त्याचाच अर्थ माझ्यामते मूल्याची संकल्पना आणि धर्माची संकल्पना जगामध्ये निरनिराळ्या कालावधीमध्ये निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळी दिसून येते.

जगातल्या प्रत्येक देशात धर्माची संकल्पना हळूहळू विकसित होत गेल्यानंतर समाजाच्या चालीरिती धर्माला घरून करण्याची प्रथा रूढ झालेली दिसते. त्या अनुषंगाने धार्मिक सण साजरे केले जातात. प्रत्येक धर्मात देव देवतांच्या जयंत्या साजऱ्या करणे आणि त्या अनुषंगाने उत्वसाजरे करणे, याला धार्मिक नितीमत्ता / नैतिकता समजण्यात येते. उदा. गणेशोत्सव, हनुमान जयंती, रामनवमी, वेद नाताळ, मोहरम याशिवाय छोट्यामोठ्या देवतांच्या यात्रा भरविणे. उदा. यल्लमादेवी यात्रा, जोतिबाची यात्रा इत्यादी यात्रांत भाग घेण किंवा ती साजरी करण हा नैतिकतेचा भाग समजला जातो. माझ्या मते ह्या ठिकाणी मूल्य आणि मूल्यशिक्षण यात आपण गफलत करत आहोत, काय असा प्रश्न पडतो. शाळा, महाविद्यालयामधून सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात त्यामध्ये धार्मिक गीते, प्रवचने, जे कीर्तने यांना आपण मूल्य शिक्षण म्हणतो सिनेमातील गाणे म्हणणे किंवा तमाशातील नृत्य याला आपण मूल्यशिक्षण मानतनाही, तरी देखील समाजामध्ये या गोष्टींना अधिक महत्व कसे काय दिले जाते याचा विचार शिक्षणात व्हायला हवा. अभ्यासक्रमामध्ये मूल्यशिक्षणाची जोड असावी म्हणून काही कविता, संतांची चरित्रे, कथा, महापूरुषांचे विचार ह्याचा अभ्यास केला जातो त्यामधून मूल्याची जोपासना व्हावी अशी अपेक्षा ठेवली जाते. समाजामध्ये देखील राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या आणि संतांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या जातात त्यासाठी व्याख्याने, स्पर्धा घेऊन मूल्यशिक्षणाची वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु शेवटी धार्मिक शिक्षण हे मूल्यशिक्षण ह्याच मुद्यावर आपण सर्वजण येवून थांबतो.

अगदी इ.स.पू. पासून धर्मसत्ता व राजसत्ता असा संघर्ष चालू आहे. अगदी अलिकडील काळात अगदी बुद्धीच्या पुनरुज्जीवनाच्या काळामध्ये देखील युरोपात हा संघर्ष चालूच होता. आपल्याकडे मात्र ज्या सत्ताधीशांनी लोकांच्या धर्माला हात घातला त्यांना लवकर पायउतार व्हावे लागले. तर ज्या सत्ताधीशांनी जनतेला धर्म स्वातंत्र्य दिले त्यांच्या धार्मिक श्रद्धांना धक्का पोहोचू दिला नाही अशा सत्ताधीशांनी सुखाने राज्य केले. याचा परिणाम म्हणून इंग्रजांनी भारतीयांना कोणते शिक्षण घ्यावे या बाबत सतत धर सोडीचे धोरण चालू ठेवले. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण अगदी काळजीपूर्वक राज्यघटना तयार केली. या राज्य घटनेमध्ये आपण धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारले. घटनेच्या Right to Freedom of Religion (२८) यामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, (१) पूर्णत: राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या अशा कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. ही गोष्ट धर्मनिरपेक्षतेशी संबंधित आहे ही बाब अधोरेखित व्हावी म्हणून ४२ वे संविधान संशोधन करून धर्मनिरपेक्ष या शब्दाचा स्पष्टपणे समावेश करण्यात आला. धार्मिक शिक्षण देणे ही अशी घटना स्विकारलेल्या राष्ट्रामध्ये गैर आहे. कारण मनुष्याला जगण्यासाठी कोणत्या तरी धर्माची आवश्यकता असते असे गृहित धरलेले आहे. परंतु हे गहीतकच तपासून पहायला हवे. सध्या सर्व जगभर विविध धर्माचे लोक राहतात. तसेच ज्यांना धर्म नावाची संकल्पनाही माहीत नाही असे आदिम जमातीचे लोकही राहतात. काही ठिकाणी तर या आदिम संस्कृती या तथाकथित धर्म संस्कृतीपेक्षा काकणभरही कमी नाहीत. सध्या तर संपूर्ण जगभर या धार्मिक जाणाऱ्या लोकांनी संपूर्ण जगभर धुमाकूळ घातला आहे. स्वत:ला धार्मिक म्हणवून घेणारी व्यक्ती दैनंदिन जीवनात किमान सभ्यता पाळतेच असे दिसत नाही असे असताना पुन्हा पुन्हा धार्मिक शिक्षण द्यावे की न द्यावे असा प्रश्न तज्ज्ञ मंडळी का उपस्थित करतात हे समजत नाही.

भारतासारख्या राष्ट्रात धार्मिक शिक्षण घ्यावयाचे ते कोणत्या धर्माचे ? अगदी बहुसंख्य असलेल्या भारतीयांच्या वैदिक धर्मामध्ये कितीतरी विविधता आहे. भारतातील हिंदू ज्या धर्माचे आचरण करतात त्यामध्ये देखील टोकाची भिन्नता आढळते. याच धर्मापासून फुटून निघालेले बौद्ध, जैन, शैव यांच्या आचार पद्धतीतदेखील साम्य आढळत नाही. धार्मिक शिक्षणाचा पक्ष घेणारे विचारवंत नेहमी सर्व धर्माचे एकच सूत्र असते त्यामुळे सर्व धर्मातील सामाईक तत्वे शिकवायला काय हरकत आहे ? असा विचार मांडतात. परंतु हा विचार एक तर भाबडेपणाचा तरी आहे किंवा ही मंडळी जाणिवपूर्वक सामान्यजनांचा बुद्धीभेद करत असावीत. यावर या मंडळीची अशी मखलाशी असते की तात्विक धर्म वेगळा व आचारधर्म वेगळा. आचारधर्मापेक्षा त्या धर्माचे तत्वज्ञान पहावे हाही एक बुद्धिभेदाचाच प्रकार आहे. कारण सामान्य जनतेला धार्मिक तत्वज्ञानाशी काही देणे घेणे नसते त्यांचा संबंध त्यांच्या धर्ममार्तडांनी सांगितलेल्या आचार धर्माशीच असतो. दोन भिन्न धर्मांच्या आचार पद्धतीही भिन्न असतात. किंबहुना धर्माचे समाजामधील हेच दृष्य रूप असते. या आचारपद्धतीला किंवा कर्मकांडाला सामान्य जनाने चिकटून रहावे अशीच कोणाही धर्ममार्तंडाची इच्छा असते. आपल्या शाळेत विविध धर्माची, पंथाची मुले येतात त्यांना तुम्ही कोणता आचारधर्म शिकविणार ? कोणाच्या आचारपद्धती योग्य ? आणि हे कोण ठरविणार ? अलिकडच्या काळात तर प्रत्येकजण आत्मशोध घेण्याच्या पाठीमागे लागलेला आहे. ज्या देशात किंवा प्रांतात धर्म बदल / स्वीकार ही सहज बाब असते तेथे एकवेळ असे शिक्षण देणे क्षम्य ठरेल. परंतु केवळ जी बाब मला माझ्या अनुवंशाने मिळालेली आहे. तो धर्म स्विकारण्याचा मला चॉईस (Choice) नव्हता त्या धर्माचे ओझे नाईलाजाने आयुष्यभर वागवावे लागते. या व्यवस्थेविरूद्ध लढा देणारा एखादाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मतो. धर्मतत्वाच्या विरोधात थोडीशीही नाराजी व्यक्त केली तर त्याचे काय परिणाम भोगावे लागतात हे आगरकर, म. फुले यांच्यावर आलेल्या प्रसंगातून ध्यानी येते. अशा धर्माचे शिक्षण द्यावयाचे कशाला ? धर्मनिरपेक्षता हे घटनेतील तत्व असेल तर किमान शासनाच्या (की जे शासन धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारलेल्या लोकांनी निवडून दिलेले आहे.) पैशाने व शासनाच्या परवानगीने तरी हे धार्मिक शिक्षण दिले जाऊ नये.

काही मंडळी असा कांगावा करतात की, व्यक्तिच्या नैतिकतेचा विकास व्हावयाचा असेल तर त्याला धार्मिक अधिष्ठान हवे. हा. केवळ भ्रम आहे. असेच जर असते तर पाकिस्तानसारख्या राष्ट्रातील नागरिक (ज्यांची घटना धर्माधिष्ठित आहे.) तर राष्ट्रातील नागरिकांच्या तुलनेने तरी खूपच नीतीमान असावयास हवे होते. प्रत्यक्षात तसे

चित्र दिसत तरी नाही. मग असा प्रश्न निर्माण होतो की धर्म पाळावयाचाच नाही का ? धार्मिक शिक्षण द्यावयाचेच नाही का ? याचे उत्तर होय असे आहे. मात्र हे शिक्षण कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा शासकीय मदतीवर चाललेल्या संस्थेतून देता कामा नये तर पालकांना जर आवश्यकता वाटत असेल तर अशा पालकांनी आपल्या पाल्यास आपल्या घरी आपणास हवे असलेल्या धर्माचे शिक्षण द्यावयास हरकत नाही. मूल्य शिक्षणाचा विचार करताना धर्मासंबंधीच्या शिक्षणाचा विचार करण्याची आवश्यकता नाही. मूल्य शिक्षण हे स्वतंत्रपणे देता येते या शिक्षणाने इप्सितही साध्य होण्याची शक्यता आहे. सध्या शाळेमध्ये दिले जाणारे मूल्य शिक्षण हे बरेचसे धार्मिक शिक्षणाच्या वळणाने चाललेले आहे असे दिसते. मूल्य शिक्षणाच्या नावाखाली हरितालिकाची पूजा करणे किंवा विविध महाराजांच्या चमत्कृतींचे कौतुक करणे अशा सारखे उपक्रम केले जात आहेत. हे होण्याचे कारण देखील शिक्षकांच्या मानसिकतेत दडलेले आहे. शिक्षकानाही असेच वाटत असावे की, धर्माबद्दलच्या शिक्षणाशिवाय मूल्य शिक्षण देता येणार नाही.. याचाच परिणाम म्हणून शाळाशाळांमधून गणपती व दत्ताच्या तसबिरी अडकविलेल्या दिसतात व त्या देवांच्या वारानुसार पूजा, आरत्यांसारखे उपक्रम म्हणजेच मूल्य शिक्षणासाठीचे उपकरण अशी धारणा होत चाललीआहे. कोणत्याही धर्माच्या पलिकडे जावून मानवता हीच सर्वात महत्वाची गोष्ट आहे आणि ही जोपासण्यासाठी कोणत्याही धर्मशिक्षणाची किंवा धर्माबद्दलच्या शिक्षणाची गरज नाही.

मूल्य म्हणजे मनोधारणा की व्यक्तिला विशिष्ट प्रकारचे वर्तन करायला प्रवृत्त करते. वर्तनाला दिशा देते, वर्तनाचे नियमन व नियंत्रण करते. ही मनोधारणा होण्याची प्रक्रिया आपल्या सभोवताल्या परिसरातून होणाऱ्या संस्काराशी निगडीत असते. कोणताही एखादा संस्कार करायचा असेल, कोणतीही वृत्ती विकसित करावयाची असेल तर मानसशास्त्रामध्ये त्यासाठी काही पद्धती सांगितलेल्या आहेत आणि पद्धतीच्या व उपक्रमाच्या आधारे आपण ज्याप्रमाणे वृत्ती विकसित करू शकतो किंवा विशिष्ट संस्कार करू शकतो अगदी त्याच पद्धतीने आपण मूल्येही विकसित करू शकतो. मूल्याची व्याख्या Rokeachने पुढीलप्रमाणे केलेली आहे. "Value is defined as enduring belief, a specific mode of conduct or end state of existence along with continuum of importance" यापेक्षा थोडीशी वेगळी व्याख्या Kluchhonने केलेली आहे त्याच्या मते Value is a conception of desirable and not something desired. मूल्याची व्याख्या Shaver ने पुढीलप्रमाणे दिलेली आहे. Values are standard and principles for judging worth. या व्याख्यांच्या आधारे Gawandeमूल्यांची + पुढीलप्रमाणे करतात. "If is such adjusted human व्याख्या behavior which is conductive to the development if himself, society, nation and International understanding.

आपण शैक्षणिक धोरणात केंद्रीय पातळीवर तेवीस मूल्याचा समावशे केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने यापैकी दहा मूल्यांचा समावेश अभ्यासक्रम तयार करताना केलेला आहे. हे करीत असताना कोठेही धर्मासंबंधीच्या शिक्षणाची गरज पडत नाही किंबहुना त्यामुळेच कदाचित आपण मानवी विकास व मानवतेचा विकास डोळयासमोर ठेवून अभ्यासक्रम तयार करू शकलो आहोत. धर्म शिक्षणामुळे मूल्य शिक्षणाला एक उंची प्राप्त होईल असे काही मंडळींना वाटत असावे परंतु मी मात्र याबाबत बिलकूल सहमत नाही. किंबहुना धर्मशिक्षणासह मूल्यशिक्षण देणे म्हणजे मूल्यशिक्षणाच्या नावाखाली धर्मशिक्षण होईल आणि भारतासारख्या राष्ट्राला तरी हे अपेक्षित नाही. आपल्या शाळेत आलेला विद्यार्थी कोणत्या जातीचा, धर्माचा आहे असा विचार न करता तो धर्मनिरपेक्ष भारतीय राज्यघटना मान्य केलेल्या नागरिकाचा मुलगा आहे व या मुलाला याच घटनेशी प्रामाणिक राहण्यासाठी तयार करावयाचे आहे. जर त्याला स्वत:ला एखाद्या धर्माच्या अभ्यासाबद्दल अभिरूची असेल तर त्याने संबंधित धर्मसंस्थेकडे जाऊन शिक्षण घ्यावे.

सदर विचार कटु वाटण्याची शक्यता आहे. कोणाच्या भावना दुखावाव्यात म्हणून नव्हे तर एका विशिष्ट विचारांशी प्रामाणिक राहण्याच्या भावनेने निबंध लिहिलेला आहे.

शिक्षणाचा मूलाधार मूल्यशिक्षण आहे. शिक्षणप्रक्रियेतून जो सुसंस्कृत व्यक्तीमत्वाचा नागरिक तयार होतो त्याने मानवी मूल्यांची जोपासना केलीच पाहिजे असा प्राचीन काळापासून शिक्षणक्षेत्रात संकेत रूढ होता. परंतु

प्रत्यक्षात औद्योगिक क्रांतीनंतर समाजाचे निरीक्षण केले तर नवीन पिढीचा नैतिक स्तर प्रचंड प्रमाणात घसरलेला दिसून येतो त्यामुळे अनंत अशा सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. परिणामतः सर्व शिक्षणतज्ञांनी एकमुखाने सर्व पातळयांवरील शिक्षणात मूल्याशिक्षणाचा आग्रह धरला आहे. मूल्यशिक्षण इतर विषयांप्रमाणे शिकवायचे नसून विद्यार्थ्यांच्या आचरणात, व्यवहारात व वर्तनात रुजवायचे आहे. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

१) आध्यात्मिक मूल्ये, २) नैतिक मूल्ये, ३) सामाजिक मूल्ये, ४) राजकीय मूल्ये, ५) सांस्कृतिक मूल्ये किंवा १) व्यक्तिगत मूल्ये, २) सामाजिक मूल्ये, ३) राष्ट्रीय मूल्ये

मूल्यशिक्षण अभ्यासक्रमातील (दक्षता)

१) अध्ययनार्थींच्या संवेदनशील मनावर होणाऱ्या सुसंस्काराद्वारे मूल्यशिक्षण घडावे.

२) आशयामध्ये मूल्ये अंतर्भूतच असावीत.

३) मूल्यशिक्षणासाठी पाठ्यपुस्तक असू नये.

४) योग्य मूल्यामापन पद्धतीने मार्गदर्शन व्हावे.

शेवटी २१ व्या शतकातील शिक्षणावर नेमलेल्या आंतराष्ट्रीय आयोगाच्या अहवालाच दाखला घेऊ. त्याचे नाव Learning - the Treasure within असे आहे. जेम्स डेलर हे या आयोगाचे अध्यक्ष होते. त्यातील ठळक मुद्दे-

१) शिक्षणाचे चार दृष्टीकोन

क) Learning to knowव्यापक सामान्यज्ञान व त्याबरोबर एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास याचा संयोग व्हावा.

ख) Learning to do कृतीकौशल्ये आत्मसात व्हावीत.

ग) Learning to live together परस्पर व सामंजस्य व दुसऱ्याच्या स्वातंत्र्यास मन देऊन, एकत्र राहण्यास शिकले पाहिजे.

घ) Learning to be स्व-विकास व स्वयंत्तता यासाठी व्यक्तीच्या सर्व क्षमतांचा उपयोग केल पाहिजे.

२) मूलभूत शिक्षण ३२ शी निगडीत असावे Reading, Writing, Arithmatic

३) दूरशिक्षणात सुधारणा हवी.

४) आंतराराष्ट्रीय सहकार्याने, आंतरराष्ट्रीय प्रकल्प, भागीदारीतून हाती घ्यावे.

५) स्त्रीशिक्षणास प्राधान्य दिले पाहिजे.

६) 'आजीवन - अध्ययन' या संकल्पनेस महत्व

७) शिक्षणातील उणिवांचा शोध घेणाऱ्या दर्शकाला ठरविले पाहिजे (Indicators).

एकविसाव्या शतकातील शिक्षणाचा विचार करता या शतकाची आव्हाने पेलणारा मूल्यशिक्षण अभ्यासक्रम हवा यात वादच नाही.

तरूण पिढीला समाजाचे कार्यक्षम व उत्पादक घटक बनवून समाज जीवनात सहभागी करून घेण्याचे साधन या दृष्टीकोनातून अभ्यासकर्माचा विचार व्हावा. हाच खरा वैश्विक भारतीय परिदृश्य होय. समता मूलक समाज आणि सामाजिक न्याय हा गाभा असावा.

संदर्भसूची:

१) शिवणेकर ल.भा, माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती, नूतन प्रकाशन, पुणे.

२) पारसनीस न.स शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पुणे.

३) पाईकराव विजयकुमार संपा., संविधान दिन व बालदिन विशेष अंक संवाद पत्रिका, नोव्हेंबर २०२२, यचममूवि प्रकाशन, नाशिक.

४) परोळेकर सुरेश, स्वच्छंदी, करवीर काशी फौंडेशन, कोल्हापूर.

साहित्य समीक्षा : दिशा आणि दृष्टी

प्रोफेसर डॉ. युवराज मानकर

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि.यवतमाळ-४४५१०१

प्रस्तावना :

साहित्य आणि समीक्षा हे दोन्ही क्षेत्र जीवनाशी निगडित असल्याने ते जगभर लोकप्रिय झाले आहे.दरवर्षी साहित्याच्या विविध दालनात मोठ्या प्रमाणात साहित्य लिहिल्या जाते आणि प्रकाशित केले जाते.या प्रकाशित झालेल्या साहित्यावर समीक्षक मोठ्या प्रमाणात समीक्षाही लिहितात आणि पुस्तक रूपाने प्रकाशितही करतात. अलिकडच्या काळात समीक्षेची पुस्तके मोठ्या प्रमाणात प्रकाशित होऊ लागली आहे.इंग्रजी,हिंदी, मराठी आणि इतरही भाषेतील साहित्य आणि समीक्षेचे क्षेत्र हे व्यापक होत आहे .साहित्याचे जसे विविध प्रकार केले जातात तसेच समीक्षेचेही विविध प्रकार केले जातात. साहित्यिकाकडून लिहिलेले साहित्य उत्तमरित्या जमले की नाही हे सांगण्याचे काम समीक्षक समीक्षेद्वारे करतो आणि केलेली समीक्षा उत्तमरित्या जमली की नाही हे सांगण्याचे काम समीक्षेचे शास्त्र करत असते .शास्त्रात एखाद्या विषयाचा व्यवस्थित,तर्कशुद्ध व सखोल अभ्यास केलेला असतो. तो तर्काच्या,बुद्धीच्या पातळीवर प्रमाण ठरत असतो. समीक्षा ही अशा प्रमाणशास्त्रावरच आधारित असते .या प्रमाणमूल्यांच्या पातळीवर साहित्याची तपासणी करून त्याची उत्तमता आणि त्यातील निकृष्टता सांगण्यात येत असते. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे, चांगल्याला चांगले आणि वाईटाला वाईट, सत्याला सत्य आणि असत्याला असत्य म्हणण्याचे धाडसी कार्य समीक्षेला करावे लागते. एका अर्थाने समीक्षा ही साहित्यासंबंधी न्यायदानाचे, निर्णयाचे काम करते असे म्हणायला हरकत नाही. समीक्षा ही साहित्याची वजाबाकी,त्याचा हिशोब आणि त्याचे उरलेले बॅलेन्स सांगण्याचा प्रयत्न करते. कोणत्याही साहित्याला समीक्षेचा हा न्यायदानाचा स्वभाव आवडतोच असे नाही.त्याचे कारण समीक्षेने साहित्याच्या विरोधी न्याय दिल्यास तो साहित्याला रुचेलच असे नाही. याउलट समीक्षेने साहित्याची मखलाशी केली तर साहित्य समीक्षेला आपल्या डोक्यावर घेते. अशा मखलशी करणाऱ्या समीक्षेला चांगले न्यायदान केले आहे म्हणून शाबासकीची थापही मिळते.आजकाल आत्मस्तुतीचे वेड प्रत्येकाला लागले आहे. यातून साहित्यही सुटले नाही. कोणालाही चांगले नसतांना देखिल मीच किती चांगला आहे अशी बढाया मारण्याची आणि मिरविण्याची प्रवृत्ती बळावत आहे. एखाद्या माणसातील एखाद्या त्रयस्थानी वैगुण्य दाखविले तर ते त्याला आवडत नाही. उलट त्याला चांगले नसताना देखिल चांगले म्हणून घेणे हे फार आवडते. तसेच कोणत्याही साहित्यिकाला आपले साहित्य हे चांगले नसतांना देखिल चांगले आहे असे इतरांनी म्हटले पाहिजे अशी भावना वाढीला लागली आहे .माणूस आणि त्याचे साहित्य हे आत्मस्तुतीच्या चौकटीत अडकले आहे .हा त्याचा स्वभावच झाला आहे .तसेच वाचकांना साहित्याच्या मूल्यांचे भान असो नसो पण एखाद्या विशिष्ट साहित्यिकाची कविता, कथा, कादंबरी, नाटक हे चांगले आहे म्हणून ते वाचणाऱ्याची संख्या देखिल वाढली आहे.साहित्य क्षेत्रात वाचकलक्षी असेही एक फॅड बनले आहे. समीक्षा ही न्यायदानाचे अचूक मूल्यमापनाचे कार्य करते असे समजले जाते .समीक्षेने आपली ही न्यायदानाची चौकट सोडून आत्मस्तुती स्वभावाच्या चौकटीत अडकलेल्या साहित्याच्या चौकटीला अभिप्रेत असलेला न्याय देऊ नये अन्यथा समीक्षेला आपले समीक्षा म्हणून असलेले स्वतंत्र अस्तित्त्व टिकवून ठेवता येणार नाही. समीक्षेने साहित्याच्या आवडी- निवडी ओळखून तसा न्याय देऊ नये .तसेच तिने अहंकारही अंगी बाळगून उत्तम साहित्याकडे दुर्लक्षही करू नये.समीक्षा ही तर्ककठोर बुद्धीवादी वृत्तीची असते असे म्हटले जाते.ती कोणत्याही काळ टप्यातील अमिषाला बळी पडत नाही आणि आपले सत्त्व गहाण ठेवून साहित्याचे मूल्यमापन करत नाही. ती शास्त्राधारावर उभी झालेली असते .अशा समीक्षेची आज गरज आहे.जो पर्यत

खोट्या,असत्य,वाईट आवडी- निवडी अस्तित्त्वात आहे. तो पर्यत समीक्षेला मरण नाही आणि तिची गरज संपणार नाही .

अलिकडच्या काळात नव्या शैक्षणिक धोरणाच्या परिणामातून मराठी भाषा व साहित्याचा अभ्यासक्रम बदलत आहे. या बदलाच्या परिणामातून साहित्य आणि समीक्षा या विषयाच्या अनुषंगाने विविध चर्चा, परिसंवाद, परिषदांचे आयोजन होत असलेले दिसते. साहित्य समीक्षा हा विषय जरा अडचणीचा, अडगळीतला म्हणून या विषयाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते. असा समज साहित्य समीक्षेसंबंधी केला जातो. याउलट पाश्चात्य लोक साहित्य समीक्षेकडे फार आस्थेने आणि गंभीरपणे बघतांना दिसतात. ते त्यांच्या जीवनक्षेत्रातील ही एक अनन्यसाधारण बाब मानतात. समीक्षेला आणि समीक्षकाला पाश्चात्य लोक विशेष महत्त्व देतात. तसे भारतीय जीवनाच्या परिघात पाश्चांत्याच्या तुलनेत समीक्षेला पाहिजे तसे महत्त्व दिले जात नाही. समीक्षकालाही पाहिजे तसा दर्जा आणि सन्मान दिला जात नाही. भारतीय भूमी नेहमीच समीक्षेला आणि समीक्षकाला दुय्यम आणि गौण समजत आली आहे. साहित्याला आणि साहित्यिकाला विशेष असे महत्त्व देत आली आहे. आई आणि दाई असा भेदभाव बालकाच्या संगोपनाच्या पातळीवर एकवेळ मान्य केला तरी साहित्य नावाच्या बालकाचे संगोपन समीक्षेच्या प्रांगणात केले जाते. या प्रांगणातच साहित्य खेळते, बागडते आणि विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करते. एकदा हे साहित्य मोठे झाले, लोकप्रिय झाले की ते समीक्षा या प्रांगाणाचे विस्मरण करते. कदाचित साहित्याला समीक्षा ही परोपजीवी आहे. ज्यांना कविता लिहिता येत नाही ते समीक्षा करतात. अपयशी ठरलेला कवी म्हणजे समीक्षक असा दृष्टिकोन साहित्य वर्तूळात वाढीला लागला आहे .साहित्य हे प्रधान मानून या साहित्यावर वाढलेले बांडगुळ म्हणजे समीक्षा, समीक्षा म्हणजे दुसऱ्याच्या घरचे भांडे घासणे आहे असे कवीला आणि अन्य साहित्यिकांना वाटते. त्याचा परिणाम साहजिकच समीक्षेला उपरे समजण्यात होत आहे. साहित्याच्या परिघात समीक्षेला फारसे महत्त्व उरलेले दिसत नाही. साहित्य समीक्षक साहित्याला न्याय देण्यात कुठे तरी कमी पडतो आहे. समीक्षेची दिशा आणि दृष्टी मर्यादीत झालेली आहे. हा समीक्षा व्यवहारा बाबत जसा दृष्टीकोन निर्माण झाला आहे तसा साहित्या संबंधीहीदृष्टीकोन निर्माण होत आहे.खरेच साहित्य हे समीक्षेपेक्षा श्रेष्ठ मानले जाते. या श्रेष्ठत्वाच्या अंहकाराने साहित्याने समीक्षेला उपरेपणाची वागणूक देणे योग्य नाही. साहित्याची निर्मिती कोणासाठी आणि कशासाठी केली जाते. तर साहित्य हे देशासाठी आणि देशातील लोकांसाठी लिहिले जाते. या साहित्याचा उपयोग देशाला आणि देशातील लोकांच्या उन्नत जीवनासाठी होतो. पण आजचे साहित्य हे विशिष्ट समाजगटांसाठी, जातीसाठी लिहिले जात असलेले दिसत आहे. साहित्याने व्यापक राष्ट्रहित आणि समाजहिताचे ध्येय समोर ठेऊन साहित्य लिहिणे आणि उपयोगी पडणे अशी अपेक्षा करणे यात काय चुकीचे आहे. ते जर उपयोगी ठरत नसेल तर साहित्याची पुनर्रचना समीक्षेने करणे आवश्यक आहे. साहित्याने आणि समीक्षेनेही आपली व्याप्ती,मर्यादा उपयोगिता नव्याने तपासणे गरजेचे आहे. साहित्याचे साहित्यपण आणि त्यातील चांगले आणि वाईटपण समजावून सांगण्याची जबाबदारी शहाण्यासुरत्या समीक्षकावर आणि त्याच्या समीक्षेवर असते. ही जबाबदारी समीक्षेने समर्थपणे पेलणे आज काळाची गरज आहे. परंतु सत्ता आणि साहित्य, साहित्य आणि समीक्षा यांच्यातील स्नेह हा साहित्याला आणि समीक्षेलाही मधूमेहाची बाधा करीत आहे. सत्तेला साहित्याचे भय उरले नाही. सत्तेने साहित्याला आपल्या भोवती मेंढीच्या बैलाप्रमाणे फिरवणे सुरु केले आहे आणि साहित्याने देखिल स्वतःला मधमाशा समजून सतेच्या पोळाशी घट्ट नाते प्रस्थापित केले आहे. साहित्य समीक्षेकडून मधूमेहाची अपेक्षा करत आहे. आज सारे जग मधुमेहाने पीडित झाले आहे तसे साहित्याने आणि समीक्षेने देखील पीडित होता कामा नये. अन्यथा अशा पीडितपणाने देशाचे आणि देशातील लोकांचे सर्वहित साधले जाणार नाही. साहित्य हे जोडण्याचे काम करत असेल तर त्याने समीक्षेकडे हीन ,तुच्छ, निम्न दर्जाचा दृष्टिकोन ठेवून स्वतःपासून तोडणे बरोबर नाही. साहित्य आणि समीक्षेच्या आंतरसंबंधाचे, त्यांच्या ध्येयदिशेचे, हरवत चाललेल्या दृष्टीचे पुनरावलोकन करून पुनर्रचना करणे साहित्य आणि समीक्षेला जडलेल्या आजाराचे मूळ तपासणे भारतीय साहित्यासाठी आणि भारतीय समीक्षेसाठी आवश्यक आहे .

समस्या :

नव्या शैक्षणिक धोरणाचा साहित्यसमीक्षेवर काही परिणाम पडला आहे काय ? साहित्य समीक्षा हा खरेच दुर्लक्ष आणि गौण समजण्याची बाब आहे का? समीक्षा म्हणजे काय? समीक्षेचे कार्य कोणते आहे? समीक्षा ही परोपजीवी आहे का ? समीक्षेची हेटाळणी का केली जाते? समीक्षकाला साहित्यिकांसारखा मानसन्मान का दिला जात नाही? साहित्य क्षेत्र हे समीक्षा क्षेत्राकडे आपला विरोधक म्हणून का पाहते ? समीक्षकाचे खरेच काही चुकते का? चुकत असेल तर समीक्षकांनी स्वशोध का घेऊ नये?आत्मचिंतन का करू नये? झालेल्या चुका दुरूस्त का करू नये? आणि स्वतःला निर्दोष करून साहित्य जगाला आपल्या चांगलेपणाचा परिचय का करून देऊ नये? असे नाना प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात.

शोध निबंधाचा उद्देश.:

साहित्यसमीक्षा म्हणजे काय, साहित्य आणि समीक्षा यांचे नातेसंबंध, त्याचे स्वरूप, समीक्षेचे कार्य, साहित्य आणि समीक्षेची पुनर्रचना, त्याची दिशा आणि दृष्टी समजून घेणे हा उद्देश साध्य करण्यासाठी हा लेखन प्रपंच केला आहे.

शोधनिबंधाची कार्यपद्धती :-

साहित्यसमीक्षा :दिशा आणि दृष्टी याविषयासंबंधी उभ्या ठाकलेल्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्याचा उद्देश साध्य करण्यासाठी साहित्य म्हणजे काय, समीक्षा म्हणजे काय, साहित्यसमीक्षेचे नातेसंबंध, त्याचे स्वरूप, त्याचे कार्य आणि साहित्य समीक्षेच्या दिशा आणि दृष्टी इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने चिंतन करतांना ते वस्तुनिष्ठ, विश्लेषणात्मक आणि तर्कशुद्ध पद्धतीचा वापर करूनच केले आहे.

शोधविषयाचे विश्लेषण :

आजवर मराठी साहित्य क्षेत्र साहित्य आणि समीक्षा संकल्पनेच्या चिंतनाच्या परिघातून पूर्णपणे बाहेर पडले नाही .साहित्य आणि समीक्षा संकल्पनेच्या पूर्णत्त्वासाठी सतत चिंतन सुरू असलेले दिसते. काळाच्या गती बरोबर जगही झपाट्याने बदलत आहे. हा बदल हे जग नित्य नाही ते अनित्य आहे हेच सांगत आहे. या बदलणाऱ्या जगात कोणतीच गोष्ट स्थिर नाही ती सतत बदलणारी आहे. साहित्य आणि समीक्षा हे स्थीर नाही ते सतत बदलणारे असल्याने स्वाभाविकच काळाच्या बदलाबरोबर साहित्य आणि समीक्षा ही बदलले की नाही. साहित्य आणि समीक्षा संकल्पनेच्या स्थितीगतीचा नव्याने पुनर्शोध घेणे हे या संकल्पनेच्या स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे असते.

साहित्य आणि समीक्षा शब्दाची चर्चा :-

साहित्य आणि समीक्षा या संकल्पना प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय साहित्याचे जन्मध्येय समजणार नाही. समीक्षेचे जन्मध्येयसमजून घेण्यासाठी समीक्षेचा विचार करावा लागतो. या दोन्ही क्षेत्राकडून समाज जीवनाला काही अपेक्षा आहे. साहित्याची आणि समीक्षेची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या कोणत्या आहेत ते समजून घेणे आवश्यक आहे. याशिवाय साहित्य आणि समीक्षेच्या पुनर्रचनेची कारण मीमांसा करता येत नाही. यासाठी साहित्य, समीक्षा यांचा विचार करावा लागतो. साहित्य आणि समीक्षा या संकल्पना पाश्चात्यांची देण आहे. यासंबंधी जसा त्यांनी विचार केला तसा भारतीयांनीही विचार केला आहे. साहित्यासाठी भारतीय साहित्यशास्त्र जन्माला घातले आणि समीक्षेसाठी पाश्चात्याच्या तसेच भारतीयांच्या चिंतनातून नवे समीक्षाशास्त्र जन्माला घातले आहे. साहित्यसमीक्षा ही संकल्पना समजून घेताना या संकल्पनेत समीक्षेपूर्वी साहित्य हा शब्द वापरला गेला आहे. तेव्हा साहित्य हा शब्द भारतीय भाषेत कधी वापरला गेला आहे तर हा शब्द पाली, प्राकृत, मागधी या भाषेत साहित्य या अर्थाने गाथा, पद म्हणून वापरला गेलेला आहे. पण साहित्य हा शब्द इ.स. सहाव्या शतकापूर्वी वापरल्या गेलेला नाही. भामहाने 'शब्दार्थो सहितौ काव्यं गद्यं पद्यंच तद् द्विधा'१ भामहाने या व्याख्येत सहितौ हा शब्द वापरला आहे. यात त्याने शब्दासह अर्थ म्हणजे काव्य, गद्य होय असे म्हटले आहे. तर पाणिनीने 'सहितस्य भाव '२ असे म्हटले आहे. यात सहितस्य म्हणजे हितासह भाव, हितकारक भाव असे म्हटले आहे. याचा अर्थ साहित्य

या शब्दात सहित या घटकाला विशेष महत्त्व दिले आहे. सहित म्हणजे काय? सहित म्हणजे सोबत, बरोबर,सह असा होतो. शब्द आणि अर्थ यांचे साहचर्य, यांचा सहभाव काव्यात,गद्यात असावा असे सांगितले आहे. तसेच हित, सहित म्हणजे जे हितकर आहे ते सहित होय. या गद्यात व पद्यात येणाऱ्या सहितलाच साहित्य असे म्हटले आहे. अशा हितकर विचार वचनाचा, मूल्यरचनाचा, विचारमुल्यांचा समूह म्हणजे साहित्य असा अर्थ साहित्य या शब्दाचा आहे .

साहित्य या शब्दांचा विग्रह 'सहित + यत्' म्हणजे साहित्य. डॉ. यशवंत मनोहर लिहितात,' साहित्य या संकल्पनेचे मूळ 'सहित' मध्ये सांगितले जाते. सहित म्हणजे सोबत, सह किंवा बरोबर. समाज संस्कृतीसोबत चालतो आणि साहित्य समाजासोबत चालते. याचा अर्थ साहित्य संस्कृतीच्या मूल्यांना सोबत घेऊन चालते आणि समाजातील असदवर फुल्या मारीत सद् सोबतीला घेऊन चालते असा आहे.'३ साहित्यात सहित हे कोणासह किंवा कोणाबरोबर चालते याला विशेष महत्त्व आहे. साहित्य म्हणजे शब्द अर्थासोबत आणि अर्थ शब्दासोबत अर्थपूर्ण पद्धतीने येणे म्हणजे साहित्य. शब्द आणि अर्थ यांचा सौंदर्यसर्जक व्यवहार म्हणजे साहित्य. शब्दांचा जन्म मानवी जीवनात होतो आणि या शब्दांच्या सुघटितचिन्हाला अर्थ देखील मानवी जीवनातच प्राप्त होतो. मानवी जीवन हे सुख आणि दुःखाने, शोषक आणि शोषितांनी, अन्याय अत्याचार दास्य, पीडा आणि त्याच्या निर्मूलनासाठीच्या पर्यायानेही तसेच चिदवाद आणि इहवाद या परस्परविरोधी भूमिकेनेही भरलेले आहे. स्वाभाविकच शब्द आणि त्याचे अर्थ हे वरील कोणत्यातरी भूमिकेसह, मूल्यांसहच साहित्यात येतात. साहित्यात अन्यायी जीवनाचे समर्थन करणारे शब्द आणि त्याचे अर्थ सोबत येत असतील तर ते साहित्य विशिष्टांच्या हितसंबंधाचेच साहित्य होणार आहे. अन्यायाचे निमूर्लन करण्यासाठी समतामयी जीवनाचे समर्थन करणारे शब्द आणि त्याचे अर्थ हे जर साहित्यात सोबत येत असतील तर हे साहित्य सर्वांच्या हिताचे साहित्य ठरते. साहित्यात येणाऱ्या शब्दांचा आणि त्याच्या अर्थाचा संबंध हा जीवनातील सत्याशी, वास्तवाशी असतो. असत्याचे प्रतिनिधीत्त्व करणारे शब्द आणि त्यांचे अर्थ हे साहित्यात येत असतील तर त्याला साहित्य म्हणता येणार नाही. साहित्य या संज्ञेत सर्वहितकारकता आणि विशिष्टांची हितकारकता असे दोन ध्रुव ध्वनीत केलेले आहे. साहित्यात येणाऱ्या शब्दाने जीवनाच्या अर्थपूर्णतेचे सौंदर्य वाढवावे. सत्य मांडणारे शब्द हे असत्य मांडणाऱ्या शब्दाना त्यांच्या गुलामीची जाणीव करून देण्यासाठी साहित्यात येतात. एका विशिष्ट भूमिकेने गुलाम झालेले शब्द हे साहित्याला आणि जीवनाला नवे अर्थ देत नसतात. ते काळाबरोबर चालत नसतात. अशा तुरुंगात अडकलेल्या शब्दांना स्वतःचा चेहरा नसतो. स्वतंत्र स्वयंभू असे त्याला व्यक्तित्वही नसते. या शब्दांना जीवनसृष्टी आणि दृष्टीही नसते .ते सर्वाच्या हिताचे नसतात. सर्वाच्या हितांचे शब्द हे निर्दोष, नितळ जीवनाच्या निर्मितीसाठी जन्माला घातलेले असतात आणि तेच खरे जिवंत व बंधमूक्त जीवनसर्जक शब्द असतात. अशा जीवनसर्जक शब्दरूपांच्या लेखनरूप आविष्काराला साहित्य असे म्हणतात. साहित्य ही संज्ञा कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक, ललित निबंध, प्रवासवर्णन, स्वकथन, चरित्र-आत्मचरित्र अशा व्यापक अर्थाने वापरली गेली आहे.

समीक्षा या संज्ञेचा विचार करणे आवश्यक आहे .डॉ यशवंत मनोहर समीक्षण या संज्ञेच्या अर्थाचा उलगडा करताना लिहितात,' सम्यक + ईक्षण ही दोन पदे समीक्षण या शब्दात आहेत .सम्यक म्हणजे साकल्याने, पूर्णपणे, जबाबदारीने आणि ईक्षण म्हणजे पाहणे, तपासणी करणे. कलाकृतीची अत्यंत जबाबदारीने, पृथक्करण करीत समग्रपणे पाहणी करणे म्हणजे कलाकृतीची समीक्षा करणे होय.'४ त्यांनी समीक्षण या संज्ञेचा विग्रह करून त्याची कार्यप्रणाली सांगितली आहे. एक जबाबदार, समंजस, समग्र जीवनाचे आकलन आणि जीवनदृष्टी असलेला असा समीक्षक असतो. या समीक्षकावर समाज जीवनाला आणि साहित्य व्यवहाराला दिशा आणि दृष्टी देण्याची जबाबदारी सोपवली गेली आहे. अशा जबाबदार असणाऱ्या समीक्षकाचे कार्य लक्षात घेता

समीक्षा म्हणजे नेमके काय ? यासंबंधी विचार करणे आवश्यक आहे. समीक्षेची व्याख्या प्रा.रा ग.जाधव यांनी केली आहे .ते म्हणतात, 'ललित साहित्याचे आकलन, आस्वाद व मूल्यमापन करण्यासाठी गांभीर्याने होणारा

विचार व्यवहार म्हणजे समीक्षा' ५ येथे साहित्याचे आकलन, त्याचा आस्वाद आणि आस्वादोत्तर मूल्यमापन समीक्षकाने गंभीर पणे करणे म्हणजे समीक्षा असे म्हटलेले आहे. या समीक्षा शब्दाला मीमांसा, टीका,भाष्य, रसग्रहण, परीक्षण, समीक्षण असे पर्यायी शब्द वापरले आहेत. यासर्व चर्चेवरून साहित्य लिहिणारा तो साहित्यिक आणि समीक्षा करणारा तो समीक्षक अशा दोन भूमिका असलेल्या दिसतात. यातील एक हा अगोदर भूमिका वठवून मोकळा होतो तर दुसरा नंतर भूमिका वठवतो. एक परीक्षा देतो आणि दुसरा दिलेल्या परीक्षेचे मूल्यांकन करतो. जीवनाच्या परीक्षेचा पेपर हा जसा विशिष्ट निकषाच्या, तत्त्वांच्या आधारे सोडवावा लागतो तसेच विशिष्ट तत्त्वांच्या, निकषांच्या आधारे त्याचे मूल्यमापनही परीक्षकाला करावे लागते. परीक्ष्यार्थी आणि परीक्षक अशा दोन भूमिका प्रत्ययाला येतात. यासाठी साहित्यसमीक्षेचा विचार करावा लागतो.

साहित्यसमीक्षा म्हणजे काय?:-

साहित्यसमीक्षा म्हणजे काय? याचे उत्तर 'साहित्यसमीक्षा म्हणजे अर्थातच उपयोजित समीक्षा होय. साहित्यकृतीच्या साहित्यत्वाची शहानिशा करणे आणि या साहित्यत्वाचा कलागुणदृष्ट्या आणि तौलनिकदृष्टया दर्जा निश्चित करणे या प्रक्रियेला साहित्यसमीक्षा असे म्हटले जाते.'६ साहित्याला साहित्यत्व कशाने प्राप्त होते. यासंबंधी साहित्याचे तत्त्व, त्याचे निकष यांची सैध्दातिक किंवा तात्त्विक मांडणी करणारा समीक्षा व्यवहारातील साहित्यशास्त्र हा पहिला भाग आहे आणि साहित्याच्या निश्चित केलेल्या निकषा- तत्त्वांनुसार साहित्याचे आकलन,आस्वादन आणि मूल्यमापन केले जाते त्या दुसऱ्या भागाला उपयोजित साहित्य समीक्षा म्हटले जाते. याचा अर्थ साहित्यिकांना जसे जीवनाचे मर्म मांडण्यासाठी जीवनानुभवाची, या जीवनदृष्टीची आणि साहित्याच्या तत्त्वांची किंवा साहित्याच्या तत्त्वज्ञानाची माहिती असणे आवश्यक असते. तसेच समीक्षकांना साहित्यसमीक्षा करतांना जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि साहित्याचे तत्त्वज्ञान चांगल्या प्रकारे माहित असणे आवश्यक असते.समीक्षा काय करते तर ती एखाद्या साहित्यकृतीचे आकलन करते म्हणजे साहित्यकृतीचे वाचन करून तिला सर्व बाजूंनी समजून घेते. त्या साहित्यकृतीचे अंतरंग, साहित्यिकाचे मन, त्याचे व्यक्तिमत्त्व,त्याची निर्मिती प्रक्रिया, त्याची भाषा, शैली, रचना वैशिष्ट्ये,शब्दसंपत्ती,प्रभाव,साहित्यकृतीचा रूपबंध हे सर्व वाचन करून समजून घेतल्या जाते. त्याचा आस्वाद घेतला जातो आणि त्यानंतर मनात निर्माण झालेल्या प्रतिक्रिया साहित्याच्या निकषाच्या आधारे मूल्यमापन करून लेखनरूपात मांडल्या जाते.साहित्याचे मूल्यमापन केल्या जाते. अर्थात साहित्य निर्मिती आणि समीक्षा निर्मिती हे सर्व साकल्याने,जबाबदारीने करावे लागते.

साहित्य आणि समीक्षा यांचे नातेसंबंध :-

अगोदर साहित्य जन्माला येते आणि त्यानंतर त्याचे व्यवस्थापन जन्माला येते. साहित्यातून साहित्यसृष्टी जशी आविष्कृत होते तसेच त्यातून त्या लेखकाची दृष्टीही आविष्कृत होते. साहित्य जन्माला येण्यापूर्वी लेखकाच्या मनात साहित्य लेखनाचे प्रयोजन, त्याची प्रेरणा,त्या साहित्य लेखनाचा संभाव्य होणारा परिणाम आणि या साहित्य लेखनाकडे वाचकाची दृष्टी यासंबंधीचे चिंतन साहित्यनिर्मिती पूर्वी साहित्यिकाच्या मनात आराखड्याच्या रुपाने येतात .पण सर्वच साहित्यिक असा सुनियोजित साहित्य लेखनाचा आराखडा लेखनापूर्वी तयार करतात आणि मग साहित्य लिहितात असे नाही. साहित्य निर्मिती ही उत्स्फूर्त असते असे म्हटले जाते. या उत्स्फूर्ततेचे तर्काधारे काटेकोर विश्लेषण करणे शक्य नाही. पण एकदा साहित्य निर्मिती झाली की त्या साहित्य निर्मात्याची ती राहत नाही. ती समाजाची प्रॉपर्टी होते. समाज या संपत्तीवर अनुकूल आणि प्रतिकूल विचार व्यक्त करतात. लेखकाकडे हे अनुकूल आणि प्रतिकूल विचार स्वीकारण्या पलिकडे त्याच्या हातात काहीच शिल्लक नसते. म्हणून अगोदर साहित्य व नंतर समीक्षा येते. या साहित्याचा आणि समीक्षेचा परस्पर संबंध हा आकलनाच्या, आस्वादाच्या आणि मूल्यमापनाच्या पातळीवरचा असतो हे लक्षात येते. तसेच साहित्याची प्रकृती ही सत्याशी, वास्तवाशी, जीवनाशी आणि सर्वांना बरोबरीने सोबत नेणारी आणि सर्वांचे हित साधणारी आहे. हे खरे मानले तर समीक्षेची प्रकृती ही सत्य मांडणारी कोणावरी अन्याय न करणारी, विशेषत : न्यायाची बाजू घेणारी आहे. तेव्हा साहित्य आणि समीक्षा

या दोघांची प्रकृती वैशिष्ट्ये मिळतीजुळती असताना साहित्याने समीक्षेला आपल्या बरोबरीचे समजून सोबत करण्याला हरकत नाही. शेवटी साहित्य हे सत्याची बाजू घेणारे आहे आणि समीक्षा ही देखील सत्याची बाजू घेणारी आहे. जीवनात जे नको ते नाकारण्यासह जे हवे ते मांडण्यासाठी, कोणीही मागे राहू नये तर त्याला बरोबरीने सोबत घेऊन तो आपल्या बरोबरीचा व्हावा, असावा हेच तर साहित्याला वाटते. समीक्षा देखील कोणी कोणावर अन्याय करून कोणाला मागे ठेवणार नाही यासाठीच तर ती न्यायाची बाजू घेते आणि जे अन्यायी आहे त्याविरुद्ध रोकठोक, कोणाचीही पर्वा न करता निर्णय देते, भाष्य करते. मॅथू अर्नोल्ड म्हणतात Poetry is the criticism of life by gifted men. साहित्य ही जीवनाची समीक्षा आहे. ते जीवन भाष्य आहे. तर समीक्षा देखील ही साहित्याची समीक्षा करण्याचे पर्यायाने जीवनाची समीक्षाच करत असते. असे असेल तर साहित्याने समीक्षेची घृणा करू नये. गौण, दुय्यम समजू नये. कारण साहित्य आणि समीक्षा यांच्यात प्राकृतिक परस्परावलंबीजीवनबंधाचे नातेसंबंध आहे.

साहित्य समीक्षेचे ध्येय :-

साहित्य समीक्षेला ध्येय असते. कोणताही समीक्षक एखाद्या साहित्याची, साहित्यकृतीची जेव्हा समीक्षा करतो तेव्हा तो विशिष्ट ध्येय ठेवूनच करीत असतो. त्याचे ध्येय तीन पातळ्यावर असते .यातील पहिली पातळी तो लेखकाच्या साहित्यनिर्मितीच्या सामर्थ्याची जाणीव करून देतो. साहित्याचा आढावा घेणे, साहित्यातील गुण आणि दोषांची चर्चा करणे, तुलनात्मक अभ्यास करणे, साहित्यासंबंधी सिद्धांत मांडणे, साहित्य क्षेत्राला मार्गदर्शन करणे, साहित्य गतिमान करणे, साहित्य प्रवाहाला योग्य दिशा आणि गती देणे, वाङ्मय मूल्ये आणि जीवनमूल्याचा शोध घेणे व त्यासाठी प्रयत्नरत राहणे, साहित्य प्रवाहातील दोषांचे निराकरण करणे, साहित्याचा, साहित्यकृतीचा दर्जा ठरविणे, समीक्षेच्या कसोट्या निश्चित करणे, तर दुसऱ्या पातळीवर वाचकाला साहित्याचे मूल्यमापन कसे करावे, त्याचे परिशीलन कसे करावे हे समजून सांगत असतो.या अर्थाने तो वाचक आणि लेखक यांच्या मधील पुल म्हणून कार्य करतो,साहित्यभिरूची निर्माण करणे, साहित्य क्षेत्राची शुद्धता राखणे, साहित्यातील अपप्रवृतीना रोखणे आणि लेखक व वाचक यांना मार्गदर्शन करणे आणि तिसऱ्या पातळीवर तो स्वत: साहित्याच्या प्रकृतीची ,स्थितीगातीची जाण प्रगल्भ करून घेतो. असे तिन पातळ्यावर साहित्य समीक्षेचे ध्येय आहे. यासाठी समीक्षा साहित्याकडे काळजीपूर्वक पाहते. नैसर्गिक उर्मीच्या आधारे साहित्याची समीक्षा करते, जीवनाचा शोध घेते,लेखकाला अप्रत्यक्षपणे मार्गदर्शन करते आणि योग्य तो बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करते. हे कार्य तसे कठीण आहे.यात भूमिका न्यायाची, निर्णयाची भूमिका आहे. जेथे भूमिका घेऊन कार्य केले जाते तेथे बऱ्यावाईट समस्या उपस्थित होतात. आजकाल भूमिका घेऊन कार्य करणाऱ्यांची संख्याच मुळात अल्प आहे. कारण आजकाल समाजाला गोलमालपणा अधिक आवडतो आहे. अशा भूमिका हीन वातावरणात आजचा माणूस टोकाची भूमिका घेण्याला कचरतो कारण आपले भले होणार नाही असे त्याला वाटते .आपला स्वार्थ साधण्यासाठी ना इकडचा ना तिकडचा, यालाही गोड आणि त्यालाही गोड असा बुड नसणारा भूमिकाहीन,चमचेगिरी करणारा, चमकीस स्वभाव धारण करीत आहे. नसता विरोध कोणी घ्यायचा, कशासाठी घ्यायचा अशी प्रवृत्ती वाढीला लागली असल्याने अशीच अपेक्षा साहित्यसमीक्षकडून केली जाते.एखादा समीक्षक गोलमाल भूमिका न घेता कठोर भूमिका घेऊन आपले कार्य करीत असेल तर त्याला प्रचंड विरोध केला जातो. त्याची हेटाळणी केली जाते .त्याच्या समीक्षेवर प्रश्न उपस्थित केले जातात. साहित्यिक मंडळी त्याचा विरोध करतात, त्याला आपला विरोधक समजतात .परंतु असे समजणे हे चुकीचे आहे. समीक्षकाने एखाद्या साहित्यकृतीवर टीका केली तर तो त्या साहित्यावर प्रेम करतो म्हणूच तो टीका करतो. काही दुरुस्तीचे कानमंत्र दिले असेल तर तेही प्रेम, आपुलकीच्या आणि दुरुस्तीच्या भावनेतूनच देत असतो. तो त्या साहित्यिकाला अद्ययावतच करत असतो. त्यामुळे साहित्याने समीक्षेला आपला विरोधक मानू नये तर आपला सखा, मित्र मानला पाहिजे. जे गुळगुळीत साहित्यावर समीक्षा करतात ते खरे मित्र नसतात. ते खरे तर साहित्यिकाची जीवंतपणी हत्या करणारे शत्रूच असतात. टीकेत आस्था, प्रेम, दुरुस्तीची सद्भावना असते आणि गुळगुळीत, चांगले

चांगले म्हणणाऱ्या समीक्षेत साहित्यिकाला हळूहळू संपून टाकण्याची भावना असते. म्हणून जो स्पष्ट, तिखट, रोकठोक समीक्षा करतो तो साहित्याचा खरा मित्र असतो. या मित्राला शत्रू वा विरोधक समजणे हे चुकीचे आहे.

समीक्षेच्या नजरेतून आजची साहित्यसमीक्षा :-

साहित्यसमीक्षेचा विचार केला तर आज साहित्य या व्यापक संज्ञेखाली तुकड्या-तुकड्यात, गटा-गटात, जाती-जातीत, धर्मा-धर्मात विभागलेले साहित्य दृष्टीस पडते. त्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, भटक्या विमुक्त जातीचे साहित्य, स्त्रीयांचे साहित्य, गांधीवादी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, मुस्लीम साहित्य, मार्क्सवादी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य असे तुकड्या-तुकड्यात विभागलेले साहित्य दृष्टीस पडते. साहित्य हे खरे तर सकल करण्याचे कार्य करते पण साहित्याची अशी विभागणी करणे हे साहित्याचे तत्त्वज्ञान आणि समीक्षा व्यवहारावर प्रश्न चिन्ह निर्माण करणारी आहे. साहित्य आणि त्याचे तत्त्वज्ञान या सकलसाहित्याच्या एका छताखाली अशा विविध साहित्याच्या छावण्याची वस्ती वसलेली आहे .ही वस्ती साहित्याचे अखंड भारतीयत्त्व निर्माणात आमचाही सहभाग आहे हेच व्याकूळ होवून अनेक शतकापासून सांगत आहे. पण या वस्तीने अखंड भारतीयत्त्वाचा उसना आव आणणाऱ्या प्रस्थापित साहित्याला आणि त्याच्या धुरिणांना हे निर्वाणीचा टाहो ऐकता आला नाही. मुळात साहित्याच्या व एकूणच कलेच्या दिशेसंबंधी टॉलस्टॉय लिहितात, 'मानवांना जोडणे, एकत्र आणणे, हृदय हृदयाला मिळविणे हे कलेचे सर्व प्रकारच्या कलेचे ध्येय आहे. हा कलेचा हेतू आहे. कला तोडत नाही तर कला जोडते, हा कलेचा विशेष होय.'७ येथे टॉलस्टॉय यांनी साहित्याचा धर्म हा जोडण्याचा आहे आणि तो बंधुभावाशिवाय शक्य नाही. सर्वच साहित्याचे हित कशात तर बंधुभावात आहे. विविध साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमुळेहा बंधुभाव आटत असलेला जाणवतो आहे. साहित्याच्या विविध प्रवाहात हा बंधुभाव नसेल तर साहित्यातून सर्वांचे हित व कल्याण साधले जाते आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. याचा अर्थ साहित्याची दिशा कुठे तरी चुकत चालली आहे असे म्हणण्याला जागा निर्माण होते. खरे तर साहित्याने सत्य व्हावे, त्याने भारतीय व्हावे, त्यांचे प्रश्न मांडावेत पण आजचे साहित्य हे समाज जीवनाची विभागणी करणारे, कंपूशाही निर्माण करणारे झाले आहे. अशा गटा-गटात, जाती-जातीत विभागलेल्या साहित्याचे आणि साहित्यिकाचे तत्त्वज्ञान एकच की अनेक आहे? भारतीय साहित्याचे तत्त्वज्ञान आणि साहित्यशास्त्र हे एकच असेल तर या विभागलेल्या साहित्य गटांनी भारतीय साहित्य व्हावे. त्याने ग्रामीण, दलित, आदिवासी, मुस्लीम, स्त्रीवादी असे होऊ नये. भारतीय साहित्य हे जोडणारे असते. जोडणे हेच त्याचे संविधान आहे. जोडणे हाच साहित्याचा भारतीय म्हणून धर्म आहे. असेच साहित्य भारतीय असते. हाच साहित्याचा ध्येयवाद आहे. भारतीयत्वाच्या अखंडत्वाची विभागणी करून वेगळी चूल मांडणारे साहित्य हेभारतीयत्वाच्या विरोधी आहे. दलित, आदिवासी, ग्रामीण, मुस्लीम, भटक्या विमुक्त अशा साहित्याच्या वेगवेगळया चुली का निर्माण झाल्यात ? याचा गंभीरपणेविचार करणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. याचा अर्थ भारतीय साहित्यशास्त्र हे या विभक्त झालेल्या साहित्याच्या अनुभवविश्वासाठी अपुरे होते .या साहित्यशास्त्रांनी निर्माण केलेला साहित्याचा साचा या विभक्त झालेल्या साहित्याच्या विश्वजाणीवेला अपुरा आणि न्यादर्शी असा नव्हता. भारतीय साहित्यशास्त्र निर्माण कर्त्याचे मन आणि मेंदू हा विशिष्टाच्या हितासाठी साहित्यशास्त्राची चौकट उभी करण्यात गुंतला होता. त्यामुळे या साहित्यशास्त्राने साहित्याचे निर्माण केलेले निकष आणि चौकट ही या देशातील संधीवंचित जीवनमर्म मांडणाऱ्या संवेदनशील सर्जक लेखकाला ही चौकट थिटी वाटू लागली. या साहित्यशास्त्राने साहित्याचे निकष हे विषमतेच्या, परमार्थतेच्या तत्त्वांना शरण येणाऱ्या साहित्यिकाला आपले वाटू लागणे हे स्वाभाविक होते. तसेच अशा साहित्यशास्त्रावर आधारित साहित्य हे जीवनाला नवे काही देऊ आणि दाखवू शकत नव्हते. स्वाभाविकच या साहित्यशास्त्रावर आणि समीक्षाशास्त्रावर पोसल्या गेलेला समीक्षक हा उपेक्षिताच्या, संधीवंचितांच्या साहित्याला साहित्य म्हणून स्वीकारतच नव्हता. यांचे साहित्य हे साहित्य या पदवीत बसतच नाही. असे साहित्याचे साहित्यपण नाकारल्यामुळे स्वाभाविकच नव्या साहित्याची, नव्या साहित्यशास्त्राची, नव्या साहित्य तत्त्वज्ञानाची, नव्या समीक्षाशास्त्राचीआणि नव्या सौंदर्यशास्त्राची गरज निर्माण झाली. या गरजेतून

नवे साहित्यशास्त्र, नवे सौंदर्यशास्त्र, नवे आंबेडकरवादी समीक्षा शास्त्र जन्माला येऊ लागले आहे. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, भटक्या विमुक्त जातीचे साहित्य, स्त्रीयांचे साहित्य, गांधीवादी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, मुस्लीम साहित्य, मार्क्सवादी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य आणि समीक्षा उदयाला आल्या आहेत. मुख्यत: भारतीय साहित्यसमीक्षा ही कलावाद आणि जीवनवाद, रुपवाद आणि आशयवाद या संघर्षातून पुढे आली. हा संघर्ष साहित्याकडे पाहण्याच्या दोन भिन्न समीक्षा दृष्टीकोनाचा निर्देश करणारा आहे. तसेच साहित्य व समीक्षा ही दोन भारतीय साहित्य, समीक्षा आणि संस्कृती परंपरेच्या चौकटीत अडकलेली आहे. एक भरताची साहित्य, समीक्षा आणि संस्कृती परंपरा आणि दुसरी बुद्धाची साहित्य, समीक्षा आणि संस्कृती परंपरा या दिशेने प्रवास करणारी आहे. वैदिक आणिअवैदिक, चैतन्यवादी आणि निरीश्वरवादी, इहवादी आणि परलोकवादी या दोनभिन्न साहित्य, समीक्षा आणि संस्कृतीच्या मुशीतून दोन साहित्यसमीक्षा जन्माला आल्या आहेत आणि तिसरी पाश्च्यात्य साहित्य, समीक्षा आणि संस्कृतीच्या मुशीतूनसाहित्यसमीक्षा जन्माला आली आहे .ही सर्व साहित्य समीक्षा परंपरेशी सापेक्ष आहे. ही सापेक्षता साहित्यासह समीक्षेला निकोप, निर्मळकरू शकली नाही आणि निरपेक्ष, नि:पक्षपाती होऊ शकली नाही. त्यामुळे स्वाभाविकच साहित्याला आणि समीक्षेला देखील आपली कोंडी झाल्यासारखे वाटू लागले आणि ही कोंडी फोडून त्यांनी स्वत :ला मुक्त केले आणि आपल्या जाणिवाचे, मूल्यांचे साहित्य आणि समीक्षा निर्माण केली.

साहित्याच्या अशा विविध चुलीमुळे ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, ख्रिस्ती, मुस्लीम, भटक्याविमुक्त, गांधीवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी साहित्यसमीक्षेच्या देखिल विविध चुली आकाराला आल्या आहेत. हा केवळ विस्तार नाही तर भिन्न भिन्न दृष्टीकोन, जीवनमूल्याचे आक्रंदन आहे. साहित्याचे आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन करण्यासाठी त्या त्या जात, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग, वंश जाणीवेचा समीक्षक असल्याशिवाय या साहित्याला न्याय मिळणार नाही. त्याचा परिणाम म्हणून समीक्षक आणि त्याची समीक्षा ही एका जात गटाच्या जीवन जाणीवेची समीक्षा झाली आहे .उच्च वर्णीय समीक्षक संधीवंचितांच्या साहित्याची दखल घेत नाही आणि घेतली तरी चिपळूणकरी नजरने फुल्यांच्या साहित्यावर जसे आसूड ओढले तसे या नजरेने या संधीवंचितांच्या साहित्यावर आसूड ओढण्यात धन्यता मानली जाऊ लागली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची दखल जशी प्रस्थापित समीक्षकांनी घेतली नाही, त्यांना साहित्यिक म्हणून मान्यता देली नाही. अशी द्वेष मुलक भावना या समीक्षकात असलेली दिसते. डॉ. यशवंत मनोहर सारख्या लोकप्रिय साहित्यिक, विचारवंत यांना अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदापासून हेतुः दूर ठेऊन हे साहित्य संमेलन एका बुद्धिवादी, इहवादी, तत्त्वज्ञ साहित्यिकांच्या मार्गदर्शनापासून स्वत:ला धन्य मानत आहे. भारताची गान कोकिळा मानलेल्या कलावंत लत्ता मंगेशकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उभ्या आयुष्यात एकही गाणे गायले नाही. यातून कलावंत, समीक्षक हा मनाने आणि मेंदूने जातीच्या आणि अशा विविध चौकटीच्या बाहेर पडला नाही आणि पडू इच्छित नाही ही गंभीर बाब साहित्य समीक्षेच्या समोर उभी ठाकली आहे. यातून समीक्षक स्वजातीच्या, स्वधर्माच्या, स्वविचाराच्या साहित्याबद्दलच्या प्रेम आणि आस्थेतून समीक्षा करू लागला आहे. त्याचा परिणाम जबाबदारीने, नि:पक्षपातीपणे साहित्याच्या होणाऱ्या मूल्यमापन प्रक्रियेवर होऊ लागला आहे. यातूनच साहित्याला आणि समीक्षेला मधुमेहाचा आजार जडल्याचे जाणवते आहे. स्वजातीच्या,स्वधर्माच्या जीवन जाणीवेने केल्या जात असलेली आजारग्रस्त समीक्षा ही आपले तर्क कठोर, बुद्धिवादी कार्य आणि जबाबदारी विसरली की काय? ती समीक्षाशास्त्राने सांगितलेले निकष विसरली आहे का? समीक्षेने भरकटलेल्या साहित्याला रस्ता दाखवावा, दिशा आणि दृष्टी द्यावी, पण स्वजातीच्या प्रेम आणि जिव्हाळ्याने समीक्षेला निरपेक्ष राहता आले नाही ती सापेक्ष झाली आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्रात आणि समीक्षा क्षेत्रात घोटाळे कमी होण्या ऐवजी त्याच्यात वाढ झाली आहे. ही वाढ नव्या दिशा आणि दृष्टी कडे बोट दाखवत आहे.

साहित्य समीक्षेची दिशा आणि दृष्टी :-

आज नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे. या धोरणानुसार पदवी व पदव्युत्तर पातळीवरील मराठी व मराठी साहित्य या विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक झाले आहे. या अभ्यासक्रमात साहित्यसमीक्षा हा देखील एक पेपर आहे. या पेपरमधून विद्यार्थ्यांना समीक्षा ही संकल्पना, त्याची उद्दिष्ट्ये, महत्त्व, अपरिहार्यता सांगणे आवश्यक आहे. समीक्षेची प्रक्रिया कशी होते, त्यात कोणते घटक असतात, साहित्यात विविध वाद जन्माला आले ,त्याचे स्वरूप काय, समीक्षेने या वादाचे समर्थन की असमर्थन करायचे,या वादातील साम्य कोणते, त्यांच्यात कोणताभेद आहे, हे सांगण्याचे कार्य समीक्षेला करावे लागते.साहित्यासंबंधीविद्यार्थ्यांची आकलनक्षमता आणि त्याची चिकित्सक दृष्टी विकसित करण्यासाठी समीक्षाप्रक्रियेतील,आकलन आस्वादन, वर्णन, विश्लेषण आणि मूल्यमापन हे घटक समजून सांगणे आवश्यक आहे .यातून त्यांची साहित्याभिरुची निर्माण होईल. गांधीवादी, मार्क्सवादी, देशीवादी आणि आंबेडकरवादी समीक्षा,या समीक्षेच्या मुळाशी असलेला मुल्यव्युह समजून सांगणे आज आवश्यक झाले आहे. हे सांगत असतानाच समीक्षकाने साहित्याचा मूळ धर्म सांगण्याची जबाबदारी देखील स्वीकारली पाहिजे. यासंबंधी वा.ल.कुलकर्णी म्हणतात,' साहित्य हा जीवनाचाच एक भाग असला तरी त्याला स्वत : चे असे स्वतंत्र अस्तित्त्व आहे. त्याचे नियमन आणि नियंत्रण करणारी स्वतंत्र तत्त्वे आहेत. त्याचा बरा वाईट पणा पारखणारी स्वतंत्र गमके आहेत. ही सर्वमान्य जाणीव साहित्यसमीक्षेच्या बुडाशी आहे.' ८ साहित्याला स्वत :चे स्वतंत्र अस्तित्त्व असते याचा अर्थ त्याला स्वत :चे स्वतंत्र मन असते, स्वतंत्र मन असल्याशिवाय नव्या मूल्य जाणीवा जन्माला येऊ शकत नाही. हे मान्य केले की त्याचे अस्तित्त्व ज्या घटकांवर उभे आहेत ते घटक समीक्षकाला माहित असणे आणि त्या घटकांचा शोध घेणे, समीक्षेचे स्वतंत्र अस्तित्त्व ज्या घटकांवर उभे झाले आहे. त्या घटकांच्या अनुरोधाने त्याचे आकलन ,आस्वादन करून त्यातील बरावाईटपणा सांगणे आवश्यक आहे. हे सांगण्याचे काम समीक्षक करत असतो. याचा अर्थ साहित्याच्या प्रकृतीची, प्रयोजनाची, स्थितीगतीची जाण कारण देणे, साहित्य ज्या मूलतत्वावर उभे झालेले असते त्या मूलतत्त्वाची जाण करून देणे आवश्यक आहे. टॉलस्टॉययांनी कला म्हणजे काय ? या ग्रंथात साहित्याचा नीतीविचार सांगितला आहे. ते म्हणतात, 'आजच्या काळातील अत्यंत व्यापक, विशाल, थोर व व्यवहार्य अशी धर्मभावना म्हणजे आपले सर्वांचे ऐहिक व पारलौकिक कल्याण आपल्यातील बंधुभावाच्या वाढीवर अवलंबून आहे ,हा विचार होय .सर्व मानवांनी स्नेहाने व प्रेमाने एकत्र गुण्यागोविंदाने नांदावे, एकमेकाना उन्नत होण्यास ,पुढे जाण्यास सहाय्य करावे यातच सर्वाचे हित व कल्याण आहे. ही दृष्टी म्हणजे आजचा धर्म होय.'९ येथे टॉलस्टॉय कलेचा अथवा साहित्याचा धर्म अर्थात नीती केवळ बंधुभाव सांगतात. केवळ बंधुभाव हाच साहित्याचा धर्म असू शकतो काय ? स्वातंत्र्य, समता, न्याय, प्रज्ञा, शील, करुणा, निब्बाण आणि मानुषता ही मुल्य साहित्याने सांगू नये का ? बंधुभाव कधी प्रस्थापित होईल जेव्हा न्यायाचे, समतेचे तत्त्व साहित्य आपल्या साहित्यातून आविष्कृत करत असेल तरच बंधुभावाच्या तत्त्वाला अर्थ राहील अन्यथा नाही, साहित्याने केवळ मानुष्यता मांडून उपयोग नाही तर याच्या जोडीला न्यायाचे तत्त्वआहे की नाही हे समीक्षकाने तपासले पाहिजे. साहित्य सत्य मांडते की असत्य मांडते याचाही विचार केला पाहिजे.साहित्याने मानवाचे निर्दोष जीवन मांडले पाहिजे, हा निर्दोष शब्द दोषपूर्ण जीवनाचा जसा निर्देश करते तसेच तो दोषपूर्ण जीवनाची कारणे नष्ट करण्याचे आणि निर्दोष जीवन निर्माणासाठी उत्तम कृती कार्य करण्याचे सांगते, हे उत्तम कार्य करण्यासाठी सदाचाराची आवश्यकता असते. हा सदाचार मनावर अवलंबून असतो. मन हे वाईटही बाब जन्माला घालते आणि जन्माला घातलेली वाईट बाब नाहीशीही करू शकते. म्हणून मनावर ताबा, त्यावर नियंत्रण असणे आवश्यक असते. जो मनाने मुक्त, स्वतंत्र असतो तोच सर्जनशील असतो. सर्जनशीलतेलाच जाणीवपूर्वक सदाचारासाठी प्रयत्न करावे लागते. सदाचाराचा मार्ग हा निर्मळ, स्वतंत्र मनातून आणि स्वतंत्र असलेल्या प्रज्ञेतून जाणारा मार्ग आहे. या सदाचारात सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या निर्दोष जीवनाच्या मांडणीसाठी हा सदाचार साहित्यातून मांडला आहे की नाही

याचा विचार केला पाहिजे.माणसाच्या दु:ख निर्मितीला जसे पंचशीलाचे आचार विहिनता हे कारण आहे तसेच पंचशील पालनाने दु:ख नाहीसेही होते. साहित्य हे सांगते काय ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बावीस प्रतिज्ञा सांगते काय ? याचा देखील समीक्षकाने साहित्याची समीक्षा करताना साहित्याला विचारले पाहिजे. समीक्षक हे प्रश्न साहित्याला विचारत नाही त्याची समीक्षा ही संस्कृत साहित्य व समीक्षाशास्त्राच्या पावलाने प्रवास करणारी समीक्षा ठरते तर साहित्याला जे प्रश्न विचारतात, त्याच्या मूळ तत्त्वाचा शोध घेतात त्यांची समीक्षा सर्व सामन्याचा जीवन व्यवहार व साहित्य ज्या पालीभाषेतून मांडला गेला त्या पाली साहित्य व समीक्षाशास्त्राच्या मार्गाने प्रवास करणारी ठरते. समीक्षकाने साहित्याची समीक्षा करतांना या साहित्याच्या नीती तत्त्वाचे ज्ञान ठेवणे आवश्यक आहे. समीक्षक हा साहित्याचा उपासक असावा तो शिक्षकही असावा.शिक्षक हाच सदाचाराचे साहित्याला, वाचकाला आणि लेखकाला जबाबदारीने सांगू शकतो. पण त्याने हे कार्य करताना कधीही स्वत:तील विद्यार्थी मारून टाकता कामा नये, जेव्हा त्याच्यातील हा विद्यार्थी मरतो त्यावेळी त्याच्यातील समीक्षक नाहीसा होतो .ही बाब ही गंभीरपणे मनावर घेण्याची आज गरज आहे.

साहित्याची समीक्षा करताना समीक्षकाने साहित्याने वर्तमानातील जे प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नाचे उत्तर भूतकालीन मन ठेऊन शोधता कामा नये. तर त्याने आपले मन हे वर्तमानात ठेऊनच समीक्षा करणे आवश्यक आहे. साहित्यसमीक्षा ही समीक्षक हा व्यासंगी असावा,त्याने चौफेर वाचन करावे, त्याला साहित्याच्या सर्वच अंगाचे ज्ञान असावे. भाषाशास्त्र, व्याकरण, साहित्याचा इतिहास, परंपरा, त्यातील प्रवाह, त्यातील बदल, सौंदर्यशास्त्र, वास्तववाद, अभिजातवाद, वाङ्मय मूल्ये, समाजमूल्ये, जीवनमूल्ये, शैली, दुर्बोधता, साहित्याचे प्रकार यासंबंधीचे अद्ययावत ज्ञान असावे. समीक्षा हा बौध्दिक व्यवहार असल्याने त्याच्याकडे बौद्धिक कणखरपणा, सडेतोडपणा, स्पष्टपणा असावा. समीक्षा ही आस्वादापासून सुरू होते या आस्वादासाठी त्याच्याकडे भाव संवेदना असावी.साहित्यिकांचे साहित्य समाज जीवनात जन्म घेते आणि समाजासाठीच साकार होते. हे समाजजीवन जगणारा आणि त्याची अनुभूती घेणारा समीक्षक असावा. त्याला काळाचे आकलन असावे. समीक्षक हा समृद्ध अनुभवाचा धनी असावा .त्याला साहित्य आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध माहित असावे. त्यांच्याकडे विश्लेषक वृत्ती असावी. त्याला भूतकाळाचे ज्ञान असावे,त्याच्याठायी वर्तमानकाळाची गुणग्राहकता भविष्याचा स्वागतशील दृष्टीकोन असावा. समीक्षक हा पूर्वग्रहदृष्टीचा असू नये. साहित्य क्षेत्रात बदल घडवून आणण्याची क्षमता समीक्षकाजवळ असण्यासाठी त्याच्याठायी विधायक दृष्टी असावी. साहित्यातून सौंदर्य, विचार व भावनेचा आविष्कार होत असल्याने त्याचे आकलनासाठी समीक्षका जवळ अभिरुची असावी. समीक्षक हा न्यायधिश असल्याने त्याने तटस्थवृत्ती अंगी बाळगावी. निरपेक्ष, नि:पक्षपणे त्याने समीक्षा करावी. समीक्षक हा एक लेखक आहे. त्याच्याठायी स्वपरिक्षण करण्याची वृत्ती असावी. समीक्षेचे कार्य हे एका अर्थाने संशोधनाचेच कार्य असल्याने त्याच्याकडे वाचनाचा व्यासंग,वस्तुनिष्ठता असावी. समीक्षक हा बहुश्रृत असावा. त्याला देशात घडणाऱ्या जीवनाच्या विविध क्षेत्रातील घडामोडीचे आकलन असावे कारण त्याचा परिणाम साहित्यनिर्मितीवर होतो. या साहित्याचे मूल्यमापन योग्य करण्यास मदत होते. चांगला समीक्षक हा चांगल्या मनाचा चांगला साहित्यिक असतो. चांगले कलासक्त मन असलेला लेखक चांगली समीक्षा करू शकतो. त्याच्याकडे सौंदर्यदृष्टी, संवेदनशीलता, व्यापकता आणि सर्जनशीलता असावी. तो सत्य प्रेम असावा. तो विनयशील, निरंहकारी व नम्र असावा. तो उदंड इच्छाशक्तीचा असावा. अशी व्यापक दिशा आणि दृष्टी असलेला समीक्षक साहित्याला उत्तम दिशा आणि दृष्टी देत असतो. उत्तम समीक्षा करीत असतो.ही दिशा दृष्टी घेऊन साहित्य आणि समीक्षेच्या क्षेत्रात निर्माण झालेले घोटाळे जात, धर्म, वर्ण, वर्ग, वंश, शोषण आणि विषमता मूक्त मनाची समीक्षा करू शकते. भरकटलेल्या साहित्याला आणि समीक्षेला भारतीय साहित्याच्या व समीक्षेच्या एका छता खाली एकत्र आणू शकते असा विश्वास आहे.

निष्कर्ष :

साहित्यसमीक्षा: दिशा आणि दृष्टी या विषयाच्या अनुषंगाने चिंतन केले असता काही निष्कर्ष हाती येतात. समीक्षा करणे म्हणजे दुसऱ्याच्या घरचे भांडे घासणे असा द्वैष समीक्षेबाबत निर्माण करून अपयशी झालेला कवी म्हणजे समीक्षक अशी दुय्यम आणि गौण समजण्याची दृष्टी समीक्षकासह समीक्षेकडे पाहण्याची झाली आहे. साहित्य हे समाज, संस्कृती, मूल्य यांचा आविष्कार करणारे असावे. ते बरोबरीने नेणारे असावे. ते जातीच्या,

धर्माच्या, वंशाच्या, वर्णाच्या तुकड्या तुकड्यात विभाग लेले नसावे. ते सकल भारतीय असावे .समीक्षा ही अशा तुकड्या- तुकड्यात विभागलेली नसावी. या विभक्त झालेल्या तुकड्यांना एकत्र करणारी आणि साहित्य व्यवहाराचे मार्गदर्शन करणारी असावी. समीक्षेला गोड गोड मूल्यमापन करण्याचा मधुमेह होऊ नये आणि साहित्यानेही तशी समीक्षेकडून अपेक्षा करू नये. समीक्षेने साहित्याला प्रज्ञा, शील आणि करुणेची दीक्षा द्यावी आणि भारतीय बनवावे. समीक्षेने साहित्यालाही साहित्यनिर्मितीचे संविधान सांगावे. साहित्य निर्मितीचे संविधान साहित्याने अंगीकृत करून साहित्यातून आचार करावा. साहित्य आणि समीक्षा यांचे नाते संबंध हे परीक्षार्थी आणि मार्गदर्शक असे आहे. समीक्षा ही बुद्धीवादी आणि तर्क कठोर आहे. समीक्षा साहित्य क्षेत्रातील कंपूशाहीला दिशा आणि दृष्टी देणारी आहे. साहित्य हे अगोदर जन्माला येते त्यानंतर समीक्षेचे कार्य सुरू होते. हे कार्य आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन या प्रक्रियेतून केले जाते. समीक्षक हा जबाबदार मनाचा आणि बुद्धीचा वाचक आणि लेखक यांच्यातील पुल आहे. तो साहित्यव्यवहाराला आपल्या व्यासंगाने मार्गदर्शन आणि दिशा दृष्टी देणारा आहे .

संदर्भ :-

१)मनोहर यशवंत, नवे साहित्यशास्त्र , विजय प्रकाशन, नागपूर,प्रथमावृत्ती सप्टे.२००१, पृ .१

२) मनोहर यशवंत, नवे साहित्यशास्त्र , विजय प्रकाशन, नागपूर,प्रथमावृत्ती सप्टे.२००१, पृ .१

३) मनोहर यशवंत, सत्याचे सौंदर्य आणि सौंदर्याचे सत्य, वर्णमुद्रा पब्लिशर्स, शेगाव, पहिली आवृत्ती- सप्टें. २०२१,पृ .१११

४) मनोहर यशवंत,नवे साहित्यशास्त्र , विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती सप्टे.२००१, पृ .८६-८७

५) मनोहर यशवंत, नवे साहित्यशास्त्र , विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती सप्टे.२००१, पृ .२०३

६) मनोहर यशवंत,नवे साहित्यशास्त्र ,विजय प्रकाशन,नागपूर,प्रथमावृत्ती सप्टे.२००१, पृ .२०२

७) कटारे मोतीराम ,बौद्ध सौंदर्यशास्त्र,अक्षरवाङमय प्रकाशन ,पुणे , पहिली आवृत्ती -१५ ऑगस्ट २०२२,पृ.१८९

८)राजाध्यक्ष विजया (स .संपा .),मराठी वाङमय कोश ,खंड चौथा ,समीक्षा संज्ञा ,म.रा.सा .आणि सं .मं. मुंबई ,प्रथमावृत्ती नोव्हे .२००२ ,पृ .३९१

९) कटारे मोतीराम ,बौद्ध सौंदर्यशास्त्र,अक्षरवाङमय प्रकाशन ,पुणे ,पहिली आवृत्ती -१५ ऑगस्ट २०२२, पृ.१८९

कवी अविनाश पाटील यांच्या "अनवट वाटा" कवितासंग्रहातील जागतिक दृष्टिकोन

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग, शिवजागृती महाविद्यालय नळेगाव, ता. चाकूर जि.लातूर

1990 नंतरच्या कालखंडामध्ये जागतिक पातळीवर जागतिकीकरणाची लाट तीव्रपणे सुरू झाली. त्याचे परिणाम भारतावरही झाले खेड्यापाड्यापर्यंत नव्या तंत्रज्ञानाने आणि विज्ञानाने आपले हात पाय पसरले खेडी आणि शहर हा भेद उरला नाही. शहरातील सर्व भौतिक सोयी सुविधांचे लोन ग्रामीण भागापर्यंत पसरले. दळणवळणाच्या साधनांमुळे अलीकडच्या काळात खेड्याकडून शहरात लोंढे आले. जागतिकीकरणाचे बरे वाईट परिणाम तीव्रतेने जाणवू लागले विशेषतः ग्रामीण भागात याचा परिणाम झाला, श्रीमंत आणि गरिबी अशा दोन न मिटणाऱ्या अभेद्य भिंती निर्माण झाल्या इथली समाज व्यवस्था संस्कृती सुद्धा जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडली जागतिकीकरणाच्या परिणामामुळे शहरात अनेक सुख सोयी आल्या. त्याचबरोबर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. भोगवाद, चंगळवाद वाढला. आता महानगरे अनेक प्रश्नांच्या चक्रव्युहात सापडली. जातीय, धार्मिक आणि वांशिक आधीसत्ता प्रबळ करीत जाणाऱ्या आजच्या एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, खाजगीकरण, आर्थिक उदारीकरण या प्रक्रियेने माणसाला सर्वच पातळयावरील निर्णय प्रक्रियेतून नामशेष केले जात आहेत. माणसाच्या जगण्या- मरण्याचे अधिकार आता ग्लोबलव्यवस्थेने आपल्या हातात घेतले आहे. माणसाने अथक परिश्रमातून निर्माण केलेल्या अनेकविध मौलिक गोष्टीचे पेटंट म्हणजे आपलीच जहागिरी असे महासत्तेला वाटत आहे हे जागतिकीकरण दलित, पीडितांच्या बाजूचे नाही, तर जागतिकीकरणाच्या कराल रूपातून एक नवी शोषक व्यवस्था अस्तित्वात आली आहे या व्यवस्थेचे तानेबाणे, शोषणाच्या तर्हा वर्चस्वाचे रूप विद्रूप जेवढ्या बारकाईने आणि अभ्यासपूर्ण रीतीने मराठी कवितेने समजून घेतले आहे या जागतिकीकरणाने माहिती तंत्रज्ञान दिले पण ज्ञान दिले नाही माणसाची अनेकविधरुपे दाखविली; पण त्याचं अंतरंग, भावभावना, नातीगोती त्याचे जगणे -मरणे, त्यांचा संघर्ष, त्यांची गोची नाही दाखवली. त्याबद्दल हे जागतिकीकरणाचे युग एक ब्र शब्दही बोलत नाही. या युगाच्या व्यापारी दृष्टीने केवळ लुटा लुटीलाच प्राधान्यक्रम दिला आहे. जागतिकीकरणामुळे भौतिक विकास आणि वैभवाबरोबरच बकालपणा, भेसळ, भ्रष्टाचार, प्रदूषण मूल्यर्हास, असुरक्षितता, दंगली, बॉम्बस्फोट, गोळीबार, मोर्चे, बंद इत्यादीमुळे माणूस भोगवादी, स्वार्थी, मतलबी बनल्यामुळे त्याचा कोंडमारा झाला. मानवी जीवनात माणसापेक्षा वस्तूला महत्त्व आले. टीव्ही, मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप, व्हाट्सअप, कॅफे, फेसबुक, इंटरनेट, ट्विटर, लॉकडाऊन, सॅनिटायझर, मास्क, कॅप्सूल, टॅबलेट, लस रेमिडीसीवर, प्लाजमा, ऑक्सिजन, सलाईन अशा साधनांच्या आहारी आजचा माणूस गेला. याचा परिणाम होऊन माणूस एकलकोंडा बनला त्यामुळे चिडचिड, टेन्शन, उदासीनता त्याच्या वाट्याला आली आहे. हे सर्व जागतिकीकरणाच्या अतिरेकामुळे घडत आहे. माणसा माणसातील वाढलेले अंतर, तुटत जाणारे नातेसंबंध, भावनाहीनता, स्वकेंद्रीतपणा, जीवनमूल्य, जीवनाबद्दलची उदासीनता, जागतिकीकरणामुळे भाषा, संस्कृतीसकट मानवी जीवनात झालेली जटिलता, गुंतागुंत आणि अशा सगळ्या गुंतागुंतीतून आकाराला आलेले अनपेक्षित वास्तव डोळ्यासमोर तरंगत आहे. अशा या गुंतागुंतीच्या भयावह जागतिकीकरणाचे चित्रण करणाऱ्या कवितांचा शोध घ्यावयाचा आहे. सायबरयुगाने माणसाची कोंडी

केली. नवे युग अवतरले. म्हणून विषमता कमी झालेली नाही. उलट यामागील दोन दशकात जात, गरिबी ,श्रीमंती ही विषमता अधिकच टेकूळीप्रमाणे वर आली. जेवढे जास्त उच्चशिक्षित तेवढे जातीयवादी कारण प्रत्येक जातीनुसार मोर्चे, आंदोलने, संघटना, कंपन्या निघाले आहेत. मॉलपासून ठेल्यापर्यंत आणि स्पेस शटलापासून सायकल रिक्षापर्यंतचे हेलपाटे ही विषमता कायमच झाडांचे सोटमूळ जमिनीत खोलवर रुजल्याप्रमाणे रुजलेली आहे. नव्या रूपात कामगार भांडवलदार आहेरे, नाहीरे ही दरी वटवृक्षाप्रमाणे रुंदावत गेली आहे. निसर्गाने दिलेले शाश्वत मूल्यांचे अमूल्य जीवन; परंतु मानवी स्वार्थाने हजारो वर्षापासून जोपासलेली शोषणव्यवस्था यांच्यामध्ये होरपळून निघालेल्या मानवी मूल्यांचे आत्मभान जोपासणारी वृत्ती घेऊन समकालीन कवितेत जे काही प्रयोग होत आहेत त्यामध्ये अरुण काळे, मंगेश नारायण काळे, उत्तम कांबळे, श्रीधर तीळवे, हेमंत दिवटे, मन्या जोशी, महेंद्र भवरे, सलील वाघ, संजीव खांडेकर, सचिन केतकर, वीरधवल परब, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमर शेख, यशवंत मनोहर, अजीम नवाज राही, प्रवीण बांदेकर, सतीश कळसकर, वंजेश सोलंकी, अविनाश पाटील, राजकुमार मस्के, पी. विठ्ठल, बालाजी इंगळे, कवी अविनाश पाटील इत्यादी कवींच्या कवितातून जागतिकीकरणातील जीवन वास्तव शब्दरूप घेत आहे.

नव्या पिढीतील एक प्रसिद्ध कवी म्हणून अविनाश पाटील प्रसिद्ध आहेत. 'अन्वय', 'ऋतुबहरताना' आणि 'अनवट वाटा' हे त्यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.,'आगरी बोली लोकसंस्कृती व साहित्य परंपरा 'हा संशोधनपर ग्रंथ ही प्रसिद्ध आहे. त्यांची इतर दहापेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित आहेत. कोणताही लेखक आपल्या लेखनाची सुरुवात ही कवितेपासून करीत असतो. तशीच त्यांच्या लेखनाची सुरुवात ही कविता लेखनातून झाली आहे. लहान वयापासूनच त्यांना वाचनाची आवड आहे. लेखन हे वाचनाचे बाय प्रॉडक्ट आहे. कवीने भरपूर वाचन केल्यामुळेच प्रतिभा शक्ती रुंदावली आहे. वाचनामुळे त्यांच्या अनुभव विश्वाची मूस समृद्ध होऊन ते लिहिते झाले आहेत. पेणचे डॉक्टर माधवराव पोतदार, शंकर देवसर, विलास फडके, कवठेकर सर वाघमारे सर, गझलकार अंजुम काजमी अशा दिग्गजांच्या सहवासात कवी अविनाश पाटील आल्यामुळे काव्य लेखनाकडे वळले आहेत. जेव्हा त्यांचे मन अस्वस्थ होते. तेव्हा त्यांची कविता शब्दरूप धारण करून प्रगट होते. कविता लिहिताना त्यांनी कधीही ठरवून, एकटाकी बसून लिहिलेली नाही. एखाद्या वृक्षाला फांदी फुटून चिगोर, तोर येऊन बहरते. त्याप्रमाणे मनाच्या सूप्त गाभाग्रातून, जाणीवेतून आणि जीवन जे जगले, अनुभवले, भोगले त्या अनुभूतीतून सर्जनशील निर्मिती केलेली आहे. कवी अविनाश पाटील यांच्या 'अनवट वाटा' या काव्यसंग्रहातील कविता अंक:तकरणातील उमाळ्यातून बाहेर आलेल्या अनुभूतीच्या आहेत. म्हणजे या काव्यसंग्रहातील कविता आजच्या वैश्विकरण, जागतिकीकरण, वर्तमान काळासमोर धरलेला लखलखित आरसा आहेत. अविनाश पाटील यांना राजकीय व सामाजिक भान आहे. यंत्रयुग उत्तरोत्तर आधुनिकता वाद समाजातील अन्यायाची वृत्ती आणि तिचे समर्थन करणारी संस्कृती यावर अविनाश पाटील यांची कविता त्वेषानेने प्रहार करते. तसेच माणुसकीचा गहिवर असणारी चिंतनशीलता ही त्यांच्या कवितेत आढळते. अनुभवाचे संघटन करणारी अर्थवाही व सुचक भाषा हे त्यांच्या कवितेचे ठळक वैशिष्टये आहे.

नव्वदोत्तर कालखंडामध्ये जागतिक स्तरावर जागतिकीकरणाची तीव्र प्रक्रिया सुरू झाली याचे परिणाम भारतावर झाले. खेड्यापाड्यापर्यंत नव्या तंत्रज्ञानाने आणि विज्ञानाने आपले हातपाय पसरले जागतिकीकरणाचे बरे वाईट परिणाम तीव्रतेने जाणवू लागले. विशेषतः ग्रामीण भागात याचा विशेष परिणाम झाला. श्रीमंती आणि गरिबी अशा दोन न मिटणाऱ्या अभेद्य भिंती निर्माण झाल्या. इथली समाजव्यवस्था सांस्कृतिकदृष्ट्या जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडली .त्यात प्रभावाखाली 'अनवट वाटा' या कवितासंग्रहातील घरासमोर,

मोबाईल, सकाळची मुंबई, मॉल, रेल्वेच्या डब्यात, सेल्फी, रोबो इत्यादी कविता जागतिकीकरणावर उत्तम भाष्य करणाऱ्या आहेत. त्याचा शोध या प्रस्तुत शोधनिबंधात घेणार आहोत. कवी अविनाश पाटील हे नवदोत्तर पिढीतील एक वेगळ्या जाणिवांचे कवी आहे. आधुनिकतावादी वळणांनी लिहिणारे पाटील आधुनिक माणसाच्या हातबलतेची आणि नव्या काळाने त्यांच्या पुढे उभ्या केलेल्या सामाजिक सांस्कृतिक पेचाचे चित्रण करतात. कवी गाव सोडून शहरात गेल्यानंतर कसा कोंडमारा होतो आणि शहरी संवेदनशीलतेची ही कविता माणसांच्या नात्यात विघटन होत आहे. याचे चित्र विस्तृतपणे मांडते. 'घरासमोर' या कवितेत म्हणतात," माझ्या घरासमोर उभा झालायएक टॉवर माझ्या घराच्या खिडकीतून दिसणारे निळेशार आकाश त्याने गिळून टाकले" (अनवट वाटा, प्रष्ठ क्रमांक 14)कवीला हा एकविसाव्या शतकातील, जागतिकीकरणातील वर्तमान काळासमोर कसा दिसतोय तर निळेशार गिळून टाकणारा टॉवर त्यांच्या घरासमोर उभा राहतोय खिडक्यामध्ये कोंबलेल्या एअर कंडिशननी कोवळ्या उन्हाशी नातेसंबंध तोडून टाकले. सकाळचे कोवळे ऊनही पाहण्यासाठी मिळत नाही. एवढी घुसमट कवी पाटील यांची होते. माणसामाणसामधील नाते तुटत चालले आहे. ही खंत कवी व्यक्त करतात. बा .सी. मर्ढेकरांनीही 'कोणी नाही कोणाचा मामा लेक भाचा मग अर्थ काय त्या बेंबीचा असे म्हटले होते. ते अगदी बरोबर आहे .माणसाने पृथ्वीवरून दूर दुर्बिणी द्वारे आकाशात काय चालले आहे. याचा शोध लावला; पण माणसांमधील नाते संपुष्टात आले आहे. याची खंत आहे. महानगरीय संस्कृती माणसाचे स्वातंत्र्य विशिष्टअस्तित्व पुसून टाकते माणूस आपली विचारशक्ती, समूहभावना गमावून बसला आहे आणि यंत्रासारखा झाला आहे .त्याच्याजवळ कोणतीच भावनिकता उरली नाही. माणसाला भरडून टाकणारी ही महानगरीय व्यवस्था निर्माण झाली आहे."पांढऱ्याशुभ्र फुलांनी डवरलेली सरळमार्गी शेंगांनी नम्र झालेली धारातीर्थी पडली, आता या झाडाच्या फांद्या फांद्यावर बागडणाऱ्या खारुताई कुठे परदेशी गेल्या आहेत." (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 14)जागतिकीकरणाने भौतिक दृष्ट्या आपल्याला समृद्ध केले असले तरी याच काळाने माणसाच्या माणसातल्या नैतिक मूल्यांना, पशुपक्ष्यांना, प्राण्यांना पुष्कळ अंशी नष्ट केले आहे .प्रचंड औद्योगीकरण, दहशतवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद यासह असुरक्षितता वय आणि मानसिकता, मानसिक तानसुद्धा दिला, पर्यावरण धोक्यात आले, या सर्व घटना, घडामोडी कवीच्या संवेदनशीलतेवर परिणाम करत असतात .तुटलेपण एकाकीपण, अविश्वास, संशय, मृत्यूचे भय, विस्थापनाचे दुःख, व्यक्तिमत्त्वाचा लोपया साऱ्यामधून कवींच्या जीवन जाणिवा आकाराला आलेल्या दिसतात. विषण्ण आणि अंतर्मुख करणारे हेच अनुभव आहेत. भोवतीच्या पर्यावरणाची कवी थेटपणे चिकित्सा करतात. ग्लोबल संसर्ग या काळातल्या निर्मितीच्या मागे आहे झाडाच्या फांद्या आणि फांद्यावर बागडणाऱ्या खडोळया नाहीसा झाल्या आहेत .सासरी गेलेल्या मुलीसारख्या या खारुताई कुठे गेल्या आहेत हे कळत नाही ."टॉवरच्या बाल्कनीत दिसतात आता वाळत घातलेली अंतवस्त्रे किंवा पसरून सोडलेल्या रंगीत साड्या भन्नाट वारा किंवा झिम्माड पाऊस आता कधी येतो कधी जातो कळतच नाही कारण खिडक्यात कोंबलेल्या एसींनी तोडून टाकलेत नातेसंबंध कोवळ्या उन्हाशी एखादा चुकार पक्षी दिसावा म्हणून मी कधीचा असूसलेला या अनोळखी शहरात मनाच्या फांदीवर झोके घेत पक्षी होऊन". (अनवट वाटा ,पृष्ठ क्रमांक 14) हे जे व्हर्च्युअल जगाचं आक्रमण होत चाललंय. मानवीपणाला कोरडं करत जाईल. असा इशारा कवी देतात. घरांना कुंपणे पडून त्यांच्या बंदीशाळा झाल्यात. याकडे कवी आपले लक्ष वेधतात. एकीकडे जागतिकीकरणाने शहरे आणि महानगरे बदलली जगण्याची नवी साधने आणि नवी रीत तयार झाली. याचा दृश्य अदृश्य परिणाम खेड्यातल्या जनजीवनावरही झाला. शहरात उंचच उंच रंगीबेरंगी इमारती उभ्या राहिल्या. मॉल आणि मल्टिप्लेक्स तयार झाले. काँक्रीटच्या इमारतीसमोर टावर बाल्कनीतील वाळू घातलेल्या पॉलिस्टर चायना

सिल्क रंगीबेरंगी साड्या यामुळे वारा पाऊस कधी येतो आणि कधी जातो हे कळत नाही. कारण खिडक्यात कोंबून एसीचे फॅन असल्यामुळे कोवळे होऊनही खायला मिळत नाही. एखादी चिमणी, साळुंकी, खडक चिमणी,चंडोल पक्षी चुकून तरी दिसावा म्हणून कवी आसुसलेले आहेत. या ओळख नसलेल्या शहरात कवीचे मन या फांदीवरून त्या फांदीवर कोरडेच घिरट्या घेत आहे .पक्षी होऊन भोवतालच्या परिस्थितीत सहभागी होण्यास नकार देणारा एक थंड परकेपणा या महानगरीय माणसाच्यात आहे. सर्वत्र त्यांचे अस्तित्व अर्धवट आणि शुल्लक वाटते. महानगरीय पर्यावरणात जगणे अपरिहार्य झाल्याने अविनाश पाटील यांच्या अस्तित्व शोधाला एक प्रकारची घुसमटीची अवस्था प्राप्त झाली आहे .त्यांच्या कवितातून महानगरीय माणसांची संभ्रमित आणि अस्तित्वातील निरर्थक अवस्था उत्कटपणे साकारली आहे महानगरी जीवनातील नरक यातनांचे वास्तव चित्रण करणारी कवी पाटील यांची कविता व्यक्तिगत जीवनातील अर्थशून्यतेचा आणि अस्तित्वाचा निरर्थकपणा, रोखठोकपणे चित्रीत करते .महानगराचे विनाशाकडे चाललेले रूप अधिक स्पष्ट करते. कवीच्या जगण्यातील कुंठीतअवस्था साकार झाली आहे. महानगरी जग एक तुरुंग आहे आणि या तुरुंगात महानगरी माणूस नातेसंबंध नष्ट झाल्यासारखे कैद्याप्रमाणे जगतो आहे. आजच्या काळात तर सारं जीवनच मोबाईलमय झाले आहे .सोशल मीडियाचा प्रभाव जनमाणसावर जबरदस्त आहे. फेसबुक आणि व्हाट्सअपवरच्या ग्रुपचर्चा आता आपल्या दैनंदिन जगण्याच्या केंद्रस्थानी येत आहेत. मोबाईल कुठेही कसाही फिरवता वापरता येतो. प्रेमपत्र, थ्रिल आता संपले आहे. कसेही कुठेही आयटमशी आपल्या आईबापांना गंडवून मुक्तपणे बोलता येते. ट्विटर, इंस्टाग्रामसह इतर अनेक माध्यमे आज उपलब्ध आहेत. त्यामुळे यापूर्वी सारखे प्रसारमाध्यमावर विसंबून राहण्याचे आणि केवळ दुसऱ्याचे ऐकण्याचे दिवस आता इतिहास जमा झाले. काही सांगायचे असेल तर आपल्या वॉलवर ,ग्रुपवर सांगू शकतो हे अभिव्यक्तीचे दालन चांगले असले तरी इथला अविष्कार कवी अविनाश पाटील यांना 'मोबाईल' या कवितेत अतिशय उथळ वाटतो. या आऊडेटेड जिंदगीत डाउनलोड करता येतात. नवी क्षितिजे कुणाचा कॉल रिसीव करावा अथवा कधी स्विचऑफ व्हावा हे सारे एकाच बटणावर डिपेंड झाले आहे .आता निसर्गप्रेम या बाबी खरे तर माणसांच्या भावजीवनातील महत्त्वाची अंगे असूनही नव्या काळाने ज्या एका संवादहीनआणि कोरड्या मनोवस्थेला जन्म दिला. त्यातून मोबाईलच्या अतिरेकातून प्रेमभावना आणि निसर्गसंवेदना, नैतिकता, सत्यता ,जिव्हाळा ,नातेसंबंध, माणुसकी जवळपास नष्ट झाली आहे. मोबाईलमुळे फक्त माणसेच जवळ आली; पण त्यांची मने मात्र कायमची दूर गेली. पूर्वी प्रेम डोळ्यातून मेंदूपर्यंत पोहोचत असे; पण हल्ली ते कानातून मेंदूपर्यंत पोहोचत आहे. मोबाईलच्या माध्यमातून सध्याच्या तरुण-तरुणी मोबाईलवर दिवस रात्र काय बोलत असतात हाच एक संशोधनाचा विषय आहे .मोबाईलच्या गरजेचं रूपांतर व्यसनात कधी झालं हे आपल्याला कळलच नाही. तरुण पिढीवर त्याचे दुष्परिणाम होत आहेत. त्यातूनच सोयीपेक्षा हा मोबाईल आपलं जगणं हैराण करून सोडताना दिसतोय .आईबापांना गंडवत आहेत तरुण पिढी मोबाईलच्या आहारी जाण्यामागे मोबाईल बनवणाऱ्या कंपन्या आणि मोबाईलचे नेटवर्क पुरवणाऱ्या कंपन्या या दोघांचाही मोठा हातभार आहे. जागतिकीकरणाचा वापर करून बेधुंद भांडवलशाही विशिष्ट गटासाठी मोठ्या प्रमाणावर लाभ आणि असमानता निर्माण करते आहे .पुढे कवी अविनाश पाटील म्हणतात, "आता तर एलसीडीच्या चिमुकल्या पडद्यावर सारं जगच सेवेला हजर फक्त तुमच्या बापाच्या खिशात हवेत पैसे जाळयात पकडले जातात मासे तसे तुम्ही अडकून जाता नेटच्या जंजाळात कधी कधी संवेदनाहीन साइटवर सर्च करताना, करता लिलाव नीतीचा आता रेंजमध्येच राहण्याची सवय ठेवावी. नाहीतर नाळ तुटते मातीची विस्कटली कधी घडी तर सारच करावं लागतं डिलीट जीर्ण भविष्याला" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 15) कवी अविनाश पाटील यांच्या कवितेला उत्तर आधुनिकतेचंकिंवा

पोस्टमॉडर्नतेचं मानसिक आणि सामाजिक पर्यावरण लाभलं आहे .त्यांच्या कवितेत नियतीवाद आहे. अभिव्यक्ती माध्यमच आहे. कागद, इंटरनेट, मायक्रोफोन ,मोबाईल, एलसीडी, कंकॉम्प्युटर, स्क्रीन, साईट सर्च, डिलीट अशा माध्यमातील शब्दांचा आधार त्यांची कविता घेते. ही कविता अव्हानात्मक असून रेंजमध्ये तरुण पिढीने राहिले नाही तर त्यांच्या गावातील पांढरीशी मातीशीअसलेली नाळ नक्कीच तुटेल आणि गावापासून, मातीपासून फारकत घेतली तर सर्वच भविष्य डिलीट होईल. असा धोका सांगून आपल्या मातीशी असलेली नाळ तोडू नका असा मोलाचा संदेश कवी देतात. त्यांची कविता देशीवाद जपते. संस्कृतीकमूल्यव्यवस्थेला, चंगळवादी, उपभोगवादी आणि सुखवादी प्रेरणेवर झोड उठवताना दिसतात. कवी पाटील जागतिकीकरणाकडे प्राय: नकारात्मक नजरेने बघतात जागतिकीकरणामुळे सर्वसामान्य माणसांच्या आर्थिक संधी वाढल्या; पण त्याची सांस्कृतिक कोंडी झालेली दिसते.

मुंबई या महानगरातील धावपळ, गतिमानता तिथले अस्थैर्य, तिथली मॉलसंस्कृती, मेट्रो संस्कृती, पंचतारांकित हॉटेल्स, गगनचुंबी इमारती, बारसंस्कृती, लोकल आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी, धारावी, दगदग, धावाधाव, भाई दादांची चाळ, आतले, बाहेरचे ,खाजगी सार्वजनिक जगणे, वेश्या -रांडा, यंत्रमाणूस, प्रेम, पैसा, सिनेकलावंत ,उद्योगपती ,खेळाडू राजकारणी, चमचमणारी विद्युत रोषणाई, डिस्को क्लब, स्विमिंग टँक, तर दुस-या बाजूला झोपडपट्टीतून सार्वजनिक पाण्याच्या नळावर एक एक घागर पाण्यासाठी मारामारी करणारा, डास मच्छर, ढेकूण यांच्या संगतीत वावरणारा कचराकुंडीत अन्नशोधणारा जगण्यासाठी भीक मागणारा शरीरविक्री करणे यासारखे उद्योग धंदे करणारा, तळागाळातील सामान्य गरीब वर्ग इत्यादी गोष्टी त्याच्या भोवतालात आहेत. या सगळयांचा बरा वाईट परिणाम त्यांच्यावर झाला आहे. जागतिकीकरण पहिल्यांदा मुंबईतील लोकांनी अनुभवलेले आहे. नंतर झिरपत झिरपत याचे लोण खेड्यापर्यंत पसरलेले आहे (पी. विठ्ठल, मराठी कविता समकालीन परिदृश्य, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2019, पृष्ठ क्रमांक 24) मुंबईवर अनेक कवींनी आपल्या वेगवेगळया अनुभूतीच्या वेगवेगळया कविता लिहिल्या आहेत; पण अविनाश पाटील यांची 'सकाळची मुंबई' ही नवी कविता आजच्या वर्तमानकालीन मुंबईतील सकाळचे आणि रात्रीचे वर्णन करते. सकाळची मुंबई रात्रीच्या मुंबईहून अगदीच सोवळी असते. सकाळी सकाळी सूर्य निघाल्यानंतर डांबरी रस्त्यावर सांडलेली असतात सूर्याची कोवळी किरणे, पोटाची खळगी भरण्यासाठी महानगरपालिकेतील सेवक मुंबईतील रात्रभर घाण केलेली रस्ते झाडत असतात ज्याप्रमाणे आपल्या घरासमोरील अंगण स्वच्छ करून सेनाचा सडा आत्मियतेने टाकतात. बागेच्या झाडाखाली पालापाचोळा पडलेला असतो. तसेच सुकलेल्या फुलांचा थर साचलेला असतो तोही काढून स्वच्छ करतात .महानगरीय या कवितेत स्त्रीसंबंधीची नव जाणीव प्रकट होते. पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रीविषयक शोषण पद्धतीत महानगरीय स्त्री वर्णाने भोगलेल्या मनोवेदना व यातना यांना वाचा फोडण्याचे कार्य अविनाश पाटील यांनी केले आहे .सकाळची मुंबई या कवितेतील वेगवेगळया थरातील, वर्गातील, वस्तीतील स्त्री-पुरुषांची चित्रणे आली आहेत. वासनेने रात्रभर भोगलेल्या कंडोमचाही थर निर्माल्य बनून पडलेला आहे. रात्र जागून देहाच्या व्यापारात आता रंगाचीलाली सकाळ झाल्यामुळे निघालेली आहे. या कवितेत आई, पत्नी, मुलगी, प्रेयसी या नातेसंबंधातील स्त्री कुटुंबासाठी अर्थार्जन करण्यासाठी नोकरी करणारी स्त्री चित्रण कवी करत नाहीत. तर शरीरविक्री करणारी, स्वतःच्या भावना बाजूला ठेवून निव्वळ कुटुंबासाठीच स्वतःचेआयुष्य उध्वस्त करणारी, मुक्तपणे लैंगिक जीवन जगणा-या आणि काही अघटीत घडू नये पोट वाढू नये, एड्स होऊ नये, संसर्ग आजार जडू नये म्हणून रात्रभर कंडोमचा वापर करते. सकाळ झाल्यानंतर ह्या कंडोमने माना टाकले आहेत. त्यामुळे या कवितेत

साचेबंद ठोकळे वजा स्त्री जीवन चित्रीत झालेले नाही. महानगरातील पिढीत आणि झोपडपट्टीत दारिद्र्यात खितपत पडलेल्या नाईलाजाने देहविक्रय करणाऱ्या पुरुषांच्या वासनांधकृतींना बळी पडलेल्या स्त्रिया येतात. अविनाश पाटील यांच्या कवितेतील स्त्री रोमांटिक वृत्तीची नाही रोमँटिक कविता वाचायची सवय असलेल्या वाचकाला अविनाश पाटील यांची कविता एकदम वेगळ्या धाटणीची वाटू शकते. स्त्री पुरुष संबंधाबद्दल पाटील यांना महानगरीय कामुक स्वरूपाची शोषणाची छाया जाणवते. भरती ओसरल्यावर रित्या किनाऱ्यासारखी फॅशन स्ट्रीट अगदी रितारिता हुतात्मा चौकाच्या कोपऱ्यात एक गुबगुबीत गाय आणि तिची गुबगुबीत मालकीण धर्माचा व्यापार करीत तिचा चारा, तिचीच पेंडतिला पैसे देऊन लोक घालत असतात. चारा, पेंडीचे लाडू तिच्याच गाईला, ढुंगणाला हेलकावे देत चर्चगेटच्या रस्त्यावर चालणाऱ्या टंच कार्पोरेट पोरीकडे बाबुलोक हळूच टाकतात. चष्म्यातून नजर अशा पद्धतीने कवी अविनाश पाटील यांना भोवतालच्या गर्दीतील माणसांचे माणूसपण शोधण्याचा ध्यास दिसतो. स्त्रियांच्या दुर्दशेचे वास्तव चित्रण करतात सामाजिक संकेत बाजूला सारून कवी समाजाशी बांधिलकी जाहीर करतात. सामान्य माणसांच्या दैन्य दारिद्र्याचा हतबलतेचा शोध घेतात उपनगरातून पंख फडफडवीत चाऱ्यासाठी आलेले मराठी पक्षी आपल्या जुन्या घरट्याच्या खुणा शोधतात. गिरगाव, लालबाग, दादरच्या गल्लीबोळात आपली हरविलेले बालपण ओव्हलच्या मैदानावर शेकडो तेंडुलकर खेळत असतात आयुष्याचे रस्ते शोधत सचिन फक्त करोडोत एकच असतो. हे ठाऊक असूनसुद्धा शेकडो बाप पीटाळत असतात. कोवळ्या पोरांना भल्या पहाटे तेंडुलकर होण्यासाठी ओव्हल मैदान भारतीय क्रिकेटचं उगमस्थान आहे. मुंबईत मिनी लंडन उभारण्याच्या कल्पनेतून लंडन मधल्या ओव्हल मैदानाच्या धर्तीवर त्यांनी मुंबईतही ओव्हल मैदान उभारलं.या भागात इरास सिनेमाच्या जागी पवन चक्की होती. वेगवेगळ्या उपनगरातून जसे पक्षी चाऱ्यासाठी सकाळी सकाळी पंख फडफडवीत जुन्या घरट्याच्या खुणा शोधत येतात त्याप्रमाणे गिरगाव लालबाग दादर या गल्लीबोळातील आपली हरवलेले बालपण मराठी माणसं. ओव्हलच्या मैदानावर येऊन क्रिकेट खेळतात. शेकडो क्रिकेट खेळतात; पण सामान्य गरीब समाजातील मुलं काही तेंडुलकर बनत नाहीत. सचिन करोडोत एखादाच असतो. हे माहीत असूनसुद्धा शेकडो बाब आपल्या कोवळ्या मुलांना भल्या पहाटे खेळण्यासाठी ओव्हलच्या मैदानात पाठवतात. महानगरीय जगात माणसाची सर्जनशीलता मारली जात आहे. त्याचे माणूसपण नष्ट होऊन ती किडामुंगी यंत्राप्रमाणे शूद्र होत चालला आहे. हे महानगर एका संवेदनशील माणसाचे स्वत्व हरवून टाकते आणि त्याचा आत्मा नष्ट करून टाकते. ही परात्मतेची भावना या कवितेचे असे सूत्र आहे."दुथडी वाहणारी नदी झालेला रस्ता, प्रवाहासारख्या धावत असतात गाड्या ,माणसांनी गच्च भरलेल्या लोकल्स, कुठून येतात ही माणसे मुंग्यासारखी रीती झालेली मुंबई पुन्हा पुन्हा भरत असते माणसांनी दर सकाळी" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 24) दोन्ही बाजूने दुथडी भरून जशी नदी वाहते त्याप्रमाणे सकाळ झाल्यानंतर नद्यातील पाण्याच्या प्रवाहासारखे रेल्वे गाड्या, खाजगी गाड्या लोकल बसगाड्या मुंग्यांच्या रांगेप्रमाणे धावत असतात. कोंबड्या खुराड्यात जश्या कोंबाव्यात त्याप्रमाणे गाड्यांमध्ये माणसे कोंबली जातात. संध्याकाळी अजगराप्रमाणे सुस्त पडलेली मुंबई सकाळ जसजशी ओसरू लागली की, रस्ते माणसाच्या गर्दीने, वाहनांच्या, सायरनच्या आवाजाने गोंगावतात. पक्षीसुद्धा झाडावर राहत नाहीत. इतके महानगरातील पक्षीसुद्धा धकाधकीचे धावपळीचे आणि असुरक्षिततेचे जीवन लोक जगतात. मृत्यू कोणत्या वेळी माणसाचा घास घेईल याची शाश्वती नाही. अपघात, दंगल, हिंसा, गर्दीतील चेंगराचेंगरी, प्रदूषण, गुन्हेगारी अशा गोष्टीला महानगरीय माणसाला तोंड द्यावे लागते. वर्तमान काळातील उग्र वास्तवाला सामोरे जाताना महानगरीय माणसासमोर पुढे सरकण्यासाठी कोणताच मार्ग दिसत नाही निष्पर्ण वृक्षात कसलाच उत्साह चैतन्य नसावे. अशी स्थिती असते. महानगरीय माणसाचे भ्रमिस्टपण, तुटलेपण ,परात्मभाव स्वतः हरवलेपणाची अवस्था कवी अविनाश

पाटील चित्रीत करतात. अनेक आंतरविरोधी वृत्ती प्रवृत्तीने वेढलेल्या वर्तमानकालीन वास्तवता जगताना होणारी सर्वसामान्य माणसाची घुसमट कवी पाटील यांच्या कवितेचे महत्त्वाचे असे आशयसूत्र आहे. अस्तित्वातील निरर्थकपणा जाणू लागला आहे. कणाकणाने झिजत जाणाऱ्या जगण्याची उमेद हरवून बसलेल्या, एकाकी पडलेल्या अर्थशून्यतेची भावना झालेल्या या कवितेतील व्यक्तीच्या वाट्याला आलेली ही परात्मतेची जाणीव त्याच्या जगण्यात नकारात्मकतेची वृत्तीबळावतनेते. पोटाची खळगी भरण्यासाठी आलेले महानगरातील माणसांचे समूह किंवा मुंगीगत जीवन जगत आहेत .त्यामुळे महानगर एक नरकपुरी झाली आहे. गलितच्छता, अस्वच्छता, गर्दी, दारिद्र्य, भूक, अस्वस्थता, धावपळ, असुरक्षितता प्रदूषण चेंगराचेंगरी, चंगळवाद, यामुळेनरकपुरीतील जगणे अधिक भयावह वाटू लागते महानगरातील औद्योगिक संस्कृतीदारिद्र्यामुळे आलेले बकालपण, झोपडपट्टी माणसांच्या लोंढ्यामुळे निर्माण झालेला जागेचा प्रश्न, जगण्याचे प्रश्न, वाढत्या गर्दीमुळे मारामाऱ्या, खून, दहशत गुंडांचे स्वतंत्र जग, जुगार अड्डे ,असे अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात. अशा बकालपणामुळे रोगट संस्कृती जन्माला येते. असे 'सकाळची मुंबई' कवितेतून कवी अविनाश पाटील अशा संस्कृतीचे चित्रण करतात. (रफिक सुरज, महानगरीय कविता नवे वळण नवे परिवार, शब्द पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 2021 पृष्ठ क्रमांक 85)

कवी अविनाश पाटील यांच्या 'माणसे' कवितेतील प्रकट होणारा मध्यमवर्गीय माणूस एकदम हिंस्र श्वापदासारखा आहे. भूक, दुःख, दारिद्र्य, शोषण, स्वार्थ ,कर्मठ जातीपाती, हिंसाचार, गोळीबार, आक्रमणे, दंगली, हल्ले, माणसे बळी जात आहेत.याविषयीची जळजळीत प्रतिक्रिया प्रकट होते. महानगरीय माणसे माणुसकी सोडून देऊन वागत आहेत. हा महानगरातील माणूस एक प्रकारे स्वतःच्या कोशात कुंपण घालून जगत आला आहे. यासंदर्भात कवी अविनाश पाटील माणसे या कवितेत म्हणतात,"आता माणसे तरी कुठे आहेत माणसासारखी जगतातहिंस्र श्वापदासारखी स्वार्थाच्या दलदलीत गुरफटलेली नातीगोती माणसांनी विणून ठेवल्या कर्मठ जातीपाती रोज जातीसाठी माती खात चाललेला हिंसाचार गोळीबार आक्रमणे हल्ले माणसे बळी घेत आहेत मारीत आहेत माणसे जातीसाठी" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 31) महानगरातील विषम अशा अर्थव्यवस्थेचे चटके सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय माणसे भोगत असतात. अराजकता, हिंसाचार रक्तपात,अन्याय, अत्याचार वाढलेला आहे. आतंकवादी प्रवृत्तीचाच जणू कवी पाटील समाचार घेतात. सामाजिक आणि सांस्कृतिक जुलूम मागील दशकात जातीनुसार आंदोलने मूकमोर्चे अधिक निघाले आहेत. शिक्षणाने जात-पात संपुष्टात येईल असे वाटत होते; परंतु माणूस जेवढा जास्त उच्चशिक्षित तेवढा जातीयवादी झाला आहे. जात ही जागतिकीकरणात महानगरीय संस्कृतीत टेकुळीप्रमाणे वर डोकं काढत आहे. राजकारण, समाजकारण ,धर्मकारण ,अर्थकारण नोकरी शिक्षण सर्व आपापल्या जातील माणसांच्या सोयीनुसार चालले आहे. माणसे माणसाला माणसाप्रमाणे वागणूक देत नाहीत. स्वार्थ बोकाळला आहे. असे आज धक्कादायक जीवन मध्यमवर्गीय व सर्वसामान्य माणसांना जगावे लागत आहे.रानटी, हिंस्रश्वापदासारखे वर्तन माणसे करत आहेत. पृथ्वीतलावर अराजकता माजत आहे. अविनाश पाटील यांच्या कवितेतील ही प्रवृत्ती हिंस्र श्वापदाकडे आपणास घेऊन जाते. सद्यस्थितीत माणूस माणसासारखा वागत नाही ही खंत अधोरेखित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाने आत्मसन्मान जागृत केला आहे अविनाश पाटील यांच्या कवितेत प्रकट होणाऱ्या हिंसाचारी, लांडग्याप्रमाणे लचके तोडणाऱ्या आतंकवादी प्रवृत्तीला आजादी का अमृत महोत्सव साजरा करून काहीच फरक पडत नाही .अजूनही जातीयतेचे, दारिद्र्याचे, विषमतेचे चटके कमी झालेले नाहीत, वेश्या, झोपड्या भूकबळी, भिकारी, बलात्कार, मारामाऱ्या, बेकारी इत्यादी अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अजूनही मिळत नाहीत. माणूस म्हणजे सुटे भाग, कालबाह्य झालेले, नादुरुस्त यंत्र वाटते .या माणसाने

दहशतिची धास्ती घेतली आहे. आजूबाजूचे वास्तव उपडसुंभ्यासारखे माणसाच्या अस्तित्वावर आणि जगण्यावर हल्ला चढवीत आहे. महानगरीय संस्कृती माणसाचे स्वयंविशिष्ट अस्तित्व पुसून टाकते. माणूस आपली विचारशक्ती गमावून बसला आहे. त्याच्याजवळ आता कोणतीच भावनिकता उरलेली नाही. माणसाला भरडून टाकणारी ही महानगरीय व्यवस्था जातीभेद महातारा

की, तरुण असावयाचा भेद, धर्म, वर्ण, लिंग, वय यांना गृहीत धरले जात नाही. हा सामान्य माणूस अनिश्चितता आणि असुरक्षिततेने ग्रासून गेला आहे. आता माणसे माणसासारखी राहिलेली नाहीत माणसे हिंस्र श्वापदासारखी जीवन जगतात अशी खंत कवी अविनाश पाटील यांनी माणसे या कवितेत व्यक्त केली आहे.

महानगरातील, जागतिकीकरणातील सापळ्यात प्रत्येक माणूस अडकला आहे. तिथली धावपळ, गतिमानता, अस्थैर्य, मॉलसंस्कृती, मेट्रोसंस्कृती, हॉटेल, बारसंस्कृती, लोकल झोपडपट्टी दगदग, धावाधाव, भाई, दादांची चाळ , आतले- बाहेरचे, खाजगी ,सार्वजनिक जगणे, वेश्या -रांडा, यंत्र -माणूस, प्रेम- पैसा, कित्येक गोष्टी त्यांच्या भोवताली आहेत. या सगळयांचा परिणाम कवी अविनाश पाटील यांच्या कवितेवर झाला आहे मोबाईल टावर मेमरी कार्ड मॉल पिझ्झा पीव्हीआर असे शब्द महानगरीय कवितेत आढळतात कवी अविनाश पाटील मालू या कवितेत म्हणतात आमच्या शहरात आता मॉल आले .बिडी पिणाऱ्या गणपत वाहण्याचे हाल झाले .बिचारा खोलायचा रोज दुकानाची फळी काचेच्या बरणीतून द्यायचा पेपर मिरची गोळी आता किराणा भुसार मालाचे व्यापारी गणपत वाणी काडी काडी चावून पहात नाहीत.माडी बांधण्याचे स्वप्न"(अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 32) नुसतीच स्वप्न बघणारा आणि वैफल्यग्रस्त सामान्य आयुष्य जगणाऱ्या बा.सी. मर्ढेकरांच्या कवितेतल्या बिडी पिणाग्रा गणपत वाण्याची वेदना व्यथा जशी होती तशीच अवस्था अविनाश पाटील यांच्या मॉलसंस्कृतीतील माणसाची आहे. या महानगरीय माणसाच्या इच्छा आकांक्षा स्वप्न अपेक्षा फार मोठे आहेत .आजच्या धकाधकीच्या दैनंदिन जीवनात यंत्रवत आयुष्यात परावर्तित झालेलं जीणंतकलादु आहे .त्यात जीवनातील रसरशीतपणा हरवलेला आहे. जीवनातील खरी असती सरून गेली आहे. हव्यास वाढला आहे .हा मॉल कवितेतील गणपत वाणी वेगळेच स्वप्न पाहतो आणि म्हणतो," आता म्हणे मॉल बांधीन मल्टिप्लेक्स सगळे शहर गोळा होईल भुलभुलैयात अडकून जाईल. सारे कसे रोख एटीएम च्या कार्डवर आज रोख उद्या उधार आता बोलायची सोय नाही घरपोच सामानाची महिना अखेरची वसूल करायची उधारी अडले नडलेल्यांचे लाचार डोळे पाहून गणपत वाणी द्यायचा उधार भुकेलेल्या जीवांना वाटायचा आधार सावकाश पैसे द्या म्हणायचा पोरं बाळ उपाशी ठेवू नका म्हणायचा आता सारे जुने झाले सारे कसे सुने झाले आमच्या शहरात आता मॉल आले"(अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 32) एकीकडे समृद्ध वाटणारी भौतिक जग, कार्पोरेट कंपन्यांचे जग तर दुसरीकडे याच महानगरातील अभावग्रस्त चिंता क्रांत जग अशा जगात वावरणारी माणसे आढळतात. कवी पाटील यांच्या कवितेतील गणपत वाणी मॉल बांधीन आणि सर्व मल्टिप्लेक्स शहर गोळा होण्याची स्वप्न बघतो. अशा भुलभुलैया असणाऱ्या छोट्याशा क्षेत्रात अडकतो. ज्याला सारे रस्ते एक वाटतात. कोणता रस्ता कोणीकडे वळतो आणि कोणता रस्ता कोठे पोहोचतो याबद्दलचा विचार मॉलमधील गणपत वाण्याला येत नाही. यालाच भूलभुलैया म्हटले जाते. म्हणजे महानगरीय जीवनात रस्ता विसरून गेला आहे. मल्टिप्लेक्सचे स्वप्न हा गणपत वाणी पाहतो. एकाच दुकानात अनेक वस्तू मिळण्याचे दुकाने असतात. त्याचबरोबर विविध डिझाईन केलेल्या असतात. यालामेगाप्लेक्स असे म्हणतात. जागतिकीकरणातील या मॉलचा आर्थिक व्यवहार रोख एटीएमच्या कार्डवर केला जातो. आज रोख उद्या उधार असे बोलण्याची आजच्या व्यापाऱ्याला आवश्यकता नाही. पूर्वी महिनाभर उधारी दिलेली वसूल केली जायचे. अडचण असेल तर लाचार डोळे पाहून एकेकाळी गणपत वाणी उधार द्यायचा. भुकेल्या लाचार गिऱ्हाईकाला आधार वाटत होता. आणखी वरून

दुकान मालक मूलबाळ उपाशी ठेवू नका सावकाश पैसे आणून द्या असे म्हणायचा. ही भावनिकता ,करुणा आज यंत्रयुगात राहिलेली नाही. आता सर्व जुने संपलेले आहे. महानगरात आता मॉल आले आहेत. इथे माणसाला कवडीमोल किंमत झाली आहे. बाजारपेठेच्या आक्रमणामुळे एकूणच आहरे वर्गाचा चंगळवाद वाढला आहे भोगवाद वृत्ती कशी प्रबळ झाली आहे याचे चित्र अविनाश पाटील यांच्या कवितेत येते. शहर म्हणजे बाजारपेठ ग्राहक आणि विक्रेते हाच एक संबंध मॉलमध्ये असतो. भुसार मालाचे दुकान विरुद्ध मॉल, मार्केट, सुपर मार्केट या लढाईत दुकानं नष्ट होतील हे शोकात्मक सत्य आहे.

आसपास घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे कवी अविनाश पाटील अतिशय सूक्ष्मपणे पाहतात 'रेल्वेच्या डब्यात' या कवितेत महानगरातील माणसांच्या कामगारांच्या जीवनक्रमाचे चित्र येते मुंबईमध्ये औद्योगिकीकरणाचे खूप मोठे जाळे पसरलेले आहे. कारखाने ,कापड गिरण्या सुरू झाल्या. कारखान्यात, कंपनीत, गिरणीत काम करण्यासाठी कामगारांची गरज भासू लागते. हातांना हमखास काम मिळते याची खात्री पटली आणि जागतिकीकरणाने खेड्यातील उद्योगधंदे बंद झाले त्याचा परिणाम होऊन खेड्यापाड्यातून जगाच्या कानाकोपऱ्यातून गरीब माणसांचा प्रचंड लोंढा महानगरात येऊन धडकला खेड्यात रोजगारीचा प्रश्न उभा राहिला. जगण्यासाठी दुसरे साधन उरले नाही. साहजिकच मुंबईसारख्या महानगरात कामगार म्हणून येण्याचे अमिष या खेड्याकडून येणाऱ्या माणसांना भुरळ घालीत होते. शिक्षण फारसे न घेतलेला खेड्यापाड्यातला हा वर्ग मुंबईत पोटाची खळगी भरण्यासाठी आपला जीव पणाला लावण्यास सिद्ध झाला. गोदी कामगार गिरणी कामगार कुली टॅक्सी ड्रायव्हर हमाल हातगाडीवाले वेटर वीट बांधकाम करणारे प्लंबर गिलावा करणारे पोरे भांडीकुंडी धुण्यासाठी वेगवेगळ्या बंगल्यातूनमधून काम करीत धावणारेअपार्टमेंटऱ्या घरगडी बायका मोलकर्णी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार स्त्रिया चाकरमान यांचे जेवणाचे डबे पोहोच करणारी मंडळी मच्छी भाजीपाला विकणारी रस्त्यावर दुकाने थाटून रस्ते का मालसस्ते मे विकणारी माणसे अशा नानाविध ठिकाणी नानाविध कामात स्वतःला झोकून लाखो श्रमिक जीव खुराड्यात कोंबडे कोंडवावे त्याप्रमाणे लोकल रेल्वेचा प्रवास करून जीव मूठीत धरून महानगराला सेवा देण्याचे काम करतात. हा रेल्वेने लोकल प्रवास करणारा कष्टकऱ्यांचा वर्ग स्वतःचे आयुष्य पणाला लावतो 24 तास यंत्रवत जीवन जगणारी कष्टकऱ्यांची लोंढे यंत्राप्रमाणे सतत धावतात अशा महानगरातील लोकल रेल्वेच्या डब्यात प्रवास करणारी माणसे नीरस, सत्वहीन जीवन जगतात त्यांचे चित्रण करताना कवी अविनाश पाटील अधोरेखित करताना लिहितात." पुराचा लोंढा यावा तशी अनावर माणसे रेल्वेच्या डब्यात येतो कुठून हा माणसांचा प्रवाह किडा मुंगी सारखी ही माणसे टिचभर पोटासाठी दाटीवाटीत लटकत असतात जीव टांगणीला टाकून श्वासात भिडे श्वास स्पर्शात भिडे स्पर्श धावतात माणसे घेऊन जगण्याची आस" (अनवट वाटा ,पृष्ठ क्रमांक 47) महानगरीय जीवनचक्रात पुराचा लोंढा यावा त्याप्रमाणे रेल्वेच्या डब्यात हा माणसांचा प्रवाह किड्या मुंग्यासारखी टिचभर पोट भरण्यासाठी आपली चिले पिले जगवण्यासाठी त्यांच्या मुखात चारा घालण्यासाठी जगण्यासाठी किड्यामुंगीप्रमाणे धडपड करून रेल्वेच्या डब्यात दाटी-वाटीत डब्याच्या वर टपावर दारातील सळयांना जीव वळचणीला टांगून श्वास मूठीत धरून जगण्याची आस मनात बाळगून ही माणसे धावतात या माणसांचे जीवन निसत्व झाले आहे. यंत्राप्रमाणे धावणे कष्ट करणे एवढेच नशीब आहे. यातून माणूसपण गमावून बसलेली ही माणसे पशुवत किडा मुंगीप्रमाणे आयुष्य जगत असल्याचे कवी सांगतात,"रेल्वेच्या टपावर खिडकीच्या गजाला धरून जीव घेणा प्रवास श्वापदे शिकारीस धावतात तशी ही माणसे धावतात सिमेंटच्या आरण्यात भक्ष्य शोधण्यासाठी घटकापळे आणि हात कधी कुणाचा निसटला तर हमखास होतो घात घरी जाताना. जातो निषप्राण देह, रेल्वेच्या रुळावर कापलेला"(अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 47) महानगरात माणसाची होणारी श्वापदगत अवस्था प्रकट झाली आहे. मुंबईची गतिमानता रेल्वे यांच्यातील अनन्य संबंध हा महानगरी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा सामाजिक अवकाश आहे. महानगरातील रेल्वेच्या डब्याशी असलेली माणसाच्या जीवनाची गुंतागुंत स्पर्शीत होते .कष्टकरी माणसे आणि रेल्वे यांच्यातील दैनंदिन नातेसंबंधाचा

हा गहिरा जीवघेणा प्रवास या कवितेत साकार झाला आहे. प्रवास करणाऱ्या माणसांची असलेली अखंड कसरत धावपळ त्यातील रेल्वेच्या वेगासह साकार होते काही झाले तरी खिडकीला दारातील सळईला डब्याच्या टपावर लोमकळून कामाला जायचे. धाव धाव करायची; पण वेळेतील लोकल रेल्वे चुकू द्यायची नाही. जीवाची अजिबात ही माणसे पर्वा करीत नाहीत; पण टायमाची रेल्वे चुकली तर सगळं पुढचं वेळापत्रक विस्कटलं पोटाची खळगी भरणार नाही. कुटुंब उपाशी मरेल म्हणून रेल्वे चुकवणे परवडणार नाही. त्यापेक्षा धावपळ करतात या कवितेचे नाते बा. सी. मर्ढेकरांच्या 'मी एक मुंगी, तू एक मुंगी 'या कवितेशी जुळते. रेल्वेच्या डब्यात जीवघेणा प्रवास करणारी माणसे श्वापदे आपले पोट भरण्यासाठी शिकारीस धावतात. तशी ही माणसे या सिमेंट काँक्रीटच्या जंगलात भक्ष्य शोधण्यासाठी धावतात. कोणाचा हात रेल्वेच्या दारातील सळईचा निसटला की, अपघात होतो आणि घराच्या ओढीने जाताना कित्येकांना रेल्वेच्या रुळावर जीव गमावा लागला आहे. चांगली बोलती- चालती कष्टकरी माणसे कागद चुरगाळावा इतक्या सहजतेने अपघातात वेडी वाकडी विद्रूप होतात. त्यांच्या भयावह चेहऱ्याकडे बघावेसे वाटत नाही. अशा अपघातांची, दुःखाची वेगवेगळी रूपे दररोज वर्तमानपत्रात झळकतात. दारिद्र्य बेकारी अपघात, रक्तपात महानगरातील या समस्या जागोजागी पाहून कवी अविनाश पाटील यांचे मन दुःखी होते .मात्र लोकल रेल्वेच्या डब्यातील माणसे सोडत असलेला श्वास निरर्थक नसल्याची सूचना देतो. नोकरी, हाताला मिळणारे काम म्हणजे जीव घड्याळाच्या काट्याला टांगावा लागतो अमुक वाजता कामाला गेले पाहिजे. नाहीतर अर्ध्या दिवसाची मजुरी मिळेल. या धास्तीमुळे त्यांचा श्वास अडकलेला असतो. हे महानगरातील सामाजिक वास्तव कवी अविनाश पाटील यांनी रेल्वेच्या डब्यात या कवितेतून मांडले आहे.

मोबाईलवर सेल्फी काढणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या फरकावर प्रकाश टाकणारी कवी अविनाश पाटील यांची 'सेल्फी' ही कविता आहे. जागतिकीकरणामुळे मोबाईल्स, संगणक, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप, जाहिरातीचे फलक, सिनेमे, रियालिटी शोज, इंटरनेट, सेल्फी इत्यादी चैनीच्या वस्तूंचा उपभोगांचा अतिरेक वाढला आहे. कोरोना महामारीच्या काळात लाकडाऊनच्या नावाखाली ऑनलाइन शिक्षण पद्धतीमुळे घरोघरी मोबाईल झाला. मीडियाची आधीसत्ता सर्वत्र पसरलेला उपभोगतावाद, माणसांमधली स्पर्धात्मकता इत्यादी गोष्टी जागतिकीकरणानंतर नव्वदोत्तर जगात रूढ झाल्या. सेल्फी काढल्यामुळे माणसाची रम्यसृष्टी संपली आहे. या चिंतनाच्या गाभ्यात जागतिकीकरणाने अभूतपूर्व बदल घडवून आणलेले दिसतात. या चंगळवादी जगात अनेक कारणांनी आत्महत्येचे प्रमाणही वाढले आहे. मोबाईल हा आजच्या आपल्या धावपळीच्या युगातील आपल्या जीवनाचा एक भाग बनला आहे; परंतु आज आपल्यासमोर या मोबाईलच्या बाबतीत दुसरी एक महत्त्वाची दुर्लक्षित केली गेलेली भेडसावणारी समस्या आहे. ती म्हणजेच या मोबाईल मध्ये असलेला त्याचा मोबाईल सेल्फी कॅमेरा आजच्या काळात सेल्फी हा एक प्रकारचा छंद म्हणून लोक जोपासत असल्याचे दिसते. आजची पिढी आणि त्याचबरोबर काही थोड्या बहुत प्रमाणात अगदी जुनी पिढीही सोशल मीडियाच्या आहारी गेल्याचे दिसते. की, त्यावर सतत आपण सर्वांच्या नजरेत कसे दिसत राहू यासाठी ह्या आपल्या मोबाईल सेल्फीचा पुरेपूर वापर करण्यात येत आहे. त्याचे वर्णन कवी अविनाश पाटील 'सेल्फी' या कवितेत करताना म्हणतात," मित्रांनो जरा राहा सावध सेल्फीच्या नादानी झुमताना जीवाचाही करा विचार स्वतःला पहा जरा निरखून बेसावध रस्ते तळी विहिरी धावती लोकल उसळता सागर करतील केव्हा घात यांचाही विचार जरा करा निरखून स्वतःला ओळखून ज्ञान म्हणजे आत्मज्ञान पाहावे आपणाशी आपण ही खरी सेल्फी" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक 68) तरुणाईत तर या सेल्फीचे वेड अगदी कळसाला पोहोचलेले आहे. प्रत्येकाला आज या सेल्फीच्या मनोरोगाने जखडलेले आहे. ज्याला त्याला आपण

मिनिटाला काय करतोय कुठे जातो आपण आनंदी आहोत की, दुःखी आहोत आपण कोणाबरोबर आहोत, काय खातोय, पितोय ते सेल्फी काढून पोस्ट करायची घाई झालेली आहे. या स्पर्धेने आपण एकमेकातील प्रेम, जिव्हाळा आपुलकी, नाती संपवत आहोत. म्हणून कवी या तरुण पिढीला सावध राहण्यास सांगतात. काही तरुण तर सहलीला, पिकनिकला गेल्यावर तेथील निसर्गाचा आनंद घेण्याऐवजी उंच डोंगर माथ्यावर नदी, विहीर, पाण्याचा धबधबा, सागर, तलाव, धावती रेल्वे या ठिकाणी खोलवर जाऊन सेल्फी काढताना जीवाचीही पर्वा करीत नाहीत. म्हणून कवी सांगतात की, जीवाचाही विचार करा स्वतःला ओळखा. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान असते. आपल्याजवळ असते ही खरी सेल्फी असते. कवी अविनाश पाटील म्हणतात की, मित्रांनो वेळेतच सावध व्हा. तारुण्याचे पंख लावून उडताना जीवनाचे मोलही करा. जीवन असे कवडी मोलाने गमावून बसू नका. सेल्फी ही आठवणीची असते ती जरा जपून ठेवा भविष्यात येणारा काळ हा फार मधूर आहे. त्यात सुंदर अशी लेणी खोदा असे त्यावर आपल्या ठसा कर्तुत्वाने निर्माण करा आणि ती आयुष्यात कायम काळावर कोरलेली सेल्फी कायम राहील. असा मोलाचा संदेश आजच्या तरुण पिढीला कवी देतात.

तंत्रज्ञानाचा अतोनात वापर ज्या समाजात होतो. तो समाज पोस्टमॉडर्न आहे. असं म्हणता येईल जसजसे औद्योगीकरणोत्तर आधुनिक समाज त्यांच्या व्यक्तिगत आणि सामुदायिक जगण्यात संगणक तंत्रज्ञानाचा वापर करू लागतात. त्यांच्या व्यक्तिगत आणि सामुदायिक जगण्यात मन्वंतर घडू लागतं. तंत्रज्ञानाने उद्धघाटीत केलेले सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बदल अत्यंत प्रत्येयकारी आणि अवाक करणारे असतात. मानवी मनाला चक्राहून सोडणारे बदल तंत्र आणि यंत्राच्या माध्यमातून होतात. या यंत्रांना माणूस कसा वापरतो. यावर यंत्रक्रांतीचे गुणावगुण अवलंबून असतात. माध्यमांचा वापर कसा करायचा हे माणूस ठरवतो.(विश्राम गुप्ते, नवजग नवी कविता, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2016, पृष्ठ क्रमांक 70) रोबोटएक प्रकारची मशीन आहे. जी खास करून कम्प्युटरद्वारा दिलेल्या प्रोग्रामच्या नियमानुसार काम करते रोबोट अनेक अवघड कामे सोपे करण्यास सक्षम असतो. रोबोट हा मेकॅनिकल सॉफ्टवेअर आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजीनिअरिंगच्या मिश्रणाने मिळून बनलेला असतो. रोबोटला नियंत्रित करण्यासाठी डिवाइसचा वापर केला जातो. रोबोट हुबेहूब माणसाप्रमाणे दिसतो. रोबोट कोणत्याही रूपात असतो जास्त करून ते त्या कामावरून ठरवले जाते. छोट्या मोठ्या पार्ट्सला जोडायचं काम रोबो करतो सर्वात पहिल्यांदा 1980 मध्ये एका मोटरकार कंपनीने 200 मजुरांना कामावरून काढून 50 रोबोटला कामावर ठेवले होते. मेडिकल जगतात याचा वापर सर्वात जास्त करतात. खाण्याच्या वस्तू कपडे, गाडी सारख्या गोष्टी ज्या इंडस्ट्रीमध्ये बनवल्या जातात. तिथे रोबोटचा वापर केला जातो.'रोबो' या कवितेत कवी अविनाश पाटील म्हणतात की, "ग्लोबल युगात माणूस यंत्र बनला आहे माणसाचा आता रोबो झाला आहे. सृष्टीतील निसर्ग तत्त्वांचाही विनाश होत आहे. माणूस अर्थ शून्य होत आहे. माणूस संवादहीन आणि रोबोटसारख्या रिमोटने नियंत्रित झाला आहे. सारे चक्रासारखी चालत आहेत. यंत्र बनवून त्याच्या प्रेरणा, संवेदनात थिजले आहेत. जीभ, कान, हात, पाय, डोळे, दात हृदय, मेंदू इत्यादींच्या रूपातील माणसाच्या शरीरातील ऑरगॅनिक प्रॉपर्टी ओरिजनल रूपात होती. तशी आता शिल्लक राहिली नाही. माणसंही एकदाच ब्रॅण्डेड बनत चालली आहेत. मोबाईल आणि फेसबुकमध्ये आजची पिढी मग्न आहे. मानवी विकासात हे सोसेल मीडिया बाधा ठरत आहे. सत्य- असत्य कोण शोधणार कारण माणसे झाली यंत्रमानव एकच चेहरा एकच मेंदू माणसाचा रोबोट झाला आहे.एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर काळजाची हार्ड डिस्क झाली. मेंदूचा प्रोसेसर झाला आहे. वेबसाईटवर शोधत आहेत वधू.

मेमरीकार्ड आता बदलायला हवं. कारण आठवणींची गर्दी झालीय. म्हणून सारी स्वप्ने डीलिट करायला हवं. म्हणजे मोबाईलमध्ये जेवढ्या फाईल्स डीलिट करणे म्हणजे मानवी जीवनात या रोबोला काढून टाकणे होय.

सारांश औद्योगिकक्रांती आणि वैज्ञानिक प्रगतीच्या झपाट्यात विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जगभर महानगरी उभी राहिली. रोजगार मिळविण्यासाठी खेड्यापाड्यातील वेगवेगळ्या प्रदेशातील वेगवेगळ्या जाती धर्माची वेगवेगळ्या सांस्कृतिक रितीरिवाजांचा लोकसमूह महानगरात येऊन स्थलांतरित झाला. माणसाचा खूप मोठा समूह शहरात एकत्र असूनही समूहाचे भावबंद निर्माण होत नाहीत. जगण्यातील कमालीच्या व्यक्तीकेंद्रितेमुळे माणसांच्या अफाट गर्दीतही इथला माणूस काय एकटाच असतो. आर्थिक दुरावस्था, बेकारी, असुरक्षितता, वेगवेगळे आचार, विचार बहिष्कृत आणि गलिच्छ वस्त्यातील दैन्य, अत्याचार, गुंडगिरी, झोपडपट्ट्या, व्यसनाधीनता, प्रदूषण, गोंधळ, गोंगाट, दंगल, धकाधकीचे आणि धावपळीचे जीवन यातून महानगरीय जीवन गुदमरून टाकणारे आणि विनाशाकडे घेऊन जाणारे असे बनलेले आहे. या पार्श्वभूमीवर बदलत्या वैश्विक जाणीवेशी सतत सहकंप पावणाऱ्या अविनाश पाटील यांनी अभिरुचीच्या नव्या वाटा चोखाळल्या. स्वच्छंदवादाला प्रखर विरोध करीत यंत्राच्या आणि यांत्रिक जीवनाच्या विराट चक्रात सापडून यंत्रवत बनून मरून जाणाऱ्या सामान्य माणसाचे दुःख त्याचे वास्तव जीवन प्रगट केले. महानगरात प्रचंड गर्दी असली तरी या गर्दीला स्वतःचा चेहरा नाही. गर्दीच्या गदारोळात व्यक्ती कमालीची एकटी पडल्यामुळे महानगरीय जगण्याच्या रहाटगाडग्यात पावला- पावलावर अस्तित्व नाकारल्यामुळे पोकळी जाणू लागली. महानगरीय संस्कृतीत माणूस दिवाळखोरीत निघाल्यामुळे त्याचे अस्तित्व निरर्थक बनले.माणूस चैतन्यहीन परात्म झाला. महानगरीय जगण्यातील स्वतःच्या अस्तित्वाविषयीचा पेच आणि कोंडमारा झालेला माणूस जेलमधील हातकडी घालून ठेवलेला कैदी वाटतो. सामान्य माणसाची अगतिकता, विषम अर्थव्यवस्था, उत्पन्न अगदी तुटपुंजे, महागाई, गळचे पी, जगण्यासाठी आटापिटा, दैन्य, दारिद्र्य, सामाजिकत्व, सांस्कृतिक जुलूम अशा समस्यामुळे महानगरीय माणसाची स्वप्ने पायदळी तुडवली जातात. मुंबईसारख्या महानगराच्या जीवनक्रमात कामगार आणि श्रमिकवर्ग यांची गळचेपी, कष्टकऱ्यांच्या जीवनातील वास्तवता कवी अविनाश पाटील यांनी महानगरीय कवितांमधून प्रकट केली आहे. महानगरीय जीवन म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. माणूस किड्यामुंग्यासारखे,श्वापदासारखे जीवन जगतो. महानगरात सामान्य माणसाला जगणे अशक्य होऊन जगण्यातली हतबलता त्याच्या वाट्याला येते. जगण्यातील दाखवेगिरी खोटेपणा, भंपकपणा यातून नैसर्गिक स्वत्व हरवून जाते. आत्मविटंबना त्याच्या वाट्याला येते. गर्दी अपघात, हिंसाचार , चेंगराचेंगरी, गुन्हेगारी, हिंसा अशा अनेक गोष्टींना तोंड देताना महानगरीय माणूस सतत असुरक्षिततेच्या भोवऱ्यात अडकला आहे. अनेक आंतरविरोधी वृत्ती प्रवृत्तींनी गांजलेल्या महानगरीय वास्तवात जगताना होणारी माणसाची घुसमट एकाकीपण त्याच्या वाट्याला येते.

अशा प्रकारे जागतिकीकरणातील समकालीन घरासमोर, मोबाईल, सकाळची मुंबई, रेल्वेच्या डब्यात, सेल्फी, रोबो अशा 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील प्रतिनिधिक कविता अविनाश पाटील यांनी व्हर्च्युअल जगाचंआक्रमण होत चाललंय. ते मानवीपणाला काराल करत जाईल. असा इशारा दिला आहे. घरांना कुंपणे पडून त्यांच्या बंदीशाळा झाल्यात. याकडे आपले लक्ष कवीवेधतात.

संदर्भ ग्रंथ :-

१) अविनाश पाटील,'अनवट वाटा', साहित्य अभिरुची प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती 2016.

२) रफिक सुरज,'महानगरीय कविता नवे वळण नवे परिमाण' शब्द पब्लिकेशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 2021

३)विश्राम गुप्ते,'नवंजग नवी कविता', संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2016

४) किशोर सानप,'युगांतराची कविता', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती 2019

५) पी. विठ्ठल,'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स ,औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2019.

जागतिकीकरणाच्या दृष्टीकोणातून बुध्द तत्वज्ञानाचे योगदान

प्रा. डॉ. बालाजी मारूती गव्हाळे

पालि विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव, ता. गंगाखेड, जि.परभणी - 431536

प्रस्तावना :

बुद्ध हे भारतीय तत्त्वज्ञ, ध्यानी, आध्यात्मिक शिक्षक व समाजसुधारक होते. गौतम बुद्ध, शाक्य मूनी बुद्ध, सिद्धार्थ गौतम, सम्यक सम्मासं बुद्धही त्यांची अन्य नावे आहेत. शाक्य गणराज्याचा राजा शुद्धोधन व त्यांची पत्नी महाराणी महामाया यांच्या पोटी शाक्य कुळामध्ये इ.स.पू. ५६३ मध्ये लुंबिनी येथे बुद्धाचा जन्म झाला. या राजकुमाराचे नाव 'सिद्धार्थ' असे ठेवण्यात आले. सिद्धार्थाच्या जन्मानंतर अवघ्या सातव्या दिवशीच त्यांची आई महामाया यांचे निधन झाले. आईचे छत्र हरवलेल्या सिद्धार्थाचा सांभाळ त्यांची मावशी व सावत्र आई महाप्रजापती गौतमी यांनी केला. त्यामुळे राजकुमार सिद्धार्थाला 'गौतम' या नावानेही ओळखले जाते. राजकुमार सिद्धार्थ गौतमास आवश्यक असे सर्व शिक्षण देण्यात आले. इ.स.पू. ५४७ मध्ये यशोधरा या सुंदर राजकुमारीशी सिद्धार्थ गौतमाचा विवाह झाला व पुढे त्यांना राहुल नावाचा एक पुत्र झाला.

शाक्यमुनी (शाक्यांचा मुनी) हे गौतमाचेच दुसरे नाव. हा बुद्ध धम्माचा मुख्य स्तंभ. त्यांची जीवन कहाणी, त्यांची प्रवचने आणि त्यांनी घालून दिलेले विहाराचे नियम पवित्र मानून ते त्यांच्या अनुयायांनी गौतम बुद्धाच्या महापरि निर्वाणानंतर संकलित केले. गौतम बुद्धांच्या मानल्या जाणाऱ्या विविध शिकवणुकी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पाठांतरा द्वारे सुपूर्द होत गेल्या. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर ही शिकवणूक लेखी स्वरूपात प्रथम मांडली गेली. तथागत बुद्धांचे सर्व तत्त्वज्ञान हे पालि भाषेमध्ये मांडले गेले आहे. त्रिपिटका मधून तत्त्वज्ञानाची माहिती मिळते. भारत हे बुद्ध धम्माची मूळ भूमी असली तरी भारताबाहेर ही मोठ्या प्रमाणावर बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार घडून आला. आजही अनेक देशांमध्ये बुद्ध धम्म हा खूप चांगल्या स्थितीमध्ये असलेला पाहायला मिळतो. मात्र भारत ही बुद्ध धम्माची मूळ भूमी असताना ही या भूमी पासून काहीसा तो दुरावलेला दिसतो. चीन, जापान, सिंगापुर, कोरिया, थाईलैंड, म्यानमार, कंबोडिया व श्रीलंका अश्या अनेक देशांमध्ये या धर्माचा खूप मोठा प्रभाव आजही कायम असलेला दिसून येतो.

बुद्ध धर्म हा भारताच्या श्रमण परंपरेतून निर्माण झालेला एक धम्म आणि तत्वज्ञान आहे. बुद्धधर्म हा एक सत्य अनादी शुद्ध सद्धम्म आहे. याचे वर्णन धम्मपद या ग्रंथामध्ये पाहावयास मिळते आणि याच सद्धर्ममार्गा पासून अनेक पंथांची उत्पत्ती झालेली आहे. तथागत भगवान बुद्ध यांनी इसवीसन पूर्व सहाव्या शतकात बुद्ध धम्माचे धम्मचक्र परिवर्तन करून महान उपदेश दिले आहे. या बुद्धधम्माची स्थापना स्वतः बुद्धत्वा पासून झाली आहे. कारण बुद्धांची परंपरा ही अनादी आहे. तथागत भगवान गौतम बुद्धांच्या पुर्वी सुध्दा बुद्ध होऊन गेले आहेत. त्यामुळे तीच अनादि परंपरा सिद्धार्थ गौतम बुद्धांनी पुढे नेली आहे. याचा उल्लेख पालि त्रिपिटकातील बुद्ध वंसया ग्रंथामध्ये आढळून येतो. तथागत भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर पुढील दोन शतकात सम्राट अशोक यांच्या काळात बुद्धधर्माचा भारतभर प्रचार आणि प्रसार झालेला आहे आणि त्यापुढील दोन हजार पाचशे वर्षांमध्ये हा धर्म मध्य, पूर्व आणि आग्नेय भारता सोबतच जगभरात पसरलेला आहे.

बुध्दधम्म हा आपल्या जन्म स्थानापासून निघून जगभर पसरलेला जगातील पहिला धम्म होय. बुद्धधम्म हा अनिश्वरवादी, अनात्मतावादी, समतावादी, विज्ञानवादी, मानवतावादी धर्म होय. सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी मानव जातीला प्रज्ञा, शील, करुणा या तत्त्वांची शिकवण दिलेली आहे. बौद्धधर्म हा स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, करुणा, मैत्री, प्रज्ञा, मानवी मूल्य, विज्ञानवादया तत्त्वांचा पुरस्कर्ता आहे. आधुनिक विज्ञान आणि मानवी मूल्यांचे समर्थन करणारा धर्म म्हणून बुद्ध धम्माला एक वेगळी ओळख मिळाली आहे.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून बुद्धधम्म हा भारतातील एक अति प्राचीन, तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून मानवी मूल्यांचा पुरस्कर्ता, विज्ञान निष्ठ व परिवर्तनशील धर्म आहे. बुद्धधर्म हा भारतीय धर्म असून भारताच्या इतिहासात हा या धर्माच्या उदयाला मोठे स्थान आहे. बौद्ध संस्कृतीचे सर्वात मोठे योगदान मौर्य कला, गांधार कला व मथुरा कला यामध्ये आढळते, तर बौद्धधर्माचा व तत्त्वांचा प्रचार व प्रसार भारताबरोबरच शेजारील अनेक देशांमध्ये ही झालेला आहे. पालि तिपिटकांच्या स्वरूपातील साहित्य व विविध पंथीय साहित्य हे बौद्ध संस्कृतीच्या रुपाने जगातील अनेक देशांमध्ये पसरले आहे. आज बौद्ध संस्कृतीचा ठसा हा विहार, स्तूप, मठ, चैत्यव लेण्या ह्या मौर्य कलेच्या प्रतिकांच्या रुपाने स्पष्ट दिसतो. जगाच्या आणि भारताच्या जीवन विषयक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि विशेषतः धार्मिक बाजूंवर बुद्ध धर्माची खोलवर व न पुसणारी अशी छाप पडलेली आहे. आज आधुनिक जगात बुद्ध उपदेश सर्वच स्तरावर उपयुक्त आहे.

आज बौद्ध अनुयायी लोक तथागत भगवान बुद्धांना वर्तमान काळातील सर्वश्रेष्ठ बुद्ध (सम्यकसं बुद्ध) मानतात. जगाच्या इतिहासातील महामानवामध्ये तथागत बुद्ध हे सर्व श्रेष्ठ मानले जातात. इंग्लंडच्या जग प्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठाने ज्यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करून मानव जातीच्या उत्थानासाठी महान कार्य केली, अशा मागील दहा हजार वर्षां मधील जगातील सर्व श्रेष्ठ समजल्या गेलेल्या शंभर विश्व मानवांची यादी तयार केली होती. त्या यादीत या विद्यापीठाने प्रथम स्थानी तथागत बुद्धांना ठेवले होते. जागतिक इतिहासातील सर्वाधिक प्रभावशाली मानव म्हणून तथागत बुद्धांचे नाव अग्रस्थानी आहे.

उद्देश :

१. जागतिकीकरणात बुद्ध धम्माचे योगदान स्पष्ट करणे.

२. जागतिकीकरणात बुद्ध तत्त्वज्ञान उपयुक्त आहे किंवा नाही हे अभ्यासणे.

३. बुद्धकालीन भिक्षु आणि आजचा भिक्षू यांच्या आचार विचारांचा अभ्यास करणे.

४. बुद्धधम्मातील नैतिकता स्पष्ट करणे.

महत्त्व :

गृह त्यागा नंतर सिद्धार्थ गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खूप चिंतन केले. कठोर तपस्या केली. शेवटी वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना दिव्यज्ञान प्राप्ती झाले. या दिव्य ज्ञानाला संबोधी, बुद्धत्व किंवा निर्वाण असेही म्हणतात. ज्ञान प्राप्तीनंतर सिद्धार्थ गौतमाला सर्वजण बुद्ध असे म्हणू लागले. बुद्ध ही व्यक्ती नव्हे, तर ती ज्ञानाची अवस्था आहे. बुद्ध म्हणजे अतिशय ज्ञानी मनुष्य होय. आज आधुनिक काळामध्ये सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणात बदल घडताना दिसतो. माणसांची रहाणी. बोली भाषा तसेच आचार-विचारांमध्ये बरीच प्रगती झालेली दिसून येत आहे. परंतु माणसांच्या जीवनात सुख उपयोगी साधनांचा शोध लागल्यामुळे, नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे मानवाला त्यापासून आनंद, सुख तर मिळतेच, परंतु त्यापाठी मागे दुःख दुप्पट अनुभवायला मिळत आहे. नवीन

तंत्रज्ञानामुळे मानवाचा विकास तर होतोच, पण त्यांच्या जास्त आहारी गेल्यामुळे प्रकृती आणि सृष्टी बिघडत चालली आहे. ज्या गोष्टींमुळे आजच्या युगात दुःख वाट्याला येते, त्या दुःखांवर उपाय फक्त बुद्ध धम्माचा उपदेश आहे. कारण ते मानवाच्या हितासाठी सर्वच प्राण्यांच्या आद्य हितासाठी मध्य हितासाठी व सुखासाठी आणि अंत्यही हीत आणि सुखासाठी कल्याणकारी आहे.

आज आधुनिक काळात बुद्धाची शिकवण महत्त्वाची आहे. कारण जगात अनेक जाती धर्म पंथीय लोक आहेत. वेगवेगळी तत्त्वप्रणाली आहे. धर्मानी दिलेली रूढी – परंपरा जोपासावी लागते. म्हणून इतर धर्मीय लोक अनेक बंधनांना बळी पडतात आणि त्यासाठी कुठलेही कार्य करायचे असल्यास दुसऱ्याची मदत घेत असतात. त्यामध्ये अनेक प्रकारची भीती दाखवून सर्वसामान्य लोकांना देवाच्या नावावर लुबाडले जाते. अंध श्रद्धा निर्माण करून प्राणी हिंसा केली जाते. परंतु बुद्ध तत्वज्ञान यापेक्षा वेगळी आहे. सर्वसमावेशक संपूर्ण विश्वाला आपल्या कवेत घेणारे आहे. बुद्ध तत्वज्ञान विश्वातील प्रत्येक सजीव प्राण्यांसाठी तसेच घटकांसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, स्वाभिमान करुणा, मैत्री या जीवन मूल्यांचा स्वीकार करून संपूर्ण सजीव प्राण्यांना बंधमुक्त केले आहे. धम्म कसा आहे तर **स्वाखातो भगवतो धम्मा। सन्दिट्ठि, अकालिको, एहिपस्सिको, ओपनियको, पच्चत वेदितब्बो विञ्युहिति।।** यामधून धम्म हा उच्चतम विचार आहे. जो चांगल्या प्रकारे समजावून सांगितला आहे. तो स्वतःच्या डोळयाने दिसणारा आहे. अनंतकाळापासून चालत आलेला आहे. स्वतः त्याची रचना पाहून अनुभव घेऊन बुद्धिमत्तेच्या जोरावर त्याचा साक्षात्कार करू शकतो. धम्मचक्र गतिमान ठेवण्याचे काम भिक्षु संघानेच अविरत केले आहे. सर्व प्रथम पंचवर्गीय भिक्षू पासून धम्मचक्र प्रवर्तन झाले असून तेथूनच संघ अस्तित्वात आलेला आहे. बुद्ध पूर्वकाळा अगोदर वर्णव्यवस्था होती व बुद्धकाळाच्या नंतर जाती व्यवस्था आली ती आजपावेतो चालत आलेला उच्च-नीचतेची समस्या संपुष्टात आणावयाची असल्यास बुद्ध तत्त्वज्ञानच उपयुक्त आहे. ही जाती व्यवस्था दूर करण्यासाठी सर्वप्रथम कोणी लढा उभारला असेल तर ते फक्त बुद्धच आहे. आज जागतिकीकरणाच्या भांडवलशाही, साम्राज्यवादी धोरणाने संबंध जगात ग्रस्त झाली आहे. अशा विभ्रांत झालेल्या संवेदनशील मनाला भ्राणती वर आणण्यासाठी पर्यायी, जगाच्या पुनर्रचनेसाठी बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची नितांत आवश्यकता आहे.

बुद्धांची शिकवण :

बुद्ध धम्मामध्ये नैतिक मूल्यांची प्रासंगिकता अभ्यासली आहे. ज्याप्रमाणे आधुनिकीकरणात कुशल कर्म आणि कुशल मन यांचा अभाव दिसून येतो. पंचशील ही नैतिक मूल्य आहेत. जर मनुष्य या मूल्यांच्या आधारित जीवन जगू लागला तर जीवनात कुठली ही आपत्ती येत नाही. परंतु आधुनिक समाजात या पंचशीलाचा मानव विचार करीत नाही व स्वतःच स्वतःचा घात करताना दिसत आहेत. नैतिक मूल्यांचा अंगीकार केल्याने स्वत: बरोबर दुसऱ्याचे पण हीत साधत असते. असा मोलाचा संदेश बुद्ध तत्वज्ञानात आहे. तथागत भगवान बुद्धांनी पालि या लोक भाषेतून अत्यंत साध्या आणि सोप्या पद्धतीने शिकवण, आचार – विचार सांगितले आहे. तथागत भगवान बुद्धांची व त्यांच्या धम्माची शिकवण व आचरण यासाठी त्रिशरण, चार आर्य सत्य, अष्टांगिक मार्ग व पंचशील महत्त्वाचे आहेत. तथागत भगवान बुद्ध म्हणतात, 'मानवी जीवन हे दुःखमय आहे, दुःखाची निर्मिती तृष्णेतून म्हणजेच वासना, इच्छा, असक्ती, आवड इत्यादीं पासून होते. म्हणून या तृष्णेवर, आपल्या ईच्छांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. यासाठी मध्यम मार्गाचा म्हणजेच **आर्य अष्टांगिक मार्गांचा** अवलंब केला पाहिजे.

दुःख म्हणजेच मानवी जीवन हे दुःखमय आहे. तृष्णा म्हणजेच मनुष्याच्या न संपणाऱ्या इच्छा हे दुःखाचे कारण आहे. दुःख निरोध म्हणजेच दुःखाचे निराकरण व अंत सर्व प्रकारची असक्ती सोडण्याने होते. आणि दुःख निरोध गामिनी प्रतिपदा म्हणजेच दुःख निवारण्यासाठी सदाचाराचा मार्ग म्हणजेच आर्य अष्टांगिक मार्ग महत्त्वाचा आहे. तथागत भगवान बुद्धाने आपल्या अनुयायांना अहिंसा म्हणजेच मी प्राणी हिंसा करण्यापासून दूर राहणाऱ्या शीलाचरणाचे पालन करतो. मी चोरी करण्यापासून दूर राहणाऱ्या शीलाचरणाचे पालन करतो. मी कामवासने पासून दूर राहणाऱ्या शीलाचरणाचे पालन करतो. मी खोटे बोलण्यापासून तसेच व्यर्थ बडबड व निंदा करण्या पासून दूर राहणाऱ्या शीलाचरणाचे पालन करतो आणि मी मद्य, मादक तसेच इतर सर्व मोहात पाडणाऱ्या मादक वस्तूंच्या शेवना पासून दूर राहणाऱ्या शीलाचरणाचे पालन करतो अशा प्रकारच्या पाच शीलाची म्हणजेच **पंचशीलाची शिकवण** तथागत भगवान बुद्धांनी दिली आहे. या बौद्ध तत्वांचा, शिकवणुकीचा मानवाने जीवनात अंगीकार केला तर मानवी अस्तित्व असताना नक्कीच तो दुःख मुक्त होऊन आदर्श जीवन जगू शकतो.

तथागत भगवान बुद्धांनी सारनाथ येथे धम्मचक्र परिवर्तनाचे विवेचन करताना निती आणि सदाचाराला महत्त्व दिले आहे. व मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी तसेच निर्वाणाच्या समीप पोहोचण्यासाठी आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजेच मध्यम मार्ग सांगितलेला आहे. आर्य अष्टांगिक मार्ग हा एक सदाचाराचा मार्ग आहे. या आठ गोष्टींच्या पालनामुळे मानवाचे जीवन सुखमय होते. ते आठ गोष्टी म्हणजेच सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मांत, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी होय. तसेच तथागत भगवान बुद्धाने दहा पारमिता सांगितलेल्या आहेत. त्यांनी सांगितलेल्या या दहा पारमिता ह्या शील मार्ग होत. त्यामध्ये शील, दान, उपेक्षा, नैष्कर्म्य, वीर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, करुणा आणि मैत्री होय. बुद्ध धम्माचे तत्वज्ञान हे बहुतांशी विज्ञानवादी आहे. बुद्ध धम्मात समानता आहे. विज्ञान व बुद्ध धर्माचा एकच उद्देश आहे तो म्हणजे सत्याचा शोध होय. बुद्धतत्त्वज्ञानाचा प्रभाव पडताना त्यातील अहिंसा, सर्वप्राणी मात्रां विषयी प्रेम व सहानुभूती इत्यादी विचारांनी प्रभाव पडलेला आहे. तसेच वैचारिक स्वातंत्र्य, सद्‌गुणांचा विकास, समता तत्त्वांचा प्रभाव, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास, नैतिक सिद्धांताचा प्रभाव महत्त्वाचा आहे.

भिक्षू संघाची वाटचाल :

आज भारतातच नव्हे तर पुर्ण विश्वात बुध्द धम्माचा संघ स्थापित झाला आहे. बुद्ध, धम्म आणि संघ या त्रि सूत्रावर बुद्ध तत्वज्ञान आधारित धम्म निरंतर सार्वजनिक जीवनामध्ये उपयुक्त आहे. बुद्ध तत्वज्ञान अमर असून निरंतर जीवसृष्टी असेपर्यंत उपयुक्त आहे. सम्राट अशोकाच्या काळापासून झालेल्या बुद्ध धम्माच्या विकासा नंतर अनेक आक्रमण होऊन ऱ्हास झाला असला तरी आज एक विसाव्या शतकात बौद्ध धम्म प्रत्येक देशांमध्ये अमर स्वरूपात जिवंत आहे आणि तो चंद्र, सूर्य, तारे, पृथ्वी असे पर्यंत जिवंत राहील. यासाठी भिक्षु संघाची चाललेली वाटचाल फार प्रेरणादायी आहे. आदर्श भिक्षु कसा असावा यावर तथागत भगवान बुद्धांचे विचार खूप महत्त्वाचे आहेत. बुद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करणारे भिक्षु आधुनिक काळात त्याचा किती प्रमाणात सहभाग आहे आणि भिक्षु कसा असला पाहिजे हे ही महत्त्वाचे आहे. भारतापेक्षा ब्रह्मदेश, म्यानमार, थायलँड व इतर प्रगत देशांमध्ये बुद्ध धम्माचा फार मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झालेला आहे.

तथागत भगवान बुद्धांनी समाजातील सर्वथरातील लोकांना भिक्षु संघात सामिल करुन घेतले होते. त्यांनी माणसामाणसात कसलाच भेदभाव ठेवला नाही. अंगुली माल सारख्या भयंकर डाकूला संघात प्रवेश दिला. त्याच बरोबर सुनीत नावाच्या भंग्यास आणि सोपाक नावाच्या समाजातील हलक्या थरातील समजल्या जाणाऱ्या

लोकांना सुद्धा भिक्षु संघात प्रवेश दिला. तथागत भगवान बुद्ध असे म्हणतात की, ज्या कोणत्या महानद्या आहेत- जसे की गंगा, यमुना, सरयू, गंडक इत्यादी सर्व नद्या महासमुद्राला प्राप्त झाल्यावर आपल्या पहिल्या नावाला गोत्राला सोडत असतात. त्याप्रमाणे भिक्षूंनो, क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य, शूद्र हे चार ही वर्णन तथागत भगवान बुद्धांनी सांगितलेल्या धम्म विनयात घरातून बेघर होऊन प्रव्रज्जित होऊन, पूर्वीच्या नाव गोत्राला सोडत असतात, असे म्हणत.

भिक्षु संघाच्या आचरणासाठी विनयपिटक अनुसार 227 नियमां पैकी काही ठळक नियमांचा अभ्यास आदर्श निर्माण करण्यासाठी घेतलेला आहे. धम्म आचरण मार्ग आहे, परंतु भिक्षु संघाने त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतलेले असते परंतु काही भिक्षु गण या मार्गा पासून विचलित झालेले आढळतात. भिक्षु संघाला समाजात वावरताना कसे वागावे, कसे बसावे, कसे चालावे, कसे बोलावे या संबंधि तसेखीय धम्माचे पालन करणे आज एक काळाची गरज आहे. भिक्षूंच्या प्रतिज्ञा म्हणजे पंचशीलाचे पालन करणे होय. तसेच भिक्षूला शरीर आच्छादनासाठी तीनचीवर म्हणजेच कमरेस गुंडाळण्याचे अंतरवास, अंगावर घ्यावयाचे उत्तरा संघ, थंडी, वार्‌यापासून रक्षण करण्यासाठी संघाटी, करगोठा, भिक्षापात्र, वस्तरा, सुईधागा, पाणी गाळण्याचा कपडा इत्यादी वस्तू जवळ बाळगता येतात. त्यापेक्षा अधिक नाही. भिक्षु निर्धन राहण्याची प्रतिज्ञा करतो. अन्नासाठी त्यांनी भिक्षा मागितली पाहिजे. परंतु आज मोजकेच भिक्षु असे वावरताना दिसत आहेत. ज्या भिक्षूने चित्तमलाचे सर्व विकार धुवून काढून टाकली आहेत, ज्याच्या अंगी सद्‌गुणांची वाढ झालेली आहे, जो सत्य आणि संयम पाळायला शिकला आहे, तोच खरोखर कासाय वस्त्रे धारण करण्यास योग्य आहे. बुद्ध धम्मात सांगितलेल्या आदर्श तत्त्वप्रणाली प्रमाणे समाज व्यवस्था निर्माण करणे, यासाठी स्वतःच्या आदर्श वागणुकीचा उत्तम नमुना ठेवणे हा हेतू भिक्षू संघात असला पाहिजे.

निष्कर्ष :

2. जगात सर्वात प्रथम नीतिमान धर्म कोणता असेल तर तो म्हणजे बौद्ध धर्म होय.
3. जो तत्वज्ञानी तर्काच्या आधारे विवेकावर चिकित्सा करतो त्यासर्व तत्त्वज्ञान महापुरुषांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केलेला आहे.
4. तथागत बुद्धांनी सामाजिक संदेशामध्ये ईश्वराचे अस्तित्व मान्य केले नाही. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि मोक्ष या गोष्टींना त्यांनी थारा दिला नाही.
5. प्रतित्य समुत्पादाला कार्यकारण भाव या तत्वाला आपले पायाभूत अस्तित्व मानले आहे.
6. बुद्ध तत्वज्ञानातील धार्मिक प्रासंगिकता सांगताना चार आर्य सत्य ही एकमेव सत्य जगाने मान्य केली आहे.
7. वर्तमान काळामध्ये तथागत बुद्धाचे राजकीय विचार आज ही प्रासंगिक आहेत.
8. आर्य अष्टांगिक मार्ग आचार धम्म आहे त्यामुळे त्यांचा जीवनात आनंद मिळू शकतो.
9. तथागत बुद्ध स्वतःला जास्त महत्त्व देत नाहीत तर धम्माला त्यांनी स्वतः पेक्षा जास्त महत्त्व दिलेली आहे. कारण धर्म म्हणजे नीती सदाचार जीवन सुचिता राखणे, जीवनात निर्वाण प्राप्त करणे, तृष्णा त्याग सर्व संस्कार अशाश्वत आहेत असे मानणे, कर्म हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे हे मानणे म्हणजेच धम्म होय.

10. तथागत भगवान बुद्धाने अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी कार्यकारण भाव सांगितला आहे. त्यालाच प्रतित्य समुत्पाद असे ही म्हणतात. कारण कोणती ही गोष्ट विनाकारण घडत नाही, तर त्याचे कारण असल्या शिवाय विश्वातील कोणतीच घटना घडत नाही असा महान संदेश तथागत बुद्धांनी दिलेला आहे.
11. आज आधुनिक काळात अनेक समस्या भेडसावत आहेत. तेव्हा या सर्व समस्यांचे निराकरण फक्त बुद्ध तत्वज्ञान करू शकते.

संदर्भ ग्रंथ :

1. **विनय पिटक – पाराजिका पालि**, (1998) विपश्यना विशोधन विन्यास, धम्मगिरी इगतपुरी, नाशिक.
2. जयशंकर मिश्र,(1983) **प्राचीन भारतका सामाजिक इतिहास**, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी पटना.
3. परमानंद सिंह, (2008) **बौद्ध साहित्य में भारतीय समाज**, मोतीलाल बनारसी दास, दिल्ली.
4. भदन्त सावंगी मेधकर, (1995) **दस पारमिता ए**, काशिनाथ मेश्राम, बुद्ध भूमी प्रकाशन नागपूर. 1995
5. भिक्खू जगदीस कस्सपो, (1960) **सुत्त पिटके अंगुत्तर निकाय पालि**, बिहार राजकीयेन पालि पकासन मण्डलेन पकासिता.
6. भरत सिंह उपाध्याय, (2000) **पालि साहित्य का इतिहास**, हिंदी साहित्य संमेलन प्रयाग, संमेलनमार्ग, इलाहाबाद.
7. मालती बोदले, (1991), **बौद्ध साहित्य आणि साहित्यकार**, अनोमा प्रकाशन, हनुमान नगर, नागपुर.
8. मा.श. मोरे, (2009), **भगवान बुद्धांचा मध्यम मार्ग**, कौशल्य प्रकाशन, हडको, औरंगाबाद.
9. भिक्षू संघरक्षित, (2008), **आर्य अष्टांगिक मार्ग**, सुगत प्रकाशन, वैशाली नगर, नागपुर.
10. मा. श. मोरे, (2007), **सुत्तपिटक- अंगुत्तरनि काय** भाग-एक व दोन, कौशल्य प्रकाशन, हडको, औरंगाबाद.
11. राहुल सांकृत्यायन,(2005) **विनय पिटक पालि**, प्रकाशक बौद्ध एज्युकेशन फाउंडेशन, तैवान.
12. स्वामी द्वारकादास शास्त्री, (2003) **खुद्दकनिकाये – खुद्दक पाठ पालि**, बौद्ध भारती प्रकाशन वाराणसी.

बौद्ध तत्त्वज्ञान आणि भारत

प्रा. डॉ. सारिका विष्णू केदार

सहाय्यक प्राध्यापक व पाली विभाग प्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव, ता.गंगाखेड जि. परभणी

प्रस्तावना:

जगामध्ये वेगवेगळ्या विचारधारा आणि त्यांची तत्त्वज्ञान अस्तित्वात आहेत. जगामध्ये विविध धर्म आणि त्यांची विचारधारा ही आज प्रचलित आहे. जगातील मोठ्या धर्मापैकी एक महत्त्वाचा बौद्ध धर्म आहे. बौद्ध धम्माचे संस्थापक गौतम बुद्ध यांचा कालखंड इसवी सन पूर्व सहावे शतक असा मानला जातो. प्राचीन भारतातील वैदिक धर्मातील यज्ञकांडे, हिंसा, ब्राह्मण व वर्चस्व आधारित कर्मकांडे यांची प्रतिक्रिया म्हणून बौद्ध तत्त्वज्ञानाचा उगम झाला असे मानले जाते. हे शतक मानवी इतिहासातील महत्त्वाचे शतक आहे. धार्मिक क्षेत्रात औपनिषदिक विचारामुळे यज्ञमूलक हिंदू धर्मावर उपनिषदकारांनी हल्ले चढविले. उपनिषदातील विचार-ब्राह्मण, आत्मन, मुक्ती, कर्म, मानव, ईश्वर, जगत, जीवात्मा, परमात्मा यावर केंद्रित होते. आत्मज्ञान प्राप्तीसाठी ज्ञान मार्ग श्रेष्ठ मार्ग असून त्यासाठी तत्वचिंतन आवश्यक आहे हा विचार समृद्ध होऊन भौतिक सुखापेक्षा अध्यात्मिक बल वाढविण्याचा लोक प्रयत्न करत होते. वैदिक संस्कृतीतील यज्ञयागाचे क्लिष्ट स्वरूप आकलन होत नव्हते. उपनिषदकारांना केलेली बौद्धिक, वैचारिक जागृती पुरेशी नव्हती. या वैचारिक पोकळीत बरेच संप्रदाय प्रचलित होऊ लागले होते. पालि वाङ्मयानुसार बौद्ध धर्माच्या उदयकाली असे 62 संप्रदाय अस्तित्वात होते तर जैन मतानुसार त्यांची संख्या 363 होती अशा काळातच जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. प्रस्तुत शोधनिबंधातून बौद्ध तत्त्वज्ञान व भारत यासंदर्भात विवेचन केले आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे:

1. तत्त्वज्ञानाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.
3. बौद्ध तत्वज्ञान व भारत यासंदर्भात अभ्यास करणे.

विषय विवेचन:

तत्त्वज्ञान म्हणजे काय? असे जर आपण म्हटले तर तत्व अधिक ज्ञान, तत्व बरोबर सत्य, यथार्थ रूप बरोबर सत्य स्वरूपाचे ज्ञान असे आपणास सांगता येते. या संदर्भात शंकराचार्य म्हणतात, तत बरोबर ब्रह्म व त्व बरोबर भाव किंवा रूप, तत्त्व म्हणजे ब्रह्माचे स्वरूप. ब्रह्माची रूप बरोबर ब्रह्म स्वरूपाचे ज्ञान बरोबर आपण दर्शन म्हणतो. ज्याच्या योगाने, सामर्थ्याने यथार्थ तत्त्व पाहिले जाते किंवा जाणले जाते ते दर्शन.सत्याचे दर्शन घडविणे असा त्याचा अर्थ होतो. तत्त्वज्ञानाला इंग्रजी शब्द Philosophy असा आहे. म्हणजे philosophy हा शब्द लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. ते म्हणजे philos बरोबर love म्हणजे प्रेम आणि Sophia या शब्दाचा अर्थ ज्ञान- wisdom बरोबर love of wisdom- शहाणपण. या दोन लॅटिन शब्दापासून फिलॉसॉफी हा शब्द तयार झाला आहे त्याचा अर्थ ज्ञानाबद्दल प्रेम असा होतो. व्यापक अर्थाने सत्याचे उपासक, सत्यशोधक, शाश्वत, चिरंतर

ज्ञानासाठी धडपडणारे उपासक असे मानले जाते.अंतिम, संपूर्ण, सर्वव्यापी, सनातन सत्याचा शोध घेणे म्हणजे तत्त्वज्ञान होय असे आपणास सांगता येते. विश्वाचे रहस्य, विश्वरचनेचे मूळ शोधणे, त्यावर प्रकाश टाकणे, सनातन नियम शोधणे, सृष्टीकरता, सृष्टीचे मूळ यासंबंधी जिज्ञासा, कुतुलातून तत्त्वज्ञानाचा जन्म, जीवनाचे प्रयोजन, सार्थक, जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तत्त्वज्ञान होय. अर्थात तत्त्वज्ञान सखोल व्यापक व दुर्गामी असते. दीर्घकाळ चिंतन व मनन केल्यानंतर दीर्घकाळ टिकणारे जे अनुभव ज्यामूळे ज्ञान प्राप्त होते ते ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान मानले जाते. त्यामुळे तत्त्वज्ञानाला शस्त्रांचे शास्त्र असे म्हटले जाते. तत्त्वज्ञान समग्र जीवनाचा सातत्याने विचार करते. ज्ञानाचा विचार कोठे करावा व कसा करावा हे सांगते.

तत्त्वज्ञान व मानवी जीवन या संदर्भात विचार केला तर तत्त्वज्ञान समग्र मानव जातीचा स्थल व काल या मर्यादांच्या पलीकडे मानवी मूल्य व आदर्श प्रतिपादन करते.अध्यात्मिक शांती व समाधान मिळवून देते. तत्त्वज्ञानाचे सिद्धांत, चिरंतन शाश्वत जीवन मूल्यावर आधारलेले असतात. मानवाला सुखात व आनंदात संयम कसा राखावा व दुःखात शांती प्राप्त कशी करून घ्यावी हे सांगते. तत्त्वज्ञान मूल्य व आदर्श यांच्यावरती निष्ठा ठेवते.तत्त्वज्ञान जीवनाचा अर्थ काय?ध्येय काय?परस्पर संबंध काय?जीवनात नैतिक मूल्यांचा संबंध काय?या विचारांना चालना देते.जीवनातील संघर्षाने, अपयशाने खचून न जाता आत्मविश्वासाने जीवनातील संकटाला सामोरे जावे, तत्त्वांनी मनुष्य खंबीर बनतो, तत्त्वावर निष्ठा ठेवतो.तत्त्वज्ञान व विज्ञानाचा विचार विज्ञान महत्त्वाचे आहे.विज्ञानाच्या प्रगतीने मानव चंद्रावर पोहोचला.विज्ञानाचे सिद्धांत सर्वमान्य आहेत. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत ज्ञानाची व्याप्ती विज्ञानाहून भिन्न असते, वरच्या दर्जाची असते.तत्त्वज्ञानाचे सिद्धांत पारखण्यासाठी मनाची गरज असते.तत्त्वज्ञानाने लावलेल्या अर्थाला, वस्तुस्थितीला सर्व मान्यता मिळेल असे नाही.विज्ञानालाही न सापडलेली कोडी व त्या कोड्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करते म्हणून तत्त्वज्ञान विज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे. विविध शास्त्रातून जे जे ज्ञान मिळविणे शक्य असते तेथे ज्ञान मिळण्याचा प्रयत्न करते त्या ज्ञानाच्या प्रकाशात विश्वाचे विशाल स्वरूप व त्यामध्ये मानवी जीवनाचे स्थान शोधण्याचा प्रयत्न करते. सर्व सामाजिक शास्त्रे, विज्ञान, भौतिक शास्त्रे इत्यादी सर्व नैतिक तत्त्वज्ञानाखाली येतात. तत्त्वज्ञान गुढ अर्थ शोधणारे शास्त्र म्हणून सर्व शास्त्रांचे मूलगामी शास्त्र आहे. प्रत्येक विषयाचे वेगवेगळे तत्त्वज्ञान बनले. तसेच प्रत्येक विचारवंताचे, वेगवेगळया धर्मसंस्थापकाचे तत्त्वज्ञान बनले आहे. त्यामध्ये बौद्ध, जैन, मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन इत्यादिंचा समावेश आहे.

बौद्ध धम्माचे संस्थापक गौतम बुद्ध यांनी तपश्चर्या करून जगाला दुःखापासून मुक्ती करण्याचा जो मार्ग शोधला तो ज्ञानमार्ग म्हणजेच बौद्ध तत्त्वज्ञान आहे.त्यामध्ये मूलभूत तत्व आणि तत्त्वमिमांसा यांचा समावेश होतो. बुद्धाच्या मृत्यूनंतर त्यांच्या शिकवणी बाबत काही विवाद निर्माण झाले होते.या विवादांचे समाधान करण्यासाठी एक परिषद आयोजित करण्यात आली होती. परिषद मगध जवळील राजगृह या ठिकाणी भरली.गौतम बुद्ध विषयी असलेली श्रद्धा व विश्वास, त्यांची शिकवण यांचे संकलन केले. या संकलनास पिटक असे म्हणतात. पिटक हे तीन आहेत त्यांना तिपिटक असे म्हणतात. त्यामध्ये बुद्धाची शिकवण म्हणजेच बुद्धाचे तत्त्वज्ञान सामावलेले आहे. अभिधम्म पिटकांमध्ये बुद्धाचा आध्यात्मिक दृष्टिकोन सांगितलेला आहे, विनय पिटकांमध्ये शिस्तीचे नियम सांगितलेले आहेत, सूत्त पिटकामध्ये बुद्धाने सांगितलेल्या गोष्टी व बोधकथा सांगितलेल्या आहेत. या तीन पिटकाच्या माध्यमातून बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची खरी ओळख होते. गौतम बुद्ध मूलतः शांत प्रवृत्तीचे व चिंतनशील होते. गौतमाची शिकवण चार आर्यसत्य,, अष्टांग मार्ग,पंचशील यामध्ये सामावली आहे.

चार आर्य सत्य मधील दुःख हे पहिले आर्य सत्य आहे. जग हे दुःखमय आहे.त्यामध्ये जन्म, जरा, रोग, निराशा, मृत्यू हे सर्व दुःखमय आहे. दुसरे आर्य सत्य हे दुःख समुदाय आहे. म्हणजेच दुःख समुदायाचे अचूक निदान करणे आवश्यक आहे.रोगाचे निदान केले जाते तसे दुःख निर्मितीचे निदान होणे आवश्यक आहे. सर्व दुःखांचे मूळ तृष्णा, वासनेत सापडते.तृष्णा व लालसा यापासून दुःख निर्मिती होते. दुःख विरोध हे तिसरे महत्त्वाचे आर्य सत्य आहे.रोगाच्या कारणाप्रमाणे ते दूर करणे आवश्यक आहे तसेच दुःखाचे कारण नष्ट करणे आवश्यक आहे म्हणून लोभ, तृष्णा नष्ट करावी म्हणजे दुःख समुदायनिर्मितीचे निरोधन करावे. स्वार्थ नष्ट झाला पाहिजे. तृष्णा नष्ट झाली पाहिजे. चौथे आर्य सत्य म्हणजे दुःख समुदाय निरोधन मार्ग होय. यामध्ये दुःख नष्ट करण्याचा मार्ग म्हणजे अष्टांग मार्ग होय. त्याचे पालन केल्याने दुःख नाहीसे होते.

निर्वाण हे जीवनातले अंतिम ध्येय असून अष्टांग मार्गाचा अवलंब केल्याने ते साध्य होते. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मात, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक ध्यान किंवा सम्यक समाधी हे आर्य अष्टांगिक मार्ग आहेत. याचे पालन केल्याने मानव चांगले जीवन जगू शकतो. गौतम बुद्धाने शील, समाधी व प्रज्ञा या गोष्टींना प्राधान्य दिले यालाच बौद्ध धम्माची त्रिरत्न असे म्हणतात. संयम, सदाचार व सन्मार्गाने जीवन जगावे हा मार्ग सर्व इच्छांचे मूळ नष्ट करून निर्वाण पदाला नेतो असे बुद्ध म्हणतात. बौद्ध तत्त्वज्ञानात अहिंसेला महत्त्वाचे स्थान आहे. सद्‌गुण व सदाचाराने निर्वाण पद प्राप्त होते.बौद्ध धम्मात उच्च -नीच भेदभाव नाही, ब्राह्मण, शूद्र, गरीब, श्रीमंत, वैश्य अशा सर्वच लोकांना आपल्या धर्मात प्रवेश दिला आहे.

पंचशील हे बौद्ध धम्मातील अत्यंत महत्त्वाचे तत्व आहे यामध्ये पाच नियम सांगितले आहेत. पहिला नियम अहिंसा संबंधित आहे. प्राण्याला ठार न मारणे, जीवमात्राच्या हत्या न करणे. दुसरा नियम सत्य बोलणे, खोटे न बोलणे, नेहमी सत्याने वागणे असा आहे.तिसरा नियम अस्तेय म्हणजे जे आपले नाही त्याबद्दल अभिलाषा बाळगू नये. चौथा नियम व्याभिचार करू नये आणि पाचवा नियम मादक पेयांचे सेवन करू नये म्हणजे अपरिग्रह होय. यामुळे मानवी जीवन सुखी आणि समृद्ध होते. हे बुद्धाचे तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान नंतरच्या काळामध्ये दोन पंथांमध्ये विभागले गेले ते म्हणजे महायान व हीनयान. पंथापेक्षाही त्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान महत्वाचे आहे.

बौद्ध तत्त्वज्ञान हे केवळ भारतापुरतेच मर्यादित राहिले नाही तर ते जगाच्या वेगवेगळया भागांमध्ये आज त्याचा प्रसार आणि प्रचार झालेला आहे. गौतम बुद्धांनी स्थापन केलेला धर्म म्हणजे बौद्ध धम्म होय. हा धम्म विज्ञानावर आधारित आहे. विज्ञान म्हणजे आपल्या सभोवती ज्या नैसर्गिक घटना घडामोडी घडतात त्याचे सत्य जाणणे होय. हे सत्य जाणून घेण्यासाठी आवश्यक असणारे मन, शरीर, निसर्ग आणि मानवी परस्पर संबंधित गुढ बाबींचे सूक्ष्म अध्ययन बुद्ध धम्मात आहे. समाजाने तर्कशुद्ध विचार करावा असा हा धम्म सांगतो. बुद्धाने ज्ञानातील विज्ञान जगाला सोप्या भाषेत सांगितले आणि म्हणूनच आधुनिक काळातील डार्विन पासून ते अल्बर्ट आईन्स्टाईन अशा विद्वानांना बुद्ध आजही प्रभावित करतात. लंडनमधील द इंडिपेंडेंट मधील एका रिपोर्टनुसार मानवी भाव-भावना व अभिव्यक्ती या विषयावरील विद्वान प्राध्यापक पॉल एकमॅन यांनी मांडलेल्या सिद्धांतानुसार असे सिद्ध केले आहे की, मानवी उत्क्रांतवादाचे जनक चार्ल्स डार्विन यांचे मानवी सहृदयता व नीतिमत्ता यावर विचार आणि बुद्ध धम्मातील तत्वे यामध्ये साधर्म्य आहे. विज्ञानाशिवाय धर्म हा आंधळा होय असं म्हणणारे नोबल पारितोषिक विजेते जगद्विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांचा सापेक्षतावाद व बुद्धाचा अनित्यवाद व कार्यकारण भाव या संबंधाचे महत्व विचार करायला लावणारे आहे. आज भारतात ज्ञान विज्ञानाच्या अफाट उपलब्धतेमुळे व

जगभरातील आदान प्रदानामुळे देव, स्वर्ग, नरक, चमत्कार इत्यादी भ्रमकल्पना विचार आता जगभरात मागे पडत आहेत. शिक्षणातली विज्ञान विषयाच्या अभ्यासाने नवीन वैज्ञानिक दृष्टी वाढीस लागत आहे. अशा ज्ञानकाळात मानवी उत्थानाचा भाव विचार जोपासणाराच व मानवी मनाच्या प्रश्नांची पारख व निराकरण करणारा खरा धर्म ठरेल. बाबासाहेब आंबेडकर सांगतात तशा उत्तम धर्माच्या कसोट्या काय असाव्यात त्याबद्दल ते म्हणतात, कोणताही धर्म नीतिमत्तेवर आधारलेला असावा, धर्मशास्त्रीय ज्ञानाशी सुसंवादी असावा, धर्मात नैतिक आचरणाचा आग्रही अंतर्भाव असावा, धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता ही समाजशील तत्वे असावीत, धर्माने दारिद्र्याचे गोडवे न गाता मानवाच्या उन्नयनाचे व सम्यक सुखाचे पक्षधर असावे. या कसोट्यानुसार सध्या प्रचलित धर्म निष्फळ ठरतात आणि आज नवीन धर्म निर्माण करतील असे महात्मे नाहीत या स्थितीत प्रचलित असलेल्या धर्मामध्ये बुद्ध धम्मच एक उत्तम पर्याय ठरतो. त्याचं कारण म्हणजे हा धम्म विज्ञानावर आधारित आहे, धम्म समानतेवर आधारित आहे, हा धम्म मैत्री वर आधारित आहे.असा जगातला कोणताच धर्म बौद्ध धम्मासारखा नाही. म्हणून भारतातील आणि जगातील ज्या ज्या लोकांना हा धम्म म्हणण्यापेक्षा या धम्माचे बुद्धांनी सांगितलेली तत्त्वज्ञान कोणत्याही मानवाला यशाच्या शिखराकडे तसेच सुख समृद्धीकडे नेणारे आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात बौद्ध धर्माच्या अनुयायांची संख्या वाढते आहे ती केवळ बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आधारेच असे म्हणावे लागेल.

निष्कर्ष:

1. बौद्ध तत्त्वज्ञान व बौद्ध धम्म हा विज्ञानावर आधारित आहे.
2. बौद्ध धम्म व बौद्ध तत्त्वज्ञान हे समतेवर आधारित आहे.
3. बौद्ध तत्त्वज्ञान व बौद्ध धम्म हा मानवतेला प्राधान्य देतो.
4. बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान हे प्रत्येक व्यक्तीला जीवनात उपयोगी पडणारे आहे.
5. बौद्ध तत्त्वज्ञान भारताने विशिष्ट समुदायाने स्वीकारलेले आहे कारण भारतामध्ये हिंदू धर्माचा पगडा जास्त आहे.
6. बौद्ध तत्त्वज्ञान विकासाकडे नेणारा महत्त्वाचा मार्ग आहे.
7. बौद्ध तत्त्वज्ञानामुळे व्यक्ती निर्वाण पदाला प्राप्त होते.

संदर्भ ग्रंथ:

1. बुद्धयान-नाग आणि आर्य संघर्ष बौद्ध धम्म: विज्ञानवादी धर्म, सिंहनाद प्रकाशन, नागपूर, वर्षे:40, अंक:01,जानेवारी-मार्च 2019
2. वैज्ञानिक युग और बौद्ध धर्म-डॉ. शिवकांत, गौतम बुक सेंटर, दिल्ली, प्रथम संस्करण 2015
3. शिक्षणशास्त्र-डॉ. दादासाहेब शिरगावे व इतर, निराली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2011
4. बौद्ध धर्म ही मानव धर्म- डॉ. भीमराव आंबेडकर, संकलन: डॉ. धर्मरक्षित, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली प्रथम संस्करण 2009

वैश्विक परिदृष्यातून कवी दिनेश काळे यांची 'विश्वशांती' कविता

प्रा. डॉ. प्रियदर्शनी वसंतराव देशमुख

(मराठी विभाग)

गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार जि.अमरावती

गोषवारा :

वैश्विक विचारांची मनामनात पेरणी आपल्या साहित्यातून करणारे प्रथितयश कवी दिनेश काळे यांची 'विश्वशांती' कविता आहे. जगाला शांतीची गरज असून सगळीकडे शांती प्रस्थापित व्हावी, या वैश्विक विचारांतून वास्तव परिस्थितीच्या दर्शनातून कवितेतील विचारांची आशयघनता लक्षवेधी ठरते. दिनेश काळे यांच्या 'समर्पित' या कादंबरीत आलेली 'विश्वशांती' ही कविता मनातील भावस्थितीचे अचूक भावचित्र प्रतीक-प्रतिमांतून अभिव्यक्त करते. कविमनातील वैश्विक विश्वास विश्वशांतीचे प्रकटीकरण करताना काव्यातून प्रगटणारा आशय तेवढाच मनोवेधक आणि मनातील भावस्थितीचे पदर उलगडणारा आहे.

बीजशब्द : शांती, विश्वशांती, सार्वत्रिक विचार, माणुसकी, प्रगतीचा, विश्वबंधुत्वाचा, वसुधैव कुटुंबकम्, शांतिदूत, ओम शांती इ.

प्रस्तावना:

सुप्रसिद्ध साहित्यिक कथाकार, कादंबरीकार, नाटककार, बालसाहित्यकार आणि कवी म्हणून दिनेश काळे यांचा मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय असा नावलौकिक आहे. कवी दिनेश काळे यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतून लेखन करताना उर्दू भाषेचादेखील त्यांचा व्यासंग प्रकटतो. 'विश्वशांती' ही कविता अल्पावधीतच इंग्रजी, गुजराती आणि कन्नड भाषेत अनुवादित झालेली आहे. अर्थात या कवितेचा विचार मानवाच्या कल्याणाचा, प्रगतीचा, विश्वबंधुत्वाचा, सार्वत्रिक, मांगल्याचा असून यामुळे संपूर्ण विश्वात शांतीची कशी आवश्यकता आहे आणि त्यासाठी शांतिदूत हवा आहे यावरही कवी दिनेश काळे यांनी 'विश्वशांती' या कवितेतून टाकलेला प्रकाशझोत लक्षवेधी ठरतो.

दिनेश काळे यांच्या कादंबरीलेखनाचा एकूणच प्रवास उल्लेखनीय ठरतो. अर्थात, त्यांच्या सोळा कादंब-यांतून तो अभिव्यक्त होतो. त्यांच्या कादंबरीलेखनाचे विषयही तेवढेच वैविध्यपूर्ण असून समाजभान असलेला हा साहित्यिक ग्रामीण, शहरी आणि महानगरीय जीवनावर सहजपणे भाष्य करतो. त्याचबरोबर वैश्विक विश्वशांती चा संदेश त्यांच्या संवेदनशील कविमनाची आशयघनता दर्शविते. 'विश्वशांती' या कवितेतून त्यांचा वैश्विक असा सकारात्मक विचार जीवनाकडे बघण्याची भूमिकाही सांगून जातो. कविमनातील वैश्विक विश्वशांतीचा, तर कधी विश्व प्रेमातील अस्वस्थता कविच्या लेखनशैलीतून मनाला भावणारी, मानवी मनात विचारांची अर्थात शांतीची बीजं रूजविणारी आणि चिंतनाचा सूर घेऊन येणारी ठरते. दिनेश काळे यांच्या सगळ्याच कादंबरीत कविता येत नाही, तर चार कादंब-यामध्ये कविता अल्पक्षरांतून व्यापकता आणि आशयसंपन्नता घेऊनच प्रकटते.

